


दिवाळी अंक १९६५ : किं. १ रु.

# माणस




# आम्ही अंतरीची ज्योत सतत प्रज्वलित ठेऊं!

भरभराटीचा काळ असो अगर संकट काळ असो भारतीय रेल्वे निस्वार्थ सेवेची ज्योत सतत प्रज्वलित ठेवील. प्रवासी, माल, त्याचप्रमाणें देशाची भरभराट व स्वातंत्र्य या साठीं आवश्यक असणाऱ्या गरजेच्या वस्तू यांची वाहतूक अविरतपणें करून राष्ट्राचा जीवन प्रवाह अखंडित राखील.

यंदाचे दिपावली निमित्तानें आम्ही आमच्या आश्रयदात्यांचे सहकार्यानें भविष्य काळांत आमच्या समोर असलेले भव्य उद्दिष्ट सर्वंकषपणें साध्य करूं अशी प्रतिज्ञा पुनश्च करीत आहोंत.

मध्य
व
पश्चिम
रेल्वे द्वारा
प्रसारित

MARATHI




कांही प्रसंगीं जबाबदारी टाळण्याचा मोह अनिवार्य होतो पण जीवनाला धैर्यानें तोंड देऊन पडणाऱ्या जबाबदारीची तरतूद करणें हेंच जास्त श्रेयस्कर नाहीं का?

कौटुंबिक गरजांसाठीं तुम्हीं नियमितपणें आवश्यक बचत करीत असालच.

बँक ऑफ इंडियामध्यें बचत योजनेसाठीं कांहीं विशेष सवलती आहेत:

■ सेव्हिंग्ज बँक खातीं • प्रतिवर्ष ४% प्रमाणें व्याज • प्रतिवर्ष १५० चेक्स • पैसे काढण्यासाठीं पूर्वसूचना अनावश्यक

■ मुदतीच्या ठेवी • प्रतिवर्ष ७½% पर्यंत व्याज.

RAAS/B/56 MAR

दी बँक ऑफ इंडिया लि.

टी. डी. कंसारा, जनरल मॅनेजर




वर्ष पाचवे : अंक दहावा-बारावा : १५ ऑक्टोबर १९६५
किंमत सव्वा रुपया : वार्षिक वर्गणी आठ रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

वाचक, विक्रेते
आणि जाहिरातदार

.........

## दी पा व ली शु भे च्छा

संपादक, 'माणूस'

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# स्मृती....

## सेकंड लेफ्ट. रेगे यांनी आपल्या बहिणीस व बहिणीच्या यजमानांस आघाडीवरून पाठविलेली दोन पत्रे

: १ :

प्रिय नलूताईस
सप्रेम नमस्कार

2 RAJ-RIF
C/o 56 APO
12 Th Sept. 65

पत्र लिहायला जरा उशीर झाला, कारण मला अंबाला सोडून ८ दिवस झाले. माझे सगळे सामान अंबाल्यातच आहे. माझ्याबरोबर फक्त एक Extra Dress, एक Baniyan, Underwere, रुमाल वगैरे.

काल जरा लढाईत ज्याला lull in the Battle म्हणतात ते मिळालं. माझ्या Friend ने लेटर्स आणून दिली म्हणून मी तुला आता लिहू शकलो. २८ ता. चा ' महाराष्ट्र टाईम्स ' मला मिळाला. Thanks very much ! नंतरचा अंक कुठे गेला कुणास ठाऊक ? मिळेल आता. जरा उशीर लागेल एवढेच !

बाकी सर्व ठीक आहे. आयुष्यात लढाईंत भाग घ्यायचा अतिशय उत्साह होता व ती इच्छा पुरी झाली. Attack करून झाला. दिलेले object capture झालं. Coy ने नाव मिळवले. दोन-चार V. C. ची सोय (आता माहीत आहे ? जरा Trench च्या बाहेर येऊन तुला पत्र लिहीत होतो. एकदम चार बॉम्ब येऊन पडले. मग काय ! एका उडीत परत Trench मध्ये) झाली. १२–१२ तास Shelling मध्ये, Trench मध्ये पडून काढलेत. सगळी लढाईची हौस फिटली. आता (रेडिओ न्यूज) Radio News प्रमाणे भारतीय सेनेने तर फारच कमाल केली. आमच्या समोरच्या शत्रूजवळ आता Amn वगैरे वगैरे संपलेले दिसतात. कारण आता एखादंदुसरा गोळा दिवसातून येतो. बाकी खरी मजा लढाईतच आहे. गेल्या आठवड्याच्या ह्या एकंदर कहाणीवरून मला एवढी खात्री झाली की, Pakistan जवळ माझ्या



सगळी लढाईची हौस फिटली...
—सेकंड ले. रेगे
*

साठी एकही बॉम्ब किंवा गोळी बनवलेली नाही.

आणि काय मुंबईची हालचाल ? गणेशोत्सव कसा काय झाला ? पुण्यात गणेशोत्सव भलत्याच पद्धतीने साजरा केला ! आम्ही अंबाल्यात चांगला साजरा केला. Variety Programme नंतर पु. लं.च 'अम्मलदार.' तिसऱ्या दिवशी जेवण. मस्तपैकी श्रीखंडपुरी, आळूची भाजी. भलतीच मजा आली. बऱ्याच दिवसांनी चांगले जेवण मिळाले.

भाऊजींची तब्येत कशी काय आहे ? Tour काय म्हणतेय ? अतुल, सुनील, मुकुंद काय म्हणतात ? पत्र जरूर पाठव

श्री

: २ :

Batlle Field
2 nd RAJ. RIF.
C/o 56 A. P. O.
16 th Sept. 65

ती. काकांना,

सप्रेम नमस्कार. आपले ५ ता. चे पत्र कालच मला मिळाले. वाचून फारच आनंद झाला. मला नेहमीच एका गोष्टीचे वाईट वाटते, ते म्हणजे मला चांगलं पत्र लिहिता येत नाही. परंतु आता ह्या पत्रात जसं घडलं तसं लिहिण्याचा प्रयत्न करतो.


आम्ही ४ ता. ला...... सोडले. एप्रिल–मे मध्ये ज्या ठिकाणी होतो, त्या भागाची आम्हाला चांगलीच माहिती असल्याने आम्हाला परत तोच भाग देण्यात आला. इथं आमचं काम होतं एक पूल काबीज करणं व शत्रूला या दिशेनं पुढं न सरकू देणे. माझ्या Platoon ला नवीन कर्नल आल्यामुळे माझ्या Platoon ला मागे सहारा देण्यासाठी ठेवण्यात आले व एक Platoon पुलावर कब्जा करायला व दुसरी Platoon त्याच्याच बाजूला असलेल्या–एक दोन बांधांवर जाणार होती. जी Platoon पुलावर 'हमला' करणार होती, तिला आपण 'A' म्हणू व बांधावर 'हमला' करणारीला 'B' म्हणू. 'A' व 'B' 'हमला' करायला जाताना आम्ही त्यांना 'सहारा' देणार होतो. मी Anti tank guns चा course नुकताच करून आल्यामुळे मला त्या Platoon चा commander नेमलं. रात्री चारला हमला होणार होता. म्हणून तीन वाजल्यापासूनच आम्ही शत्रूवर Shelling करायला सुरवात केली.

शत्रूच्या हातात एक मनोरा होता. तो खूपच उंच होता व त्यात त्यांचे एक Observation Post होते. तो आमच्यावर Accurate shelling करत होता. कारण त्याला आमचे मोर्चे फारच चांगल्या तऱ्हेने दिसत होते. तर तो मनोरा पाडण्याचं महत्त्वाचं काम मला देण्यात आलं. एक गन मी fire करत होतो व दुसऱ्यावर एक हवालदार होता. आम्ही आठ गोळे fire केले. तो मनोरा कसा बांधलाय कुणास ठाऊक. आमचे सर्व गोळे आरपार निघून गेले; पण मनोरा जसाच्या तसाच. तेवढ्यात त्या मनोऱ्यावर असलेल्या M. M. G. ने fire सुरू केले. मग Casualties जास्त होणार म्हणून आम्ही guns हलवायच्या प्रयत्नाला लागलो. तेवढ्यात एक गोळी माझ्या एका जवानास लागली. पण बाकी दोन्ही guns व ८ माणसे सुरक्षित आली. नंतर आमच्या guns नी तो मनोरा काही पडत नाही, हे पाहिल्यावर आम्ही आमच्या guns मागे घेतल्या 'A' Platoon नं हमला केला. त्यांनी पूल ताब्यात घेतला, साधारण सकाळी ८ वाजता ! ९–३० ला शत्रूनं tanks च्या मदतीनं Counter attack केला. Tanks पुढं गरीब बिचारी infantry काय करणार ? त्यांचा पराभव झाला. 'A' Platoon ची फार हानी झाली.

त्याच दिवशी दुपारभर चिक्कार Shelling झालं. ह्याचा परिणाम म्हणजे सर्व दुपार पंजाबच्या गरमीत व वाळूत ३' × २' × १½' खड्यात काढली. जवळजवळ ८ तास वरून Shelling चा सतत वर्षाव !! आमच्या

[ पृष्ठ १७५ वर पाहा ]

# वॉशिंग्टनचा दुतोंड्या



आमची शस्त्रें चीन विरुद्ध
वापरायची बरं कां बाळ!
शू: शू:
अहो पण ती
आमच्याच विरुद्ध
वापरली की!
राजेंद्र गायकवाड

# लंडनचा ठग



रशियन जादूगार


काश्मीर हा भारताचाच
'अविभाज्य' भाग
आहे
शास्त्री आणि अयूबने
वाटले तर रशियात
येऊन काश्मिरबद्दल
वाटाघाटी कराव्यात!
राजेंद्र गायकवाड




## अशांतीच्या येथे

**वासंती गजेंद्रगडकर**

कुणाच्या हातांनी कधी घडविले अंबर थिटे
प्रवासी पक्ष्यांना हळु नकळता खूणहि पटे
अशांतीने तेथे घर सजविले अभ्रपर्णी
प्रवासी पक्ष्यांची जवळ उडता नजर गोठे
अशांतीच्या येथे नवल घडले काय वर्णू
अशांतीच्या पोटी मन उपजले जहर मागे
अशांतीच्या होत्या कितीक गडणी रडत जमुनी
कुणाचे कोणाशी जुळत असती मरण धागे
प्रवासी पक्ष्यांनी पंख मिटले वेदनेचे
अशांतीच्या बाळा शुभक्षत दिले अमृताचे
इथे जन्मावेळी गडद उठली प्रळयरेखा
चितेच्याही भेटी मन उतरले लक्तरांचे
चिताभस्माखाली अजुन जळतो अंतरात्मा
मनाच्या शून्याला चिरत सुटती आर्त हाका
□

## शापातून प्रवास

**सुधाकर शं. देशपांडे**

ओठांवरती थेंब चांदणे
आषाढातिल रात्र
फुलाफुलांनी मला जखडिले
ऐसा मी परतंत्र
कुठे कुणास्तव जीव उजळतो
दवात भिजली वाट
रुपास लाजुन तुझ्या थबकते
अंधारात पहाट
पंख अधूरे उडे पाखरू
एकलकोंडे श्वास
फुटलेले हे ऊर चालला
शापातून प्रवास
□

## इन्ग्रिड बर्गमन

### ग्रेस

आषाढातील भर्जरी मेघांसारखे पूर्ण ऐहिक
डोळे घेऊन तू आलीस
नेस्तनाबूत झालेल्या या साथीच्या गावात
विश्वरचनेतील बर्फाचा शुभ्र पहाडी अहंकार
या गावात आणून सोडलेला
जशा अनेक बाबी किंवा अरण्यातील निर्मनुष्यतेच
पारावर पडलेली हजारो फुले . . .
हजारो फुले तशी हजारो घरे अनामिकांच्या
या प्रदेशात
तुझा घोडा तू मोकळा सोडलास शिशिराच्या
निर्विघ्न कुरणात; तो मध्येच दिपून पाहतो
एका नसलेल्या ध्रुवाच्या दिशेस झिजणाऱ्या
तुझ्या देहास
तुला वाटतात तितके सोपे नसतात तुझे अश्रु
पाण्याच्या सलिल संग्रमात हलतात जखमी
ख्रिस्ताच्या घंटा रात्रंदिवस . . .
गावावर साचलेल्या बर्फातून महानिनादांची
अज्ञात पर्वणी जाऊ लागते . . .
तसे माझ्या झोळीत काही नाही
जाण्यायेण्याच्या चित्रलिपीत झाडांचा एखादा
संगमरवरी सांगाडा
तोही चांदण्यांनी शोषून घेतलेला
फक्त एवढेच : निःशब्द भासांच्या रचनेला
लटकलेले हे स्टेशन आणि संवेदनांच्या
आवर्तांना झुगारून कोण्या मावळत्या संताला
तू दिलेले एकाकी आलिंगन

□

## घालू कोणाला साकडे ?

मरायचे केव्हातरी
हेचि जिण्याचे सार्थक
रात्र पोटात घेऊन
रोज उगवतो दीस...
कधी हसावे, करून
भलावण चेहेऱ्याची
दुःख भुताखेतासम
सदा बसे मानगुटी !
नको नुसता आकांत
कोणी ऐकायाचे नाही
ऊर बडवू नकोस
कोणी पहायाचे नाही
तुझे बीळ मात्र तुझे
थोडी जमवी लाकडे
उद्या मेलासबिलास—
घालू कोणाला साकडे ?



**शरद साटम**

## मुरळी

देव तुझा मल्हारी पण तू मदनाची गऽ मुरळी
भंडाऱ्याच्या भाळावरती नाचविशी बट कुरळी !
नाकापाशी पदर...पोचते नजर तुझी वेशीत
जेजुरीत असतानाही तू जमविशील पालीत
नाचतेस भर उन्हात तेव्हा फुलतो गाली पळस
धुंद पापणीवरी तोलशी देवाचाही कळस !
यळकोटातील शब्दफेक तव गोळिबंद अन् गरती
अंधारातही खणकन वाजे असा रुपय्या सुरती
देवदासी तू ! नकोस चाखू पाणी गावचं बारा
तुझ्यासाठी मी फिरूनही येइन चौऱ्यांशीचा फेरा !

**श्रीरंग विष्णू जोशी**



# ऐसी अक्षरे...

गोपीनाथ तळवलकर

'**मा**णूस 'च्या दिवाळी अंकातला हा काव्यगुच्छ ' माणूस 'च्या परंपरेस धरून आहे. म्हणजे त्यात योग्य निवड आहे, चांगली अभिरुची आहे आणि नव्या-जुन्यांचा सन्मान आहे. शरद साटम यांच्या एरवी बऱ्यापैकी असलेल्या कवितेत ' थोडी जमवू लाकडे ' एवढीच ओळ जरा अप्रासंगिक वाटली ! पण या कवितेतील इतर प्रतिमा उत्कट आणि सुबोध आहेत; म्हणून एवढ्या ओळीचा अपराध माफ करायला कुणीही तयार होईल. बाकी कुठे कुठे दुर्बोधता आहे, पण अनौचित्य नाही. दुर्बोधता ही आपण आता धरूनच चालतो. कारण नवकवितेचे ते एक आवश्यक अंग आहे !

पण अंतरीचे हृद्‌गत फार गुंतागुंतीचे आहे, गोंधळाचे आहे आणि ते स्पष्ट करण्यास शब्द अपुरे पडतात, म्हणून आलेली दुर्बोधता वेगळी आणि टूम म्हणून आणलेली दुर्बोधता वेगळी. कवी आविष्कारासाठी धडपडतो आहे, आपले हृद्‌गत जास्तीत जास्त स्पष्ट करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतो आहे, हे रसिकाला पूर्ण पटले म्हणजे काही दुर्बोधता क्षम्यच नव्हे, तर रम्य ठरते. ' अशांतीच्या येथे ' या वासंती गजेन्द्रगडकर यांच्या कवितेत असे झाले आहे. यातली संदिग्ध वेदना अंधुकपणे जाणवते, पण स्पष्ट होत नाही. शिखरिणीसारखे जुने वृत्त कवयित्रीने कुशलतेने हाताळले आहे, पण दोन यती संपल्यानंतर दोन लघूंऐवजी एक गुरू आणि एक गुरूऐवजी दोन लघू अशी सवलत घेतली आहे. हे मुद्दाम नवीन एखादे वृत्त बनविण्यासाठी असेल म्हणावे, तर त्यात सुसंगती नाही. नवकविता ही सूक्ष्मतर सूक्ष्मतम वर्णनात शिरते. ' शून्याला चिरणे ' हा असाच प्रयोग आहे. ' अमृताचे शुभक्षत ' मात्र माझ्या लक्षात आले नाही ! पण कविता नादावणारी आहे, हे खास.

' समाधी ' ही मधुकर कुलकर्णी यांची कविता मला विशेष आवडली, ती त्यातल्या धवधवीत शब्दप्रयोगांसाठी, आर्ततेसाठी. प्रतिमा नवीन आहेत, पण सुबोध आहेत. निदान प्रयत्न केल्यावर तरी लक्षात येतात. दीपस्तंभावरील दिवा हा तृतीय नेत्र कल्पिण्यात कुलकर्णी यांनी बहार केली आहे. काव्यकृतीची बाह्यजगात प्रशंसा होत असता अंतर्विश्वात तिच्या रचनेसाठी काय किंमत द्यावी लागली, याचा हा आविष्कार परिणामकारक वाटतो. मुक्त छंदाऐवजी नियमबद्ध छंदात तो

## तीन वर्षांपूर्वी . . .

१९६२ च्या ' माणूस ' दिवाळी अंकात आम्ही निवडक एकोणीस कविता व त्यांवरील टीका प्रसिद्ध केली होती. या रसग्रहणाने संमिश्र स्वागत झाले. वाचकांनी मात्र याचे निर्भेळ स्वागतच केले.

या वर्षी सुप्रसिद्ध काव्यरसिक श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी या विभागाचे रसग्रहण केलेले आहे– सं.

* * *

असता तर मला तरी अधिक आनंद झाला असता.

या सर्व कवितांत संपूर्ण कळणारी आणि धुंद करणारी कविता मला ' मुरळी ' ही वाटते. श्रीरंग विष्णू जोशी यांनी लोककाव्याचा साज वर्ण्यविषयावर चढविला आहे. ' मुरळी-कुरळी, ' ' पळस-कळस ' अशी देवदासीच्या शब्दाप्रमाणे खणकन् वाजणारी सुरती रुपयासारखी यमके हे या कवितेचे विलोभनीय वैशिष्टय ठरेल. शृंगारात जोस आहे, उत्कटता आहे. कविता लौकर संपली याची चुटपुट लागते. याहून तिचे यश आणखी कोणते सांगता येणार ?

' इन्ग्रिड बर्गमन ' या विषयावर ग्रेस यांनी लिहिलेली कविता अगदी या उलट. सौंदर्याचा मादकपणा (दाहकपणा म्हणा) या दोन्ही विषयांत सारखा. मात्र एक कडेकपारीच्या मंदिरात राहणारी अप्रसिद्ध देवदासी, तर दुसरी जगविख्यात अभिनेत्री. पण प्रेमिकाला दोघींचेही आकर्षण तितकेच उत्कट. ग्रेसनी ख्रिस्ती वातावरणाची चौकट बर्गमनच्या स्तोत्राला घातली आहे. यांतल्या काही उल्लेखांना बर्गमन्च्या जीवनातील काही गोष्टी ठाऊक असण्याची जरूरी भासते. त्या दृष्टीने रसग्रहणाला मर्यादा पडतात. सामान्य रसिकाला एवढेच प्रतीत होईल, की ही एक रूपगर्विता असून, जगातील असंख्य माणसांना हिने वेड लावले आहे. काही काही ओळी फार अर्थगर्भ असाव्यात, असा भास होतो. ( अर्थ लक्षात न येऊनही ) पण नवकवितेत अशी स्थळे नेहमीच आढळतात. काही ओळी नादमधुर असूनही अर्थ मात्र संदिग्धच राहतो. ही कविता अशीच आहे, पण एकंदरीने ' मावळत्या संताला आलिंगन देणारी ' ही लावण्यवती फार प्रभावी आहे, एवढा ठसा मनावर ठेवून ही कविता जाते.

' मागणे ' ही सय्यद अकबर यांची कविता तशी सुस्पष्ट आहे. गूढ–धूसर असे तीत काही नाही. साजशृंगार करून संकेतस्थली आलेल्या एका प्रणयिनीची मीलनाच्या अभावी कशी निराशा झाली, याचे हृद्य चित्रण आहे. विषय सनातन आहे, तसाच चिरंतन आहे. विप्रलंभ शृंगार हा कवींचा आवडता विषय असतो. सय्यद अकबर यांनी स्वभावोक्तीवरच भर दिला आहे. प्रेमी हृदय फार आशावादी असते. आज झाले तसे पुनः होऊ नये, एवढेच त्याचे मागणे असते. शेवट चांगला आहे.

या कवितेत विशेष काही नसून, नीटनेटकेपणा आणि नवीन टूम साधण्याचा अभाव यांमुळे ती वाचनीय झाली आहे.

सुमन करमरकर यांना 'दुपार' या कवितेत काहीतरी व्यथा सांगायची आहे, असें दिसते. नवकवितेत आता संस्कृत–मराठी आदर्श काव्यांप्रमाणे काही संकेत, उपमा रूढ होऊन गेल्या आहेत. हा साचेबंदपणा फार लौकर आला. काहीतरी कोरणे, कशावर तरी नक्षी काढणे, एकटेच कुणीतरी भराऱ्या मारणे या क्रिया बहुधा यायच्याच. पंख, गारवा, अर्थहीनता या कल्पनाही हटकून डोकावतात, तरीही काहीसा सुबोधपणा या कवितेत आहे, हे अभिनंदनीय म्हणावे लागेल. यात आशय फार स्पष्ट होत नसला, तरी वातावरण आणि 'मूड' (mood) बराच आकलनीय वठला आहे. आशा लिमये यांचा 'हिशेब' फारसा गुंतागुंतीचा नाही. प्रेमात एक व्यक्ती सर्वस्व ओतीत असते. इच्छा असूनही प्रतिसादाचे कोष्टक जमतेच असे नाही. असेच काहीसे चित्रण 'मी चिरयात्री' या सुधा कुलकर्णी यांच्या कवितेत आहे. या कवितेतल्या प्रतिमा फार सुस्पष्ट आहेत. प्रेम हा एक न संपणारा प्रवास आहे. सोबत मिळतेच असे नाही. मिळाली तरी ती सुटेल कुठे, याचा नेम नसतो. शेवटी स्वत:ची प्रेमभावना आणि निर्मिलेले जग हेच आपले खरे साथी असते. प्रथम ज्या वासंती गजेन्द्रगडकर यांच्या कवितेचा उल्लेख केला, त्यातलेही चित्रण अशाच स्वरूपाचे; पण सुधा कुलकर्णी यांनी वेदनेच्या चित्रणाला आत्मनिष्ठेची बैठक दिली; तर गजेन्द्रगडकर तिला तात्त्विक बैठक देतात. सुधाकर देशपांडे यांचा 'शापातून प्रवास' याच वेदनेने भारलेला आहे. हाही 'चिरयात्री'च आहे, पण याच्या दु:खात स्पष्टता आहे. प्रेमगीतांतली आर्तता बऱ्याच ठिकाणी खरी वाटते. या गीताचे शब्दरूप आधुनिक असले तरी त्यातली भावना चिरंतन आहे. हा काव्यगुच्छ प्रातिनिधिक आहे. नवकवितेचा थाट त्यावरून कळून येईल. नवकवितेची चांगली वैशिष्टये म्हणजे सत्काव्याचे गुण त्यात बऱ्याच प्रमाणात आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.

● ●

[ आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या पुष्कळच असते. कवितासंबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने व्हावयास हवा, तसा होऊ शकत नाही. या अंकातील उपक्रमाप्रमाणेच पुढील वर्षभर, रसग्रहणासह आम्ही काव्य प्रसिद्ध करणार आहोत. या दृष्टीनें १–९–६६ पर्यंतच्या कवितांची निवड झालेली आहे.

यामुळे यापुढे येणाऱ्या कवितांच्या निर्णयाला व प्रसिद्धीला वर्षभराचा विलंब लागेल, ही गोष्ट गृहीत धरूनच कविता पाठवाव्यात, ही विनंती. —सं. ]

## मी चिरयात्री

### सुधा कुलकर्णी

कधी तुझे शब्द, येती घेऊन वादळ
कैफ चढल्या मनाची क्षणी होई पानगळ

बांधलेल्या घरट्यावर, शिंपिलेस तू श्रावणउन
कुठे तुझे धुंद गीत का बसले पंख मिटून

'मी माझ्यातली अशी, तू नेवोनी दूरी
डोळ्यांत घेऊन वाट मी चालते अनवाणी

हा अनंत प्रवास .... मी चिरयात्री
मंतरल्या स्वप्नांवर सरायच्या का रात्री ...

□

□

□

## समाधी

### मधुकर कुलकर्णी

" कित्ती सुंदर
लिहिता कविता !"

मायावी शब्द
कानी घुमता
अंधाऱ्या सांदीतले
वेटोळे सुटते
उपाशी अहंता
वळवळू लागते !


सळसळ करते
पायांत अडखळते
पुढचे पाऊल
जागीच रोखते
झिंजाडू लागताच
धोंडशीर फोडते
मुंग्यांची रांग
मेंदूत शिरते !

विषाचे समुद्र
रक्तात उसळतात
थेंबाथेंबात कालिया
थैमान घालतात
झेंडू फुटले जीवन
वादळात सापडते
दिशाही काळोखात
खडकावर कोसळते !

अचल दीपस्तंभ
हसत उभा आहे
कपाळीचा ज्ञानडोळा
लुकलुकतो आहे
त्याच अंधुक प्रकाशात
फुटके अवशेष शोधतो आहे
पुन्हा सांधून, नव्या प्रस्थानाचा
संकल्प सोडतो आहे !

शुभ श्रीकारसमयी
स्पर्श नको अहंतेचा
कृष्णार्पण साऱ्या कृति
ध्वज डुलो समाप्तीचा
माथी चढता कळस
गावी गौरवाची नांदी
पाळण्यात बांधावी का
उगा आधीच समाधी ?

□ □ □ □



## दुपार

गुदमरलेली दुपार
एकटीच थबकते
सावल्यांच्या गारव्यात
उसासणारे आकाश

उगाचच पेंगते
ढगांच्या थव्यात
रुद्ध वारा कोरतो
अर्थहीन नक्षी

झाकळलेल्या तळयात
आणि एक धार
धरणीवर झेपावून
बुडून रहाते पंखात

**कु. सुमन करमरकर**

## मागणे

ज्याची भिती, झाले तेच
ज्याची नव्हती गरज
आस व्याकुळली आता
वाया गेलारे, हा साज...
वाट पाहूनी थकले
जीव डोळयांत ओतला
तुझ्या भेटीच्या लोभाने
जप नामाचाहि केला...
नाही काहीच ठेपले,
आता पाहण्यात वाट
नको वाया धाडू माझा
अरे उद्यातरी थाट...

**सैय्यद अकबर**

## हिशेब

तुझा माझा हिशेब होता
लाखांचा–हजारांचा
हिरे-माणके देऊन घेऊन
हिशेब कधीच झाला नव्हता
लाखांनी देत देत
मी हजारो होते घेत
मला तेही नको होते
पण तू देत होतास
एक दिवस तू आलास
हिशेब संपवू म्हणालास
देणं मी एकच पैसा
जो देवासाठी दिला होतास
तोहि देईन पुढील जन्मीच
हिशेब पुरे या जन्मीचा !

**आशा लिमये**

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणे २.


**आता कोदंड घेउनि हाती । आरूढ पा इये रथी ।**
**देई आलिंगन वीरवृत्ती । समाधाने ॥ —श्रीज्ञानेश्वरी.**

पाकिस्तानने भारतावर आक्रमण केल्यामुळे, आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी आपल्या शूर जवानांनी प्राण पणाला लावून रणांगणावर मर्दुमकी गाजवून शत्रूला धूळ चारली, यावद्दल भारतीय जनता जवानांशी सदैव कृतज्ञ राहील. या कसोटीच्या वेळी सर्व भारतीयांनी एक होऊन आपली सारी शक्ती जवानांच्या पाठीशी उभी करून त्यांना साथ दिली व राष्ट्राच्या अभेद्य एकजुटीचा प्रत्यय आणून दिला. यापुढे युद्धसाहित्यापासून तो थेट अन्नधान्यापर्यंत सर्वस्वी स्वावलंबी होणे हे उद्दिष्ट साधण्यासाठी आपण अविश्रांत झटले पाहिजे. आपण सारे राष्ट्राकरिता आहोत या भावनेने आपल्या वाट्याला आलेली कर्तव्ये चोखपणे बजावून आपले उद्दिष्ट साधण्यास सहाय्य करू या. सिंडिकेटही आपल्या कारखान्यातून साखरेचे व स्पिरीटचे जास्तीत जास्त उत्पादन वाढवून देश बलवान व स्वावलंबी करण्यातील आपला वाटा उचलीत आहे.

आपल्या शूर जवानांनी सीमोल्लंघन केलेच आहे. दिवाळी व नूतन वर्षानिमित्त जवानांना व जनतेला शुभेच्छा.

**गो. श्री. वाळिंबे**
बी. कॉम्.
ऑफिशिएटिंग मॅनेजर

**शं. ल. लिमये**
बी. एस्सी., एल्एल्. बी., वकील
अध्यक्ष




# माझे पौष्टिक जीवन

(कडकट्ट कळकट्ट)

पोष्ट हापीस ही एक अजब गोष्ट आहे. तिथे पब्लिकसाठी म्हणून ठेवलेल्या टाक-दौतीपासून ते आतल्या पोष्टमास्तरापर्यंत प्रत्येक स्थिरचरावर कसला तरी निराळाच शिक्का मारलेला असतो. तो पोष्टाच्या इतर कुठल्याही शिक्क्याप्रमाणे वाचता येत नाही. फक्त त्या शिक्क्याचे अस्तित्व जाणवते. पोष्टात नोकरीला घेताना उमेदवारांना त्यांच्या चेहऱ्यावरचे काही विशिष्ट भाव किंवा चेहऱ्यावर कुठल्याही भावांचा अभाव पाहून निवडले जात असावे. इतर सरकारी खात्यांतले कर्मचारी (काय भयंकर पदनामी शब्द आहे हा!) आणि पोष्टल कर्मचारी ह्यांच्या चेहऱ्यावरील भावांत मला नेहमी फरक वाटतो. इतर काही काही सरकारी खात्यांतले लोक कसे 'तयार' वाटतात. कारकुनी फराटचाने कधी झाडून टाकतील ते सांगता येत नाही. पोष्टल कर्मचाऱ्यांचे तसले काही नसते. पाच पैशांचा ष्टांप घ्या किंवा पन्नास रुपयांची कार्ड-पाकिटं घ्या, निष्काम कर्मयोग्याच्या भावनेने ती ते देतात.

पोष्टाच्या इमारतीच्या घडणीतच काही निराळेपण आहे. भरपूर उजेड, वारा, वगैरे खेळता कामा नये, अशी दक्षता घेऊनच पोष्ट हापिसे बांधली गेली आहेत. फार उजेड असला तर पोष्टमन लोकांची पत्रं वाचत बसतील म्हणून पत्ता वाचण्या-

# विनोदाची दहीहंडी

# पु. ल. देशपांडे

इतपत उजेड असतो. वारा खेळला तर पत्रं उडून जातील, ही भीती असावी. काउंटरची उंची आणि खिडकीच्या भोकाची रुंदीदेखील पलीकडच्या मास्तरची टाळू आणि कपाळाचा काही भाग ह्याहून अधिक काही दिसू नये, अशा बेताची असते. आज अनेक वर्षे मी आमच्या नाक्यावरच्या पोष्टात जातो आहे, पण अजून मी तिथला अखंड मास्तर पाहूच शकलो नाही. खिडकीपलीकडल्या टाळूवर टक्कल दिसण्याऐवजी भांग दिसला, की मास्तर बदलले, एवढं लक्षात येतं.

पोष्टातला तो काळोख, तारयंत्राचं ते भुताटकीसारखं आपोआप चाललेलं कड-कट्ट–कडकट्ट, धपाक् ठपाक् असे शिक्क्यांचे आवाज, यांच्यामुळे पोष्टात कसलेसे गूढ वातावरण असते. खिडकीपलीकडला प्रत्येक लहानमोठा मास्तर खाली मान घालून काहीना काही तरी लिहीत असतो. ते लिखाण पावतीबिवतीच्या रूपाने कधी आपल्या हाती लागलेच तर तो सांकेतिक लिपीतला मजकूर असावा, असे वाटते. पोष्टातून मिळणाऱ्या पावतीवरची अक्षरे ज्याला वाचता आली, तो काय उद्या एखाद्या डॉक्टरचे प्रिस्क्रिप्शन्‌सुद्धा वाचेल. अक्षरांची ती अगम्य गिचमीड पोष्टातल्या वंशाला गेलं तरच कळते.

त्या गूढ अक्षरांप्रमाणेच पोष्टसांप्रदायाचे काही गूढ शब्द आहेत. उदाहरणार्थ



'डिसीव्ह मदर इन लॉ'.

"बटवडा !" 'बटवडा' हा शब्द वास्तविक आजचे ताजे पदार्थ ह्या यादीतून चुकून पोष्टाच्या पत्त्यावर आल्यासारखा वाटतो. मी एकदा हा प्रकार तरी काय आहे, ते पाहू या म्हणून पोष्टात दोन आण्यांचा 'बटवडा' मागितला होता. सारं पोष्ट —पोष्टमास्तरसुद्धा—हसलं होतं. त्यानंतर आजच्या डिलीवरीपर्यंत मी पोष्टात कुणाला हसताना पाहिलेलं नाही. सदैव 'डिलीवरी' च्या चिंतेतल्या माणसांकडून हसण्या-विसण्याची अपेक्षा करणंही चूकच आहे. तसं पोष्टमास्तराच्या जातीला विनोदाचं वावडं आहे, असं नाही. कुणीतरी नवशिका पोष्टल कर्मचारी (बापरे !) पी. एम. जी. ला पोष्टमास्तर जनरल असं संपूर्ण नाव घेऊन म्हणाला, म्हणून पोष्टमास्तर खो खो खो करून हसले होते, असं ऐकिवात आहे. एम. ओ., टी. एम्. ओ., जी. पी. ओ., टी. ओ., पी. एम. जी., आर. एम. एस. अशा सांकेतिक भाषेत न बोलता कुणी खुल्या भाषेत बोललं तर पोष्ट हसते. पण विनोदाची खरी देणगी पोष्टापेक्षा तार-खात्याला अधिक. तारखात्याची विनोदबुद्धी भलत्यावेळी जागी होते. विवाहाच्या अभिनंदनाची तार " हा दिवस आपल्या आयुष्यात वारंवार येवो," ' ह्या नंबरावर धाडणे. ' 'वाईफ रीचिंग टु नाईट ' ऐवजी " वाइफ टीचिंग टु नाइट् " करणे किंवा 'रिसीव्ह मदर इन लॉ.' च्या ' ऐवजी 'डिसीव्ह मदर इन लॉ' असल्या गमती होतात. अशावेळी तारमास्तर कुठल्या तारेत असतात हे ओळखायला विनोदबुद्धी हवी. माझ्या एका मित्राला " बाबूज मॅरेज् फिक्स्ड् विथ लिमयेज डॉटर ' च्या ऐवजी 'बाबूज् मॅरेज् मिक्स्ड् विथ लेमन वॉटर' अशी तार आली होती. तेव्हा तार-खात्याला विनोद जमतो. खिडकीमागे नॉटपेड पाकिटाइतका कोरा चेहरा ठेवून

बसणारे मास्तर कधी कधी अंतरीची कळा दाखवून जातात. एकदा पब्लिकपैकी एक गृहस्थ महत्त्वाच्या पत्राची डिलिव्हरी उशिरा केल्याबद्दल पोष्टमास्तरांशी तावातावाने भांडत होते. शेवटी त्यांचं सगळं ऐकून घेऊन पोष्टमास्तर म्हणाले,

" अहो, डिलिव्हरी म्हटली की चार दिवस अलीकडे-पलीकडे व्हायचंच. नवव्या महिन्याची दहाव्या महिन्याला होते– देव चुकतो–माणसाचं काय ? " पोष्टात जमलेलं सगळं पब्लिक हसलं. मलाही एकदा एका पोष्टमास्तरांनी असंच तोंडावर ष्टांप चिकटवल्यासारखे गप्प केले होते. मी म्हटले–

" मास्तर–मास्तर, हे पत्र पोष्टात नक्की केव्हा पडलं ते जरा शिक्क्याची तारीख नीट बघून सांगता का."

मास्तरांनादेखील शिक्का वाचता येईना.

" मास्तर, जरा नीट शिक्का उमटवायला सांगा की– "

" साहेब, गुलाबी पाकीट आहे, म्हणून हलकेच उमटवला असेल. "

" मास्तर, हल्ली गुलाबी पाकिटांतून वर्गणी तुंबल्याचीसुद्धा पत्रं पाठवतात. बिलाचा तगादा आहे– "

" असं होय– गुलाबी पाकीट पाहून दिलाचा तगादा वाटला असेल– हॅं हॅं हॅं–" मीही हॅं हॅं हॅं केलं. बाकीचेही पोष्टातले लोक हसले. पूर्वी मला वाटायचं, पोष्टाच्या हसण्याच्याही ठराविक वेळा असाव्यात. कारण " टपाल हंशील निराळे " असं कुठे कुठे छापून येई, पण त्याचा हसण्याशी संबंध नाही हे मागाहून कळले.

बाकी 'हंशील' हादेखील पोष्टाचा खास शब्द. बटवड्याच्या जोडीला एक 'बंगी' असते. बडवड्याप्रमाणे 'बंगी' कोण हेही मला गूढच होते. किंबहुना पोष्टाला टपाल आणि डाक केव्हा म्हणतात, याचाही पत्ता मला नाही. 'टपाल' हा शब्द वरपांगी खेळकर वाटतो, पण 'डाक' हा मामला जरा भेदक आहे. डाक बंगल्याचा आणि माझा योग आयुष्यात फार उशिरा आला. त्या बंगल्याचा आणि डाकेचा संबंध नाही, हे तेव्हा कळलं. तरीही त्या बंगल्याला डाक-बंगला का म्हणतात ? मालगाडीच्या डब्यांना 'वाघीण' म्हणतात तर पोष्टाच्या डब्याला 'डाकीण' का नाही ? वास्तविक मालगाडीच्या डब्याचा वाघिणीच्या क्रूरतेशी काहीही संबंध नाही. तो डबा अतीच ठोंब्या दिसतो. त्या उलट पोष्टाचा लालभडक डबा अनार्य दैवतासारखा असतो. त्याला 'पेटी' म्हणायचे ! का म्हणून ?

बाकी, वाजवायच्या पेटीसारखे त्या पेटीत पडलेल्या पत्रांचे सूर मोठ्याने उमटवण्याची जादू आली असती तर रोजच्या डिलिव्हरीला काय काय म्हणून ऐकायला मिळाले असते. सुख–दुःख–त्वेष–चीड–संताप–समाधान–राग–लोभ–प्रेम–द्वेष–मत्सर–ममता अशा असंख्य सुरांचा तो सुप्त कोलाहल. 'विजू ग विजू, मी तुझ्यासाठी झुरतो आहे ग रात्रंदिवस,' सारख्या पत्रावर 'आणखी महिनाभर माहेरी विश्रांती घ्यावी. माझे इथे उत्तम चालले आहे,' यासारखे पत्र पडले असेल.' इकडील

सर्वत्रांची क्षेम ' च्या बाजूला ' काल रात्री देवाज्ञा झाली. असो. ' हेही अडकले असेल. संपादकाच्या हस्तस्पर्शाची वाट पाहात पडलेल्या एखाद्या नवख्या कवीच्या कवितेशेजारी एखाद्या वकिलाची नोटीस असेल ... तेव्हा आमचे अशिलाचे शीलावर शिंतोडे उडवल्याबद्दल नुकसानभरपाईपोटी इत्यादी, इत्यादी. कुठे कुणाचे लग्न ठरल्याची मंगल वार्ता, तर कुठे " ...म्हणून तुम्हाला सांगते, की शेखर मला विसरून जा... " असाही मजकूर पडला असेल. पोष्टाच्या पेटीने ' आ ' वासून जर अंतरंग दाखविले, तर एक चिमुकले विश्वरूप दर्शन होईल.

पण हे दर्शन घडवण्यात ज्यांचा ' लिहिता हात नसला तरी पोचवता हात ' आहे, ते पोष्ट मात्र अत्यंत अलिप्तपणाने शिक्कामोर्तब करून आपले काम करीत असते. नाटकातले किंवा सिनेमातले डोअरकीपर जसे शेवटल्या अंकाची किंवा रिळाची उत्सुकता शिगेला पोहोचलेली असताना जसे अत्यंत अलिप्त भावनेने दरवाजे उघडायची वेळ झाली एवढेच जाणतात, तसे पोष्टमन मजकुरातून अलिप्त राहून माणूस म्हणजे फक्त पत्त्याचा धनी एवढेच ओळखतात. तेही योग्यच आहे. उद्या प्रत्येक दारात जाणारा पोष्टमन जर पत्रांतल्या कर्मभोगांशी मन गुंतवू लागला, तर दिवसातून तीन पत्रं नाही वाटू शकणार. पत्र वाटणाऱ्या हातामागलं अंतःकरण फार पुढे सरकवू देऊन त्याला भागण्यासारखं नाही. एखाद्या सुमीचं लग्न ठरल्याची तार दिल्यावर ते कसं ठरलं, ही हकीकत ऐकत तारवाला उभा राहू लागला, तर अनवस्था प्रसंग येईल. " बरं का तारवाले, ही सुमी म्हणजे आमचे उमरावतीचे दीर आहेत, त्यांची मुलगी —पुतणी माझी—म्हणजे मजा काय झाली.... " ही हकीकत किती तास चालेल काय सांगावं ! एवढ्यासाठी निवृत्त मनाने तारा किंवा पत्रे वाटायची असतात.

म्हणूनच कुठल्याही जादा उत्साहाला आळा घालण्याकडेच पोष्टाची प्रवृत्ती असते. पुढाऱ्यांच्या किंवा आणखी कोणाकोणाच्या स्मरणार्थ कितीही सुंदर तिकीट काढलं, की पोष्टाचं मुख्य काम त्याच्यावर काळाभोर ठसा उठवून त्या चित्राची शोभा घालवणे हे असते. इतकंच कशाला ? पोष्टात पब्लिकसाठी ठेवलेला टाक आणि दऊत ही माणसाला लेखनापासून परावृत्त करण्याच्या हेतूनेच ठेवीत असावेत. फार तर ' पत्ता ' लिहिता येतो. पोष्टातल्या टाकाने अगर शाईने अखंड एक कार्ड लिहू शकणारा माणूस त्या जगात काय वाटेल ते करू शकेल. पोष्टासाठी ' शाई ' करणारे जे कोणी शाईवाले असतील, त्यांचा पूर्वी आयुर्वेदिक औषध करण्याचा कारखाना असावा, अशी मला त्या शाईइतकीच दाट शंका येते. त्यांना एकदा शाई हे एक द्रव असून, ते चाटण्यासारखे थवथबीत लेह्य अगर चोष्य न करता कुमारी आसवासारखे पातळ करावे लागते, हे कुणीतरी धीटपणाने सांगायला हवे आणि पोष्टखात्याने टाक—निब् इत्यादींवर वायफळ खर्च न करता, रोज एक केरसुणीच्या हीरांचा लहानसा जुडगा त्या दौतीच्या बाजूला ठेवावा. हीराचे टोक हे पोष्टाच्या निबापेक्षा निश्चित अधिक टोकदार असते. शाईची ती काळा चिखल भरलेली दौत आणि

पत्रापेक्षा धोतरालाच अधिक चिकटणारी ती निळसर पांढरी खळ ही त्या दौती-शेजारीच ठेवली पाहिजे, असा जर कायदा असला, तर तो मात्र देशव्यापी चळवळ करून बदलला पाहिजे. माणूस पोष्टात चिकटला ह्याचा भलता अर्थ होऊ शकेल. अशी ती गोंद–डिंक–अधिक खळ अशी तिहेरी ताकदीची वस्तू पोष्टातल्या एकुलत्या एक असणाऱ्या बाकड्यावर सकाळच्या वेळी हळूच पसरून ठेवत असावेत, अशी एक मला शंका आहे.

पोष्टाची शाई करणाऱ्या कारखानदारांप्रमाणेच पोष्टातली छपाई करणारे छापखानेवाले कोण असावेत, हेंही मला गूढ आहे. पोष्टखात्याचा एकूणच स्पष्टपणा ह्या गोष्टीला विरोध असावा. पत्ता सुवाच्य लिहावा म्हणणारे पोष्टखाते ज्यावेळी एका पत्त्यावरील पत्र दुसऱ्या पत्त्यावर रीडायरेक्ट करते, त्यावेळी मूळ पत्ता खोडून पहिले पोष्टमास्तरमजकूर जेव्हा दुसरा रीडायरेक्ट–पत्ता लाल शाईत लिहितात, त्या अक्षराला सुवाच्य म्हणणे म्हणजे गांडुळाला शेष म्हणण्यापैकी आहे. अर्थात असली अक्षरे वाचून ती योग्य पत्त्यावर आणून देणाऱ्या आणि वाटेल त्या फराटचातून पत्ता वाचू शकणाऱ्या पोष्टमनला तिसरा डोळा असावा. मनिऑर्डरचे फॉर्म वाचता येणाराला तर ललाटीचा लेखही नक्की वाचता येईल. मनिऑर्डरी, रजिष्ट्रेशनची ए. डी. पावती, त्यांच्यावर जे काही उमटलेले असते, त्याला छपाई म्हणण्यापेक्षा ‘ छुपाई ’ म्हणणे अधिक योग्य. माझा तर दरवेळी मनिऑर्डर घेताना – ( हा योग दुर्लभ – व्हीप्याच फार. ) – मी आड्रेसर आहे की आड्रेसी याचा घोटाळा होतो. ‘ पानेवाला ’ हा शब्द मी अनेक वर्षे ‘ पाववाला ’ असा वाचत होतो. ज्याला मनि-ऑर्डर पावते तो पाववाला, अशी माझी समजूत. भारतीय एकात्मतेविषयी पोष्ट-खात्याची काही विशिष्ट कल्पना असावी. त्यामुळे जिथे जी भाषा बोलली अगर वाचली जाते, तिथे त्या भाषेतले फॉर्म पाठवावयाचे नाहीत, असा एक शिरस्ता आहे. एकदा गडबडीत मी फॉर्म घेऊन आलो. नाशिकच्या पोष्टात त्यांनी मला कानडी फॉर्म का द्यावा ? तो फॉर्म घेऊन मी परत पोष्टात गेलो, तेव्हा त्यांनी मला बदलून जो फॉर्म दिला, तो मराठी, हिंदी, तामीळ कुठल्याही भाषेतला म्हणून चालला असता. मास्तरना मी तो फॉर्म दाखवला -- त्यांनी मला तो घडाघडा मराठीत वाचून


संजीवनी सोने

गरिबी-श्रीमंतीचा मिलाफ करणारे

❀ संजीवनी सोने ❀

१० ग्रॅम दर : ५ रु ✱ परतीचा भाव २·५० रु.

सर्व प्रकारचे दागिने तयार मिळतात.

ल. ग. कुलकर्णी, तुळशीबाग, दत्तमंदिरासमोर, पुणे २.

संजीवनी सोने



' काय, घोड्यावरून आलात काय ! '
—जस्ती काड्या

दाखवला. मला लिहिता–वाचता येत असूनही मी तो फॉर्म आणखी दोन आणे भरून दारातल्या लेखनिकाकडून भरून घ्यावा म्हणून त्याच्यापुढे जाऊन उकिडवा बसलो. त्याने माझ्याकडे पाहून 'हल्ली वाटेल ती माणसे मोठा जंटलमनचा ड्रेस घालून मिरवतात,' असं म्हणून घेतलं आणि ओरडला, 'बसा'–मी बसलो. माझ्या आधी दुसरा एक माणूस कार्ड लिहून घ्यायला बसला होता.

" हं, सांगा –

" मनिऑर्डर करायची आहे. " मी.

" तुम्ही नव्हे, तुम्ही थांबा–काय घोड्यावरून आलाय काय ? " जस्ती काड्या.

" नीट बोला की. काही मॅनर्स ? व्हाय आर् यू सोरूऽऽड् ? " दमदाटीला इंग्रजी वरी. जस्ती काड्या एकदम नाकावरून घसरल्या.

" अरे वा ! आंगठाछाप असून ही मिजास ? "

" कोण आंगठा छाप ? "

" दुसरं कोण ? लिहायला येत नाही न् वर—"

" लिहायला येतं, वाचायला येत नाही. "

" का ऽऽ य ? "

" हा फार्म वाचून दाखवा. " मी त्याच्यापुढे फॉर्म धरला. त्याने ती अगम्य अक्षरं इंग्लिशमध्ये वाचून दाखवली.

" अहो, पण पोस्टमास्तरनी तर हा मराठीत वाचला, तुम्ही इंग्लिशमधे वाचता, आणखी कोणीतरी गुजरातीत वाचेल. आहे काय हा चावटपणा–" उकिडवा बसल्यामुळे मी आधी वैतागलो होतो.

" चावटपणा कसला ?–गुजरातीतच आहे. तुम्हाला कळावा म्हणून मराठीत वाचला. "

" छान ! अहो, पण कशापुढे काय भरायचं ते आम्हाला कसं कळणार ? "

" मग आम्ही कशाला बसलोय ?–बसा, ह्यांचं पत्र लिहू दे आधी–सांगा पाव्हनं–" मी निमूटपणे पाव्हण्याचं पत्र ऐकत बसलो. धोतराचं काय वाटेल ते होऊ दे म्हणून उकिडव्याचा टेकता होऊन बसलो.

"...तऽऽ गंपाला म्हनावं–औंदा भैरूऽ "

" ते लिहिलं, पुढे बोला–' ष्टांपव्हेंडरसाहेब गेल्या जन्मी फौजदार होते.

" मंग आपलं ते–ह्येऽऽ असंच, मंजी हितं बरं चाललंय म्हनाना– बोनुस गावंल आसा चान्से दिसतुय-तवा धुर्पदीच्या नवऱ्याला–मंजे आमचा जावायबापू–किल्लुस्कर-वाडीस्नं त्येला म्हनावं–जावायाला दिवाळीच्या टायम्बाला बलावनं आलं–मंजीच्या मारी साटसत्तर रुपयांचा फटका आला खरा...पर चार मानसं कसं काय वागत्यात–मंजी जी काय जन्रीत आसंल तसं–कसं म्हनता ?– झालंच त गोंद्या आन् हारी गोंदळेकराला–न् दामू सुताराला दंडवत साहांगावे–म्हातारीच्या दम्याचं वशीद भ्येटलं का लालचिमनीतला भिवा–त्यो जावर जहाला–त्येच्या संगटं पाटवितो–काका बसगड्याला दंडवत–" नळ गळावा तसा पाव्हन्याच्या तोंडून मजकूर गळत होता आणि जस्ती काड्यावाले ष्टांपव्हेंडर आणि लेटररायटर कार्ड भरून काढीत होते.

" ... हं, संपली जागा. तुमचं नाव बोला. "

" बावज्या धना भोरीकर–"

" कोण कर ? " लेटररायटरसाहेबांच्या गुरूंनी त्यांना फक्त वसकन् ओरडायला शिकवलं होतं.

" कोनकर न्हवं–भो हो री·ही क ह र–" पाव्हण्यांनी पष्ट सांगितलं.

" पत्ता–"

" धुरपती बावज्या भोरीकर स्वभाग्येवती–पाटलाच्या बखळीम्होरं–मारुतीच्या देवळाच्या आड्याल्ल्या आंगाला–मुक्काम हारनगाव–पोष्टे किकवडी– "

" क्याय ?"

" कि हीं क ह व ह डी पुन्हा पष्ट, जिल्हा सातारा–त्येवढा सशेगुर्जीला दंडवत ल्याहा बरं का मास्तर–त्ये बेनं लय हालकट हाय–दंडवत नसला तर यकाचं दोन वाचून दावतंय् लय बारा × × ×"

असल्या ब्रह्मघोटाळ्यातून कार्ड काय तयार झालं, ते लिहायला मी भोहोरीही-करापेक्षाही अधिक उत्सुक होतो.

" ऐका–सौभाग्यवती द्रौपदीस अनेक आशीर्वाद. मी खुशाल आहे. दिवाळीला जावईबापूना बोलवले पाहिजे. जनरीत पाळली पाहिजे. बहुधा बोनस मिळेल.

काकीच्या दम्याचं औषध भिवावरोबर धाडतो. वडील मंडळीस नमस्कार. लहानास आशीर्वाद. सांभाळून राहावे. माझी प्रकृती उत्तम आहे. वावज्या धना भोरीकर–"

"सशेगुर्जीचा दंडवत राह्यला–"

"आँ–ह्रा काय ? सशेगुरुजींना साष्टांग नमस्कार. " मास्तर अजीवात जिथे न लिहिलेला मजकूर वाचू शकत होते, तिथे माझा गुजराती मनिऑर्डरचा फॉर्म त्यांनी मराठीत वाचून दाखवला, यात नवल काय ? ष्टांपव्हेंडर आणि त्याच्यापुढली लिहून घेनार मंडळींची गर्दी हा पोष्टखात्याचा भरपूर करमणूक करणारा एक सांस्कृतिक कार्यक्रमाचा विभाग मानायला हरकत नाही.

ज्या खिडकीवर जो बोर्ड असतो, तेच काम तिथे होईल याची पोस्टात खात्री नसते. त्यामुळे रजिष्टर पोष्ट-पार्सलचा 'क्यू' आहे, असे समजून त्यात उभे राहिले तर अंती आपण मनिआर्डरीशी पोहोचतो. मी एकदा पंधरा पैशांचे ष्टांप विकत घेण्याची महत्वाकांक्षा मनात बाळगून एक रांग धरून उभा होतो. काउंटरच्या खिडक्या आणि भिंत यांच्यामधली जागा माणसांना उभं राहण्यासाठी नसून, चेंगरण्यासाठी आहे, अशा समजुतीनेच पोष्टाच्या इमारतीची रचना केलेली असते. त्यामुळे मनिआर्डरी, रजिष्टरे, सेविंग अकाउंट, पाकिटे, तिकिटे यांच्या रांगा एकमेकांत मिसळून उभ्या होत्या आणि पोष्टहापिसला पंढरीच्या वारीच्या मोसमात वार्शीलाइटच्या डब्याला येते तसली कळा आली होती. त्यामुळे केवळ ज्यांनी आयुष्यात आटापाटयांचा खेळ खेळलाय् असलेच भिडू सूर मारून इष्ट खिडकीपाशी जाऊन पोहोचत होते. त्या रणधुमाळीत पंधरा पैशांचा ष्टांप मिळविण्याची माझी धडपड सामान्यतः चौपाटीच्या वाळवंटात रविवारी संध्याकाळी पॅंटचं हरवलेलं बकलू शोधण्याइतकीच सोपी होती. ष्टांप मिळणारी खिडकी कोणती ते कळण्याचा मार्ग नव्हता. कुणीतरी मला तिथे म्हणाला म्हणून इथे उभा होतो. ईश्वरेच्छेने सरकत होतो. सरकता सरकता एक खिडकी नजरेच्या होऱ्यात आली. आता पुढे एकच माणूस उभा होता. 'क्यू' ह्या बाबतीतला माझा एक अनुभव असा : आपल्यापुढे उभा असलेल्या माणसाचे काम कधीही लवकर आटपत नाही. समोरच्या तराजूत पाकिटांची तुला चालली होती. मी ठेविले-अनंते–होऊन बारीत उभा होतो. तेवढ्या वेळात 'वजनी आणि मापी परिमाणे,' 'अधिक धान्य पिकवा,' 'राष्ट्रीय विमा योजना,' 'देवी निर्मूलन मोहीम' इत्यादी भिंतीवर डकवलेला मजकूर मुखोद्‌गत केला. अल्पबचत रोख्यात पाच रुपये गुंतवले तर वयाच्या पासष्ठाव्या वर्षी मला बारा रुपये मिळणार आहेत, ही आनंददायक वार्ता वाचून पुढल्या महिन्यापासून प्रत्येक पाच रुपयांच्या नोटेचा 'रोखा' करायचं ठरवलं...माझा विमा लाख रुपयांचा झाला आहे, हे ऐकून...माझ्या पश्चात सगळे आनंदात नांदताहेत, हे भविष्य डोळ्यांपुढे आणलं...इतकं सारं करूनही माझ्या पुढल्या माणसाचं काम संपेना. खिडकीपलीकडून आता गाभाऱ्यातून आरतीचा उजेड येतो, तसा आला. मी मान उंचावली. ती

आरती नसून लाखेची मोहर उठवण्याची पूर्वतयारी आहे, हे ध्यानात आलं. मी तेवढ्यात एकदा 'मला पंधरा पैशांचा ष्टांप देता का हो, ' अशी एक थोडीशी आर्तपैकी हाक दिली. ' थांबा '–असा कुठूनसा आवाज आला. माझ्यापुढल्या माणसाने गळपट्टेवाल्या कुत्र्याने बिनपट्टेवाल्या कुत्र्याकडे पाहावे तशा तिरस्काराने माझ्याकडे पाहिले. शेवटी एकदाचे त्याचे काम संपले. पुन्हा एकदा तो इसम ग. प. वा. कु. बिन ग. प. वा. कु. कडे पाहतो तसा पाहून गेला. मी अशावेळी बिनपट्टेवाला कुत्रा पट्टेवाल्याकडे जसं दुर्लक्ष करतो, तसं केलं आणि खिडकीत पंधरा पैसे सरकावीत म्हणालो,

" पंधरा पैशांचे ष्टांप द्या–"

" पलीकडल्या खिडकीत जा–"

" अहो पण–"

" पाटी वाचता येते ना–" माझ्या मुखमंडलात असा काय गुण आहे मला कळत नाही, पण बसकंडक्टर (सौजन्य सप्ताहातसुद्धा), पोष्ट अगर तारमास्तर, तिकीटकलेक्टर, हाटेलातले वेटर, कापड दुकानांतले पंचा विभागातले लोक गुरकल्याशिवाय माझ्याशी बोलतच नाही. साऱ्या दिवसाचा उद्धटपणा माझ्यावर काढतात. अशा वेळी आपण गेल्या जन्मी कोण होतो म्हणून ह्या जन्मी हा भोग माझ्या नशिबी यावा, ह्या विचाराने मी हैराण होतो. आता हा पोष्टातला धाकटा मास्तर–' पाटी–वाचता–येते–ना ?' असं कुत्सित बोलायचं कारण काय ?

" पलीकडे जा–पब्लिकचा टाइम फुकट घालवू नका–"

" अहो पण ष्टांप कुठे मिळतात ?"

" ते काय चौकशी असं लिहिलंय तिथे. "

" पोष्टांत ष्टांपाला चौकशी म्हणायला लागले काय हल्ली ?"

" विनोद घरी जाऊन करा–"

मी चौकशीच्या खिडकीपाशी गेलो. बाकी पोष्टाचं एक बरं आहे–ह्या खिडकीचा त्या खिडकीला पत्ता नसतो.

" काय ?" चौकशी खिडकीत चौकशी झाली.

" पंधरा पैशांची एक चौकशी द्या–" मी थंडपणाने सांगितलं.

" काय द्या ऽऽ" खिडकीमागून पूर्वीच्या नायिका फोडत, तसली पण पुरुषी आवाजात ' अस्फुट आरोळी ' आली.

" पंधरा पैशांची चौकशी. "

" चौकशी ?"

" चौ–क–शी. "

" काय मिस्टर, सकाळीच चढवून आलाय काय ?"

" खिडकीबाहेर मुंडकं काढा–तुम्हालाही चढवतो. "–शाळेत मी एकदा गणोजी




**शाळेत मी एकदा**
**गणोजी शिर्याचं काम केलं होतं...**

शिर्याचं काम केलं होतं–तो आवाज पुन्हा लावला. अवघं पोष्ट हादरलं. तारमास्तरच्या थरथरत्या बोटांतून ' कडकट्ट ' मधलं नुसतं कडकडकडकडकड एवढंच वाजलेलं ह्या कानांनी मी ऐकलं. ' क्यू ' मधली दीड तासाची तपश्चर्या आणि चहाची टळलेली वेळ माझ्या संतापातून बोलत होती. शेवटी पब्लिकने ' जाने दो–जाने दो यार–साला गवर्मेंटका मामला ऐसाही हो ग्या–' वगैरे पाणी ओतलं आणि ती पंधरा पैशांची तिकिटं विजयचिन्हासारखी मिरवीत मी बाहेर पडलो आणि समोरच्या पेटीत पत्र टाकले. निम्मी वाट चालून गेल्यावर ती पंधरा पैशांची विजयचिन्हे त्या पत्राला चिकटवायची विजयोन्मादाच्या भरात विसरल्याचे लक्षात आले.

पण वैतागण्याचे असे नानाविध क्षण पब्लिकच्या आयुष्यात आणून देणे, हा आपला एक पोष्टखात्याचा विरंगुळा असावा. तासभर एक रांग धरून उभं राहिल्यावर एकदाचा माणूस रजिष्टरच्या खिडकीपाशी येतो. खिडकीपलीकडून आवाज उमटतो– ' एक रुपया पस्तीस पैशांचे स्टॅम्प लावा–थांबा, येडी आहे का सादं ऽ"

" कोण ?" मी दचकलो. रजिस्टर पत्र देवाब्राह्मणांच्या साक्षीने–जिचा हात धरला तिच्या नावे होते. (बायकोला रजिस्टर पत्र कसलं, ही शंका काढू नये. नवराबायकोच्या नात्यात जास्ती लक्ष घालणाऱ्याला पुढला जन्म सापसुरळीचा की बेडकाचा कसला तरी मिळतो.)

" कोण काय हो ऽ ?" मनिऑर्डरीचे कानडी फार्मच मराठी मुलखात पाठवतात असं नाही–हे मास्तरदेखील थेट गुड्डीहळ्ळी किंवा चिगंपल्लीहून मागवलेले दिसत होते.

" येडी कोणाला म्हणता–"

" कोणाला म्हणजे काय की यक्नलिजमेंट ड्यू तर येडी म्हंटात की होऽ. "

" हां हां– रजिस्टर्ड ए. डी. "

" मग मी काय कानडी बोललं काय हो थुमच्याकडं ? आणकी धा पैशाचं ष्टांप लावा म्हटलं तर-"

" द्या-"

" हिकडं नाही-ते यम्. वो. लिहलंय् तिकडं-"

त्या खिडकीत रामाच्या शेंडीपासून सीतेच्या केसापर्यंत लांब क्यू होता. त्यात जाऊन ठाकलो. सरकत सरकत एकदाचा खिडकीपाशी पोहोचलो-ष्टांप घेऊन पुन्हा रजिष्ट्रेशनच्या रांगेतून घसरत ती खिडकी गाठली.

" घ्या. "

" हे पत्र रजिष्टर..."

" टायम् संपलं-उद्या या-"

वास्तविक तिकिटं चिकटवल्याखेरीज पोष्टाचं पाऊल उठत नाही. तार असो की आणखी काही, तिकीट हवेच. मग प्रत्यक्ष खिडकीवाल्याकडे चार तिकिटं ठेवली तर ते काय फावल्या वेळेत एकमेकाच्या पाठीला चिकटवण्याचा खेळ खेळतील, अशी पोष्टाला भीती वाटते की काय नकळे ! चार खिडक्या हिंडून आल्याखेरीज पब्लिक सुधारणार नाही, अशी पोष्टाची समजूत असावी.

लायब्ररीत हवे ते पुस्तक, ष्टॉपवर हवी ती बस आणि पोष्टात जेवढ्याचा हवा तेवढ्याचा ष्टांप-ओळीने तीनदा ह्या इच्छा सफल झालेला माणूस कुणालाही भेटला तर तो सत्पुरुष आहे, असं समजून त्याच्याकडून बंद मुठीतून हिऱ्याची आंगठी मागावी. मिळण्याचा संभव आहे. पंधरा पैशांचा एक ष्टांप मागा-पाच पैशांचे तीन मिळतील. पाच पैशांचा मागा - पैशेवाले पाच ! एकदा मी एका पत्रावर आठ आण्यांचे पैसेवाले पन्नास ष्टांप लावले होते. ते डकवता डकवता जीभ कोरडी पडली. पुढे पुढे जिभेवर इतका डिंक चढला, की बोलताना जीभ टाळूला चिकटून राहायची. ष्टांप चिकटवण्यासाठी पोष्टात एक पत्र्याची कापड गुंडाळलेली फिरती सुरळी असते. तिला कधीही ओलावा नसतो. त्यामुळे जीभ हा एकमेव उपाय.. पोष्टात


उंची कल्चर्ड मोत्यांचे

फॅन्सी खड्यांचे सर्व प्रकारचे दागिने तयार

व

ऑर्डरप्रमाणे तयार करून मिळतील.

• देवधर मोतीवाले •

९३२, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २. फोन : ५७७१६




पत्र चिकटवण्याच्या नादात...

अनेक वेळेला लोक ह्या पत्रं चिकटवण्याच्या नादात एकमेकांना जिभा काढून वेडावत असल्याचा भास होतो. त्यातून पाकिटं, अंतर्देशीय पत्रं इत्यादिकांनी चिकटू नये त्यावेळी चिकटावं आणि चिकटावं तेव्हा ' आ ' वासावा, हे एक उघडे गुपित आहे.

मला मात्र मोठ्या शहरांतल्या पोष्टापेक्षा आडगावची पोष्टे फार आवडतात. मोठ्या शहरी पोष्टात आपला पत्ताच लागत नाही. लहान गावी मास्तर आस्थेनं विचारपूस करतात. एक प्रेमळ पोष्टमास्तर तर हात धुणारांना यजमानांनी टावेल पुढे करावा, तसे ष्टांप घेणाऱ्यापुढे स्वतःची जीभ लांबवीत, असे मी आमच्या शेजारी एक गृहस्थ राहायचे, त्यांच्या घरी पाहुणे आले होते, त्यांना कोणीसं सांगितले होते, त्यांच्याकडून ऐकलं आहे. तळहातावर शीर घेऊन सैनिक जातात–तसा तोंडाबाहेर जीभ घेऊन ष्टांप विकणारा एखादा पोष्टमास्तर ह्या भारतात निघणं अशक्य नाही. पण लहान गावचे पोष्टमास्तर हौशी असतात, हे मी स्वानुभवावरून–म्हणजे मी पोष्टमास्तर नव्हतो–मी पाहिले आहेत, त्यावरून सांगतो. माझ्या पाहण्यातले एक पोष्टमास्तर हौशी गवई होते. एक कीर्तनकार होते. एक नटसुद्धा होते. माझ्या ओळखीच्या डभोईकर पो. मा. ना आमच्या गावात ' टपाल गंधर्व ' म्हणत असत. मात्र तारखात्यात हौशी गवई-तबलजी वगैरेंना नेमू नये, अशी माझी संबंधित अधिकाऱ्यांना विनंती आहे. उद्या कडकट्ट कडकट्टचा ठेका धरून भजनबिजन म्हणत बसले तर गावोगावी भलत्या तारा जायच्या.

पण साऱ्या पोष्टखात्यात मला पोस्टमन ह्या माणसाबद्दल मात्र अतीव आदर आहे. आपल्या दारी पोस्टमन येऊ नये, असे वाटणारा माणूस म्हणजे ज्याच्यावर समन्साखेरीज दुसरे घेण्यासारखे नाही तेवढाच असावा. एक मात्र खरे; पोस्टमन आणि पाऊस हे हवे तेव्हा येत नाहीत. पाऊस पुष्कळदा नको तेव्हा येतो. पोस्टमन नकोसा नसतोच–उलट फार हवासा असतो त्यावेळी आपल्या घराशी येऊन चटकन्



'निष्काम कर्मयोगी' पोष्टमन

पुढल्या घराकडे जातो. पूर्वीच्या काळी दरवाजाला घंटचा नव्हत्या. घंटी वाजवून आपण आल्याची वर्दी फक्त देवळातल्या देवाला असे. त्या काळात पोष्टमनच्या पाया-प्रमाणे तोंडाला व्यायाम असे. 'सोमऽण' 'कुळकर्णीऽऽ' असा पुकारा करावा लागे—तेव्हा पोस्टमन आळी गाजवून जायचे. आता दारातली बेल दोनदा वाजवून पोष्ट-मन वर्दी देतात. ह्या पोष्टमन लोकांना घरनंबर कसे दिसतात कोण जाणे. नसलेले घरनंबर दिसतात, पण डिलीवरीवर निघालेल्या पोस्टमनला रस्त्यांतली मारामारी, अपघात वगैरे काही दिसत नाही. भोवताली काहीही होवो, पोस्टमन अलिप्तपणाने चाललेले असतात. आपण बरे, आपली पत्रे बरी, या नादात त्याचे एकला चलो रे चालू असतं. मारामारी, अपघात वगैरेची गंमत पाहत पोलीससुद्धा उभे असतात, पण पोष्टमनलोक उभे असलेले मी तरी पाहिले नाहीत. अशाच एका निष्काम कर्मयोगी पोस्टमनने पाचव्या मजल्यावरची आग विझवायला निघालेल्या आग-बंबाच्या शिडीवरून शांतपणाने वर जाऊन पत्रं टाकून आल्याची कथा मी ऐकली आहे. बंबवाले आग विझवत होते आणि पोस्टमन पत्र टाकीत होता. आग-पाणी ऊन-पाऊस, वादळ-वारा या पलीकडे पोहोचलेला हा पत्रदाता. सदैव यावा-यावासा वाटणारा. फक्त दिवाळीच्या वेळी न आला तर चालेल. त्यावेळी मात्र तो पोष्ट टाकायला न येता पोस्त मागायला येतो. चक्रपाणी भगवंताची जशी अनेक रूपं आहेत, तशी पत्रपाणी पोस्टमनचीही आहेत, हे त्यावेळी कळतं. मुरलीवाला, कालीकमलीवाला, धेनुचरावतवाला, मोरमुकुटवाला अशी विविध रूपं धारण कर-णाऱ्या कृष्णपरमात्म्याप्रमाणे एकच पोष्टमन तारवाला, एक्स्प्रेस डिलीवरीवाला, रजिष्टर पत्रवाला, मनिआर्डरवाला अशा निरनिराळ्या भूमिकेतून येतो. दिवाळीची बक्षिशी मागण्याची ही थोर परंपरा बहुवा पोस्टखात्यातून सुरू झाली असावी. त्या शिवाय त्या बक्षिशीला 'पोस्त' म्हणायचे कारण नव्हते. (व्याकरणाच्या नियमा-

प्रमाणे 'ष्ट' चा 'स्त' होतो—पाहा : तुष्टचा तुस्त.)

पोष्टात सुधारणा करण्यात येणार असल्याचं मी कुठेतरी वाचलं आणि सुधारलेलं पोष्ट डोळ्यांपुढे उभं राहिलं. ष्टांप विकत घेण्यासाठी मी खिडकीपुढे उभा आहे. खिडकीही चांगली रुंद आहे. पलीकडले हसतमुख-दाढी वगैरे केलेले पोष्टमास्तर मला चक्क नमस्कार वगैरे करताहेत. नव्या सुधारलेल्या पोष्टात त्यांची नवी पदनामी झाली आहे. मुख्य पोष्टमास्तरांना प्राचार्य म्हणताहेत—तारमास्तर न म्हणता तंतुगुरुजी केले आहे. पोष्टमनचा संदेशकुमार झाला आहे. मनिऑर्डरच्या वातायनात बसलेल्या मास्तरला मनि-वर्य किंवा धनाचार्य म्हणताहेत. मी पंधरा पैशांचा ष्टांप घ्यायला गेलो आहे. पोष्टात झगझगीत उजेड आहे. कड्कट्ट कडकट्ट ऐकू न येता—मेरा प्रेमपत्र पढकर किंवा सखये प्रेमपत्र पहिले, हाय मेरे दिल् जलदी जवाब भेजो, असली गीतं हलक्या सुरात ऐकू येताहेत. मुख्य म्हणजे पोष्टातल्या टाकाने लिहिता येऊ लागले आहे...... असली चित्रे दिसू लागली. पण लगेच वाटले, 'छे: ! हे पोष्ट नव्हे ! ' न बदलणं हा मुळी पोष्टाचा स्थायीभाव आहे. शिवाय रोज झपाटयाने बदलणाऱ्या ह्या जगात एखादी तरी न बदलणारी गोष्ट रुचिपालट म्हणून ठेवली पाहिजे. मायने बदलले, मजकुराची ढब बदलली, उद्या पोष्ट बदललं तर कसं व्हायचं ? पण 'बदलणे' हा हल्लीच्या जगाचा नवा छंद दिसतो. परदेशांत बायकोच्या पोशाखाला मॅचिंग रंगाचा सूट नाही घातला, तर नवरा बदलण्याची आतून धमकी मिळते, अशीही वार्ता ऐकली आहे. अशा वेळी पोष्टाचा खांब हा माझा एकमेव आधार आहे. नावासकट पोष्ट आहे, असंच राहिले पाहिजे. मराठी किंवा हिंदीकरणाच्या भानगडीत डाक-घर केलंय इथपर्यंत ठीक आहे. उत्साहाच्या आणि देशीकरणाच्या भरात डाकघरातल्या मास्तरांना 'डाकू' म्हणायचं कारण नाही.

केअर ऑफचे 'द्वारा' झाले. नुकताच मी एक पत्ता पाहिला. त्याच्यावर 'ला— श्री. अमुक अमुक' असं होतं. हे 'ला' कळेना. शेवटी ते 'टू' चे मराठीकरण आहे, असं कळलं. पूर्वी '—स' नावाच्या कविता असत, तसला हा पत्ता होता. अशाने उद्या 'ला—श्री अमुक अमुक, ची—गंगारामा चाळ, ची पिछाडी सचिवा' असले पत्ते येतील. पूर्वीची माणसं मजकुरापेक्षा मायना मोठा लिहीत आणि 'पत्ता' म्हणजे पोष्टमनला लिहिलेलं एक पत्रच असे. नुसतं ग. मो. सातपुते, दोनशेतीन गुरुवार, असला तुटक पत्ता नसे. "हे पत्र श्रीयुत राजमान्य राजेश्री गजानन मोरेश्वर सातपुते, सातपुते यांचा वाडा, गोळयांच्या वाडयासमोर, बारा मारुतीशेजारी, घर-नंबर दोनशेतीन, बुधवारपेठ, मुक्काम व पोष्ट ढापेवाडी, तालुका गुंजारा, जिल्हा-वाढे, इलाखा मुंबई," असला मनमोकळेपणा होता. गोळयांच्या वाडयात राहणाऱ्या माणसांच्या पत्त्यावर सातपुत्यांच्या वाडयासमोर असे असल्यामुळे सातपुत्यांनाही आपल्यापेक्षा गोळे अधिक महशूर (देशी काढे असतात तसे) आहेत, असे वाटून

दुःख होत नसे. शिवाय तपशीलवार पत्त्यामुळे पोष्टमन खूष ! परवाच मी एक पत्ता शोधीत होतो. समोरून पोष्टमन येताना पाहून मी त्यालाच पत्ता विचारला. पोष्टमन हताशपणाने म्हणाला –

" साहेब, मीसुद्धा तोच पत्ता गेले दोन दिवस शोधतोय्. "

" अहो, पण तुम्हाला इथले घरनंबर पाठ नाहीत – ?"

" होते, पण ते आता बदलले. "

घरनंबर बदलणे हा पोष्टमनच्या जातीवर भयंकर अन्याय आहे. कालपर्यंत तीनशेबत्तीस सदाशिव असलेलं घर आज चारशेवीस शुक्रवार झालं तर कसं व्हायचं ? म्हणून कसल्याही बदलाची झळ पोष्टाला लागता कामा नये. अंती पोष्टमनची पायपीट वाढते. माणूस हौस म्हणून पोष्टमन होईल, असे मला वाटत नाही. जगात ठरवून काहीच होत नाही आणि जे होते, ते त्याला कधीच व्हायचे नसते. माझ्या ओळखीच्या एका प्रख्यात डॉक्टरांना गवयी व्हायचे होते आणि गवयाला 'हिंद-केसरी ' होऊन गदा मिळवायची होती. मुलाखती घेणाऱ्याने जर पोष्टात एखाद्याला विचारले – " पोष्टात काम करण्याची महत्त्वाकांक्षा आपल्या मनात केव्हा उत्पन्न झाली " – उत्तरादाखल 'कडकट्ट' असा जोरदार आवाज उठेल. तारयंत्राचा


अंगांतल्या व हवेंतल्या
उष्णतेच्या
तक्रारीं साठीं
पर्ल काढा
कुटुंबांत सर्वांच्या
उपयोगी पडतो



Scusa

जवळच्या औषधी दुकानांतून घ्या।





# पंजाब नॅशनल बँकेत

**तुमचा पैसा**

हळुवार, कर्तबगार,

**सेवाशील**

हाती असतो.

PR6529/Mar/Ad/2



अखेरची 'पौष्टिक' गुटी

नव्हे; विचारणाऱ्याची मुंडी मुरगळल्याचा. त्या मुलाखतवाल्याला वंगीत भरून डेड लेटर हापिसात टाकतील. तिथल्या वंग्यांचा बटवडा होत नाही. तेव्हा होतकरू मुलाखतवाल्यांनी सावध राहावे.

पोष्टाचं थोडसं देवासारखं आहे. तो देईल ते निमूटपणाने घ्यावे. जे पत्र, तार, एम्. ओ., व्ही. पी., रजिस्टर, बुकपोष्ट आपल्या नशिबी असेल, ते पोष्टमन आणून देणार. देणारा तो आणि घेणारे आपण. चार दिवस मनिआर्डरीचे, चार दिवस व्ही. प्यांचे; हे सूत्र ज्याने जाणले तो तरला. शेवटी आपण सगळे पत्त्यातल्या नावापुरते धनी. मजकुराचा मालक निराळा.

पोष्टल गूढतेतून घेण्यासारखे तत्त्व एवढेच ! आमच्या ओळखीचे बागुल पोष्टमास्तर कीर्तनं करायचे. गावकरी त्यांना 'पोष्टपरायण' म्हणत. ते एकदा म्हणाले होते —

" मातेच्या उदरी आणि महाराज वंगी भरताना तो जो काही वर सगळ्यांचा पोष्टमास्तर जनरल बसलाय त्याने आपल्याला विचारले नव्हते – भरली वंगी – मारला माणूस हा शिक्का – आलो इथे – आता इथून पुढे बढवडा करायचं ते त्याच्या हाती – तेव्हा इथून शेवटली डिलिव्हरी होण्यापूर्वी हरिनामाचा गजर चालू ठेवा महाराज, म्हणा पुंडलिक वरदा हारिविठ्ठल !"—– आणि आम्ही आध्यात्माची ती पौष्टिक गुटी गिळून ओरडत होतो – पुंडलीकवरदा हाऽऽरि विठ्ठऽऽल.

• • •

# कडाकण्या

## आनंद यादव

**देवळाभोवती मंद उजेड निवळला होता. समोरचं दिवाळं दिव्यांच्या मंद पिवळ्या फुलांनी बहरलं होतं. देवळातही पाच-दहा दिवे होते. भिक्या देवळात शिरला. त्याला आत सुरक्षित वाटलं. मग एक दिवा तडतडू लागला–विझू लागला !**

गल्लीत काळ्या–बेंद्र्या पोरांचा घोळका खेळत होता. जिभांवर शेव, चकल्या, कडाकण्या यांच्या चवी जिरत होत्या. खेळता खेळता पोरं दाढा हलवत होती... दारात बसलेल्या रत्नी आणि शंकऱ्याच्या तोंडाला पाणी सुटलं. आईनं दारातच बसायला सांगितलं होतं.


रत्नीनं कल्पनेनं कोंड्यानं घेतली होती, तशी एक कडाकणी हातात घेतली. कल्पनेनंच तोंडानं कुरतडून खाल्ली. तोंडाला पाणी तेवढं खरोखरचं आलं.

दिनूनं कडाकणी तोंडात चावली नि तो खेळाकडं ध्यान देत पुढं गेला. स्वत:लाही ठाऊक न होता खेळात सामील झालेल्या शंकऱ्याच्या मनात होतं तसं झालं. बोटाच्या पेराएवढा कडाकणीचा कुरकुरीत तुकडा खाली पडला होता...शंकऱ्याच्या जिभेवर कितीतरी वेळ विरघळत राहिला...आ ऽ म् ! आ ऽ म् ! हा ऽ !

रत्नीही कोंड्याच्या मागनं फिरत होती. कोंड्या कडाकणी बकाबक खात होता आणि खाली काहीच पडत नव्हतं...कडाकणी मऊ होती. रत्नीच्या पोटात नुसतं तोंडातलं पाणी जात होतं आणि आत आत कालवाकालव होत होती.

एक कडाकणी संपवून दुसरी कडाकणी आणायला कोंड्या घरात पळाला...देवा, कोंड्याची कडाकणी कुरकुरीत असू दे.

रत्नी रडकुंडीला आली होती. शंकऱ्या दिनूच्या मागनं हिंडून वारका चुरा वेचत सारखा जिभेवर विरघळत ठेवत होता. कोंड्या कडाकणी घेऊन आला. घोळक्यात



घुसला. त्याला आणि त्याच्या कडाकणीला धक्कासुद्धा लागला नाही.

शंकऱ्यानं तुकडा वेचला आणि त्याच्या पाठीत कडाकणीएवढा रुंद झपाटा बसला. तेवढीच जागा झिणझिणली. वखोटीला हिसका देऊन त्याला सरळ केलं आणि रत्नीवर डोळ्यांचा विस्तू ठेवत गोदा म्हणाली, "चलतीस घराकडं का जीव घेऊ ?"... रत्नीनं शेंबूड वर ओढला नि ती घराकडं फिरली.

शंकऱ्याला दारात नेऊन आपटलं.

"आम्हाला कडाकणी पाहिजे." दोन दणकं खाऊनही त्यानं कडाकणीसाठी तोंड पसरलं. आईचा अंदाज घेऊन रत्नीही कडाकणीच्या नावानं कुंई कुंई करू लागली.

गोदालाही गल्लीतनं चकल्या–लाडवाचं घाणं काढताना वास येत होता. तेलं चरचरताना ऐकू येत होती. नको म्हटलं तरी नाक आणि कान तिकडं ध्यान देत होते...बाहेर दिवाळीची तयारी चालली होती आणि गोदाच्या घरात नुसती तोंडं असलेली चार पोरं.

त्या पोरांना दिवाळीचा नुसता वास तरी लागावा म्हणून ती धडपडत होती; पण शिळ्यापाक्याशिवाय काही मिळत नव्हतं. घराघरांतनं दिवाळीचं ताजं ताजं चाललं होतं. ते आताच मिळणार नव्हतं. दिवाळी झाल्यावर. शिळं–पाकं उरल्यावर तिच्या पदरात पडणार होतं.

दीसभर गावातनं फिरून गोपा किनीट पडताना घराकडं आला...देवानं त्याला

पाय दिले होते. त्याचा तो पुरेपूर फायदा घेत होता. ... पायात पोटातल्यासारखी आतडी नव्हती. कायमची खंबीर हाडं होती. ही हाडं पोटातल्या आतड्यावर कधी कधी अर्धी–चतकोर भाकरी देऊन उपकार करत होती.

फिरता फिरताच त्याला, कोणतरी हटकायचं. तो तिथंच गुंगायचा. ढोरागत काम करायचा नि भिकाऱ्यागत कोरड्यास–भाकरीचा राजा व्हायचा. पण आई–बाऽनं बायको करून दिली होती; तिला चार तोंड असलेली चार मुलं होती; याची त्याला आठवणच नव्हती.

घरात आल्यावर गोदानं विषय काढला–

" उद्या दिवाळी हाय. "

" व्हय ? "

" व्हय. उद्या उठल्याबरोबर इठू माळ्याच्या मळ्याकडं जावा. "

" हूं. "

" जाऊन काय करतासा ?"

" काय करू ?"

" काय करायचं ठावं न्हाई; तर हूंऽ कसं म्हणता ?"

" तेच म्हणतोय मीबी. "

" म्हईंदासारखं उगंच हूं ऽ हूं ऽ करत जाऊ नका. "

" हूं. "

" आणि हूं ऽ च. "

" मग आता काय करू ?"

" उद्या सकाळी माळ्याच्या मळ्याकडं जावा आणि गवात कापू लागा. "

" हूं. "

" दुपारपत्तर गवात कापू लागून एक–दोन पाचुंडं दील तेवढं घेऊन या. "

" येतो की. "

गोपा सकाळी उठला. दिवाळीचं अंगावरच्या चिंध्या अंगावर घाटल्या. विळा–दोरी घेऊन चहाची वाट बघत बसला.

" लौकरच जावा मळ्याकडं. सकाळचा च्याऽबी तिथंच मिळंल. "

" हूं. " गोपा उठला. हाडं कडाकडा वाजली.

" येतानं कुठंतरी वड्याला न्हाईतर हिरीला आंघूळ करून या. दिवाळी हाय. "

" हूं. "

गोदानं आधल्याच दिशी भिक्याला बरोबर घेऊन कुठनं तरी कूप मोडून आणला होता. त्या काट्यांच्या शिऱ्यावर तिनं चारी पोरांसाठी गाडगं–गाडगंभर फुकट मिळणारं पाणी तापवलं. पोरांच्या अंगावर ओतलं. पदरानं पोरांची अंगं पुसली. भिक्यानं आपलं अंग आपल्या अंगावरच्या कुडत्यानंच पुसून तेच कुडतं अंगावर

घातलं नि तो चहाच्या कामाला लागला. काल राती चोरून आणलेलं दोन ऊस त्यानं वरवंटयानं बडवलं नि पिळून पिळून त्यांचा रस काढला. चहाच्या भांड्यात ओतून आईला हाक मारली; "च्याऽची पावडर घाल ये, ग आई."

बारक्या पोराला आंघोळ घालून पटकुरात टाकलं नि गोदा काल वाळवून ठेवलेली पावडर चहात घालायला आली. पोरगं न रडता हाता–पायांच्या काटकुटया हलवत गप पडलं...देव सकाळीच भूक लागू देत नाही ते एक बरं असतंय्. गोदाच्या घरात तो मोठ्या सुखाचा काळ असतो.

उरलेलं पाणी अंगावर ओतून घेऊन ती बाहेर पडली. रत्नी शेंबूड ओढत मुला-जवळ बसली. भिक्या रानात शेंगा, ऊस खायला मिळतंय् म्हणून चरायला गेला. शंकऱ्या उंबऱ्यात येऊन इकडं–तिकडं गल्लीत बघत बसला...गल्लीत काही न्यारंच चाललं होतं. पोरांच्या अंगावर नवी आणि धुतलेली कुडती होती. कालची शेव, कडबोळी जिभेवर पुन्हा विरघळत होती. अंगाला तेलं लावलेली होती...दोन्ही मांड्यांत हात घेऊन नि तोंड मिटून शंकऱ्या गप्प बसला. डोळे तेवढे उघडे होते. उगीचच मनातल्या मनात मोठ्यानं म्हणाला, "आमचीबी आई आज कडाकण्या करणार हाय की."

गोदा गोंदू भटजीच्या घराकडं गेली. मुकाटपणानं गाईच्या गोठ्यात शिरली. शेणात हात घातला. पोवटया गोळा करून बुट्टीत भरल्या. खराटयानं मूत एका खड्ड्यात घेऊन हातानं गाडग्यात भरला. गोठा लोटून काढला. गोंदू भटजीच्या हातात दुधाची स्वच्छ कासंडी होती. लोटलेल्या गोठ्यात पायाचे चंपे ठेवत तो गाईच्या कासेत बसला. कासंडीत निरशा चांदीच्या धारा पडू लागल्या. गोदानं डोईवर शेणाची पाटी घेतली आणि बाहेरच्या मोगळातनं परड्याकडं गेली. तिथं शेण कालवून शेणी लावल्या. भटजी दूध घेऊन आत गेला. आतनं रातचं खाऊन उरलेलं अन्न घेऊन भटजीची बायको बाहेर आली. गोदानं बारडीतल्या पाण्यात हात कसेवसे खळवळले आणि फाटका पदर पुढं केला. ताटीतलं अन्न पदरात पडलं. विरलेल्या पदराला जास्तच खीस बसली.

"बाई." गोदा घोटाळली.

"काय ग?"

"आज दिवाळी हाय."

"आज आहे. काल नव्हती. दिवाळीचं उद्या मिळेल."

"काय म्हणते ग ती? तिला शिळं नको असेल तर गाईला घाल. तेवढंच दूध जास्त देईल." ...भटजी बदामी रंगाचे जुने कागद मोठ्यानं वाचत होते.

"तसं न्हवंजी, दादा. आज दिवाळी हाय. बाईचं शेरमापटं गहू मिळालं असतं; तर तेवढंच पोरा–बाळांस्नी कायतरी करून घाटलं असतं; म्हणते मी."

होय–ना करता करता बाईंनी ओंजळी–दोन ओंजळी गहू घाटले आणि उशीर

करून शेण काढायला येतेस म्हणून पायलीभर बोलून घेटलं...गोदाच्या अंगाला काही त्या शिव्यांनी भोकं पडली नाहीत.

शिळं अन्न आणि गहू घेऊन ती तशीच घराकडं आली. पोरं धोंगावून अन्नावर पडली. वेचून वेचून खाल्लं. कुणालाच पत्ता नाही ते गहू उतरंडीच्या खालच्या गाडग्यात ठेवून टाकलं. ते भिक्यानं बघिटलं नाही, नाहीतर निम्मे गहू त्यानं पळवले असते आणि चिरमुरंवालीला देऊन चिरमुऱ्याचं लाडू घेऊन खाल्लं असतं.

पोरांपुढं अन्न टाकून, एक–दोन घास चावून घेऊन ती माळ्याच्या घराकडं गेली. माळणीचं कांदं नीट करून देऊन बचकभर गुळाचा खडा आणला. ओटा जड झाला होता.

"काय आणलंस ग आई ?" शंकऱ्याला वास आला.

"ईख आणलंय."

"आम्हाला जरा देऽऽऽ!" शंकऱ्यानं सूर धरला. ईख आणलंय म्हणजे काही-तरी खायाला आणलंय्; हे त्याला ठाऊक होतं.

"आई, मलाबी देऽऽ" रत्नी.

"गप बसा कुत्र्यावाणी हुंबऱ्यात. रातचं कडाकण्या केल्यावर मग खायाला दीन." गोदानं गुळाचा खडा नंतर कुठं ठेवला ह्याचा पत्ता कुणालाच लागला नाही.

तीन–चार वाजता डोसक्यावर गवताचं दोन–तीन पाचुंडं घेऊन गोपा आला. दाराच्या सांदरीला भारा टाकून डुईचा घाम पुसत बसला. गालफाडं तहानेनं आत ओढली होती. भुकेवर आतडी गोळा झाली होती.

"काय खायाला हाय काय ग ?"

"थोडं हाय बघा त्या शिक्क्यावर."

भटाच्या इथनं आणलेली चतकोर भाकरी ठेवली होती. वर कसली तरी गुळचट भाजी चिकटली होती. तेवढी भाकरी खाऊन त्यानं तांब्याभर पाणी ढोसलं...... पोटात कुठंतरी अन्न, नाहीतर सगळीकडं पाणी झालं आणि गोपाचं पोट भरलं.

"गवताच्या सोड–पेंड्या करून एक भारा घाला." पाण्याचा ढेकर देऊन दात कोरून चाटत बसलेल्या गोपाला गोदा म्हणाली.

"हूं."

"आणि भारा घेऊन बामणगल्लीतनं एक फेरी मारून या."

"हूं."

"केवढ्यापतर देशीला भारा ?"

"तेच म्हणतो मी."

"बारा आणे सांगा. आठ आणे आलं तर द्या आणि लईच पाडून मागाय लागलं तर सा आण्यापतर देऊन टाका."

"हूं."

गोपानं सोड-पेंड्या करून भारा चौरीसारखा बांधला. पटक्याच्या चिंध्या गोळा करून डुईला गुंडाळल्या. आणखी अर्धा तांब्या पाणी ढोसलं आणि उठला...बामण-गल्लीची वाट धरली.

गोदानं उतरंडीतलं गहू काढलं. त्याच गाडग्यात गूळ ठेवून तिनं ती उतरंडी लावली. गहू निवडून काढलं. सुपात घेऊन ती बाहेर पडली. पलीकडच्या पारीच्या घरात जातं होतं. त्या जात्यावर पोट आवळून दळायला बसली.

दीड-दोन तास दिसाला गोपा डुईवर तसाच भारा घेऊन आला आणि त्यानं दारात बाद्‌ददिशी भारा टाकला.

"आलासा काय म्हईंदासारखं भारा तसाच घेऊन? कुठंपतर मीच एकटी हाडं उगळू?"

"मग काय करू? कोण घेईना झाल्यात."

"पोरांच्या डोंबलावर एक एक तरी कडाकणी बांधू या की दिवाळीचं. अजून डाळ, येशेल तेल आणायचं हाय. कशानं आणू तरी ते?" गोदाची आतडी तुटेपर्यंत ताणली होती. गोपा म्हईंदासारखा गपच बसला. घटकाभर थांबून गोदाच म्हणाली, "कुणीच मागिटला न्हाई?"

"चार आणे न्हाईतर तीन आण्याला मागत्यात. दत्तू भटजीनं तेवढा सा आण्याला मागिटला हुता."

"मग आणि हत्ती कुठं आडवा आला?"

"तू सांगिटलं न्हवतंस का आठ आण्यापतर द्यायला? आणि कुणीच न्हाई घेटला तर सा आण्याला द्यायला?"

"मग?"

"मग दत्तू भटजीनं सा आण्याला मागिटल्यावर मी न्हाई म्हटलं आणि आठ आण्याला कोण घेतंय का ते बघत फुडं गेलो; तर कुणीच घेईना. मग पुन्ना फिरून


दि. १८ नोव्हें. ६५ रोजी दक्षिण भारत यात्रा

* रामेश्वर-कन्याकुमारी-यात्रा *

दि. २५ डिसेंबर ६५ रोजी • संपूर्ण अलिशान व्यवस्था

* काशी - हरद्वार - कलकत्ता - पुरी *

राजकमल यात्रा कंपनी, ६०५ शनवार, पुणे २.

अनिल केळकर, २१ रामनिवास, गोखले रोड,

N. दादर, मुंबई २८. फोन : ५४४५७.

भटजीकडं गेलो, तर त्यो म्हणाला, ' आता चार आण्याला दे. ' मग तसाच भारा घेऊन आलो."

" बरं केलंसा. आता टाका एक एक पेंडी पोरांच्या फुड्यात नि खावा तुम्हीबी बसून."

दीस बुडायला गेला. पितेलं पोर तिथंच टाकून ती बाहेर गेली. गोपानं आपल्या डुईच्या चिंध्या काढल्या आणि गुडघ्यावर लोंबकळत ठेवल्या......डुईवर घाम मगाशी प्यालेल्या पाण्यासारखा आला होता. पाण्यासारखाच वाया चालला होता....... आयला ह्या दिवाळीच्या ! आली नसती तर बरं झालं असतं. पोरांची तोंडंबी खरकाटी हुत्यात का न्हाई कुणाला दखल ? जलमच आपला खोटा. एक एकाचं पेटता पेटंना झालंय नि आमच्या पोटातली आग काय काय केलं तरी इझंना झालीया.

घटकाभरातच गोदा टांग्याच्या घोड्यागत परत आली. गोपा गपच बसला होता.

" बसू नका म्हईदागत."

" तर काय करू ?"

" त्यो गवताचा भारा घ्या आणि कल्लू वाण्याच्या हितं टाकून या."

" हां."

" नुसतं हां न्हवं. भारा टाकून मापटं—तीन कोळवी डाळ दील ती घेऊन या."

" हां."

त्यानं पुन्हा भारा डुईवर घातला. कल्लू वाण्याच्या घरात नेऊन टाकला. दोरी सोडून घेटली. कल्लू वाण्यानं गवत म्हशीजवळच्या खोपड्यात लावायला सांगिटलं. ते लावलं आणि उभा राहिला. गवत लावताना ते कल्लू वाण्यानं मोजलं. बारक्या बारक्या पेंड्यांचं चार पाचुंडं होतं...चार कोळवी डाळ घेऊन तो बाहेर आला. गोपानं डाळ न्यायला काहीच आणलं नव्हतं. अंगरख्याच्या पुढच्या सोग्यात डाळ घेटली आणि तो परत आला.

रात झाली होती, तरी गोदा डाळ घेऊन पुन्हा पारीच्या जात्यावर गेली. डाळीला ऊन द्यायला वेळच मिळाला नाही. तशीच मऊ डाळ ती दळत होती......दोनदा दळली. जात्याचं वरचं पेड उचलून खालच्या पेडाच्या बारीक बारीक खड्डयांतलं पीठ नखांनी टोकरून घेटलं. घाम पुसत घराकडं आली.

पोरं वाट बघतच बसली होती. घरातला दिवा विझला होता. गोपाला कुणीतरी एका चिलमीची तंबाखू दिली होती. तिच्यासाठी तो अंधारातच दिवळ्यातनं चिलीम हुडकत होता. त्याला एका दिवळीत चुकून राहिलेला आणि वाळून खारीक झालेला भाकरीचा तुकडा गावला. बारकं पोरगं तंगड्या फेकत जीव तोडून खात होतं. त्याला तो तुकडा दिला. चोखताना त्याला बरं वाटू लागलं.......गल्लीत दिवाळीचं दिवं बारकी—सारकी पोरं लावत होती; त्याची गंमत बघत शंकऱ्या दारात उभा होता. रत्नी पोरगं अंधाराला भिऊनच रडतंय म्हणून त्याच्याजवळ ' गप, मी

न्हाय गप,' करत बसली होती.

गोदा पीठ घेऊन आली.

"अंधारातच बसलाईसा ?"

"चिमणीतलं तेल सपलंय."

"चूल न्हाई का पेटवायची ?"

"काय ठेवायचं चुलीवर ?"

"माझं मढं,—नुसता उजेड तरी झाला नसता का ?"

सगळीच गप राहिली. गोदानं पेटीच्या आत ठेवणीत ठेवलेलं रॉकेल तेल काढलं. जराही न सांडता चिमणीत थोडं ओतलं. तेल पुन्हा पेटीत ठेवून कुलूप लावलं नि किल्ली डोरल्यात अडकवली. मग चिमणी लावली ...... चूल पेटिवल्यावर तीही फुंकून टाकली.


किडूक-मिडूक शिजवून पोरं जेवणातनं ओढून काढली. गोपाला थोर चतकोर ताटलीत टाकली. जरा जरा कण्या आणि आमटी खाऊन सगळीजणं पटकुराच्या ढिगात पडली.

तीन-साडेतीन तास रात झाली होती. पोटभर जेवल्यावर माणूस झोपतं तसा पोटभराच्या कामानं गोपा भुईबरोबर एकजीव होऊन पडला होता. गोदानं हळूच पुन्हा दिवा लावला आणि त्याच्या उजेडात उतरंडीचा गूळ काढला. पाटचावर वरवंटचानं चेचला आणि भिजलेल्या डाळीच्या पिठात मिसळून दोन्ही एकजीव केलं. कणीक मळून ठेवली आणि हळूच भिक्याला उठिवलं.

भिक्या चटाकदिशी उठला. गोदा त्याला खालच्या आवाजात म्हणाली, "कडाकण्या करायच्या हाईत."

"मी करू लागतो की. मला नीज न्हाई." भिक्याचा जीव भराभर वर आला. आई कडाकण्या करण्यात आपणाला सामावून घेते यात त्याला फुशारकी वाटली.

"कडाकण्या करू लाग खरं; तेल

न्हाई येशेलचं."
"मग ग ?"
"मी सांगते तसं करतोस काय ?"
"करतो की."
"येशेल तेलाचं लोटकं घे. समदं गाव निजलंय्. कुणाचं म्या वाळगायचं काय कारण न्हाई. हळूहळू गावाबाहीरच्या म्हारुतीच्या देवळात जा. तिथं आत–बाहीर, दिवाळ्यावर दिवं लावल्यात. पर्तेक दिव्यातलं जरा जरा तेल वतून लोटकं भरून घेऊन ये जा."
"पाच मिटाचं काम हाय. लोटकं कुठं हाय ते दे." भिक्यानं चड्डी वर ओढली.
"कुणाला तरी गावशील–बिवशील."
"हॅल ! मी काय मेलेल्या आईचं दूध प्यालोय काय ? रानातनं असल्या रोज छप्पन चोऱ्या करतोय."
गोदानं तेलाचं लोटकं दिलं. घटकेच्या आत भिक्या अंधारात नाहीसा झाला. पाठीमागं शंकऱ्या आणि रत्नी हळूच उठून बसली होती. त्यांना कशी चाहूल लागली; काही कळलं नाही. "आई, कडाकण्या करायच्या व्हय ग ?" म्हणत शंकऱ्या उठून गोदाजवळ आला. रत्नीही डोळं चोळत कणिकीच्या लाटचाजवळ येऊन बसली...आता भिक्या आला की कडाकण्याऽऽऽ!
अंधाराच्या पोटातनं वळवळत भिक्या गुमान शिवेजवळच्या देवळाशेजारी आला. देवळाभवतीच्या तेवढ्या जागेत मंद उजेड निवळला होता. देवळासमोरचं लहानगं दिवाळं दिव्याच्या पिवळ्या फुलांनी भरलं होतं. देवळाच्या भिंतीतही भवतीनं खूप दिवळ्या होत्या. त्यातनंही एकएक दिवा मनापासनं समाधानानं जळत होता. देवळा-तही तसेच दहा–पंधरा दिवे होते. ठावक्यांतनं तेल तुडुंब भरलं होतं. दिवळ्यांतनंही बरंच सांडलं होतं...जळून आणि सांडून तेल वाया चाललं होतं.
भिक्या हळूच देवळात शिरला. त्याला आत सुरक्षित वाटलं. एक एक दिवा लोटक्यात ओतला. सगळे दिवे ओतून झाले. लोटकं भरत आलं. एखाद–दुसरा दिवा विझला. बाकीचे अखेरचं तेल जाळू लागले...भिक्या घगघगू लागला...आणखी दोन–चार दिवं घेटलं की लोटकं भरतं. कडाकण्यांस्नी भरपूर तेल हुईल आणि आईला सांगून एखादं ठावकंबी बाहीर लावता येईल.
...देवळाच्या मागच्या बाजूला गेला. पटापट चार–पाच दिवे ओतून घेटलं. लोटकं सांभाळत मागं–पुढं बघत तुरूतुरू जाऊ लागला. कोणच दिसत नव्हतं.
भिक्याची वाट बघत गोदा, शंकऱ्या आणि रत्नी यांनी पिठाचे आणि कणिकीचे गोळे करून ठेवले होते. शंकऱ्यानं पिठाचे गोळे किती आणि कणिकीचे गोळे किती हेमोजलं. पिठाचा एक गोळा कमी पडत होता. मग त्यानं आईला विचारून जरा जरा गोळ्यांतनं पीठ काढून एक गोळा जास्त करून हिशेब चुकता केला. पण नाही.

घटकाभरानं त्याच्या ध्यानात आलं, की हिशेब अजून चुकता झाला नाही. मग त्यानं प्रत्येकाच्या वाटणीला किती किती कडाकण्या येतील, हे गोळे जरा जरा बाजूला ठेवून बघितलं. बारक्या पोराला दोन कडाकण्या कमी देऊन पुन्हा हिशेब केला. रत्नी आणि आपण लहान म्हणून आई–बाबा यांच्यातली एक एक कडाकणी आपल्या कडाकण्यांत घेऊन बघितली...आता भिक्या आला की कडाकण्याऽऽ! आऽम्, आऽम् हाऽऽ!

भिक्या आला. हातात लोटकं नव्हतं. गोदा वाटच बघत बसली होती.

"लोटकं कुठं हाय रं?"

"त्या वेन्या गुरुवानं वाटंत धरून लोटकं फोडलं."

"आणि असा कसा गावलास तू?"

"गुरव पत्या न्हाई ते अंधारात दडून बसला हुता. मी आपलं हळूहळू तेल भरलं नि घराकडं यायला निघालो, तर वाटंवरच्या झाडाखाली बसला हुता. अंधारातनं आला नि कमरंत लाथ घातली. तोंडघशी पडलो. घुन्यासुद्धा माझा फुटला. हे बघ." भिक्यानं नाकातनं आलेलं रक्त दाखवलं.

"पटकी आली त्या गुरवाला."

गोदा तव्यागत काळवंडली. पिठाचं गोळं डोळं मोठं करून तिच्याकडं बघू लागलं. शंकऱ्या–रत्नीचं डोळंही त्या गोळ्यांगत झालं होतं. तेलाची वाट बघणारा चुलीतला जाळ उपाशीच चालला होता. ● ● ●



# हॉट-ओ-मॅट

## आता शेकण्याची दगदग नाही !

हो ! कारण ''हॉट-ओ-मॅटच्या'' निर्मितीने आरामशीरपणे शेक घेण्याची एक निर्धोक आणि अद्ययावत पद्धती उपलब्ध झाली आहे. ती एक विजेवर चालणारी स्वयंचलित तपमान नियंत्रक बसविलेली शेकण्याची पिशवी आहे. घरगुती वापरण्यासाठी आणि हॉस्पिटल्स्‌करिता अत्यंत उपयुक्त, किंमत माफक.

**निर्माते–नाना इंडस्ट्रीज.**


मालक वरच-
झोपलेला दिसतो
आता कसं?
'क्रियाशील' सभासद
केव्हां होता येते हो?
सर्व प्रकारच्या 'क्रिया'
करून जो निष्क्रीय होतो
तोच 'क्रियाशील' सभासद!
राजेंद्र गायकवाड


या पूर्वी आपण कोणत्या नाटकात काम केलय कां? अ‍ॅक्शनसहीत दाखवा पाहू.
" हत मेल्या, लाज वाटत नाही तुला विचारायला ?....."
हे आमच्या 'मुलूक मैदान' नाटकातील वाक्य

मायलेकरे उन्हातून घरची वाट चालू लागली.
एखादा चुकार पोपट शेतावर झेपावत होता.
आईचे शब्द आठवले आणि त्याला वाटू लागले
— आपणही पोपट व्हावे का ?

# तयारी

मधु मंगेश कर्णिक

गोपू आणि त्याची आई शेताच्या बांधांवरून चालली होती. गोपू नऊ–दहा वर्षांचा. आई आईएवढीच, पण इतरांना असतात तसे गोपूला वडील नव्हते. ह्यामुळे त्याला शाळेत पोचवायला–न्यायला त्याची आईच येई. आजही गोपूची आई नेहमी-सारखीच त्याला न्यायला शाळा सुटण्याच्या सुमारास आली होती. शाळा सुटण्याची घंटा होईपर्यंत बाहेर थांबून राहिली होती. शाळा सुटताच पाटीदप्तर सांभाळीत गोपू बाहेर पडला आणि थेट आईपाशी आला. आई आंब्याच्या झाडाखाली थांबली होती. गोपू जवळ येताच ती म्हणाली,

" गोपू, आज आपल्याला शेतात जायचंय् बाळ. "

" मलासुद्धा ! "

" हो, तुलासुद्धा. घरी जाऊन एकटाच बसणार, त्यापेक्षा माझ्यावरोबर शेतात चल — "

" पण तू रोज तर लवकर जातेस. मला शाळेत पोचवतेस नि लगेच शेतात जातेस. आज कशाला उशीर केलास — "

" आज दुसऱ्याच्या कामासाठी मजुरीला नाही जायचंय् बाळ मला.... आज स्वत:चीच मजुरी करायची. "

" चल, जाऊ या. "

" तुला भूक लागली असेल– "



" फार नाही, थोडीशी – "

" हे घे. "

गोपूच्या आईने पदरात बांधलेली नाचणीची अर्धी भाकर बाहेर काढली. वर मीठ नि तिखटाची थोडी पूड होती. मुलग्याचे दप्तर आपल्या हातात घेतले नि भाकरी गुंडाळलेला कागद त्याच्या हाती दिला. गोपू भाकरी खात खात आईबरोबर चालू लागला. लवकरच शेत आले. ती दोघे बांधावरून चालू लागली. भाताचा अथांग मळा. नुकतीच कापणी झाली होती. खाचरांत कुठे कुठे थोडे पाणी थबकले होते. मूठभर उंचीचे भाताचे कापलेले खुंट ओळीत उभे होते. कापलेल्या भाताच्या त्या खुंटांचेही एक ठेंगणे पिवळे पीक आल्यासारखे वाटत होते. भातमळा रिकामा होता. दरोबस्त कापणी आटोपली होती. कार्तिकातले उन्ह तापत होते. रिकाम्या मळ्यात ते नागडे उघडे दिसत होते.

गोपूची भाकरी खाऊन संपली. त्याने हात खमिसाला पुसले. जीभ तिखटाने भगभगली होती, पण त्याने तोंड वाऱ्याच्या दिशेने उघडे केले. थंड वारा जिभेला लागताच आग थांबली. मग त्याने आईला विचारले,

" आई, आपण कुणाच्या मजुरीला चाललो ?"

" आपल्याच. "

" म्हणजे ? "

" तेच दाखवते तुला–" असे म्हणत आई कापलेला भात होता, तेथे उतरली.

" हे तर शेत केव्हाच कापले. "

" कापलेल्या शेतातही धान्य असते. "

आई खाली वाकली आणि शेतात जमिनीवर सांडलेले भात वेचू लागली. कापणीच्या वेळी खाली सांडलेली अर्धवट भातकेसरे आणि भातगोटे बेवारशी होऊन जमिनीत मिसळले होते. आई खाली बसून एकेक भातगोटा काळजीपूर्वक निवडू लागली. पदरात साठवू लागली. खाली खूप बारीक दगड होते, चिखल होता आणि भातखाचरांत नेहमी रुजणारी बोटभर उंचीची वनस्पती होती. त्या सगळ्यांतून नजर बारीक करून आई भात तेवढे वेचून पदरात साठवीत होती. गोपू बांधावर उभा राहून पाहत होता. त्याला आठवण आली– सोसायटीच्या रेशनिंग–दुकानांसमोर सांडलेले धान्य गोळा करण्यासाठी महारांची पोरे अशीच जमायची. अशीच नजर बारीक करून धान्याचा कणन् कण टिपून घ्यायची. कित्ता गिरवताना चळलेली शाई टिपकागदाने टिपून घ्यावी त्याप्रमाणे. तो म्हणाला,

" मी येऊ आई भात वेचायला ?"

" ये. "

गोपू बांधावरून खाली उतरून आईशेजारी बसला. भात निवडू लागला.

" कशात साठवू आई ? "

" साठव मुठीतच. मूठ भरली म्हणजे माझ्या पदरात टाक. "

" पण मग मी किती भात निवडलं ते कसं कळणार ! तुझ्यापेक्षा मी अधिक निवडणार आहे. " आई हसली. म्हणाली,

" पदराच्या दुसऱ्या शेवात तुझं भात साठवीन. मग तर झालं ? "

गोपूने मान डोलवली आणि खाली मान घालून एकाग्रपणे तो भात निवडू लागला. कितीतरी भातगोटे तेथे सांडले होते. पिवळेजर्द आणि रसरशीत. तांबस चिखलावर सोनेरी नक्षी काढावी तसे. उकिडवे बसून मायलेकरे ते बेवारशी पीक गोळा करू लागली. गोपूची मूठ भरली की तो आईकडे साठवलेले भात देई. आई पदराच्या वेगळ्या शेवात ते बांधून ठेवी. दाण्यामागून दाणे, मुठीमागून मुठी...गोपूला आश्चर्य वाटले. हे एवढे धान्य खाली सांडते कसे ? मग शेताच्या मालकाने कापून किती नेले असेल ? त्याच्या घरी किती मुठी गेल्या असतील...? त्याच्या आईचा अख्खा पदर मग भातगोट्यांनी भरून गेला असेल ?...हे शेत कुणाचे बरे असेल ? आपल्याला का नाही एखादे शेत...मग आपल्याला असे दाणे वेचावे लागले नसते. कोयती घ्यायची आणि उंच वाढलेली भातकेसरे सपसप कापीत जायचे. वाऱ्यावर सळसळणारी साळीची शेते किती सुंदर दिसतात. ती कधी कुणी कापलीच नाहीत तर किती मजा होईल ? पिवळेधमक शेत नुसते बघायलाच किती सुंदर वाटते. तो आईला म्हणाला,

" आई–"

" काय रे, दमलास ? "

" दमलो नाही; पण आई, शेत कुणाचं ग ?"

" असेल कुणातरी खोताचं; इनामदाराचं."

" एखादं शेत कापलंच नाही तर ?"

" वेड्या, शेतं कापण्यासाठीच पिकवतात."

" शेत कापलं नाही तर वाऱ्यावर ते एकसारखं सळसळत राहील...त्याच्यात उभं केलेलं बुजगावणं नुसतंच टकमक बघत हसत राहील आणि बांधावरून शाळेतली मुलं जाऊ लागली म्हणजे त्यांना मोठी गंमत वाटेल......खरं की नाही ? कशाला लोकं कापतात एवढी सुंदर शेतं—"

आई मान वर करून हसली. पुटपुटत म्हणाली,

" तू किनई अगदी नादिष्ट मुलगा आहेस."

गोपू मग निमूटपणे गोटे निवडीत राहिला !

लवकरच त्याला कंटाळा आला. सारखं आपलं मान खाली घालून निवडायचं. डोळे दुखू लागले. पिवळे भात रंगीबेरंगी खड्यांसारखेच दिसू लागले. मग त्याच्या जागी तांबड्यालाल गुंजा दिसू लागल्या. हातात भाताऐवजी बारीक दगड येऊ लागले. गोपू कंटाळला. आईला न सांगताच उठून उभा राहिला. आईला जागच नव्हती. ती निवडता निवडता बरीच दूरवर गेली होती. गोपूने डोळे चोळीत आजूबाजूला पाहिले. बापरे, किती दुपार झाली होती. लखलखीत उन्हे पडली होती. ओल्यागार भातखाचरांवर उन्हे पडल्यामुळे वाफेच्या लाटा उठत होत्या. मोकळ्या मळ्यांत पिवळी फुलपाखरे स्वच्छंद बागडत होती. त्यांना वरच्यावर मटकावणाऱ्या मुठीएवढ्या रानचिमण्या इकडेतिकडे उडत होत्या.

गोपू ती मौज पाहण्यात गुंतला. त्याला आईचे भानच उरले नाही. तो चालत चालत खूप लांबवर आला. तेथे अद्याप न कापलेले एक शेत उभे होते. भाताच्या ओंब्यांनी गच्च भरलेले, वाऱ्यावर डुलणारे आणि त्यावर पोपटांचे थवे भरारत होते. लांब शेपट्यांचे हिरवेगार पोपट पलीकडल्या झाडींतून बाणासारखे धावत येत नि त्या शेताला भिडत. चोचीत एकेक ओंबी पकडून पुन्हा माघारी जात. गोपू डोळे विस्फारून बघत होता. त्या शेतात राखण नव्हती. बुजगावण्याचे हात मोडून पडले होते आणि पोपटांचे थवे भाताच्या केसरांची बेबंद लूट करीत होते. त्यांच्या चीत्कारांनी सगळे वातावरण भरून गेले होते......

गोपूने मागे वळून पाहिले.

त्याची आई खूप दूर राहिली होती. तिथून ती एखाद्या काळ्या ठिपक्याएवढी दिसत होती. गोपूला आईची दया आली. आईपेक्षा पोपट अधिक शहाणे. आईला तासभर निवडून जेवढे दाणे गोळा करता येणार नाहीत, तेवढे हे पोपट एका भरारीत गोळा करतात. आईला दाखवले पाहिजे. उगीचच रिकाम्या शेतांतले खाली

पडलेले दाणे वेचण्यापेक्षा या पिकलेल्या शतात येऊन ओझेभर केसरे कापून नेली तर किती तरी भात मिळेल......

तेवढ्यात शेताचा मालक कुठूनतरी उगवला. बुजगावण्याच्या पायाशी ठेवलेले पत्र्याचे डबे त्याने बडवण्यास सुरवात केली, त्यासरशी पोपटांचे थवे मिऊन झाडींत पळाले. शेत ओकेबोके दिसू लागले. गोपू पोपट गेले त्या दिशेकडे पाहत होता. मग तो त्याच दिशेने चालू लागला. कुठे राहतात हे पोपट ? त्यांनी किती भात जमवले असेल ? पाहू या का...आणि तो हा हा म्हणता बांधापलीकडील त्या आंबराईत येऊन पोचला......

आंब्याच्या झाडांवर फांदीफांदींवर पोपट बसले होते. आपापसात मोठमोठ्याने गोंगाट करीत होते. गोपूने बारकाईने एका झाडाकडे पाहिले. तेथे एक पोपट एका ढोलीतून तोंड बाहेर काढून पाहात होता...अरेच्च्या, या ढोलीत राहतात काय पोपट ? तिथे तर आपणास सहज चढून जाता येईल......

गोपू मागचापुढचा विचार न करता त्या झाडावर चढू लागला. ढोल फार उंचावर नव्हती. तो एक दुबेळक्यात बसला नि त्याने ढोलीत वाकून पाहिले. ढोल हातभर खोल होती नि आत भाताची केसरे तोंडापर्यंत ठासून भरली होती. ढोलीतून उडालेला पोपट दूर बसून वाकड्या मानेनें पाहात होता......

गोपूने ढोलीत हात घातला आणि पोपटाने साठवलेले सगळे भात आपल्या खिशात कोंबायला सुरवात केली. त्याचे दोन्ही खिसे तुडंब भरले. ओरबडलेली पिवळीजर्द भातकेसरे. कितीतरी जातींची. जिरेसाळ, कमोद आणि आंबेमोहर. गोपूचा चेहरा उजळून निघाला. त्याने ती ढोल रिकामी केली नि पलीकडच्या झाडांकडे पाहिले. प्रत्येक झाडाला एक–दोन लहानमोठ्या ढोली होत्या. या प्रत्येक ढोलीत किती भात असेल ? त्याला अंदाज करवेना......

तोच त्याच्या कानांवर हाका येऊ लागल्या......दूरून त्याची आई त्याला हाक मारीत होती......

" गोपू ऽ ऽ – रे, गोपू ऽ ऽ ऽ ! "

गोपू भराभर खाली उतरला नि चालू लागला. बोल बोल म्हणता आईपाशी जाऊन पोचला. आई त्याचे पाटीदप्तर हातात घेऊन त्याला हाका मारीत होती. तिच्या पदरात शेरभर भाताची मोटली बांधली होती......

" कुठे होतासरे इतका वेळ – ? "

गोपू खुषीने हसला. त्याचे डोळे लुकलुकले. त्याने आईच्या पदरातील मोटली पाहिली. मग विचारले,

" इतका वेळ निवडून एवढाच भात ? "

" मग काय करू ? तू गेलास मला एकटीलाच सोडून – "

गोपू पुन्हा हसला.

" मी बघ तुझ्यापेक्षा अधिक भात जमवले. " अणि त्याने आपले गच्च फुगलेले दोन्ही खिसे दाखवले. खिशात हात घालून मुठभर ओंब्या बाहेर काढल्या.

" कुठून आणलेस हे भात ? कुणाच्या शेतातून चोरून तर नाही आणलेस ? "

" उंहुं. " गोपूचे डोळे अधिकच लुकलुकले.

" मग ?"

" त्या तिकडून– " त्याने पलीकडील झाडीकडे बोट दाखवले. आई तिकडे पाहू लागली. तिला काही कळले नाही. गोपूने म्हटले,

" आणखी पण खूप आहे भात तिकडे......निवडत बसायला नको काही...आमची गंमत आहे ती. "

" मेल्या, सांग आधी कुठून आणलीस ही केसरे, नाहीतर मार खावा लागेल... ...चोरीबिरी करून आणली असलीस तर– "

गोपूच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. चोरी करणे म्हणजे पाप हे त्याला ठाऊक नाही का ? तो कसा चोरी करील ? आईला एवढा पण विश्वास नाही. कधी केली होती का आम्ही चोरी...गोपूचे ओठ वेडेवाकडे झाले. तो हिंपुटी झाला !

" तसं नाहीरे वेड्या...चल, असा रडवेला नको होऊस...पण खरं सांग, कुणी दिली तुला ही साळीची केसरे ? "

" पोपटांनी. "

आई त्याच्या तोंडाकडे पहातच राहिली. मग तो म्हणाला, " चल दाखवतो तुला, खरं वाटत नसेल तर. "

तो पुढे नि आई त्याच्यामागून अशी दोघे चालू लागली. आता ऊन कडक झाले होते. आईला कधी एकदा घर गाठीनसे झाले होते. आता याच्यानंतर घरी जायचं. हे गोळा केलेलं भात खापरांत भाजायचं. मग उखळात कांडून त्याची पटणी करायची. मग तिचा भात नाहीतर भाकरी. ती थकली होती. पाऊल पुढे टाकण्याचीही ताकद अंगात उरली नव्हती, पण तरीही वाटत होते, कुठून या मुलाने आणले हे एवढे भात...चोरीबिरी न करता आणलं असेल, कुणी आपण होऊन दिलं असेल, तर बरंच झालं. तेवढीच भर...लहान पोरगा चोरी करायचा नाही. काय डोकं लढवलं असेल देव जाणे...

गोपू आईला आंबराईपाशी घेऊन आला. एका आंब्याच्या झाडाकडे हात करून म्हणाला,

" त्या तिथे ढोलीत पोपट राहतात ! त्यांनी गोळा केलेलं हे भात मी आणलं. "

आईने एकवार त्या ढोलीकडे पाहिलं. एकवार आपल्या हडकुळ्या पण तरतरीत मुलाच्या लुकलुकणाऱ्या डोळ्यांकडे पाहिले नि ती घट्ट आवाजात बोलली,

" नि त्या पोपटांनी काय खावं रे– "

खरंच, हा विचार आलाच नाही आपल्या डोक्यात. आपण त्यांचं धान्य आणलं

तर त्यांनी काय खावं ? पोपटांची झाली तरी ती चोरीच–क्षणभर विचार करून तो उत्तरला,

"ते आणतील दुसरं भात–त्यांना कोण अडवणार आहे? बोलून चालून ते पक्षी !"

"म्हणजे पुन्हा चोरीच...पक्ष्यांनी माणसांची चोरी करायची. माणसांनी पुन्हा पक्ष्यांची चोरी करायची...म्हणजे माणसांनी माणसांचीच चोरी केली...नाही का ?"

गोपूला काही कळले नाही. आईच्या मते आपण चोरीच केली एवढे त्याच्या ध्यानात आले.

"मग हे भात तू घेणार नाहीस ? याचे तांदूळ बनवणार नाहीस ?" त्याने हात खिशाकडे नेत विचारले.

"अं हं–"

गोपू क्षणभर घुटमळला. मग तरतरा चालत आंब्याच्या झाडापाशी गेला नि दोन्ही हात खोडाभोवती वेढून तो झपाझप वर चढला. ढोलीपाशी गेला. दोन्ही खिशांतले भात त्याने पुन्हा त्या ढोलीत टाकले. खिसे रिकामे करून तो खाली उतरला.

"चला आता घरी." आई म्हणाली.

मायलेकरे उन्हातून घराची वाट चालू लागली वाटेत मघाचे शेत पुन्हा लागले. राखणदाराला चुकवून एखादा चुकार पोपट शेतावर झेपावत होता. चोचीत ओंबी पकडून ढोलीच्या दिशेने उडत होता...गोपू पाहात होता. अद्याप त्यांच्या कानांत आईचे शब्द घुमत होते. पक्ष्यांनी माणसांची चोरी करायची, मग माणसांनी पक्ष्यांची चोरी करायची...म्हणजे पुन्हा माणसाने माणसाचीच चोरी करायची...पाप करायचे... आई काय म्हणाली, हे त्याला अद्यापही नीटसं उमगले नव्हते; पण डोक्यावरून निर्भरपणे उडत जाणारे ते हिरवेगार पोपट पाहून त्याला वाटत होते–आपणही पोपट व्हावं का ?.....

● ● ●


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.


छत्रपती विडी
कफ
साफ
मार्क
एस. आर. साबळे
२५
छत्रपती
शिवाजी विडी
ANSO 64
साबळे वाघीरे आणि कं. कुर्ला, मुंबई, पुणें



काही घरे अशी असतात, की तिथे बोलावले तरी जाऊ नये. मात्र काही अशी असतात, की जिथे न बोलावता माणसे येतात. शारदाबाईंना वाटे, आपले घर असेच आहे. न बोलावता इथे कितीजण येतात. कालच विष्णू आणि त्याची बायको दोन दिवस राहून गेली. पंधरा दिवसांपूर्वी विष्णूचा मित्रच मुलाबाळांना घेऊन येऊन गेला. राहिला नाही पण गावात आल्यासारखा भेटून गेला. यांना जाऊन आता पंधरा वर्षं होतील, पण सासरची माणसं अजून धरून आहेत. यांचे पुतणे, भाचे, भाच्या सगळी येऊन–जाऊन असतातच. बहिणीची मुले ती मावशीकडे यायचीच ! पाहुण्यांचा सारखा राबता पुढच्या खोलीत असतो.

कधी कधी शारदाबाई कावून जात. दोन खोल्यांच्या बिन्हाडात सारखा पाहुणा एक खोली धरून राहिला, की त्यांच्या मनात येई, एक खोली भाड्याने देऊन टाकावी. वाड्यातली कितीतरी माणसं त्यांना म्हणत, "शारदाबाई, खोली द्यायची झाली तर आम्हाला विचारा !"

शारदाबाईंनी कधी अशी विनंती मनावर घेतली नाही, पण आता वयानुरूप त्यांना थकवा वाटे. एका खोलीत पाहुणा नकोच, पण कुणी कायमचा शेजार असावा, असे त्यांना वाटे; पण हे फार थोडा वेळ टिके. नाना प्रश्न त्यांना भेडसावू लागत. पुढच्या खोलीतल्या सगळ्या सामानाचे काय करायचे ? जुना शिसवी पलंग, व्यायामाच्या वेळी लागतो म्हणून यांनी मुद्दाम आणलेला बेल्जम–काचेचा तीन फुटी आरसा, टेबल, खुर्च्या.....शिवण्याचे मशीन, भिंतीवरल्या रविवर्म्याच्या तस-

काही घरे अशी असतात,
की जिथे न बोलावता माणसे येतात.
शारदाबाईंना वाटे, आपले घर असेच आहे —!

# माय मरो - मावशी जगो

वि. ग. कानिटकर

बिरी......! शिवाय एकदा खोली दिली, की मग पुनः लागली तर थोडीच मिळणार आहे ? ......शारदाबाई मग तो विचार मनातून हाकलून काढीत. आहे तसेच चालू राही. पुढच्या खोलीत अधूनमधून कुणी ना कुणी येता-जाता राही.

कालपासून त्यांना थोडे बरे वाटत नव्हते. सकाळी त्यांना हुशारी वाटली. चार घास खाऊन त्या आता लवंडण्यापूर्वी खिडकीशी उभ्या होत्या. समोरच्या चौकातली वर्दळ आता थोडी शमली होती. पोलीस हातवारे न करता नुसताच उभा होता. पुतळ्यासारखा. आसपासचे सगळे फक्त पाहत होता.

रस्त्याच्या कडेने मुले शाळेत धावत होती. एकमेकांच्या अंगावर लवंडत, गिल्ला करीत चालत होती. मध्येच मोटारीची चाहूल लागली, की पोलीस हात आडवे–उभे करीत त्यांना दिशा देत होता. शारदाबाईंना त्या पोलिसाविषयी सहवासाचा जिव्हाळा निर्माण झाला होता. तशी थोडीशी ओळखही झाली होती. बरोबर बारा वाजता, पायाखालचे पत्र्याचे पिवळे टेकण तो फरफटीत त्यांच्या खिडकीपाशी आणून ठेवी. शारदाबाई उभ्या असल्या तर हसून म्हणे, " संपली ड्यूटी ! " कधी विचारी, "पाहुणे गेले वाटतं......!" अशी आणि इतकीच ओळख होती. चारच्या सुमारास त्या आतल्या खोलीत लवंडलेल्या असताना, ते टेकण पुनः रस्त्याच्या मध्यभागी ओढत नेल्याचा आवाज त्यांच्या कानी येई.

शारदाबाईंचे यजमान गेले आणि असेच कुणीतरी आयुष्याचे टेकण फरफटत या खोल्यांत आणून ठेवले; ते मात्र तिथेच राहिले होते.

सदाशिवराव जिवंत होते तोपर्यंत......आपण फारसे शिकलो—सवरलो नाही याची खंत त्यांना कधी वाटत नसे. तशा त्यांच्या चार-सहा यत्ता झाल्या, परंतु सदाशिवरावांनी इंग्रजी शिकण्याकरता आणलेले तर्खडकरांचे पहिले भाषांतर फळीवर अजून कोऱ्या अवस्थेत पडलेले होते. गेली पाच-सहा वर्षे मात्र त्यांना याची फार खंत वाटे. वाड्यातल्या सुमित्राबाईदेखील त्यांच्याच वयाच्या होत्या, विधवा होत्या, पण त्या चांगल्या मॅट्रिक शिकल्या होत्या. नवऱ्याचे चांगले पेन्शन मिळत होते, तरी त्या एका कारखान्यात चार तास नोकरी करीत. संध्याकाळी घरी येताना त्यांच्या काखेत कसलातरी अंक असे. न चुकता शेजारच्या लायब्ररीतून त्या अंक बदलून आणीत. कारखान्यातल्या बायका त्यांच्याकडे सारख्या या ना त्या कारणाने कामाकरता येत-जात असत. आयुष्य कसे अजून भरल्यासारखे होते.

शारदाबाईंच्या घरात एक पुस्तकांचे कपाट होते. त्यांतली जी इंग्रजी पुस्तके होती, त्या बहुतेक डिक्शनऱ्या होत्या. चित्रमयजगतच्या अंकाच्या बाईंड केलेल्या चार-पाच वर्षांच्या फायली आणि दासबोध—ज्ञानेश्वरी ! यांतला दासबोध शारदाबाई कधी कधी वाचीत. बाकी रोजचे वाचन म्हणजे फक्त रोजचे वर्तमानपत्र. पुष्कळवेळा वर्तमानपत्रांतून गावात होणाऱ्या सभासंमेलनांच्या हकीकती वाचल्या, की त्यांना वाटे, आपणदेखील कुठे कुठे जायला हवे. पण त्यांनी हे प्रत्यक्षात मात्र कधीच केले नव्हते. ‘ चला हो, ’ म्हणणारी कुणी समवयस्क मैत्रीण त्यांना नव्हती आणि एकट्यानेच या गोष्टी करण्याचे धैर्यही त्यांना होत नसे.

तसे म्हटले तर सभेला जायचे म्हणजे विशेष ते काय करायचे ? उठायचे आणि चालू लागायचे. पण असे काही करणेच त्यांना चमत्कारिकपणाचे वाटत असे. समोरच्या पशुपतिनाथाच्या मंदिरात कुणाची तरी ज्ञानेश्वरीवर प्रवचने होती. सकाळी साडेसहाला उठून त्या दोन दिवस गेल्या. तिसऱ्या दिवशी त्यांनी त्या बाजूची खिडकीदेखील उघडली नाही ! जायला हवे, जायला हवे अशी मनाची टोचणीही फार वेळ टिकली नाही. कारण तितक्यात त्यांच्या बहिणीचा मुलगा परशा आला. नोकरीसाठी त्याचा इंटरव्ह्यू होता, म्हणून तो आला होता. मग त्याने उंबरठ्यावर बसून घरच्या हकीकती सांगितल्या. त्या ऐकता ऐकता ती टोचणीही संपली. चौथ्या दिवशी त्यांना टोचणीदेखील लागली नाही.

कुणी पाहुणा पुढच्या खोलीत नसला, की त्यांना मधूनच चुकल्या—चुकल्यासारखे होई. आता वयानुरूप त्यांना पाहुण्यांची ऊठ-बस होत नसे, म्हणून त्या पाहुण्यांची रीघ लागली, की कावून जात. परंतु घरात एकटे राहण्याचा प्रसंग आला, की वेळ त्यांना पुन: खायला उठे. सकाळ, दुपार, सायंकाळ हे त्यांच्या जागेपणाच्या जीवनाचे ढोबळ वेळापत्रक होते. सकाळी घरात पडलेल्या वर्तमानपत्रावर जो वार असे, तो वार आणि बँकेतून येणाऱ्या पेन्शनवरच्या व्याजावर जो महिना असे, तो महिना, एवढाच कालाचा हिशोब त्यांना पुरेसा वाटे. त्यांचा दाणेवाला त्यांना आठवणीने

नवे कॅलेंडर देई. नवे कॅलेंडर आले, की त्यांचे वर्ष बदलत असे.

एखादे दिवशी त्यांना बरे वाटत नाहीसे झाले म्हणजे मात्र त्या गलबलून जात. आपण उद्या अंथरूण धरले, तर येता-जाता आपल्याकडे येणारी ही माणसे येतील का ? हक्काने पत्र लिहावे–बोलावून घ्यावे–असा यांपैकी कोणाशीच आपला जिव्हाळा जोडलेला नाही. शिवाय पत्र लिहून आलेच कुणी, तर समाचाराला येतील, परत जातील...जीव घाबरला तर हात गच्च धरून ठेवावा, असे मायेचे कुणीच जवळ असणार नाही...या विचाराने त्या अस्वस्थ होत.

आतादेखील त्या खिडकीपासून दूर झाल्या व चटई अंथरून त्यांनी लुगड्याची घडी उशाला ठेवून, अंग जमिनीवर टेकले. टेबलावरचा दासबोध किंवा वर्तमानपत्र त्यांनी हातात घेतले नाही. खोलीच्या कडीपाटाकडे एकटक पाहत त्या आठवत होत्या–

" शरू, आपल्याला मूल झालंच नाही तर ? "

"इकडे या पाहू ! काहीतरी बोलू नका ! "

अशीच या विषयाची थट्टेत सुरवात झाली. त्यांनाही हा संशय अनकवेळा आलेला होता. परंतु त्याचा उच्चार त्यांनी केला नव्हता. नवऱ्याने तो केला, तेव्हा रात्र होती. बाहेर पाऊस पडत होता. स्तनभागापाशी त्याला ती थोपटीत होती. महत्त्वाचा विचार, धक्का देणारे असे काही या स्थितीत बोलणे शक्य नव्हते.

त्यानंतर ओळीने कितीतरी रात्री तो विचार त्याने बोलून दाखविला. मग नवरा नसताना कधी त्या या विचाराने अस्वस्थ होत––" खरंच, आपल्याला मूल होणार नाही का ? " कुणी त्यांना नेम सांगितले. उपास सांगितले. व्रतवैकल्ये सांगितली. फारसा विचार न करता या व्रतवैकल्यात त्या अडकल्या आणि अशीच आणखी दोन-तीन वर्षे गेली.

मग एक वेगळाच बदल त्यांना जाणवला. सदाशिवराव सायंकाळी ऑफिसमधून घरी येत. नवेपण आता संपले होते, पण बायकोवर त्यांचा जीव अजून कायमचा होता. घरात मूल नाही म्हणून शक्य तेव्हा वेळ बाहेर काढण्याचा प्रयत्न सदाशिवरावांनी केला नाही. आपल्याकडून मोठाच अन्याय झालेल्या व्यक्तीशी अधिकच सहानुभूतीने, प्रेमाने वागावे तसे ते शारदाबाईंशी आता वागत. घरातली अर्धी कामे ते करीत. शारदाबाईंना खरे म्हणजे हे सर्व आवडत नसे. त्यांना वाटे, सदाशिवरावांनी सारखे आपल्या कचेरीच्या किंवा बाहेरच्या अशा काही कामांत गुंतावे आणि त्यांच्यासाठी आपण एकट्याने खपावे–राबावे–रांधावे. परंतु सदाशिवरावांना त्यांनी कधी दुखवले नाही. हा काळ तर फार सुखाचा होता. शारदाबाईंचे शरीर दृष्ट लागावे असे आता सतेज आणि भरलेले होते. खर्ची न पडता त्यांचे सगळे तारुण्य शरीरात फुलतच होते. पण रात्र झाली, की सदाशिवरावांचा नूर पालटे. त्यांना कसलीतरी भीती वाटू लागे. ते पलंगावर निजत आणि शारदाबाई पलंगापुढे जमिनीवर गादी पसरत असत. महिन्या-महिन्यांत त्या पलंगावर जात नसत. झोप

लागेपर्यंत सदाशिवराव वाचत बसत आणि त्यांना झोप लागली, की दिवा विझवून शारदाबाई झोपत. अशाच एका रात्रीची आठवण त्यांना अजून होती—

शेजारी कुणीतरी घसमुसळेपणा केला म्हणून त्या जाग्या झाल्या. सदाशिवराव त्यांच्या शेजारी होते. त्यांनी शारदाबाईंना घट्ट मिठी मारली व त्यांच्या कुशीत तोंड खुपसून रडू लागले.

"असे काय करता वेड्यासारखे—?"

"मला भीती वाटते शरू—शरू, तू मला सोडून जाणार नाहीस ना ?"

"मी कुठे जाणार तुम्हाला सोडून..."

मिठी सैल झाली. सदाशिवराव दूर झाले. हा प्रश्न होता की अगतिकता ? तिनें सहज केलेले प्रत्युत्तर त्यांना अधिकच वर्मी लागले असावे. ते केविलवाणेपणे म्हणाले, "म्हणजे शक्य असतं तर गेली असतीस."

"तुम्हीच हल्ली चमत्कारिक वागता ! किती दिवसांनी आज आपण शेजारी निजतो आहोत ते आठवा—"

"उपयोग काय त्याचा ? नको वाटतं. इच्छाच राहत नाही—"

"मग त्यात माझी काय चूक ? हे काय बसले का झालात ? निजा ना. उगाच विचार करू नका..."

नवऱ्याची समजूत कशी घालावी हे तिला समजेना. अखेर शारदाबाईंनी जो एक प्रसंग त्यांना सांगितला नव्हता, तोदेखील सांगून टाकला. बरेच दिवस त्या प्रसंगाचे ओझे त्यांनी वागवले होते. हे सांगितले तर नवऱ्याला उगाच मनःस्ताप होईल, म्हणून त्यांनी ही गोष्ट सांगितली नव्हती, पण यावेळी त्यांनी ती सांगितली—

"मी तुम्हाला सांगणार नव्हते, पण सांगते. गेल्या आठवड्यात तुम्ही मुंबईला गेला होता, तेव्हाची गोष्ट आहे. नेहमीप्रमाणे सकाळी केशवराव आले होते. तुम्ही असला म्हणजे माझी त्यांच्याशी कशाला बोलायची वेळ येतेय् ? पण त्या दिवशी सकाळीच ते आले. त्यांना तुम्ही घरात आहात की नाही, हे माहीत होते की नाही कुणास ठाऊक. मी आत होते. दरवाजा लोटून ते आत आले. त्यांनी हिरव्या चाफ्याची फुले आणली होती. मी म्हटले, "ठेवा टेबलावर." ते म्हणाले, "तुम्ही आधी डोक्यात घाला. फार छान दिसतील तुम्हाला !" मी काहीच बोलले नाही. फारच लघळपणा करायला लागले तेव्हा मी विचारले, "तुमच्या बायकोशी असं कुणी वागलं तर चालेल का ?" मग ते लगेच गेले."

ही हकीकत ऐकताना काहीसा शांत झालेला त्यांचा नवरा पुन: शेजारी आडवा झाला. केशवरावांच्या दृष्टीने शारदाबाईंनी पुष्कळ काही तपासून पाहिले होते. केशवराव तसा सज्जन होता. या एका प्रसंगाव्यतिरिक्त त्याने कधी त्यांचा पाठपुरावा केला नव्हता. पाणउतारा झाल्यासारखा तो निघून गेला आणि आतापर्यंत शारदाबाईंनी ही हकीकत कुणाला सांगितली नव्हती. यावेळी मात्र त्यांचा

नाइलाज झाला.

नवऱ्याला थोपटीत त्या म्हणाल्या, "तुम्ही याबद्दल केशवरावांना काही बोलू नका–"

ती रात्र संपली. अधूनमधून अशाच किरकोळ प्रसंगातून रात्रीमागून रात्री उलटल्या. नवऱ्याला संशय यावा, अशा शारदाबाई कधी वागल्या नाहीत आणि आपल्यातील उणिवेची खंत सदाशिवरावांनी वर्षानुवर्षे त्यांच्याजवळ इमानाने व्यक्त केली. त्यांच्या त्या उभय इमानीपणावर तारुण्य संपले.

कमीत कमी पैशांत सदाशिवराव आता संसार करून, जास्तीत जास्त पैसे शिल्लक टाकू लागले होते. हौसा संपल्या होत्या. मौज करण्याची उमेद शिल्लक नव्हती... बँक-आकडा मात्र वाढतच होता.

संसारातली रुक्षताही वाढली होती. केस पांढरे होऊ लागलेले सदाशिवराव आता अगदी लहानसहान कारणांवरून चिडाचिडी करीत. ठरलेली वस्तू ठरलेल्या ठिकाणी न ठेवणे हा शारदाबाईंचा भयंकर गुन्हा...... वाड्यात अधूनमधून सगळ्यांना कळू लागला. मूलबाळ नाही, हे दुःख आता ताजे नव्हते. उलट मूलबाळ न होऊनही शारदाबाईंनी संसार सुखाने अखेरपर्यंत केला, अशी काहीशी शाश्वती सदाशिवरावांना आता आली होती. नवरेपणाचे इतर सर्व हक्क आता ते बजाव लागले होते.

आणि एके दिवशी पहाटे सदाशिवराव हार्टफेलने गेले. शारदाबाई सुन्न झाल्या. केशवरावांनीच वडीलकीच्या नात्याने त्यांची समजूत घालून, सदाशिवरावांना उचलताना त्याने मंगळसूत्र मागून नेले.

पेन्शनचे कागदपत्र, नियमाने पेन्शन व व्याज बँकेमार्फत मिळण्याची व्यवस्था, या सगळ्या गोष्टी केशवरावांनी केल्या. एके दिवशी केशवरावांना शारदाबाई चक्क म्हणाल्या,


आपला पादस्पर्श सुखद व्हावा
आपले घर सुशोभित दिसावे यासाठी

* सर्व प्रकारचे सिमेंटचे मार्बल मोझॅक व टेरोझो टाईल्स
* सिंथेटिक मोझॅक टाईल्स
* न घसरणाऱ्या पायऱ्यांसाठी आमच्या चेकर्ड

**झेनिथ टाईल्स**

फोन : निवास ५४४४६ — कार्यालय : ५७७७२
२८ शिवाजीनगर, सिंगर रोड, वाकडेवाडी, पुणे ५

" केशवराव, तुम्ही फार केलंत हो माझ्यासाठी...... "

केशवरावांनी घर बांधले व ते वाडा सोडून नव्या घरात गेले, त्यावेळी त्यांना सगळ्यांना शारदाबाईंनी घरी जेवायला बोलावले. शारदाबाईंचा निरोप घेताना केशवरावांच्या डोळ्यांत पाणी आले. आठवणीच्या ओघात सदाशिवरावांची आठवण मात्र त्यांनी कटाक्षाने काढली नाही.

...... नेहमी डोळ्यांपुढून सरकणाऱ्या या नवऱ्याच्या आठवणी शारदाबाईंच्या पुढून सरकत असतानाच, खिडकीखालील पत्र्याचे टेकण पोलिसाने ओढत नेल्याचा आवाज झाला.

शारदाबाईंनी भिंतीवरच्या घड्याळात पाहिले, तो चार वाजून गेले होते. त्या लगबगीने उठल्या. त्यांनी चटई गुंडाळून ठेवली आणि त्या चहाकडे वळल्या. चहाचे आधण ठेवून झाले, इतक्यात दारावर टकटक झाली.

त्यांनी दाराची कडी काढली. दरवाजात कुणीतरी अनोळखी जोडपे उभे होते. तो काळा-सावळा होता. सुटाबुटात होता. ती नाकीडोळी नीटस, छान, गोरीपान होती. हसतमुख चेहऱ्याची. डोक्यावरून तिने पदर घेतला होता. त्यांना काही ओळख पटेना. त्या म्हणाल्या,

" या–ना... "

तो आत शिरताना म्हणाला,

"तुम्ही मला ओळखत नसणार ! " त्याची बायकोपण खुर्चीत टेकली होती. पदर पुन:पुन्हा सारखा करताना तिच्या बांगड्या किणकिणत होत्या. त्या आवाजाने शारदाबाई भारल्यासारख्या झालेल्या होत्या. अवघडून उंबरठ्यावर उभ्या राहून त्या विचार करीत होत्या– कोण असावीत ही ?

" मला ओळखणं शक्य नाही तुम्ही. मी बाळ भोसले. इथे पंधरा-वीस वर्षांपूर्वी माझे वडील पी. डब्ल्यू. डी. त होते. मी त्या वेळी ७–८ वर्षांचा होतो. तुमच्या घराबाहेर इथंच मला अपघात झाला... "

शारदाबाई चकित होऊन पाहत होत्या. सोळा–सतरा वर्षांपूर्वी भुरभुरल्या केसांचा गोरा गोरा मुलगा म्हणजेच हा, यावर त्यांचा विश्वास बसेना. त्या एकीकडे मान डोलवीत होत्या. त्या एकदम म्हणाल्या,

" आठवले ! बसा हं. चहा टाकून आले. "

त्या दोघांना बाहेरच्या खोलीतच बसायला सांगून त्या आत वळल्या. विस्मृतीत घरंगळलेल्या त्या घटनेतला हा ' राजबिंडा ' असा अचानक घरी यावा, याचे त्यांना मोठे कौतुक वाटत होते.

त्या दिवशी सदाशिवराव कचेरीत गेले आणि दुपारी आवराआवर आटोपून त्या पलंगावर लवंडल्या होत्या. रस्त्यावर शुकशुकाट होता...आणि इतक्यात रस्त्यावर सायकल धाडकन पडल्याचा आवाज झाला. त्या दचकून खिडकीशी आल्या.

रस्ता ओलांडून धावत येणाऱ्या मुलाच्या अंगावर सायकल आदळली होती. आडवी पडलेली सायकल तशीच टाकून सायकलवाल्याने त्या मुलाला उचलले होते. त्या मुलाच्या ढोपरातून खरचटल्यामुळे थोडे रक्त आले होते, पण विशेष लागले नव्हते. घाबरून तो मुलगा फक्त मोठ्याने रडू लागला होता...व डोळे फिरवू लागला होता...रस्ता तसा निर्मनुष्य होता.

शारदाबाईंनी खिडकीतून सांगितले,

"त्याला आत आणा."

सायकलवाल्याने त्याला आत आणला व कॉटवर ठेवले. शारदाबाई त्याच्याजवळ गेल्या व त्यांनी त्याला जवळ घेतले. त्याचे हुंदके आता ओसरले होते आणि खरचट-लेल्या ढोपराकडे पाहत तो फक्त रडण्याचा कढ आणीत होता.

सायकल कडेला घेऊन, त्याचे दप्तर घेऊन सायकलवाला आत आला आणि शारदाबाईंकडे पाहून म्हणाला,

"एकदम हा धावत आला मध्ये." तो सायकलवाला दिसताच त्या मुलाने शारदाबाईंच्या कुशीत तोंड खुपसले. विशेष खरचटले नव्हते. शारदाबाई त्या सायकलवाल्याला म्हणाल्या,

"तुम्हाला घाई असली तर तुम्ही जा. मी थोड्या वेळाने तपास काढून याला त्याच्या घरी पोचवीन—"

सायकलवाल्याला खरोखरच कामाला जायची घाई होती. तो निघून गेला. शारदाबाईंनी तो निघून जाताच दरवाजाला कडी घातली. मुलगा आता रडायचा थांबला होता. भीतीने झोपेला मात्र आला होता. शारदाबाईंनी त्याला नाव विचारले. त्याने सर्व माहिती दमात सांगून टाकली —

"बाळ शंकरराव भोसले, खजिन्याच्या विहिरीजवळ, बोऱ्यांचा वाडा ...वय वर्षे सात."

मग शारदाबाईंनी पत्ते काढले. थोडा वेळ पत्त्यातील भिकार–सावकार खेळ खेळला. शारदाबाई त्याला म्हणाल्या,

"हे बघ, तू आता जरा वेळ नीज. उन्हे उतरली, की मग आपण घरी जाऊ हं तुझ्या."

"पण मला एकट्याला झोप येत नाही." त्याने अडचण सांगितली.

"हात्तीच्या, मग मी निजते ना तुझ्याजवळ."

शारदाबाईंच्याजवळ तो निजला. प्रथम चोरट्यासारखा लांब होता. हळूहळू डोळ्यांवर झोप आली, तसा तो कुशीत शिरला. शारदाबाईंनी त्याला घट्ट जवळ घेतला. शारदाबाईंच्या कमरेभोवती चिमुकला हात प्रथमच पडत होता. त्या दोन तासांत शारदाबाईंनाच फक्त झोप आली नाही. त्याचे केस हाताने मागे सारीत शारदाबाई त्याला थोपटीत होत्या. मध्येच तो चाळवाचाळव करी, तेव्हा त्या

त्याला अधिकच जवळ ओढीत. अशाच अवस्थेत त्यांच्या हातून विलक्षण गोष्ट केली गेली. त्यांनी त्याचे भराभर पापे घेतले होते. त्यांना वाटत होते, की ही दुपार संपू नये आणि याने असेच आपल्याला बिलगून निजून राहावे.

निग्रही मनाने ब्लाऊझची सुटलेली ओलसर बटनें लावीत त्या दूर झाल्या. त्यांनी थोडा शिरा केला. तो जागा झाला, तेव्हा तरतरीत झालेला होता. त्याला शिरा वाढून त्यांचे समाधान होईना. शिऱ्याचा घास भरविण्यासाठी त्यांनी एक घास केला...पण त्याच्या तोंडाजवळ नेताच त्याने तोंड फिरवले. तो म्हणाला, " हे काय ? मी लहान आहे का ?"

त्या हसल्या. घास खाली ठेवून त्यांनी त्याला चांगला जवळ घेऊन कुस्करला.

खाऊन झाल्यावर त्यांनी त्याला घरी पोचता केला.

चहाचे कप घेऊन शारदाबाई बाहेर आल्या. ती दोघे हळू आवाजात बोलत होती. चहा येताच तो म्हणाला,

" आता आमचं इथं कुणी नाही. मी सांगलीला प्रोबेशनर डेप्युटी कलेक्टर आहे. नुकतंच लग्न झालं माझं! सध्या रजेवर आहे. इथे आलो आणि मला एकदम आठवण झाली. मी हिला म्हटले, की माझी इथे पण एक आई राहते. हिला खरं वाटेना. म्हणून घेऊनच आलो. "

" बरं झालं आलात. तुम्ही बसला आहात ना, त्याच पलंगावर निजला होता त्या वेळी. "

" असं ? "

नवऱ्याच्या बालिशपणाकडे त्याची बायको कौतुकाने पाहत होती. तिने विचारले,

" त्यानंतर पुन: कधीच कसे आला नाहीत तुम्ही यांच्याकडे – हो ? "

" त्यानंतर दोन–तीन महिन्यांतच वडिलांची बदली झाली. "

त्याच्या एकदम ध्यानात आले असेल, की आपण त्या बाईची काहीच चौकशी केली नाही. चहाचा कप खाली ठेवीत मग त्याने विचारले,

" तुम्ही आता एकटयाच असता का इथे ? "

" हो, एकटीच असते. "

पुढचा प्रश्न त्याच्या तोंडावर आला होता, पण शारदाबाईंच्या खाली वळलेल्या पापण्या पाहून त्याने तो प्रश्न विचारला नाही. शारदाबाई विचार करीत होत्या... की चार–आठ दिवसांपूर्वी लग्न झालेलं दिसतंय्. सात–आठ रात्रींत यांच्या आयुष्यातल्या किरकोळ अपघातासारख्या बारीकसारीक घटनाही हिला आता समजल्या असतील. या बहरातली गंमत संपली नाही, तोच इवल्या इवल्या मुठी हिच्या पदराला सोडवू लागतील. एक, दोन, तीन, कदाचित चारसुद्धा. मग अशी चार मुले झाली, की त्यांच्या गराडयात जमिनीवर अंग टाकताना हिला नवऱ्याची आठवण राहील का ?

समजा, आठवण राहिली नाही, तरी नवरा हिच्याभोवता पडलेले पाश पाहून सुखाने झोपेल. कधी झोपेतून घाबरून जागा होऊन हिला विचारणार नाही – " तू सोडून जाणार नाहीस ना ? "

भोसले आणि त्याची बायको निरोप घेऊन निघून गेली. एके दिवशी काही तास आपण वात्सल्याचा लोट अनुभवला, ही गोष्ट शारदाबाईंनी कधीच सदाशिवरावांना सांगितली नव्हती. त्या दिवशी सायंकाळी ते घरी उशिरा आले होते. रात्र झाली होती.

रात्री सदाशिवरावांच्या डोळ्यांत उत्पन्न होणारी असहाय्यता शारदाबाईंच्या तोपर्यंत चांगली ओळखीची होती. दुपारी दोन–तीन तास आपल्याकडे राहून गेलेल्या मुलाची हकीकत नवऱ्याला सांगण्याचे धैर्यच शारदाबाईंना झाले नाही. कटाक्षाने त्यांनी ती आठवण मनातून पुसून टाकली. ती रात्र गेली ... आणि पुन: ती हकीकत नवऱ्याला सांगण्याचा उत्साह त्यांना कधी वाटला नाही.

एखादा व्यभिचार जपावा, तसे सदाशिवरावांपासून जपलेले गुपित आज इतक्या वर्षांनी त्यांना पुन्हा आठवले. सकाळपासून त्यांना बरे वाटत नव्हतेच ... आणि या आठवणीसरशी त्यांना अधिकच गळल्यासारखे वाटू लागले. त्या पलंगावर आडव्या झाल्या.

त्यांच्या डोळ्यांतून पाणी गळू लागले. सदाशिवरावांना सोडून शरीराने आणि मनाने आपण एकदा दूर गेलो होतो. हा बाळ आपल्या कुशीत निजला होता. आपण त्याला कुरवाळीत होतो, पापे घेत होतो, तेव्हा खरोखरीच सदाशिवरावांना आपण विसरलो होतो. ज्या सुखासाठी केशवरावांनी आपल्याला एकदा इशारा केला होता, ते सुख अखेर आपण अनुभवले होते. सदाशिवरावांना ही गोष्ट न सांगताच ते निघून गेले, याचे दु:ख शारदाबाईंना जाणवू लागले. आपल्या या दिशाहीन आयुष्यात ही कसली वादळे उगाच निर्माण होतात, या विचाराने शारदाबाई अधिक कष्टी होत होत्या.

तितक्यात दारावर टक्टक् झाली. त्या उठल्या. पदराने डोळे पुशीत त्यांनी दार उघडले. दारातून आत येतायेता परशा सांगू लागला –

" मावशी, मला नोकरी लागली. उद्या सकाळच्या गाडीने सोलापूरला जायचंय, आई म्हणाली, " मग एकाच दिवशी दोन दोन प्रवास नकोत. आजच नीघ. मावशी-कडे राहा. "

शारदाबाई चहासाठी आतल्या खोलीत आल्या आणि पाहुण्यांच्या आवाजाने पुन: पुढली खोली गजबजून गेली.

• • •

# भिंतीच्या तुंबड्या

## • " मेड-टु-ऑर्डर " प्रिया

नखरा म्हणजे ' न खरा ' हे समीकरण आता सर्वमान्य झाले आहे; पण आजच्या विज्ञानयुगात फक्त गुलाबी गाल अन् लालचुटुक ओठ एवढ्यापुरतेच ते मर्यादित राहिलेले नाही. परवाच एका विज्ञानाला वाहिलेल्या मासिकात वाचले, की स्त्री-सौंदर्याचे प्रत्येक लक्षण आता ' ऑर्डर ' देऊन मिळू शकते ! धनुष्याकृती भुवया आणि पापण्यांची दुकाने आहेत. डोळ्यांचा रंग साडीबरोबर मॅच करायचा असेल, तर ' कॉन्टॅक्ट लेन्स ' आहे अन् गालाला नाजुक खळी हवी असेल, तर प्लास्टिक सर्जन आहे. कहर म्हणजे एका अमेरिकन कंपनीने एक इंजेक्शन काढले आहे; ते घेतले म्हणजे कुठल्याही बाईला म्हणे ' फिगर ' येते ! तात्पर्य काय, संस्कृत कवींच्या तमाम कमलनयना, चंद्रानना, जंबुग्रीवा आणि पीन-पयोधरा प्रिया आता बाद आहेत. बाणभट्ट आणि कालिदास एकत्र कोळून जी लावण्यवती तयार होऊ शकेल, ती आजच्या जमान्यात कुठल्याही केमिस्टकडे मिळेल. आता कुठलाही प्रेमवीर दुकानात जाऊन " मला अमुक ' स्पेसिफिकेशन्स 'ची प्रिया हवी, " अशी ऑर्डर देऊ शकेल. लगेच भुवयांचा बाक, नाकाची लांबी इत्यादी मोजमापे घेऊन दुकानदार म्हणेल, " साहेब, आठवड्याच्या आत डिलिव्हरी देतो. " आता ग्यानबाची मेख एवढीच, की अशा मेड-टु-ऑर्डर प्रियेवर अंतःकरणापासून प्रेम करता येईल काय ? कठीण आहे – कारण याच लेखात म्हटलंय्, की बॅटरीवर चालणारी इलेक्ट्रिक हृदये पण अशक्य नाहीत; पण अशा इलेक्ट्रिक हृदयात प्रेमाची नाजुक भावना फुलत असताना मध्येच शॉर्ट सर्कीट झाले म्हणजे ?

## • भेंडीची भाजी-भक्षक मंडळ ?

माणसांची गणना टोळी करून राहणाऱ्या जनावरांत होते. प्राचीन काळच्या या वृत्तीचे आधुनिक स्वरूप म्हणजे मंडळे अन् समित्या. आतापर्यंत भांडवलदारांच्या छळाविरुद्ध उभ्या राहिलेल्या कामगारांपासून बायकोच्या दादागिरीविरुद्ध उभ्या ठाकलेल्या नवऱ्यापर्यंत आणि अतिविशाल महिलांपासून अतिलघू बाळचा-बंड्यापर्यंत अनेकांनी आपापली मंडळे काढली आहेत. अर्थात मंडळ आले, की उद्दिष्ट आलेच. एक वेळ शेपटाशिवाय कुत्राच काय, पण कुत्र्याशिवाय शेपूट असणेही शक्य आहे, पण उद्दिष्टाशिवाय मंडळ अशक्य. तेव्हा मंडळ-समित्यांच्या सध्याच्या भाऊगर्दीत जगातली यच्चयावत महान उद्दिष्टे खर्ची पडली असावीत, अशी माझी समजूत होती.

– पण नाही ! थोड्याच दिवसांपूर्वी अमेरिकेत एक " काळा वाटाणा संस्था "


स्थापन झाली असून, तिची चांगली तीनशे मेंबरे झाली आहेत ! संस्थेचे उद्दिष्ट काय, तर "काळ्या वाटाण्याची कीर्ती दिगंतात पसरविणे – आणि तो खाणे." धन्य धन्य तो काळा वाटाणा, की ज्याच्यासाठी गोऱ्या अमेरिकनांनी संस्था काढावी ! आता प्रत्यक्ष अमेरिकेत जर हे घडते, तर सदाशिव पेठेत "भेंडीची भाजी-भक्षक मंडळ" निघायला काय हरकत आहे ? अर्थात एकाने भेंडीच्या भाजीची तळी उचलली, की दुसरा पडवळाची इज्जत बचावण्यासाठी पुढे सरसावणार हे ओघानेच आले आणि मग भेंडी विरुद्ध पडवळ असे वादंग न माजले तरच नवल. गलिव्हरने भेट दिलेल्या चिमुकल्या लिलिपुट राज्यात अंडे कोठल्या टोकाने उभे करावे, याची गहन चर्चा झाली, तेव्हा अखेर 'मोठे टोकवाले' व 'छोटे टोकवाले' असे दोन पक्षच स्थापन झाले होते. मधल्यामध्ये बिचाऱ्या अंड्याचे ऑम्लेट झाले असावे. पण मराठी माणूस लिलिपुट-निवासी पिटुकल्यापेक्षा अधिक समंजस आहे (असे मी मराठी असल्याने मला वाटते). तेव्हा भेंडी विरुद्ध पडवळ हे भांडण विळीच्या विकोपाला न जाऊ देता एकाच भाजीत दोघांचे सहजीवन शक्य आहे काय, याचा प्रयत्न भेंडी-बहाद्दूर आणि पडवळ-प्रेमी अशी दोन्ही मंडळी करतील, अशी मी आशा करतो. न जाणो, यातूनच "आजचा पदार्थ" या सदरात एखादी अनमोल भर पडायची.

**● आंतरराष्ट्रीय अस्वले**

आधुनिक जगरीतीप्रमाणे काही सुचले नाही, की एखादी आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात येते. अशाच एका परिषदेत सर्वानुमते (अगदी अमेरिका आणि रशिया यांच्या मतेही) ध्रुव-प्रदेशीय अस्वलांना आंतरराष्ट्रीय दर्जा व संरक्षण देण्याचे ठरविण्यात आले आहे. आता अस्वलांचा आंतरराष्ट्रीय दर्जा म्हणजे काय, असे मात्र कोणी विचारू नये; पण ज्या अर्थी तो त्यांना बहाल करण्यासाठी बऱ्याचशा देशांतल्या शास्त्रज्ञांची एक खास परिषद भरविण्यात आली, त्या अर्थी त्यात काही तरी विशेष असले पाहिजे, अशी आपली माझी तरी समजूत आहे. ती कितपत रास्त आहे, उचित आहे, योग्य आहे व इष्ट आहे, हे एक राम गणेश गडकऱ्यांचा घुंडिराजच जाणे !

पण आता प्रश्न असा, की या आंतरराष्ट्रीय दर्जाप्राप्तीचे ध्रुव प्रदेशीय अस्वल–समाजाने कसे काय स्वागत केले, हे कसे कळायचे ? मला वाटते, हिंदुस्थानातल्या एखाद्या राष्ट्रीय अस्वलाला त्याच्या दरवेशाकडून सुटी मिळवून देऊन तपासासाठी पाठवावे. पंडित नेहरू असताना भारताने बऱ्याच हत्तींना महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीवर परदेशी पाठविले आहे, तेव्हा आता एखाद्या अस्वलाला चान्स द्यायला हरकत नाही. त्या अस्वलाचा अहवाल सादर झाला, की मग त्यांतल्या शिफारशी लक्षात घेऊन आणखी कुठकुठली जनावरे आंतरराष्ट्रीय आहेत, हे ठरविण्यासाठी दुसरी परिषद राणीच्या बागेत भरविता येईल.

**– सुधाकर राजे**



१९४३ चा उन्हाळा सुरू झाला. आतापर्यंत युद्धाच्या सुरवातीपासून असा पायंडा होता, की प्रत्येक नव्या वर्षाच्या उन्हाळ्यात हिटलरची सैन्ये एखाद्या नव्या रणाच्या दिशेने झेप घेत असत. आता मात्र पारडे फिरले होते. एल्-अलेमीनच्या पराभवातून, फील्ड मार्शल रोमेलला पुन्हा दोस्तांचा मुकाबला करण्याची ताकद जमवणे अशक्य झाले होते. एका बाजूने जनरल माँटगोमोरी व आफ्रिकेत उतरलेल्या दोस्त सैन्याचा सेनापती जनरल आयसेन हॉवर यांनी ट्युनिशियातून कोंडीत पकडलेली इटाली–जर्मन सैन्ये पळवून लावली वा शरण आणली.

आता लवकरच दोस्त सैन्ये प्रत्यक्ष इटालीत उतरणार, याबद्दल कुणाला शंका उरलेली नव्हती.

सप्टेंबर, १९३९ मध्ये मुसोलिनीने ज्या संकटाला घाबरून, हिटलरपाठोपाठ युद्धात उडी झोकली नव्हती, ते संकट अखेर १९४३ च्या मे महिन्यात, त्याला भेडसावू लागले. ब्रिटनची सैन्ये डंकर्कहून पळाली व फ्रेंच सैन्ये गर्भगळीत झाली, तेव्हाच मुसोलिनी युद्धात पडला, तो या हिशोबाने की आता प्रत्यक्ष इटालीत शत्रू शिरण्याची वा उतरण्याची धास्तीच नाही. इतकेच नव्हे तर लौकरच ब्रिटन शरण येऊन जी युरोपची वाटणी होईल, तेव्हा हिटलरच्या पंक्तीला बसण्याची संधी दवडू नये; या हिशेबाने मुसोलिनी युद्धात पडला होता. परंतु चेंबर्लेन गडगडले, चर्चिल यांनी हिटलरच्या शांततायत्नाला पाने पुसली व अमेरिकेला युद्धात ओढण्यात यश मिळवून अखेर लढाईचे पारडे फिरवण्यात यश मिळवले होते.

मुसोलिनी आता साठीच्या घरात होता. पोटातल्या अल्सरमुळे तो नेहमी आजारी असे. फक्त दुधावर व फळांवर त्याची जीवितयात्रा चालू होती. ग्रीसमध्ये व आफ्रिकेच्या वाळवंटात इटालियन सैन्याच्या उडालेल्या फटफजितीने त्याची पत देशात

उत्तरार्ध

लेखांक : १४ वा

# नाझी

# भस्मासुराचा उदयास्त

**रा. म. शास्त्री**

घसरली होती. रोम, मिलन, नेपल्स, सिसिली या शहरांतून इटालीतील छुप्या कम्युनिस्टांनी आता कारखान्यांतून, गोद्यांतून भूकंप घडवून आणून युद्धप्रयत्नात मोठाच विक्षेप निर्माण केलेला होता. हरताळ, मोर्चे, गोळीबार यांना ऊत आला होता. टुरिन् व जिनोआ येथून कम्युनिस्ट, युद्धविरोधी पत्रके छापवून कामगारांत वाटीत होते.

इटालीतील दक्षिणेकडील भागात तर शेतकरी अन्नान्नदशेला पोचलेला होता. जे युद्ध मुसोलिनीने सुरू केले, ते जनतेचे युद्ध नाही, असा प्रचार कम्युनिस्ट सतत करीत होते. ज्या कम्युनिस्टांनी रूसो-जर्मन करार होताच सरकारला पाठिंबा दिला होता, ते आता फिरले होते. त्यातच युद्धपरिस्थितीमुळे व पराभवांमुळे हवालदील झालेले सरकार, सरकारचे पाय ओढणाऱ्या या देशबुडव्यांना शासन करण्यात दुबळे ठरत होते.

### अखेरची अनर्थपरंपरा

देशाचे सर्वाधिकार स्वतःकडे घेणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी जो निर्घृणपणा व क्रौर्य लागते ते हिटलरपाशी होते, परंतु मुसोलिनीचा पिंडच तो नव्हता. त्यामुळे अनेकांनी इशारे देऊनही देशातील कम्युनिस्टांचे वेळीच शिरकाण करण्यास त्याने अखेरपर्यंत नकार दिला व अखेर एका कडव्या कम्युनिस्टाच्या गोळ्यांचा मुसोलिनी अंती धनी झाला.

जो क्रांती मुसोलिनीने घडवून आणली, त्यावरचा मुसोलिनीचा कबजा आता झपाट्याने सुटत चालला होता. कितीही चुका घडल्या व चुकीच्या धोरणाने अनर्थ कोसळले वा लष्करी पराभव झाले, तरी एक गोष्ट नेतृत्वाला तारून नेते, ती म्हणजे चारित्र्य. मुसोलिनी याने कधी पैशाचा हव्यास धरला नाही किंवा स्वतःच्या कुटुंबा-

साठी पैसाही केला नाही, परंतु तो रंगेल होता. युद्धाच्या गर्तेत देश डुबू लागला असतानाही पेटॅसी नावाच्या एका स्वरूपसुंदर तरुणीशी त्याचे प्रेमसंबंध निर्माण झालेले होते. इटालियन सरकारात पेटॅसीच्या वशिल्याने अनेक नालायक माणसांची वर्णी मुसोलिनीने लावली होती. या त्याच्या विलासी व स्वैर वर्तनाने इटालीचे किती नुकसान झाले, याचे वर्णन त्याच्या एका निकटवर्ती पोलीस–अधिकाऱ्याने केले आहे. तो लिहितो––

" The scandal was doing the Duce more harm than the loss of fifteen battles. "

म्हणजे पंधरा लढाया गमावूनही जे नुकसान होणार नाही, एवढे मोठे नुकसान या लफड्यामुळे ड्यूसच्या वाट्याला येत होते.

सहकाऱ्यांचा विश्वास आता मुसोलिनीने गमावला होता. प्रत्येक पराजयाच्या वृत्ताबरोबर, इटालियन लोक हेच मुळी रणभीरू आहेत, असे हताश उद्‌गार मुसोलिनी वारंवार काढू लागलेला पाहताच, त्याच्या नेतृत्वाभोवती गोळा झालेले सहकारी मुसोलिनीच्या मागे अनादराने बोलू लागले होते.

लष्करी पराभवाने हताश झालेला, पोटातील विकाराने त्रासलेला, देशातील संप, हरताळ आणि गोळीबार या कम्युनिस्ट–कारवायांनी पिडलेला आणि फॅसिस्ट संघटनेतील सहकाऱ्यांच्या मनातून उतरलेला बेनिटो मुसोलिनी हा दुसऱ्या महायुद्धाची एक शोकांतिका आता ठरत आली होती. कामगार–शेतकऱ्यांचा आवाज उठत होता––" भाकरी–शांतता आणि स्वातंत्र्य ! " मुसोलिनी गांगरून गेला होता आणि एकामागोमाग चुका करू लागला होता.

आपला जावई काऊंट सियानो याला १९४३ च्या सुरवातीलाच त्याने परराष्ट्रमंत्रिपदावरून काढून त्याची रवानगी पोपच्या व्हॅटिकन्‌मधील इटालीचा वकील म्हणून त्याने केली होती. सियानोला पोपच्या दरबारात पाठविण्याच्या या कृतीचा विपर्यास होत होता. सियानोमार्फत मुसोलिनी हा दोस्तांकडे तहाची याचना करीत आहे, असा जर्मनांचा समज होत चालला होता.

संपूर्ण पराभवाच्या भीतीने, मुसोलिनीने हिटलरला पत्रावर पत्रे धाडून सूचना करावयास सुरवात केली, की रशियाबरोबर तह करून फक्त इटालीत अँग्लो–अमेरिकनांशी लढण्याशिवाय आता गत्यंतर नाही. फ्रान्समध्ये दोस्त सैन्ये उतरली व इटालीतही घुसली, तर रशियनांशी लढत राहणे केवळ अशक्य आहे, याचा धसका मुसोलिनीने घेतला होता.

## मोडलेला म्हातारा

७ एप्रिल, १९४३ रोजी म्हणूनच हिटलरने साल्झबर्ग येथे मुसोलिनीची भेट घेतली. या वेळी गोबेल्स हजर होता. गोबेल्सला या वेळी मुसोलिनी कसा दिसला तर––' a broken old man '––कणा मोडलेल्या म्हाताऱ्यासारखा ! या भेटीला



पेटॅसी...किंमत – किमान १५ लढाय

येताना मुसोलिनी बऱ्याच मागण्या ठरवून आला होता. रशियाशी तह करा, रशियात गुंतलेल्या इटालियन फौजा इटालीत परत धाडा. जर्मनीने इटालीला अधिक लष्करी व आर्थिक मदत धाडावी......असाही आग्रह तो धरणार होता. प्रत्यक्ष हिटलरच्या भेटीत मात्र या मागण्या मांडण्याऐवजी तो हिटलरचा उपदेश ऐकतच मंत्रमुग्ध झाला. हिटलरच्या प्रत्यक्ष भेटीत अनेकांना अशी मंत्रमुग्धता येत असे व मुसोलिनीवर हिटलरचा विलक्षण पगडाच बसलेला होता. नव्या उत्साहाने मुसोलिनी तर साल्झ-बर्गहून परतला. इटालीतील सरकारविरोधी बंडखोरांचे पारिपत्य करायचे, असा निर्धार त्याने आता व्यक्त करण्यास सुरवात केली.

आदिस-अबाबा ही अबिसिनियाची राजधानी सर केल्याचा वाढदिवस साजरा झाला, त्या दिवशी मुसोलिनी रिवाजाप्रमाणे पेलॅझो व्हेनिशिया या आपल्या कचेरीच्या सज्जात भाषणासाठी दाखल झाला. समोरच्या चौकात त्याच्या असंख्य अनुयायांची गर्दी उसळलेली होती. त्या जमावाला त्याने आश्वासन दिले--" अंतिम विजय आपलाच आहे, याबद्दल खात्री बाळगा. "

[ Have no fear for ultimate victory. ]

नेहमीप्रमाणे दोनच दिवसांत मुसोलिनीचे हे उसने अवसान गळून पडले. मुसो-

लिनीला अंदाज होता, की सिसिलीत दोस्त सैन्ये उतरणार...आणि त्याच्या अपेक्षेप्रमाणे १० जुलै, १९४३ ला इटालीच्या किनाऱ्यावर प्रथम मोठ्या प्रमाणावर बॉम्बफेक करून दोस्त सैन्याची पथके सिसिलीत उतरली. दोस्तांचे पाय इटालीच्या भूमीवर स्थिरावताच, आठवड्याभरात सैन्ये ' कटानिया 'च्या पठारावरून उत्तरेकडे दौडू लागली.

इटालीचा नामधारी राजा व्हिक्टर इमॅनुअल हा आतापर्यंत स्वस्थ होता. आता मात्र त्याने काहीतरी हालचाल करण्याचा निश्चय केला. इटालियन सेनाधिकाऱ्यांपैकी काही वरिष्ठ अधिकारी मुसोलिनीला तावडतोब कैद करून दोस्तांकडे तहाची विचारणा करावी, या मताचे झालेले होतेच. यांतले जे ' फॅसिस्ट ग्रँड कौन्सिल ' या मुसोलिनीनेच निर्माण केलेल्या इटालीच्या वरिष्ठ–यंत्रणेचे सभासद होते, त्यांनी दि. १६ जुलैला कौन्सिलची सभा घ्यावी, असा लेखी आग्रह मुसोलिनीला केला व युद्धाच्या सुरवातीपासून एकही सभा न बोलावले गेलेले हे कौन्सिल भरवण्याचे मुसोलिनीने मान्य केले. शनिवार दि. २४ जुलै, १९४३ ही तारीख त्याने मुक्रर केली.

मुसोलिनीचे पाय लटपटू लागले असावेत, असा रास्त तर्क हिटलरने केला व ' फॅसिस्ट ग्रँड कौन्सिल ' भरवण्यापूर्वी म्हणजे १९ जुलैलाच भेटीसाठी त्याने मुसोलिनीला निमंत्रण दिले. उत्तर इटालीत ट्रेव्हिसो या ठिकाणी हिटलर मुसोलिनीच्या भेटीसाठी येणार होता. मुसोलिनी हा स्वतःचे विमान चालवीत ट्रेव्हिसो येथे आला व हिटलरसह फेलट्री या ठिकाणी दोघे बोलणी करण्यासाठी गेले.

## लढत राहणे...

हिटलर–मुसोलिनीची ही तेरावी भेट होती. या भेटीत हिटलरने सांगितले, "लढत राहणे याशिवाय आता दुसरा पर्यायच नाही. हे करताना त्याग हा करावा लागणारच. जर्मनीत पंधरा वर्षांची मुले विमानविरोधी तोफा सांभाळीत आहेत. इटालीत मात्र सैनिकही धडपणे लढत नाहीत. जे देशद्रोही आहेत, त्यांचा वेळीच काटा काढून सर्व लढ्याची सूत्रे आता जर्मन सेनाधिकाऱ्याकडे देण्यात यावीत."

हिटलर–मुसोलिनीची ही बोलणी एकीकडे चालू असतानाच......दालनाबाहेर इटालीचा नवा परराष्ट्रमंत्री अल्फेरी (Alfieri) व इटालियन जनरल ॲम्ब्रोसियो यांनी फील्ड मार्शल कायटेलला स्पष्ट विचारले, " आता त्वरित जर्मनी इटालीसाठी काय करणार आहे ? "

कायटेलने थंडपणे सांगितले,

"याचा विचारच दोघे नेते करीत आहेत." यापेक्षा एक शब्दही बोलण्यास कायटेल राजी नव्हता.

जनरल ॲम्ब्रोसियोने नंतर भेट होताच मुसोलिनीला स्पष्टपणे सांगितले, "इटालीत आता युद्धाला फारसा पाठिंबा नाही."

यामुळे राग येऊन मुसोलिनी उत्तरला–

" कुठलीच लढाई कधी लोकप्रिय असत नाही. ज्या लढायांत अखेर विजय मिळतो, त्या लढाया नंतर लोकप्रिय होतात. "

[ No war ever has been or will be popular. Wars only become popular, when they end in victory. ]

भेट संपली. हिटलरला घेऊन त्याचे कॉन्डॉर विमान सुटले. विमानाबाहेर अॅटेन्शन स्थितीत खटकन येऊन मुसोलिनीने फॅसिस्ट मुजरा ठोकला व तो वैमानिकाचे जाकीट घालीत आपल्या विमानाकडे वळला. विमानाभोवती अलेफरी व जनरल अॅम्ब्रोसियो उभे होते. इंजिनाच्या घरघरटात मुसोलिनीने त्यांना सांगितले,

" या वेळी आपण मागू ती मदत देण्याचे हिटलरने मान्य केले आहे "

१९ जुलैलाच इकडे रोमवरती दोस्त विमानांनी बॉम्बफेक केली होती. आल्या-आल्या मुसोलिनी रोममधील हानी पाहण्यासाठी गेला. पडलेल्या इमारतींचे ढिगारे अजून जळत होते. मनुष्यहानी जबर झाली होती. मुसोलिनी हा मनाचा निष्ठुर व रगेल नव्हता. रोममध्ये निरपराध माणसांची हानी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहताच त्याच्या मनोवृत्ती काळवंडू लागल्या. याच मनस्थितीत फ्यूरर भेटीचा वृत्तान्त निवेदन करण्यासाठी राजे इम्यॅनुएल यांची भेट त्याने घेतली. सर्व सैन्याचे नेतृत्व जर्मन जनरल केसरलिंग याचे हवाली करण्याची कल्पना राजे इमॅन्युएल यांना पटेना ! ही जर्मनांची अटही मुसोलिनीला मानणे भाग पडावे, यावरून इटालीचे संरक्षण करण्याची शक्ती आता त्याच्या नेतृत्वात नाही, ही खूणगाठ राजाने मनाशी बांधली व मुसोलिनीविरुद्ध ' ग्रॅन्ड कौन्सिल 'मध्ये प्रचार करणरे मार्शल बॅडॅग्लिओ दीनोग्रॅंडी व काऊंट सियानो यांना राजाने आपला मुसोलिनीवरील विश्वास उडाल्याचे स्पष्टपणे कळवले.

मुसोलिनीविरुद्ध जमा होऊ लागलेल्या गटाला राजाने पाठिंबा देताच चांगला जोर चढला.

२४ जुलै उजाडला. त्या दिवशी कौन्सिल भरण्यापूर्वी दीनोग्रॅंडी याने तयार केलेला ठराव मुसोलिनीला बैठकीपूर्वी दाखविण्यासाठी त्याची भेट त्याने घेतली, परंतु मुसोलिनी हा आपल्याच आत्मविश्वासात होता. ' कौन्सिल ' आपण सहज जिंकू या घमेंडीत त्याने दीनोग्रॅंडीशी चर्चाही केली नाही.

### कौन्सिल विरुद्ध गेले

दुपारी कौन्सिल भरले. २८ सभासद हजर होते. ग्रॅन्डीने आपला ठराव मांडला. मुसोलिनीने अधिकार सोडावे व राजाने नवा सर्वाधिकारी नेमावा, असा तो ठराव होता. ठरावावर ग्रॅंडीने मुसोलिनीच्या अकर्तृत्वाचा पाढा वाचला. मुसोलिनीने आपली बाजू मांडली. चर्चा अपरात्र झाली तरी संपली नाही. पहाटेचे चार वाजले व अखेर चर्चा संपून ठराव मतास पडला. चर्चेच्या सुरावरून मुसोलिनीला अटकळ

आली होती, की वातावरण तापलेले आहे. परंतु सतत वीस वर्षे इटालियन जनतेच्या गळ्यातील ताईत व हिटलरचा परम स्नेही म्हणून युरोपच्या रंगभूमीवर वावरलेल्या बेनिटोला असा संशयही आला नाही, की त्याला अधिकारावरून उठवण्याचा पक्का निर्णय करूनच कौन्सिल भरले होते. ठराव मतास पडला. १९ हात ठरावाच्या बाजूने वर उचलले गेले.

मुसोलिनीने आपल्यापुढचे कागद भराभर गोळा केले व तो कौन्सिलमधून बाहेर पडला. त्याच्या ए. डी. सी. ने हुकूम केला– " Salute the Duce ! " (ड्यूसला प्रणाम) कौन्सिलचे बहुसंख्य सभासद तसेच पाहत राहिले. ड्यूस अपमानास्पद अवस्थेत घरी निघून गेला.

घरी पोहोचताच मुसोलिनीची पत्नी रॅचेल् हिने त्याला सल्ला दिला –

" कौन्सिलच्या सभासदांना अटक करून अजून सूत्रे हातात ठेवणे शक्य आहे. "

मुसोलिनीने स्पष्ट सांगितले,

" मी हे करणार नाही – ! "

मुसोलिनीच्या हिशेबात आता युद्ध गमावल्यासारखेच होते. तो अलीकडे फक्त एकाच गोष्टीचा विचार करू लागला होता, की. अखेर इतिहासात मला काय स्थान राहील ? वीस वर्षे मी देशाची सेवा केली. कधी नव्हे असे ऐश्वर्य इटालीने माझ्यामुळे पाहिले. नियतीचे फासे उलटे पडू लागले आणि आज मी देशाला दिलासा देऊ शकत नाही. अशा परिस्थितीत जर कौन्सिलला मी नको असेन, तर मी बाजूला होतो. मुसोलिनीचीही मन:स्थिती प्रामाणिक् होती, परंतु सर्वाधिकारी नेत्याला तारणारी नव्हती. अधिकाराचा खांदेपालट फक्त लोकशाहीतच रक्तपाताशिवाय होऊ शकतो ! लष्करी हुकूमशहाची राजवट बदलते ती एखाद्या खुनाने, नाहीतर हुकूमशहा परागंदा होऊन ! याच न्यायाने लियाकत अलीखान पैगंबरवासी झाले आणि याच न्यायाने इस्कंदर मिर्झा लंडनमध्ये आज हवा खात आहेत. परंतु मुसोलिनीने आपली हुकूमशाही ही खऱ्या अर्थाने हुकूमशाही आहे, असे कधी मानलेले नव्हते. इटालियन लोकांचे आपल्यावर अमाप प्रेम आहे, विश्वास आहे; यामुळे देशाचे नेतृत्व आपण करीत आहोत, असा त्याचा विश्वास होता. कौन्सिलमध्ये त्याला उलटा अनुभव येताच त्याने दडपशाही करून अधिकारावर राहावयाचे नाही, असाच निश्चय केला. याच विचाराने तो राजे इमॅन्युएल यांना भेटावयास गेला.

राजांनी त्याला सांगितले,

" My dear Duce, matters are very serious. Italy is in ruins. The army is completely demoralised. The Grand Council vote is terrific. At this moment you are the most hated man in the country. I am your only remaining friend. "

[ प्रिय ड्यूस, परिस्थिती फार गंभीर आहे. इटाली ढासळलेली आहे. सैन्याचे

पूर्णतः स्वत्वहरण झालेले आहे. ग्रँड कौन्सिलचा ठराव कठोर आहे. या क्षणी साऱ्या देशात तुझ्याविषयी अत्यंत द्वेष पसरलेला आहे. मीच काय तो एक तुझा मित्र उरलेलो आहे. ]

### अटक आणि धिक्कार

मुसोलिनी स्तब्धपणे ऐकत होता. अखेर राजाने सांगितले, "सर्व अधिकार मार्शल बॅडॅग्लियोच्या स्वाधीन करण्याचे मी ठरवले आहे."

इतका वेळ उभा असलेला ड्यूस मटकन् खाली बसला. क्षणभर तो सुन्न झाला. मात्र लगेच तो उभा राहिला व त्याने राजाला सांगितले,

"जर तुम्ही सांगता हे खरे असेल, तर मी राजीनामा देतो, परंतु तुम्ही जो निर्णय घेत आहात, त्याचे परिणाम दूरगामी होणार आहेत. यावेळी अधिकारात खांदेपालट झाला तर याचा अर्थ लोक असा घेतील, की आता शस्त्रसंधी होणार ! सैन्याचे धैर्य खचून जाईल. माझी पदच्युती ही चर्चिल, स्टॅलिन आपला विजय मानतील. लोकांच्या मनात झालेली अप्रीती मी समजू शकतो. लोकांकडे मोठाल्या त्यागाची सतत मागणी करून कुणालाही लोकांच्या रागाचे धनी न होता इतका मोठा काल राज्यावर राहणे शक्य होणार नाही."

[ One cannot govern so long and demand such heavy sacrifice from the people, without provoking some sort of indignation. I wish good luck to the man who takes over the Govt. from me. ]

"जो कुणी माझ्याकडून या प्रसंगात राज्यधुरा उचलणार असेल, त्याला मी सुयश चिंततो—"

मुलाखत संपली. मुसोलिनीने हात पुढे केला. राजाने दोन्ही हातांत त्याचा हात प्रेमभराने दाबला व मुसोलिनी राजाचा निरोप घेऊन राजप्रासादाबाहेर आला.

ही भेट होण्यापूर्वी राजाने मुसोलिनीच्या अटकेचे फर्मानावर सही दिली होती ! प्रासादाबाहेर मुसोलिनीला अटक करण्यात आली.

मुसोलिनीला ज्या पद्धतीने राजाकडून अटक झाली, त्याचा राणीने धिक्कार केला. तिने लिहिले आहे—

"They could have arrested him where and when they wanted. But they should not have done it here. Here he was our guest. The laws of hospitality have been violated. It is a disgrace."

[ त्यांनी त्याला इतरत्र कुठेही हवे तेव्हा पकडण्याचा प्रत्यवाय नव्हता; परंतु इथेच ही अटक व्हावयास नको होती. इथे ड्यूस आमचा पाहुणा होता. पाहुणचाराच्या शिष्टसंमत संप्रदायाचा हा भंग झालेला आहे. ही लाजिरवाणी गोष्ट घडली आहे. ]

मुसोलिनीच्या अटकेचे वृत्त प्रसृत झाले, परंतु कुणीही त्याच्या बाजूने शस्त्र उप-

सले नाही, की निषेध प्रदर्शित केला नाही. लोकांनी निदर्शने केली नाहीत, की कुणाचे डोळे पाणावले नाहीत.

मार्शल बॅडॅग्लियो याने नवे अपक्ष सरकार स्थापन केले व फॅसिस्ट संघटना बरखास्त करण्यात आली. जे फॅसिस्टविरोधी पुढारी तुरुंगात पडले होते, त्यांची बॅडॅग्लियोने तावडतोब मुक्तता केली. मात्र रेडिओवर त्याने घोषणा केली की "युद्ध चालूच राहील."

२६ जुलैला हिटलर रॅस्टनबर्ग येथे आपल्या युद्धछावणीत होता. मुसोलिनीच्या अटकेचे वृत्त त्याला २६ जुलैला कळले. मुसोलिनी मनातून धास्तावलेला आहे याची अटकळ हिटलरला आलेली होती. असे असले तरी इतक्या तडकाफडकी तो अधिकारावरून फेकला जाईल, अशी मात्र त्याची कल्पना नव्हती. मात्र एकदा पहिला धक्का ओसरताच हिटलरने झाल्या प्रकाराचा जो अन्वय लावला, तो इतका अचूक होता, की त्यामुळे इटालीच्या रणक्षेत्रांत काहीही गडबड उडू शकली नाही.


## हिटलरची कारवाई

युद्ध चालूच राहणार, अशी घोषणा केली असली तरी, दोस्तांबरोबर प्रत्यक्ष तह घडेपर्यंत बॅडॅग्लियोने घेतलेला हा पवित्रा आहे, ही गोष्ट हिटलरने जनरल जोडलला सांगितली. हा जर्मनीचा झालेला विश्वासघात आहे व याचा बंदोबस्त– 'ते काय करतात, याची वाट न पाहता आपल्याला ताबडतोब केला पाहिजे,' असा निर्णय हिटलरने घेतला. त्याच रात्री इटाली–फ्रान्स व इटाली–जर्मन सरहद्दीवरील आल्पस् पर्वतातील सर्व खिंडी जर्मन सैन्याने ताब्यात घ्याव्यात, असा हुकूम फ्यूररने सोडला.

फ्रान्समधून व जर्मनीतून आठ डिव्हिजन जर्मन सैन्याचा एक नवीन सैन्य-विभाग निर्माण करून त्यावर हिटलरने रोमेलची नियुक्ती केली. इटालीतील ही लष्करी कारवाई लगेच रोमेलने पुरी केली.

रातोरात इटालियन सैन्याला जर्मनांशी लढण्यास उद्युक्त करणे बॅडॅग्लियोला शक्यच नव्हते, बॅडॅग्लियो हा शस्त्रसंधीच्या खटपटीत आहे व आठवडाभरात दोस्त इटालीशी शस्त्रसंधी करतील, अशी हिटलरची अपेक्षा होती.

प्रत्यक्षात इटालीचे नवे सरकार व दोस्तांचा संपर्क होऊन, शस्त्रसंधीवर सह्या होण्यास सप्टेंबर महिना उजाडला. इटालीतील जर्मन सेनानी केसरलिंग व रोमेल यांनी या महिनाभराच्या अवधीचा योग्य उपयोग करून अखेर बॅडॅग्लियोलाच रोम सोडून परागंदा होणे भाग पाडले. रोममध्ये प्रत्यक्षात फक्त दोन डिव्हिजन्स जर्मन सैन्य होते व इटालियन सेना पाच–सहा डिव्हिजन्स होती. जर शस्त्रसंधी आठवडाभरात झाला असता तर माघार घेणे भाग होते व इटालीत दोस्तांशी लढा देणे जर्मनांना अशक्य होणार होते. फील्ड मार्शल केसरलिंग व रोमेल चिंतेत होते; परंतु दोस्त सेनानी आयसेन हॉवर व मॉन्टेगोमोरी यांनी रोमजवळ उतरण्याचा धोका पत्करला नाही. सहा आठवडे प्रत्यक्ष शस्त्रसंधी होईपर्यंत फुकट गेले व ८ सप्टेंबरला



मुसोलिनी : सुखासीन हुकूमशहा

शस्त्रसंधी जाहीर झाल्यावर दोस्त सैन्ये उतरली, ती नेपल्सच्या दक्षिणेस सालेर्नो येथे!

इतकेच नव्हे तर रोममधील इटालियन सेनेने शरणागती पत्करून रोम जर्मनांच्या हवाली केले. इटालीचा राजा इमॅन्युएल, बॅडॅग्लियो व त्याच्या सरकारचे मंत्री रोमहून निसटले व त्यांनी दोस्तांनी कबजा केलेल्या इटालीच्या दक्षिण भूभागात इटालीचे स्वतंत्र सरकार प्रस्थापित केले.

हिटलरने बॅडॅग्लियोच्या शरणागतीचा व शस्त्रसंधीचा मनसुबा अचूक ओळखल्यामुळे इटालीचा दोनतृतीयांश भूभाग सप्टेंबर १९४३ मध्येही जर्मनांच्या कबजात राहिला व केसरलिंगने दोस्तांशी मुकाबला करण्यासाठी नवी मजबूत फळी मध्य इटालीत निर्माण केली.

## मुसोलिनीची सुटका मित्रकर्तव्य

मुसोलिनीच्या अटकेनंतर अवघ्या दीड महिन्याच्या कालावधीत हिटलरने इटालीतील जर्मन फळी पुन: सुस्थिर करण्यात यश मिळवले खरे, परंतु मुसोलिनीची सुटका करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती माहिती अजून त्याच्या हाती लागत नव्हती. हिटलरव्यतिरिक्त कुणाही जर्मन सेनापतीला मुसोलिनीची सुटका हा फारसा महत्त्वाचा विषय वाटत नव्हता ! मुसोलिनीची सुटका झाली काय किंवा न झाली काय, जर्मन युद्धप्रयत्नावर त्याचा काहीच परिणाम होणार नव्हता. हिटलरने ड्यूसला आपला

परममित्र मानला होता. म्युनिच येथे चेंबर्लेन व दलाँदिया यांचेवर दडपण आणण्यात ड्यूसने जी अनमोल कामगिरी बजावली व ज्यामुळे जर्मनीला आपल्या सोयीने युद्ध करता आले, ते ड्यूसचे उपकार हिटलर विसरू शकत नव्हता. ड्यूसची सुटका ही त्याच्या दृष्टीने परम मित्रकर्तव्य होते. आपल्या या वैय्यक्तिक मित्रकर्तव्याची हेळसांड आपल्या सेनानींकडून होईल, याकरता हिटलरने ड्यूसच्या मुक्ततेचा प्रयत्न स्वत: जातीने केला. मुसोलिनी मुक्त झाला तर इटालीच्या जनतेचे अधिक सहकार्य जर्मनांना लाभेल, ही गोष्ट तर उघड होती; कारण सामान्य नागरिकांच्या मनात अजून ड्यूसविषयी विश्वास नसला तरी बरीच अनुकंपा शिल्लक होती. हिटलरच्या दृष्टीने मुसोलिनीच्या सुटकेला राजकीय हेतू फारसा नव्हता......त्याला एकच गोष्ट समजत होती, की आपल्या मित्राला सोडवणे हे आपले कर्तव्य आहे.

मुसोलिनीच्या अटकेनंतर २४ तासांच्या आत हिटलरने या दिशेने पाऊल उचललेले होते.

२६ जुलैला इस्ट प्रशियातील लॉटझेन शहराजवळ हिटलरच्या छावणीत सहा तरुण जर्मन लष्करी अधिकारी दाखल झाले होते. यांतील एक होता ओटो स्कोर्झेनी. या सहाजणांना एका प्रशस्त दालनात नेण्यात आले होते. त्या दालनात जे मोठे टेबल होते, त्यावर नकाशे पसरून ठेवलेले होते. काही मिनिटांतच आतील दरवाजातून फ्यूरर दालनात आला. सहाही अधिकाऱ्यांनी नाझी-सलामी दिली. हिटलरने प्रतिसलामी दिली. हिटलरच्या अंगावर यावेळी त्याचा किरमिजी रंगाचा लष्करी कोट होता व त्यावर पहिल्या महायुद्धातील त्याने मिळवलेला आयर्न क्रॉस झळाळत होता. त्याने एकेकाला प्रश्न विचारून ओळखी करून घेतल्या व प्रश्न टाकला—

"तुमच्यापैकी इटालीची प्रत्यक्ष माहिती कुणाला आहे?"

सहाजणांपैकी फक्त स्कोर्झेनीनेच होकारात्मक उत्तर दिले. कारण बाकीचे सर्व अजून इटालीत गेलेले नव्हते. स्कोर्झेनीने फक्त होकारच दिला नाही, तर तो पुढे आणखी म्हणाला,

### मी कसूर करणार नाही

"फ्यूरर, मी स्वत: ऑस्ट्रियन आहे!"

हिटलरने क्षणभर त्याचेकडे निरखून पाहिले व बाकीच्यांना रजा दिली. स्कोर्झेनी व फ्यूरर दोघेच दालनात उरल्यावर हिटलरने सुरवात केली—

"फार महत्त्वाची कामगिरी तुझ्यावर सोपवणार आहे. माझा मित्र व आपल्या खांद्याला खांदा देऊन लढणारा दोस्त मुसोलिनी पकडला गेला आहे. इटालीच्या राजांनी त्याच्याशी दगाफटका केला आहे. अशा कठीण कालात मी इटालीच्या या महान पुत्राला विसरू शकत नाही व विसरणार नाही. माझ्या दृष्टीने ड्यूस हा जुन्या रोमचे आजचे ऐश्वर्य आहे. त्याची सुटका झाली पाहिजे."

(He must be rescued promptly.)

स्कोर्झेनी उत्तरला—

" I fully understand my Fuhrer. I will do my best."

[ फ्यूरर, मी सर्व समजू शकतो. मी माझ्याकडून कसूर करणार नाही. ]

स्कोर्झेनी फ्यूररचा निरोप घेऊन दालनाच्या दारापाशी आला. वळून त्याने फ्यूररला सलामी दिली. फ्यूरर एकटक नजरेने त्याचेवर नजर खिळवून पाहात होता.

स्कोर्झेनीने त्याच दिवशी स्वतःचे मृत्युपत्र केले व आवश्यक त्या साधनांसह तो आपले विमान घेऊन रोमच्या दिशेने गेला. त्याने प्रथम फील्ड मार्शल केसरलिंगची गाठ घेतली. केसरलिंगकडून कुणा इटालियन अधिकाऱ्यामार्फत मुसोलिनीचा ठाव-ठिकाणा कळतो की काय, याचा त्याने अंदाज घेतला.

मुसोलिनीचे नेमके काय झाले ? तो जिवंत आहे की मारला गेला ? जिवंत असून कैदेत असला तर कुठे आहे ? त्याच्यावर कुणाचा कबजा आहे ? यासंबंधी काहीही निश्चित माहिती त्याला मिळू शकली नाही. अफवा होत्या, की त्याने आत्महत्या केली आहे. कुणी सांगत, तो स्पेनमध्ये निघून गेलेला आहे.

लढाईच्या धुमश्चक्रीत मुसोलिनीचा शोध आता कसा लागावा ? स्कोर्झेनी रोमच्या रस्त्यांतून, भटारखान्यांतून, हॉटेलांतून कानोसा घेत फिरू लागला. रोमच्या एका हॉटेलात त्याला पहिला सुगावा लागला. हॉटेलमध्ये येणाऱ्या एका गिऱ्हाइकाने हकीकत सांगितली, की पोंझा बेटावर त्याचा एक मित्र राहतो. त्याने आपल्या प्रेयसीला लिहिलेल्या पत्रात बेटावर कुणीतरी महत्त्वाची व्यक्ती अटकेत असावी, असा संशय व्यक्त केलेला होता. स्कोर्झेनीने त्या गिऱ्हाइकाकडून एवढी माहिती काढली.

पोंझा बेटावर पोचताच स्कोर्झेनीला कळले, की तेथून एक महत्त्वाचा कैदी नुकताच हलवण्यात आला व तो ' माडेलिना ' बेटावर आता ठेवण्यात आला आहे.

यावेळी स्कोर्झेनीने आपल्या बरोबर आपला सहकारी लेफ्टनंट वार्गर याला घेतले. याला इटालियन भाषा सफाईदारपणाने बोलता येत होती. ' माडेलिना ' बेटावरील डॉक भागातच खाणावळीत इटालियन नौसैनिक म्हणून वार्गरने भटकावे व जर कुणी माणूस मुसोलिनीसंबंधी काही बोलू लागला तर ' ड्यूस मेलेला आहे, ' असे ठामपणे सांगून, त्या व्यक्तीशी या बाबतीत पैज मारावी, अशी योजना स्कोर्झेनीने निश्चित केली. वार्गर ' माडेलिना ' बेटाच्या डॉक भागात इटालियन खलाशाच्या पोषाखात वावरू लागला.

तिथल्या बाजारात येणारा एक इटालियन माळी या जाळ्यात अचूक गवसला. वार्गरने पैज मारली, की ड्यूस जिवंत नाही. त्या माळ्याने वार्गरला वेबर या विवक्षित विभागातील एका घराजवळ नेले. त्या घराच्या गच्चीत एक व्यक्ती बसलेली होती. तिच्याकडे दुरून बोट दाखवीत त्याने वार्गरला सांगितले –

"तो ड्यूस आहे ! "

वार्गरचे काम झाले. पैज हरून वार्गरने बेट सोडले !

स्कोर्झेनीने वार्गरने आणलेल्या बातमीची शहानिशा केली व तो हिटलरच्या भेटीला आला. इकडे अॅडमिरल कनारीस या जर्मन अधिकाऱ्याने बातमी आणली होती, की मुसोलिनी एल्बा बेटावर आहे. फ्यूररने स्कोर्झेनीची गाठ घेतली व त्याचे म्हणणे ऐकून घेताच, एल्बावर हल्ला चढविण्याचा हुकूम त्याने मागे घेतला. स्कोर्झेनीला त्याने सांगितले,

"I believe you captain Skorzeny. You are right. Have you a further plan of operations ?"

[ कॅप्टन स्कोर्झेनी, माझा तुझ्या सांगण्यावर विश्वास आहे. तुझा अंदाज बरोबर आहे. आता पुढे काय करण्याची योजना आहे ? ]

स्कोर्झेनीने माडेलिना बेटावर हल्ला करण्याची योजना फ्यूररकडून मान्य करवून घेतली व तो माडेलिनाला परतला. २७ ऑगस्टला पहाटे हा हल्ला होणार होता. सर्व तयारी झाली होती, परंतु २६ ऑगस्टला अपरात्री मुसोलिनीला माडेलिना बेटावरून हलविण्यात आले ! तो मुसोलिनीच आहे, या विषयी स्कोर्झेनीची आता खात्री झाली होती. कारण आदल्या दिवशी रात्री इटालियन गृहखात्याकडे बेटावरून गेलेला संदेश स्कोर्झेनीने डीकोड केला होता. यात म्हटले होते—

"Security measures around Grand Sasso completed..."

[ ग्रँड सॅसोभोवती संरक्षणाची व्यवस्था पूर्ण झालेली आहे. ]

### डोंगरमाथ्यावरील ग्रँड सॅसो

एव्हाना ८ सप्टेंबर उलटली होती.

बॅडॅग्लियो सरकारने दोस्तांशी शस्त्रसंधी केलेला होता. मुसोलिनी हातातून कायमचा निसटण्याचा धोका निर्माण झाला होता. स्कोर्झेनीने ठरविले, की ग्रँड सॅसो येथूनच मुसोलिनीची मुक्तता करावयाची. दुसरी संधी पुन: मिळेल न मिळेल—कुणी सांगावे ?

ग्रँड सॅसो हे ठिकाण कुठे होते...तर एका डोंगराच्या सुळक्यावर होते. माथेरानच म्हणाना. अगदी माथेरानसारखेच. तिथे जाणारी एकच रेल्वेगाडी डोंगराला वळसे घेत घेत वर पोचत असे. हे ठिकाण आता सामान्य प्रवाशांना बंद करण्यात आले होते. स्कोर्झेनीपुढे तीन पर्याय होते. (१) तळाशी हल्ला करून रेल्वेमार्गावर कबजा करणे. (२) पॅराशूटच्या सहाय्याने डोंगरमाथ्यावरच उतरणे. (३) ग्लायडरने डोंगरमाथ्यावर उतरून मुसोलिनीला पळवणे.

यांतील पहिला मार्ग अनुसरणे धोक्याचे होते, कारण मुसोलिनीवर नजर ठेवणाऱ्या मोठ्या संख्येने असलेल्या इटालियन सैन्याशी तळाशीच घनचक्कर उठली असती व यदाकदाचित मुसोलिनी हाती लागला, तर इटालियन सैन्याचा वेढा

फोडून पुनः त्याच्यासकट निसटून जर्मन सरहद्द गाठणे कठीण झाले असते. दुसरा मार्ग सोपा होता, परंतु यात विलक्षण अडचणी होत्या. स्कोर्झेनीने विमानातून या डोंगरमाथ्याची जी छायाचित्रे घेतली, त्यांवरून तेथे विमान उतरणे केवळ अशक्य होते. शिवाय एवढ्या सुळक्यावर नेमके पॅराशूट उतरणे अशक्य असते. दऱ्याखोऱ्यांत पॅराशूट कोसळले तर मामला बिघडावयाचा. शेवटी तिसरा पर्याय स्कोर्झेनीने निश्चित केला.

ग्लायडर डोंगरमाथ्यावर उतरताच मुसोलिनीवर पहारा करणाऱ्या लोकांनी मुसोलिनीला ठार करू नये, यासाठी जनरल सोलेटी (Soleti) या इटालियन सेनाधिकाऱ्याला स्कोर्झेनीने बरोबर घेण्याचे ठरवले. इटालियन सेनेत आता गोंधळ माजलेला होता. शस्त्रसंधी केलेले सरकार रोम सोडून पळाले होते. ज्यांना जर्मनांच्या बाजूने लढावेसे वाटत होते, ते लढत होते. ज्यांना वाटत नव्हते, ते शरण जात होते. जनरल सोलेटी हा स्कोर्झेनीने आपल्या नादी लावला. प्रत्यक्ष ड्यूसला सोडवण्याच्या या साहसी प्रयत्नात सहभागी व्हायला जनरल सोलेटी तयार झाला होता.

१२ सप्टेंबर, रविवार हा दिवस स्कोर्झेनीने नक्की केला. ग्लायडर विमान येऊन दाखल झाले होते. दुपारी १ वाजता पॅट्रीका–डी–मारे येथील विमानतळावरून स्कोर्झेनी, जनरल सोलेटी व विमानाचा वैमानिक असे तिघांना घेऊन ग्लायडरने भरारी मारली. ग्रँड सॅसोवर गिरक्या घेताना दुर्बिणीतून त्यांच्या लक्षात आले, की ग्रँड सॅसो हे अक्षरशः डोंगराच्या सुळक्यावर आहे व तिथे ग्लायडर टेकवण्यासाठी सपाट जागाही नाही. हॉटेलच्या समोर जी थोडीशी मोकळी जागा होती, तिथेच क्रॅशलँडिंग (मोडतोड पत्करून उतरणे) करणे भाग होते.

### ड्यूस, तुम्ही मुक्त आहात

विमान ग्रँड सॅसोच्या दिशेने खाली येऊ लागले. विमानाचा घरघराट ऐकून मुसोलिनी आपल्या खोलीच्या खिडकीत आला व त्याने वर आकाशात दृष्टी टाकली. विमान दृष्टिपथात येते न येते तोच विमानाने झेप घेतली व हॉटेलच्या पुढच्या


श्री प्रफुल्ल दत्तांची
दोन संग्राह्य पुस्तके

| | |
|---|---|
| दुर्गावाडीतील दैवते | किं. २ रु. |
| तपोवनातील दुर्वा | किं. १॥ रु. |

किंमतीशिवाय ट. ख वेगळा
**बलवंत पुस्तक भांडार, मुंबई ४**

मोकळ्या पटांगणात ते विमान जोराने येऊन आदळले. जमिनीशी संपर्क होताच ग्लायडर विमानाची मोडतोड झाली व त्यातून स्कोर्झेनी, वैमानिक व इटालियन जनरल सोलेटी धडपडत बाहेर आले.

ग्रँड सॅसोमधील पहारेकरी खडबडून बंदुका व रिव्हाल्व्हर सरसावू लागलेले पाहताच, जनरल सोलेटीने हाताने त्याना थांबण्याची खूण करीत इटालियन भाषेत हाका घातल्या–" Don't shoot ! Don't shoot ! " [ गोळीबार करू नका. ]

वरच्या खिडकीतून मुसोलिनीही तेच ओरडला–" Don't fire–! "

या गडबडीत तेथला वायरलेस सेट नष्ट करणे प्रथम आवश्यक होते. स्कोर्झेनी पुढे घुसला व खालच्या मजल्याला ज्या खुर्चीवर वायरलेस सेट होता, ती खुर्ची त्याने लाथेने उडवली. त्याने सेटच्या निमिषार्धात ठिकऱ्या केल्या व वर जाण्यासाठी तो मार्ग शोधू लागला. त्याला जिना दिसेना, तेव्हा तो पुन: बाहेर आला. इमारतीच्या कडेकडेने तो वर चढण्यासाठी जागा शोधू लागला. नऊ फूट उंचीवर एका गच्चीचा कठडा होता. पहिल्या विमानापाठोपाठ एक स्टॉर्च विमान...फक्त पंख्याची थोडी नासाडी करून (Gerlach) गेरलॅच या बहाद्दूर वैमानिकाने ठरल्याप्रमाणे उतरवले होते. तीतून आणखी काही जर्मन सैनिक उतरले होते.

एका सैनिकाच्या पाठीवर चढून स्कोर्झेनीने वरच्या गच्चीत झेप घेतली व तो आतल्या खोलीत धावत गेला. वरच्या खिडकीतून मुसोलिनी सर्व पाहत होता. हातात पिस्तूल घेतलेला स्कोर्झेनी जिना चढून तिसऱ्या मजल्यावरच्या दालनात घुसला.

समोर मुसोलिनी स्तिमित जनरेने त्याच्याकडे पाहत उभा होता. स्कोर्झेनी हर्षाने जवळ जवळ ओरडलाच––

" Duce ! Fuhrer has sent me ! You are free ! ! ! "

[ ड्यूस, फ्यूररने मला धाडले आहे ! तुम्ही आता मुक्त आहात ! ! ]

मुसोलिनीने हात पुढे केले व स्कोर्झेनीला त्याने घट्ट मिठी मारली.

## ड्यूस ! अभिनंदन !

मुसोलिनीने भराभर कपडे केले व काही मिनिटांत स्कोर्झेनी व मुसोलिनी जिने उतरून खाली येईपर्यंत जनरल सोलेटी व जर्मन सैनिकांनी तेथल्या पहारेकऱ्यांवर कबजा केला होता. मुसोलिनी त्या निवासाबाहेर पडला, तेव्हा त्याच्या सेवेतील सर्वजण व पहारेकरी दुतर्फा उभे होते.

" आभारी आहे––" असे घाईघाईने म्हणत मुसोलिनी स्कोर्झेनीच्या मागे भराभर पावले टाकीत होता.

ग्रँड सॅसोचा पायथा शांत होता. वर माथ्यावर काय चालले आहे, याची कुणाला वास्तपुस्त नव्हती. कारण दुपारी दोनचा सुमार होता. सगळेजण वामकुक्षीत दंग होते.

स्टॉर्च विमानाचा पंखा वाकडा झाला होता. गेरलॅच वाट पाहत होता. जेमतेम एकाच प्रवाशाला घेऊन उडणे आता शक्य होते, परंतु स्कोर्झेनीही मुसोलिनी-पाठोपाठ विमानात चढला. गेरलॅचने सांगितले–विमान उडणे कठीण आहे. येथे विमानाला गती घेण्यासाठी धावपट्टी नाही.

याला स्कोर्झेनीने उपाय काढला. विमानाचे मशीन सुरू होताच ...... मागे उरलेल्या बारा सैनिकांनी ओळखांबे देऊन विमानाला जमिनीला खिळवून धरले. पुरेशी गती घेताच –बाराजणांनी एकदम हात सोडले व ते पंखा दुखावलेले स्टॉर्च विमान कोलांट्या खात त्या डोंगरमाथ्यावरून दरीत कोसळू लागले.

क्षणभर स्कोर्झेनीला वाटले, की विमान कोसळून तिघांचा अंत होणार ! –परंतु गेरलॅचने विमानाची अधोगती थांबवण्यात यश मिळवले व विमान स्थिर झाले. आकाशात त्याने पुन: झेप घेतली.

पॅट्रिका–डी-मरे विमानतळावर स्टॉर्च विमान उतरले. गेरलॅचसाठी ' हिनकेल ' (Heinkel) जातीचे दुसरे विमान सज्ज होते. त्यातून मुसोलिनीसह स्कोर्झेनी व्हिएन्नाच्या दिशेने निघाला, तेव्हा सायंकाळ झाली होती.

व्हिएन्नाच्या विमानतळावर मुसोलिनी उतरला, तेव्हा सायंकाळ चांगलीच दाटली होती व काळोख पडला होता. ' हॉटेल कॉन्टिनेंटल ' या ठिकाणी मुसोलिनीची व्यवस्था करण्यात आली होती. मुसोलिनी हॉटेलमध्ये आपल्या खोलीत पोचताच फोनची घंटा खणखणली ......

मुसोलिनीने फोन उचलला–

दुसऱ्या टोकाने फ्यूररचा आवाज आला

" अभिनंदन ... "

फ्यूरर युद्धछावणीतून बोलत होता. दुसऱ्या दिवशी म्हणजे १३ सप्टेंबर, १९४३ ला मुसोलिनी म्यूनिचला आला. तिथे त्याची पत्नी रॅचेल व मुले त्याच्या स्वागतासाठी हजर होती. दोन दिवस विश्रांती घेऊन १५ सप्टेंबरला मुसोलिनी


झाले ते होऊन गेले !

आता हेच ठरवा की यापुढे टोप्या, गंजिफ्रॉक, सॉक्स वगैरे होजियरी माल व सर्व तऱ्हेचे अद्ययावत तयार कपडे

मुंबईस प्रार्थनासमाजजवळ

**एन्. व्ही. गोखले**

यांचे दुकानातच घ्यावयाचे

इस्ट प्रशियात रॅस्टेनबर्ग येथे हिलरच्या भेटीसाठी दाखल झाला.

मुसोलिनीची सुटका करणारा धाडसी जर्मन तरुण कॅप्टन ओटो स्कोर्झेनी याने दोस्त सेना फ्रान्समध्ये उतरल्यानंतर आणखी एक मोठी धाडसी कामगिरी उरकली. त्याची हकीकत पुढे येईलच. हा स्कोर्झेनी युद्धानंतर पकडला गेला. परंतु अभियोगात त्याचेवर कसलाही गैरआरोप शाबीत झाला नाही. डॅच्यू तुरुंगातून १९४७ मध्ये त्याची अमेरिकन सरकारने सुटका केली. तेथून तो काही दिवस स्पेनमध्ये राहून आता सध्या दक्षिण अमेरिकेत स्थायिक झाला आहे. सिमेंटच्या धंद्यात त्याने तेथे जम बसविला असून, आपल्या युद्धकाळातील आठवणी त्याने तेथेच लिहिल्या. मुसोलिनीच्या सुटकेची साद्यंत हकीकत ही मुख्यत: त्यानेच लिहिलेली हकीकत आहे.

मुसोलिनीच्या सुटकेचा संपूर्ण वृत्तांत–जो शिररने आपल्या पुस्तकात दिलेला नाही–तो विस्ताराने देण्याचे कारण मुसोलिनीच्या आयुष्यातील हे नाटय मोठे वाचनीय तर आहेच, परंतु जर्मन सैन्यातील सर्वसाधारण सैनिक व फ्यूरर यांच्यांत जे निष्ठेचे नाते होते, ते स्कोर्झेनीच्या साहसाने चांगलेच दृष्टोत्पत्तीस येते. फ्यूररला कुठलीच गोष्ट अशक्य वाटत नव्हती, याचे मुख्य कारण त्याच्या सैनिकांतले एकूण एक सैनिक वाटेल ते साहस पत्करण्यास सिद्ध होते. हिटलरला माणसांची पारखही अचूक होती. त्याने निवडलेल्या सर्वच सेनानींनी भीमपराक्रम केले. अंती त्यांचा व हिटलरचा मतभेद उडाला असला तरी अखेरच्या क्षणापर्यंत फ्यूररवर निष्ठा ठेवणाऱ्यांचीच संख्या मोठी होती.

## हिटलरची निराशा

१५ सप्टेंबरला रॅस्टेनबर्ग येथे हिटलर व मुसोलिनीची गळाभेट झाली, पण पुढल्या दोन दिवसांत ड्यूसशी बोलणे केल्यानंतर हिटलरची निराशा झाली. जर्मन-व्याप्त इटालीत फॅसिस्ट राजवटीचे पुनरुज्जीवन करण्यास मुसोलिनी फारसा उत्सुक नव्हता. हिटलरची अपेक्षा होती, की सुटका होताच ज्या ग्रँड कौन्सिलच्या सभासदांनी त्याला अधिकारभ्रष्ट केले, त्यांना यमसदनाला धाडण्यासाठी ड्यूस उतावीळ झालेला असेल. परंतु यादवीची कल्पना ड्यूसला सहन होण्यासारखी नव्हती. ज्याला यादवी मानवत नाही, त्याला क्रान्तीचे नेतृत्व पेलवत नाही.

ग्रँड कौन्सिलच्या ज्या सभासदांनी पुढाकार घेऊन मुसोलिनीला पदच्युत केले, त्यांत मुसोलितीचा जावई–काऊंट सियानो–हादेखील होता. मुसोलिनीने ही अडचण पुढे केली, की सर्वांनाच फासावर टांगायचे, तर त्यातून माझ्या जावयाचा अपवाद कसा करता येईल ? हिटलरने ताडकन सांगितले–

" That makes his treachery all the graver "

[ म्हणून तर त्याची हरामखोरीही अधिकच गंभीर मानली पाहिजे. ]

इटालीत परतून फॅफिस्ट अमलाचे नवे सरकार आपल्या नेतृत्वाखाली उत्तर इटालीत स्थापन करण्याचे मुसोलिनीने मान्य केले. अर्थात त्यात फारसा राम आहे,

असे हिटलरलाच वाटत नव्हते. मुसोलिनी निघून जाताच हिटलरने गोबेल्सला म्हटले–

" He is so bound to his own people that he lacks the broad qualities of a world wide revolutionary. "

[ मुसोलिनी हा आपल्या इटालियन लोकांबद्दल इतका हळुवार आहे, की जागतिक स्वरूपाच्या क्रांतिकारक नेतृत्वासाठी लागणारे सर्वसंग्राहक गुण त्याचेपाशी नाहीतच. ]

गोबेल्सही आपल्या दैनंदिनीत लिहितो–"मुसोलिनी हा फ्यूरर किंवा स्टॅलिनप्रमाणे खरा क्रांतिनेता नाहीच. "

मुसोलिनीची पत्नी रॅचेल, मुले व सियानोपत्नी एडा, ही सर्व म्यूनिचला राहिली होती. मुसोलिनीची प्रेयसी क्लॅरा पेटॅसी (Clara Petaci) ही आता मुसोलिनीजवळ राहावयास आली व आपल्या प्रेयसीच्या संगतीत मुसोलिनी पुन: आपले सुखासीन आयुष्य चवीने जगू लागला. १७ सप्टेंबरला सुटका झाल्यानंतर म्यूनिच रेडिओवरून इटालियन जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात मुसोलिनीने इटालियन जनतेला आवाहन केले होते–

" मी पुन: मुक्त झालो आहे. सर्व इटालियन जनतेने एकमुखाने मला साथ द्यावी. अंतिम विजय आपलाच आहे–" या त्याच्या शब्दांवर त्याचा स्वत:चा तरी विश्वास होता की नाही, याची शंका आहे !

मुसोलिनी सरकारला करण्यासारखे असे आता काहीही नव्हतेच. लढाया जर्मन सैन्यच करीत होते. जे थोडेअधिक इटालियन सैन्य लढाईला उत्सुक होते व मुसोलिनी सरकारभोवती जमले होते, त्यांना जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालीच लढावे लागत होते. युद्धाचे निर्णय केसरलिंग, रोमेल व फ्यूरर घेत होते. इटालियन जनतेला कबजात ठेवण्यासाठी मुसोलिनीचे बुजगावणे फक्त आता इटालीच्या शेतांत उभे होते.

## सियानोचा अंत

इटालियन बंडखोरांच्या कारवाया वाढत होत्या. मुसोलिनीला खाली ओढणाऱ्यांना न्यायालयापुढे खेचल्याखेरीज वचक बसणार नाही, असा तगादा हिटलरने

★ नूतन वर्षाभिनंदन ★

मध्यमवर्गीयांना उपयोगासाठी लागणारे घरगुती सर्व प्रकारचे सुंदर मजबूत आणि टिकाऊ तसेच हॉस्पिटल्स आणि ऑफिसेस यांना लागणारे उत्तम फर्निचर ऑर्डरप्रमाणे बनवून मिळण्याचे एकमेव ठिकाण

• स्टँडर्ड फर्निचर वर्क्स (के. के. मुळे)

नूर बिल्डिंग, तुळशीपाईप रोड, दादर (बी. बी.) रेल्वेस्टेशनजवळ, मुंबई २८

लावलेला होता. अखेर मुसोलिनीने सियानोप्रभृती जे जे हिटलरला बंडखोर वाटणारे हाती लागले, त्यांना नोव्हेंबरात अटक केली व ८ जानेवारी, १९४४ ला त्यांचा खटला उभा राहिला.

निकाल ठरल्यासारखाच होता. सियानो आदि पाचजणांना गोळ्या घालण्यात याव्या, असा निर्णय झाला. फक्त एकाच ग्रँड कौन्सिल सभासदाला ३० वर्षे कैद मिळाली. या पाचांत रोमवर मोर्चा नेण्यात मुसोलिनीचा उजवा हात असलेला डी– बोनो हा क्रांतिनेता होता. आता त्याचे वय ७८ होते.

शिक्षा जाहीर होताच सियानो, डी. बोनो आदींनी 'इटाली अमर रहे,' अशी घोषणा केली. डी. बोनो उद्गारला,

"या चौकशीचा उपयोग काय ? आम्हाला मारण्यात यावे, हे कुणीतरी आधीच ठरवलेले होते. मी तर वृद्ध आहे...फारच वृद्ध आहे. हिसकून घ्यावे असे आता माझ्यापाशी काही नाही. फक्त आता फार वेळ लावू नका–"

सियानोने तुरुंगात पडण्यापूर्वी एक मोठी कामगिरी उरकली होती. त्याची दैनंदिनी महत्त्वाची होती. ही सर्व महत्त्वाची कागदपत्रे घेऊन सियानोची पत्नी– मुसोलिनीची कन्या एडा सियानो हिने स्वित्झर्लंडची सरहद्द ओलांडली होती. निसटताना तिने शेतकऱ्याच्या स्त्रीसारखा पोषाख केला होता व कागदपत्रे आपल्या स्कर्टमध्ये लपविली होती. आपल्या सर्व डायऱ्या एडापाशी सुखरूप आहेत, असे सांगणारी चिठी व्हेरोनो तुरुंगातून (२३–१२–१९४३) बाहेर धाडण्यातही सियानो यशस्वी झाला. सियानो हा मुसोलिनीचा जावई असल्यामुळे तुरुंगात असतानाही त्याला बऱ्याच सवलती इटालियन रक्षकांनी दिल्या असल्याशिवाय हे शक्य नव्हते. सियानोची ही दैनंदिनी आज उपलब्ध आहे व इतिहासाच्या दृष्टीने ती महत्त्वाची समजली जाते. यातील उतारे पूर्वीच्या निवेदनात बऱ्याच वेळा आलेले आहेत.

११ जानेवारी, १९४४ ला सकाळी ८ वाजता व्हेरोना तुरुंगातून सियानो, डी बोनो आदि पाचजणांना वधस्थानाकडे नेण्यात आले. पाचांपैकी मॅरिनेली हा एकदाच बेशुद्ध झाला व शुद्धीवर यायला थोडा वेळ लागला. सियानोने विनंती केली, की पाठीकडून गोळ्या घालण्यात येऊ नयेत. (देशद्रोह्यांना पाठीकडून गोळ्या घालण्यात येतात.) विनंती नाकारण्यात आली. डी. बोनो, सियानो व मॅरिनेली हे फायरिंग स्कॉडकडे पाठी करून छोट्या स्टुलांवर बसले. याचे छायाचित्र घेण्यात आले. गोळ्या सुटल्या. अखेरच्या क्षणी अंगाभोवतीच्या दोऱ्या उसकटून सियानोने गोळ्यांच्या दिशेने छाती पुढे केली. यामुळे फरक इतकाच झाला, की गोळ्या वाकड्यातिकड्या त्याच्या शरीरात घुसल्या व त्याच्या जवळ जाऊन आणखी एक गोळी मस्तकात झाडण्यात आली.

युरोपच्या रंगभूमीवर हिटलर– रिबेनट्रॉपबरोबर अनेक वाटाघाटींत भाग घेत- लेल्या सियानोचा असा अंत झाला !

आदल्या दिवशी रात्रभर मुसोलिनीला झोप लागली नव्हती. सियानो व डी. बोनो धीरोदात्तपणे मेले, हे ऐकून आनंद झाला, अशी प्रतिक्रिया त्याने लगेच व्यक्त केली, तरी आपल्या पत्नीच्या भेटीत त्याने उद्‌गार काढले– “ माझ्या यातना जर्मनांना कधीच समजणार नाहीत. ”


[ They will never know my torment. ]

विजयाची आशा सोडून आता मुसोलिनी सतत एकाच गोष्टीचा विचार करीत असे, की इतिहासात आपल्याविषयी काय लिहिले जाईल ? इटालीला जगात पहिल्या दर्जाला आपण नेले. युद्धातील जय–पराजय हे चालायचेच. इटालीच्याच भूमीवर आपण या युद्धात मरावे व इटालीच्या पराभवातही आपण कीर्तिरूपाने उरावे, अशीच विचारसरणी त्याच्या मनात सतत घर करू लागली. स्वतःची तुलना सतत नेपोलियनशी तो करी. मॅझिनी, गॅरिबॉल्डी यांच्यानंतर मुसोलिनी हे नाव इटालीच्या इतिहासात कसे दिसेल, याची अनेक चित्रे तो सतत मनःचक्षूपुढे रंगवीत बसे.

– लढाई फक्त आता फ्यूरर लढत होता.

इटालीने शरणागती देऊनही जवळजवळ दोनतृतीयांश इटालीवर केसरलिंगच्या सैन्याचे वर्चस्व बसलेले होते. ग्रीस, अल्बानिया, बाल्कन्स, युगोस्लाव्हिया या सर्व ठिकाणी असलेले इटालियन सैन्य आता जर्मन नेतृत्वाखाली का होईना, युद्धसिद्ध ठेवण्यात त्याने यश मिळवले होते. जगाच्या डोळ्यांत मुसोलिनीची इटालीचा भाग्यविधाता ही प्रतिमा पुनः स्थिरावू लागली होती...... कारण त्यावेळी अंतर्गत-रीत्या सर्व कबजा जर्मनांनी केलेला आहे, ही गोष्ट बाहेर समजणे दुरापास्त होते. राज्य मुसोलिनीचे व हुकूमत नाझींची, असा हा देखावा बाहेर ओळखू येत नव्हता.

रोमच्या दक्षिणेला केसरलिंगने आता आपली फळी उभी केली होती व दोस्तांची

हरिभाऊ विश्वनाथ कं.

संगीत वाद्यालय

दादर, मुंबई २८

प्रगती सर्व आघाडींवर रोखून धरली होती.

## रशियन आघाडीवरील पराभव

रशियन आघाडीवर मात्र हिटलरची अखेरची मोठी चढाई फसण्याच्या स्थितीत होती.

५ जुलै, १९४३ ला ५,००,००० जर्मन सैन्याने सतरा पॅन्झर डिव्हिजन्ससह व नव्या 'टायगर' रणगाड्यांनिशी कुर्स्क (Kursk) च्या पश्चिमेस मोठी चढाई सुरू केली. या चढाईमुळे स्टॅलिनग्राडमधून पुढे आलेले रशियन सैन्य उजवी बगल धोक्यात येताच सैन्य वेढले जाऊ नये, म्हणून पुनः डॉनपर्यंत मागे जाईल, अशा हिशोबाने ही चढाई आखण्यात आलेली होती.

परंतु रशियन सेनानी त्या दृष्टीने सावध होते. ज्याला बगलेची चढाई म्हणतात (Flank move), ती जर्मन सैन्य हाती घेणार, अशी त्यांची अटकळ होतीच व रशियन तयारीत होते. पहिल्या पंधरवड्यातच जर्मनांचे निम्मे अधिक टँक रशियनांनी नष्ट केले व या चढाईचे दातच पाडण्यात आले. हा चावा तर बसला नाहीच, उलट या आघाडीवरील जर्मन रेटयाचा जोर कमी करण्यासाठी कुर्स्कच्या उत्तरेस ओरेल (Orel) या ठिकाणी रशियनांनी जर्मन सन्यातच पाचर ठोकली. ही पाचर आरपार शिरताच रशियनांनी पुनः मागे वळून म्हणून पाहिले नाही. ४ ऑगस्टला ओरेल रशियनांनी घेतले व मॉस्कोच्या वाटेवरील शेवटचे जर्मन लष्करी ठाणे हिटलरच्या हातातून गेले.

जर्मन-चढाई कोसळू लागली. रशियन सैन्याची पाचर रुंदावू लागली. २३ ऑगस्टला खारकॉव्ह पडले. महिनाभराने २५ सप्टेंबरला जर्मनांना स्मॉलेन्क्स शहर खाली करावे लागले. याच ठिकाणाहून नेपोलियनच्या 'ग्रँड आर्मी' प्रमाणे जर्मनांनी मॉस्कोसाठी प्रस्थान ठेवले होते.

सप्टेंबरच्या अखेरीस क्रिमियात घुसलेल्या जर्मन सैन्याला वरची फळी कोसळल्यामुळे मोठा धोका निर्माण झालेला होता. डिनेपर नदीवर आता जर्मन सैन्ये मोर्चेबंदी करू पाहत होती. लाल सैन्य पुनः जमवाजमव करण्यासाठी उसंत घेईल, असा जर्मनांचा अंदाज होता; परंतु रशियन सेनानी आता थांबू इच्छित नव्हते. पळू लागलेल्या सैन्याला उसंत देऊन त्याचा मोड झाला, असे समजण्याइतके रशियन दूधखुळे नव्हते. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात डिनेपर नदी रशियन सैन्याने कीव्हच्या उत्तरेकडे व दक्षिणेकडे ओलांडली. ६ नोव्हेंबरला कीव्ह पडले.

१९४३ साल संपण्याच्या सुमारास सोव्हिएट सैन्य उत्तरेस पोलंडच्या व दक्षिणेस रुमानियाच्या सरहद्दीजवळ येऊन पोचलेले होते.

एवढ्यानेच भागलेले नव्हते !

## 'यू' बोटींचा संहार

दोन इतर आघाड्यांवरही जर्मनांनी मोठा मार खाल्लेला होता. १९४२ मध्ये

अटलांटिकमध्ये दोस्तांची असंख्य जहाजे व बोटी बुडवीत जर्मन पाणबुड्यांनी कसा घुमाकूळ घातलेला होता, हे निवेदनात आलेले आहे. परंतु ज्या रडारयंत्राने लुप्त-वाफ नामोहरम झाले, त्याच यंत्राने हा धुमाकूळ आवरला. अमेरिकन व ब्रिटिश बोटींवर १९४३ च्या सुरवातीला रडारयंत्रे बसविण्यात आली. यामुळे आसपासच्या परिसरातील जर्मन पाणबुड्यांचा सुगावा, पाणबुड्या बोटीच्या दिशेने पुरेशा पुढे सरकण्यापूर्वीच लागू लागला व मोठ्या प्रमाणावर जर्मन पाणबुड्यांचा संहार सुरू झाला. फेब्रुवारी, मार्च व एप्रिल, १९४३ या तीन महिन्यांत पन्नास व मेमध्ये सदतीस जर्मन यू-बोटी खलास करण्यात ब्रिटिश आरमाराने यश मिळविले. अखेर या संहाराचा उलगडा न होता नवा जर्मन नौदल प्रमुख डोनिटझ् याने अटलांटिक-मधून सर्व यू-बोटी काढून घेतल्या होत्या.

सप्टेंबरनंतर पुन: यू–बोटी अटलांटिकमध्ये आपल्या व त्यांनी ६७ ब्रिटिश जहाजे बुडवली. मात्र आणखी ६४ यू बोटी यावेळीही रसातळाला गेल्या. आता मात्र डोनिटझ्ने अटलांटिकमध्ये ब्रिटिशांचा मुकाबला अशक्य ठरवून उरल्यासुरल्या यू-बोटी मागे खेचल्या.

सबंध १९४४ साल अमेरिकेतून येणारे शस्त्रास्त्रांचे साठे अविरोधपणे इंग्लंडच्या किनाऱ्याला पोचू शकले, याला कारण जर्मन यू-बोटींचे १९४३ मध्येच संपूर्ण शिरकाण झालेले होते. फ्रान्समध्ये उतरण्याची दोस्तांची तयारी यामुळे निर्वेधपणे पुरी होऊ शकली.

आणि याच १९४३ सालात दोस्तांच्या विमानांनी जर्मन शहरावर राक्षसी बॉम्बहल्ले सतत चालू ठेवले होते. २९ जुलैला हॅम्बुर्गवर ८०० ते १००० बॉम्बर विमानांनी आग ओकली. हॅम्बुर्गची राखरांगोळी झाली, तशी खुद्द लंडनचीही जर्मनांना करता आलेली नव्हती. ८,००,००० माणसे बेघर झाली, हजारो मारली गेली. जर्मन कारखाने, युद्धसाहित्याचे साठे, बंदरे, गोद्या, शहरे यांवर दोस्तांनी भडिमार ठेवला होता, तो याच पद्धतीच्या हल्ल्यांनी.




जर्मन जनतेने या सर्व बॉम्ब-वर्षावाला ब्रिटिशांइतक्याच धैर्याने तोंड दिले, परंतु पहाट होण्यापूर्वीचा

काळोख निराळा आणि कधी न संपणारी काळरात्र निराळी ! चार वर्षे युद्धासाठी सतत राबलेल्या जर्मन जनतेला संपूर्ण पराभवापूर्वी सहन करावा लागणारा हा सत्यानाश महाभयंकर होता. राईशच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत दोस्तांच्या विमानांनी पेटवलेले वणवे पाहताना सामान्य जर्मन जनतेच्या मनांत निराशेची काळरात्र पसरत चालली होती. राईशच्या मृत्यूचे टोले त्यांना स्पष्ट ऐकू येत होते.




मी पार्वती!
आहोत आपली ....
'साधी माणसं'
हणबर वाडी
गाव आमचं,
पोटासाठी आलो
सहरांत
आणि तीथं जे ....
तुम्हींच पहा
आणि ठरवा!

गायत्री चित्र:
भूमिका:
जयश्री गडकर, सूर्यकांत,
मा. विठ्ठल, चंद्रकांत गोखले,
शेखर आणि सुलोचना
संगीत – आनंदघन
छाया – अरविंद लाड

"भालजी पेंढारकर बोलपट"

मंगेश वितरण
सहर्ष सादर करीत आहे.

## शरणागतीचे विचार

जर्मन सेनानींच्या मनांतही शरणागतीचे विचार येऊ लागले होते. हिटलरच्या सेनेतून मुक्त झालेला जनरल हाल्डर युद्धाच्या आठवणीत लिहितो–

"Towards the end of 1943, it had become unmistakably clear that the war was militarily lost..."

[ १९४३ च्या अखेरीस लष्करीदृष्टचा युद्ध गमावलेले आहे, ही गोष्ट चांगलीच स्पष्ट झालेली होती. ]

१० सप्टेंबर, १९४३ ला इटालीच्या शरणागतीचे वृत्त जाहीर होताच तातडीने हिटलरच्या भेटीस गेलेला गोबेल्स दैनंदिनीत लिहितो.

"आम्ही प्रथम कुणाकडे युद्धबंदीसाठी वळावे हा प्रश्न विचारात घ्यावा लागणार आहे. मॉस्कोकडे की अँग्लो–अमेरिकनांकडे ? एक गोष्ट काहीही झाले तरी स्पष्ट आहे, की दोन्ही बाजूंविरुद्ध युद्ध रेटणे व जय मिळणे अशक्य आहे."

हिटलरजवळ मनात येईल ती गोष्ट धीटपणे बोलणारे जे थोडे नाझी–नेते होते त्यांतला गोबेल्स हा सर्वात धीट होता. हे विचार फक्त दैनंदिनीत लिहून गोबेल्स, स्वस्थ बसला नाही. २३ सप्टेंबरला हिटलरबरोबर रात्री जेवण घेताना गोबेल्सने हा विषय काढला. त्यावेळी फक्त दोघेच होते. गोबेल्स लिहितो –

"मी फ्यूररला विचारले, की चर्चिल यांच्याशी वाटाघाटी करायला त्याची तयारी आहे काय — चर्चिल यांच्याशी वाटाघाटी करून काही साध्य होईल, असे फ्यूररला वाटत नाही. चर्चिल हा द्वेष्टा आहे व त्याच्या मताशी तो चिकटून राहणार, यात शंका नाही. यापेक्षा स्टॅलिनशी वाटाघाटी करणे परवडेल, असे त्याला वाटते. परंतु स्टॅलिनशी एकमत होणे कठीण आहे—! काहीही परिस्थती असली तरी एका कुठल्यातरी बाजूशी समझोता करायलाच हवा, असे मी फ्यूररला सांगितले—"

युद्धाला पाचवे वर्ष लागले, तेव्हा केवळ हिटलर व गोबेल्स यांच्याच मनात शांततेचे आकर्षण उत्पन्न झालेले नव्हते, तर हिटलरला अधिकारावरून दूर करून शांतता लवकर प्रस्थापित होऊ शकेल व त्याकरता हिटलरचा वध करावा लागेल, असा विचार काही दुखावलेल्या जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या मनात येऊ लागलेला होता.

कशाही परिस्थतीत युद्धाचा हा खेळ आता फार काळ चालू शकत नाही, याविषयी मात्र सर्वांचे राईशमध्ये एकमत होत आले होते. प्रश्न होता शांतता आणायची कशी ?

[ अपूर्ण ]

● ● ●

• दिवाळीनिमित्त 'गृहसजावट' या विषयावरील एक विचारसंकलन

# असावे घरकुल आपुले छान !

• सुधीर दामले

गृहसजावट म्हणजे श्रीमंतांची मिरासदारी आहे, एक अनाठाई चैन आहे, अशी आपल्यापैकी बहुतेकांची समजूत असते. परंतु ही गोष्ट तितकीशी बरोबर नाही. गृहसजावटीसाठी थोडाफार पैसा लागतो, ही गोष्ट जरी खरी असली, तरी खरी गरज असते ती सौंदर्यपूर्ण, रसिक दृष्टीची ! मात्र अशी दृष्टी असणारी माणसे नेहमीच हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी असतात. माझ्या परिचयातील अशा ज्या काही दोनचार व्यक्ती आहेत, त्यांचे या बाबतीतील अनुभव, सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबांना मार्गदर्शक ठरतील, असेच आहेत. हे अनुभव व काही सूचना एकत्रित देण्याचा प्रयत्न इथे केला आहे.

गृहसजावटीतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे रंगकाम ! रंगकाम नीटनेटक्या पद्धतीत केले नसेल, तर घरात कितीही भारी किमतीच्या वस्तू असल्या तरी त्याचा योग्य तो परिणाम होत नाही. उलट रंगकाम आकर्षक असेल, तर खोलीचा नूर एकदम केवढा बदलून जातो ! पण तरीही रंगकामाविषयी कोणी फारशी आस्था बाळगीत नाही. म्हणूनच ही आस्था बाळगून रंगकामाविषयी ज्यांनी काही निश्चित विचार केला आहे, अशा शीव (मुंबई) येथील श्री. मनोहर गंगाधर महाजन यांचे या विषयीचे मत त्यांच्याच शब्दांत पाहा. श्री. महाजन म्हणतात, "रंगकाम ही गोष्टच आवश्यक आहे, की वर्षा-दोन वर्षांनी अगर काही कार्याचे वेळी तरी तो आपल्याला द्यावाच लागतो. अशा वेळी थोडी कल्पकता ठेवून, डोळ्यांना त्रासदायक होतील, असे काही विचित्र भडक रंग वापरण्याऐवजी, डोळ्यांना सुखदायक वाटतील, आनंद देतील, असे फिकट पोपटी, निळसर अगर क्रीम-कलर वापरून पाहा. एक वेगळाच परिणाम होईल. यातही निळ्या रंगाचा फायदा एवढा आहे, की



त्यामुळे खोलीचा आकार एकदम मोठा वाटेल. मुख्य म्हणजे प्रकाश अधिक येईल. उन्हाळ्यासाठी, विशेषत: मुंबईच्या हवामानाला तर थंड रंगच विशेष फायदेशीर असतात.

" काही लोकांना संपूर्ण खोलीला रंग देणे कित्येकवेळा परवडत नाही. त्यांनी फर्निचर, कपाटे यांच्यामागे रंग न देता उरलेल्या मोकळ्या भिंतींना फक्त रंग द्यावा आणि थोडा खर्च करायची तयारी असली, तर प्रत्येक भिंतीस वेगवेगळा रंग द्यावा. तो केव्हाही आकर्षकच दिसेल."

श्री. महाजन यांच्याप्रमाणेच मुंबईच्या Willam Jacks and Co. मधील सजावट विभागाचे प्रमुख श्री. लक्ष्मण गोविंद कावळे, लोकांमध्ये आढळणाऱ्या रंग-कामाच्या आवडीविषयी बोलताना म्हणाले, " नव्या काळाला अनुसरून लोकांमध्ये प्लॅस्टिक इमल्शन रंगाचे आकर्षण अधिक वाटत असले, तरी ऑईलपेंटचा टिकाऊ-पणा काही त्यात येत नाही. प्लॅस्टिकचा रंग धुऊन जरी त्यावरील डाग जात असण्याचा फायदा त्यामधून होत असला, तरी एकदा का तो रंग खरवडला गेला, की मग तो टिकून राहणे फारच कठीण जाते. म्हणूनच ज्यांच्या घरातून मुलेबाळे आहेत, त्यांच्याकडे तर हा रंग देणे जरा तोटयाचेच ठरते. शिवाय ऑईलपेंटपेक्षा त्याला खर्च अधिक येतो तो वेगळाच!"

**स्त्रीपुरुषांच्या वेगवेगळ्या आवडी**


स्त्री-पुरुषांच्या भिन्नभिन्न आवडी स्पष्ट करून सांगताना ते पुढे म्हणाले, " स्त्रियांना सर्वसाधारणपणे पिंक, फिक्कट अंजिरी (मोकलर), लाईट व्हायोलेट हे रंग विशेष आवडतात, तर पुरुषांना लाईट ब्लू, ग्रीन किंवा आयव्हरी (हस्तिदंती)

रंग विशेष पसंत असतात." घरातील कोणत्या खोलीला कोणता रंग द्यावा, हे सांगताना ते म्हणाले, "प्रत्येक व्यक्तीचे ⅓ आयुष्य बेडरूममध्ये जात असल्याने त्या खोलीला डोळयांना थंड वाटतील, असे म्हणजेच निळा, निळसर जांभळा, निळसर हिरवा, हिरवा, पिवळट हिरवा हे रंग द्यावेत. क्वचित प्रसंगी या थंड रंगात पांढऱ्या रंगांचे मिश्रण केले, तर अधिक आकर्षक छटा निर्माण होतात. जेवणघराला उत्तेजक (वॉर्म) म्हणजेच तांबडा, तांबूस नारिंगी, तांबूस जांभळा, पिवळसर नारिंगी हे रंग द्यावेत. यामुळे उत्साह वाढेल, भूक अधिक लागेल. उठण्या-बसण्याच्या खोलीला जरा जास्त भारदस्त रंग द्यावेत. रंगाबाबत सर्वसाधारणपणे ही खबरदारी घेतली, म्हणजे त्या रंगाशी मिळतेजुळते अगर विरोधी फर्निचर ठेवावे, म्हणजे खोलीचा रुबाब वाढेल.

"गेल्या ८-१० वर्षात परस्परविरोधी रंगांचा वापर करून खोलीची सजावट करण्याबद्दलचे आकर्षण विशेष वाढले आहे. त्यादृष्टीने जांभळा आणि पिवळा, हिरवा आणि तांबडा किंवा निळा आणि नारिंगी हे रंग परस्परविरोधी असले तरी परस्परपूरकही असतात, ही गोष्ट लक्षात घेऊन रचना केली, तर उत्तम दिसेल. मात्र या वरील जोडीतील एक रंग प्रमुख ठेवून दुसरा दुय्यम ठेवावा. अर्थात हे रंग-संगतीचे कौशल्य या क्षेत्रातील व्यक्तींखेरीज इतरांना समजणार नाही. सामान्यांनी त्याचा वापर केला, तर त्याला त्यातील तोल न कळल्यामुळे काही भलताच परि-णाम दिसू लागतो. म्हणून अभ्यास, निश्चित दृष्टिकोन पाहिजे, असे मी जे म्हणतो, ते एवढ्याचसाठी !"

रंगकामानंतर गृहसजावटीत महत्त्व आहे ते आतील फर्निचरला ! अर्थात फर्नि-चर-सोफा वगैरे-विकत घेणे प्रत्येकालाच परवडणार नाही, हे अगदी उघड आहे. याबाबत श्री महाजनांनी केलेल्या सूचना अगदी सहज अमलात आणता येण्या-जोग्या आहेत. ते म्हणतात, "प्रत्येकाच्या घरात गाद्या ठेवण्यासाठी एखादा तरी पलंग असतोच. त्याचा दिवाण म्हणून उपयोग केल्यास फारच चांगले दिसते. या लोखंडी कॉटच्या डोक्याच्या बाजूला स्टँड असतो, तो कापून टाकून कॉट संपूर्ण सपाट करावी. या कॉटवर प्रथम पडद्याच्या कापडाची अगर पातळाची झालर तयार करून ती प्रथम घालावी. ही झालर चारी बाजूस घातल्यास उत्तमच, न पेक्षा तीन बाजूस मात्र हवीच ! नंतर त्यावर गाद्या टाकाव्यात. त्या दोन गाद्यांच्यामध्ये चादरी, मच्छरदाण्या वगैरे टाकून गादीवर एक चांगल्यापैकी बेडकव्हर टाकावे. या दिवाणकरता जी झालर लावायची त्यासाठी पातळांचे काठ वापरावेत. ते छान दिसतात. मात्र झालरीचे कापड आणि काठ यांचे रंग एकमेकांशी मिळणारे असावेत.

"या कॉटखाली घरातील भरपूर सामानही बंद करून ठेवता येते. त्यामुळे घरात सामानांची गर्दीही दिसत नाही. जर घरात कॉट नसेल, तर मोठमोठ्या ट्रंकांचा उपयोग करूनही दिवाण करता येईल."



ट्रंकांचा उपयोग करूनही 'दिवाण' करता येईल

## जुन्या फर्निचरचा कायापालट

" कित्येकांच्या घरातून जुने अवजड कोच असतात. त्याची अडचण तर होतेच, पण ते विकू म्हटले तरी त्याला अगदीच थोडी किंमत येते. म्हणूनच जर त्यात काही सुधारणा केल्या, तर नव्या पद्धतीचे आटोपशीर कोच बनविता येतील आणि त्यासाठी खर्चही अगदी थोडा येईल. फक्त जुन्या गोष्टींतून नव्या गोष्टी तयार करण्याची तयारी मात्र पाहिजे," असे विचार सौ. गायतोंडे यांनी मांडले. आज मुंबईमध्ये त्यांनी स्वतःचा एक फर्निचरचा कारखाना काढला असून, घरांच्या सजावटीचा व्यवसायही त्या करीत आहेत. जुन्या अवजड गोष्टींमधून कोणाही मध्यमवर्गीयाला नव्या सुबक गोष्टी तयार करणे अगदी सहज शक्य होईल, असे सांगताना त्या पुढे म्हणाल्या, " घरातील जुनी लाकडी कपाटेही अशीच अवाढव्य तर असतातच, पण क्वचितप्रसंगी ती अगदी तकलुबीही असतात. मोडून टाकू म्हटले तरीही धीर होत नाही. शिवाय काही भावनाही त्यामध्ये साठविलेल्या असतात. अशा कपाटांमधून काही नव्या घर्तीची आटोपशीर आणि सुखसोईंनी युक्त अशा शोकेस, छोटी छोटी कपाटे तयार करता येतात; पण ही गोष्ट प्रत्येक घरमालकाला सुचेलच असे नाही आणि याचसाठी तर आमच्यासारख्यांनी हा व्यवसाय सुरू केलेला असतो. कमीत कमी खर्चात अनेक सोयी करून जुन्याला नवे रूप देणे, हेच तर आम्हा कलाकारांचे खरेखुरे कौशल्य असते."

घरातील फर्निचरनंतर लक्ष जाते, ते खिडक्यांच्या पडद्यांकडे. त्याबाबत कोणालाही अगदी सहज अवलंबता येईल, अशी एक युक्ती सांगताना सौ. गायतोंडे पुढे म्हणाल्या, " घरातील दारांखिडक्यांना चांगल्या कापडाचे पडदे बसविणे ही गोष्ट

चांगलीच खर्चाची असते. यासाठी जुने पडदे विटले असतील, तर तेच पुन्हा नव्यान रंगवून आणावेत. साहजिकच ते नव्यासारखे वाटतील आणि मुख्य म्हणजे अधिक काळ टिकू शकतील." सौ. गायतोंडे यांची ही सूचना कोणालाही अगदी सहज सुचण्यासारखी असून, त्या वरेचजण अमलातही आणीत असतील, पण याबाबत श्री. महाजनांनी केलेली सूचना मात्र नवीन आणि उपयुक्त वाटते.

## झालर आणि पेलमेट

ते म्हणतात, "पडद्याचे कापड जसे महाग मिळते, तसेच ते स्वस्तही मिळू शकते. साध्या साध्या प्रिंटेड चीटवरतीही कितीतरी आकर्षक डिझाईन्स मिळू शकतात आणि ही चीटस् फारशी महागही नसतात. फक्त शोधक नजरेने पाहावे मात्र लागते.


"असे पडदे शिवल्यानंतर ते अधिक आकर्षक दिसावे, यासाठी त्याच्यावर झालर लावावी. ही झालर मुख्य पडद्यावर सुमारे २ ते ३ इंचांपर्यंत आली म्हणजे झाले. ही झालर एखाद्या पेलमेटवर लावली तर फारच सुरेख दिसते, पण अशी लाकडी पेलमेट करणे फारच खर्चाचे काम असते. त्याऐवजी एक अगदी साधी आणि सोपी युक्ती आहे. दारापासून सुमारे सहा इंच पुढे येणाऱ्या दोन किंवा तीन खुंटचा दारावर ठोकाव्यात आणि त्यावर ही झालर ताठ करून ड्रॉईंग पिनेनी बसवावी. हेतू हाच की ती धुण्यासाठी केव्हाही काढता येईल.

"खिडकीच्या बाजूलाही मुख्य पडद्याखेरीज दोन डेकोरेटिव्ह पडदे सोडावेत. यामुळे खिडकी अधिक मोठी भासते. हे पडदे साधारणपणे १८ इंच रुंद असावेत. त्याला १।२ घडचा पडल्या म्हणजे झाल्या. या पडद्याने खिडकी संपूर्ण झाकावी,


**वाढदिवस, संमेलने अशा समयी**
**भेट व बक्षीस देण्यायोग्य आमची प्रकाशनें**

| | किमत |
|---|---|
| उत्कलप्रसंग : श्री. श्री. र. जोशी | १·५० |
| मला वाटते : श्री. दत्ता टोळ | १·४० |
| मुलांचे रवींद्रनाथ : श्री. श्री. र. जोशी | १·५० |
| बोलके कुत्रे आणि इतर गोष्टी : श्री. प्रभाकर बेंद्रे | ०·७५ |
| छोटयांची मोठी साहसे : सौ. कुमुदिनी रांगणेकर | १·०० |
| राजपूत असे लढले : भाग १–२ : श्री. गो. वि. चिपळूणकर (प्रत्येकी) | ०·८० |

**अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २**
**दादर बुक डेपो, रानडे रोड, मुंबई २८**




कमी खर्चातील 'पेलमेट'

असा हेतूच नाही, पण मूळच्या पडद्याचे सौंदर्य त्यामुळे अधिकच वाढते. हे बाजूस सोडलेले पडदे खिडक्यांच्या पडद्यांच्या मिळत्याजुळत्या रंगांचे असावेत (Matching) अगर अगदी विरोधी असावेत. हे पडदे काही खिडकीच्या मूळच्या पडद्याप्रमाणे उत्तम कापडाचेच हवेत असेही नाही. जुन्या पातळाचे केले तरीही आकर्षक दिसतात. मात्र पातळाचे काठ काढून टाकूनच ते वापरात आणावे. हे पडदे शिवण्यासही अगदी सोपे असतात. शिवाय वरच्या बाजूला त्याला दोन शिवणी घातल्या म्हणजे एक लहानशी झालर तयार होते. खिडक्यांप्रमाणेच दारांच्या पडद्यांचीही रचना तशीच करावी."

## कॅलेंडर्सची गर्दी कशाला ?

पडद्यानंतर गृहसजावटीतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे भिंतींवरील तसबिरी आणि कॅलेंडरे ! कित्येकांच्या घरातून चित्रांच्या कॅलेंडर्सची एकच गर्दी उडालेली दिसते. जिथे जागा सापडेल, तिथे कॅलेंडरे लटकावलेली आढळतात. पण वर चित्र आणि खाली तारखा असलेल्या कॅलेंडर्समध्ये काय सौंदर्य साधतात कोण जाणे ? कॅलेंडर लावायचेच तर केवळ मोठ्या तारखांचे एका खोलीत एकच लावावे. खोलीत चित्रे लावायचीच असली, तर फ्रेम्स करून लावावीत. पण कित्येकांना फ्रेम्स करणेही परवडत नाही. त्यांच्यासाठी श्री. महाजनांनी सुचविलेली एक साधी सोपी युक्ती !



घरगुती स्वस्त 'फ्रेम्स्'

" आपल्याला आवडणारे चित्र निवडून त्यापेक्षा थोडा मोठा असा एक कार्डबोर्ड घ्यावा व त्यावर प्रथम ड्रॉइंगपेपर अगर साधा पांढरा स्वच्छ कागद चिकटवावा अगर पिन-मशीनने लावावा. मग त्यावर आपल्याला हवे ते चित्र मध्यभागी चिकटवा. चित्राभोवती चारी बाजूला सारख्या प्रमाणात मोकळी जागा ठेवण्यास विसरू नये. त्यामुळे ही फ्रेम मोठी तर दिसेलच, पण चित्रही उठून दिसेल. या फ्रेमला अधिक उठाव येण्याचे दृष्टीने पांढऱ्या कागदाच्या कडेने काळा कागद चिकटवून द्यावा. भिंतीवर या अशा फ्रेम्स् लावल्या, तर फारच चांगल्या दिसतात. या फ्रेम्स् करण्यास जशा सोप्या, तशाच अगदी स्वस्तही पडतात. शिवाय वर्ष-सहा महिन्यांनी मधले चित्रही बदलता येते."

अशा या चित्राचा एक दुसरा प्रकार सांगताना ते पुढे म्हणतात, " जुनी कॅलेंडर्स, सीन्स यांमधून एकमेकात चांगल्या तऱ्हेने मिसळू शकतील, असे देखावे काळजीपूर्वक निवडून घ्यावे. बहुधा पर्वत, समुद्र, जंगल असे देखावे एकमेकात चांगल्या तऱ्हेने मिळण्याची शक्यता अधिक असते. यामधून लांबलचक सीन्स तयार होऊ शकतात. अशी एकात एक मिसळून जाणारी चित्रे मिळाली, की आकाश अगर क्षितिजाची रेषा एक धरून तो एकमेकास लांब चिकटवावीत. मधल्या भागावर चित्रातील वेडेवाकडे रंगीत तुकडे चिकटवून त्याला एकसंधपणा आणता येतो. साधारण एक-दीड फूट रुंदीचे आणि ४ ते ५ फूट लांबीचे चित्र मोठ्या लांब भिंतीवर चांगलाच effect आणते. या चित्रालाही वरीलप्रमाणेच फ्रेम तयार करावी.

" भिंतीवर लावलेले एखादे कपाट असेल, तर त्याखाली अशा चित्राची फ्रेमपट्टी करून लावली, तर आकर्षक तर दिसतेच, पण दुसराही एक फायदा साधता येतो. या कपाटाखाली एक टेबल ठेवावे व कपाटाचे खालचे बाजूस इलेक्ट्रिक बल्ब

लावावा. यामुळे टेबलावर भरपूर लाईट तर पडतोच, पण डोळ्यालाही त्रास होत नाही."

इलेक्ट्रिकच्या दिव्याचे स्टँडही घरी चांगले आणि अगदी स्वस्तात करता येतील. एखादा गोल बांबूचा ९ अगर १२ इंचांचा तुकडा गोल लाकडाच्या फळीत अगर तुकड्यात बसवावा. नंतर लाकडाच्या वखारीतून ६ इंच रुंदीचा तुकडा सालीसकट कापून आणावा. त्याचाच वरच्या बाजूस होल्डर म्हणून उपयोग करावा. याच्यावर १–१॥ रुपयांना मिळणारी प्लॅस्टिकची शेड लावावी. यायोगे हा स्टँड फारच कलात्मक दिसतो.

खोलीत २।३ तरी शोभेच्या झाडांच्या कुंड्या असाव्यात. यामध्येही सावलीत वाढणारी झाडे, रंगीत पानाचे आळू वगैरे लावावा. या कुंड्यांना काचेचा रंग देता येतो. कुंडीखाली प्लॅस्टिकची बशी ठेवावी, म्हणजे त्यात पाणी साठू शकते. रिकाम्या बाटल्यांतून मनि-क्रीपरही लावायला हरकत नाही. त्यामुळेही आल्हाद वाटतो.

एकंदरीत या एवढ्या गोष्टी केल्या तरी खोली सुबक, नीटनेटकी दिसायला काहीच हरकत नाही. शिवाय या सर्व गोष्टी अगदी फावल्या वेळातही होण्यासारख्या आहेत.

मात्र घरात एका व्यक्तीने आपल्या कल्पनेप्रमाणे, हौशीप्रमाणे केलेली ती सजावट, सुबकता यात इतरांना भर घालून ती वाढविता आली नाही, त्यात वाढ करणाऱ्या कल्पना कुणाला सुचल्या नाहीत, तरी ठेवलेल्या वस्तू जशाच्या तशा ठेवण्यात त्यांनी मदत मात्र केली पाहिजे. एरवी कितीही कलात्मकतेने घर सजविले, त्यात कितीही पैसा ओतला, तरी अगदी व्यर्थ आहे.




## अभ्यासक्रमही आहेत

सर्वसाधारणपणे घर सजवितांना कोणकोणत्या गोष्टी विचारात घ्याव्यात, त्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, याविषयीच्या वेगवेगळ्या उपयुक्त वाटणाऱ्या सूचना इथे मांडल्या असल्या, तरी यासाठी पद्धतशीरपणे जे शिक्षण दिले जाते, त्याचाही फायदा घेतला असता गृहसजावटीच्या दृष्टीने पुष्कळच मोलाची भर पडेल.

यासाठी केवळ स्त्रियांसाठी चालविण्यात येणारी 'गुलिस्तान' नावाची एक शाळा मुंबईत असून, श्री. मेहरू सुखिया या विशिष्ट विषयाचे शिक्षण देत असतात. सर्व शिक्षण लेक्चर्स आणि विविध मासिके, पुस्तके यांमधून यासंबंधी जी काही माहिती छापली जाते, त्यावर चर्चा करून सुमारे १९ ते २० तासांच्या अवधीत देण्यात येते. यासाठी सुमारे तीन महिने लागतात.


मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्येही याचे शिक्षण दिले जात असून, हा अभ्यासक्रम सुमारे एक वर्षाचा आहे.


याखेरीज सजावट करून देण्याचा व्यवसाय करणारे मुंबईचे श्री. प्रभू राम ओतुरकर यांनीही अशाच तऱ्हेचे वर्ग वांद्रा, दादर आणि डोंबिवली येथे काढले असून, त्यांतील सर्व अभ्यासक्रम जे. जे. स्कूलच्या धर्तीवर चालतो.

अशा तऱ्हेने या अशाच विविध शिक्षण-संस्थांतून सजावटीचे शिक्षण घेतल्याने सजावटीबाबतची निश्चित दृष्टी प्राप्त होऊन आपले स्वतःचे घर सजविणे तर प्रत्येकाला शक्य होईलच, पण स्त्री अगर पुरुष, कुणालाही या व्यवसायात प्रवेश करता येईल. सौ. गायतोंडे यांच्या उदाहरणावरून स्त्रिया या व्यवसायात केवढे काम करू शकतात, हे कळून येते. त्या आज या व्यवसायात काम तर करीत आहेतच, पण त्यांनी स्वतःचा फर्निचरचा कारखानाही काढला आहे, ही गोष्ट विशेष कौतुकास्पद आहे. स्त्रियांनी या क्षेत्रात प्रवेश करण्याबाबतचा त्यांचा अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, "स्त्रियांनी हा व्यवसाय पत्करणे केव्हाही श्रेयस्करच असते. कारण घरामध्ये स्त्रीचाच वावर अधिक असल्याने पुरुषापेक्षाही घरात नेमक्या कोणत्या गोष्टींची जरूर आहे, यांची माहिती तिला अधिक असते. त्यामुळेच पुरुषापेक्षाही तिच्या कामांत अधिक बारकावा येण्याची शक्यता असते."

एकंदरीत कल्पकबुद्धी आणि सौंदर्यदृष्टी यायोगे कोणीही व्यक्ती या क्षेत्रात व्यावसायिक म्हणून प्रवेश तर करू शकेलच, पण स्वतःचे घरही आकर्षक, व्यवस्थित आणि सुखसोईंनी युक्त ठेवू शकेल. फक्त मनात येणाऱ्या अगर आढळात येणाऱ्या वेगवेगळ्या कल्पना रसिकदृष्टीने टिपून घेण्याची वृत्ती मात्र पाहिजे; म्हणजे गृहसजावट ही कोणालाही अगदी सहज अमलात आणता येईल.

• • •







हें नवें प्लेटो २२२ पेन नुसतं हातांत धरून तर पहा—कसं चपलख धरतां येतं, नाहीं? याची फ्लश कॅप हलकेंच थोडी वरच्या बाजूला सरकवा—किती झटकन् सरकते नाही! लिहायलाही लागलात? उत्तम! लिहिताना आनंद होतो आहे तो तुमच्या मुद्रेवर दिसतोच आहे.
या पेनचं सोनरी टोपण पाहिलंत कीं नाहीं? ते तसंच रहावं म्हणून अनॉडाईझ्ड् करण्यांत आलं आहे. शिवाय चित्ताकर्षक रंग:...शाई भरण्याच्या अनेक तऱ्हा! किंमत? अवघी ५/५० रुपये.

**plato 222** प्लेटो २२२
म्हात्रे उत्पादन

एकमेव विक्रेते: दि बेस्ट फाउंटन पेन डेपो, ७९ देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.

PLATO



आपणांस
आणि जवानांस
ही दिवाळी आणि
नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो
साठे बिस्किट अँण्ड चॉकोलेट कं. लि., पुणें
heros'SBC-252 MAR

# शिलंगणाचं सोनं



ब.मो. पुरंदरे



दाही दिशा अंधारलेल्या होत्या. मराठी मुलुखाचं स्वराज्य अल्लाउद्दीन खलजीने तीनशे वर्षांपूर्वीच बुडवलं होतं. तीनशे वर्षं सुलतानच राज्य करीत होते. तेव्हापासून महाराष्ट्राच्या दाही दिशा अंधारलेल्या होत्या. कोंबडा आरवत नव्हता. कुणीही जागं होत नव्हतं.

धुरळा उधळीत सुलतानांची घोडदळं दौडत होती. महाराष्ट्राची अंतःकरणं आणि अब्रू त्यांच्या टापांखाली चेंदाळत होती.

तरीही मराठी मनं आणि मनगटं चिडत नव्हती. वर्ष-शतकं अशीच उलटत होती. सुलतानांची जरब आणि अम्मल.कायम होता. दाही दिशा अंधारलेल्याच होत्या. कोंबडा अजूनही आरवत नव्हता. तीनशे वर्षांच्या सवयीने आता अपमानांचं विशेषसं दुःख वाटेनासं झालं होतं. पूर्वी आपलं स्वतःचं स्वतंत्र राज्य होतं आणि आपण त्याचे राजे होतो, सैनिक होतो, प्रजाजन होतो, ही आठवणही

बुजली होती. आता सुलतान बनले होते ईश्वरावतार, परवर दिगार मायबाप आणि मराठे बनले होते त्याचे साहेबजादे, फर्जंद ! त्यांतच त्यांना अभिमान वाटत होता. निरनिराळे सुलतान आपसांत सत्तेसाठी झुंजत होते. मराठे बनले होते सुलतानांच्या पायाचे नेकजात चाकर. गुलाम म्हणून वागविणाऱ्या, राबविणाऱ्या सुलतानांसाठी मराठी माणसं अभिमानाने मरत होती, पण स्वजनांसाठी, स्वतःसाठी, स्वत्वासाठी मरायला कुणीच तयार नव्हतं. कुणाच्या मनात तो विचारही येत नव्हता.

मावळपट्टी म्हणजे महाराष्ट्राचं काळीज. सह्याद्रीच्या कणखर बरगड्यांच्या कोंदणांत वसलेलं काळीज, पण बलाढ्य सह्याद्रीच्या गाभाऱ्यांतही अभिमान नांदत होता गुलामगिरीचा. सुलतानांची गुलामगिरी आणि स्वजनांशी वैर हा मावळातील मराठ्यांचा स्वभाव बनला होता. मराठ्यांच्याच हातून मराठ्यांचे खून पडत होते. मराठ्यांच्याच हातून मराठ्यांची घरेदारे पेटविली जात होती. आपण कुणाशी आणि का दुष्मनी करीत आहोत आणि त्यांत नाश कुणाचा अन् फायदा कुणाचा, याचा विचारही कुणाला स्पर्श करीत नव्हता. अविचारांची ही रात्र होती. सह्याद्रीचे स्वामी सुलतानांचे लाचार, दास बनले होते.

अशा अंधारात कुठं तरी कोंबडा आरवला. एक आई जागी झाली. तिने डोळे उघडले. आपण कोण आहोत, कुठं आहोत याची तिला पुरेपूर कल्पना आली. सुलतानांना, स्वजनांना आणि सह्याद्रीला तिने अचूक ओळखलं. वेळ अंधाराचीच होती, पण पहाटेपूर्वीच्या अंधाराची होती. ती शिवनेरीवर भूपाळी गात होती. तिचा बाळ पाळण्यात मुठी वळीत होता.

डोंगरकडे, दऱ्याकपाऱ्या, गुहा, घळी, खिंडी आणि किर्रर्र झाडी यांनी वेढलेल्या मावळपट्टीच्या वारुळांतील पहाटेपूर्वीची ही कथा. . . .

. . . .

. . . .

# शिंगणाचं सोनं



नायकिणीच्या माळावरचा शेलाटा पिंपळ सळसळत होता अन् त्या सळसळाटात आवाज मिसळत होता नारंदीच्या खळखळाटाचा. नदीच्या पैलतीरावरचं येसगाव गाड झोपलं होतं. उगीच एखादं कुत्रं मधूनअधून भुंकारत होतं. ऐन मध्यरात्रीचा अम्मल होता. त्यातून पौषाची अवस. साऱ्या मावळपट्ट्यावर काळीकुट्ट काजळी चढली होती. काही म्हणता काही दिसत नव्हतं. अवतीभवतीचे सारे डोंगर अंधार पांघरून सुस्तावले होते. झाडंझुडपं वाऱ्याशी कुजबुजत होती. रातकिड्यांनी सूर धरला होता—चिर्रर्रर्रर्र !

नायकिणीच्या माळावर तेवढा एकुलता एक पिंपळ उभा होता. झाड लहानसान नव्हतं. सत्तरीच्या वर उमर गेली असावी त्याची. त्याचा शेंडा काही नाही तरी पाऊणशे हात वर गेला होता. खांद्याफांद्यांचा पसारा आडवातिडवा पसरला होता. पसारा मोठा; पण फांद्यांवर डहाळ्या नि पानं फारच विरळ विरळ. काळ्याकुट्ट अंधारात निळ्या आभाळापुढं उभ्या असलेल्या त्या पिंपळाचा सांगाडा उठून दिसत होता. त्याच्या शेंड्यावर मात्र काळा गर्दावा दिसत होता. जणू तिथं पखालीएवढं आग्या मोहोळच लागलेलं असावं, असं भासत होतं.

नायकिणीच्या माळाजवळून नारंदी वाहत होती. माळावर चार बोटं

उंचीचं गवतही अंग धरीत नव्हतं. सारी भुई मुरमाड होती, पण तेवढा सात बिघ्यांचा माळ सोडला तर सर्व बाजूला गर्द झाडी होती. नायकिणीचा माळ उभ्या बारा मावळांत सर्वांना माहीत होता. येसगावच्या भैरोबाच्या जत्रेत दूर-दूरच्या नायकिणी हजेरी द्यायला यायच्या. पैंजणांच्या झणझणाटात नायकिणीचा माळ धुंद होऊन जायचा.

अन् कधी कधी रक्ताने भिजून जायचा ! छिव !

अवसेची चिडीचिप्प शांतता दाटली होती. फक्त सळसळत होता पिंपळ आणि खळखळत होती नारंदी. क्षणामागून क्षण जात होते.

अन् माळालगतच्या झाडीतून एकदम वटवाघळांचा चिलचिलाट उठला. वाघळं फडफडाट करीत साऱ्या आभाळभर सैराट सुटली. माळालगतची झुडपं खसवसली. गवत चुरचुरू वाजू लागलं. पावलांची चाहूल उमटू लागली आणि दीड–दोनशे अस्वलासारख्या काळ्या आकृती दबकत दबकत झुडपांतून बाहेर पडल्या. माळावरच्या पिंपळाच्या रोखाने त्या आकृती सरकू लागल्या आणि पिंपळाच्या शेंड्याला बिलगलेली, आग्या मोहोळासारखी दिसणारी काळी सावली शेंड्यावरून खाली येऊ लागली. ती सावली पिंपळाच्या बुंध्याशी येऊन पोहोचली. साऱ्या इतर आकृती पिंपळाच्या बुंध्याशी गोळा होऊ लागल्या. शब्द उमटत नव्हता. गारगोटया एकमेकांवर झाडल्याचा आवाज उमटू लागला. चकमकीतून ठिणग्या उडू लागल्या अन् क्षणभरातच एकदम मशालीसारखा जाळ उठला. गर्द काळोखात तो तांबडा-पिवळा जाळ उठून दिसत होता. त्याच्या उजेडात मानवी आकृती दिसू लागल्या. भेसूर चेहरे आणि खुनशी डोळे स्पष्ट स्पष्ट दिसू लागले. दुसरी मशाल पेटली. तिसरी मशाल पेटली. चौथी......पाचवी......सहावी......अनेक मशालींचे जाळ वाऱ्यावर फुरफुरू लागले. एकाच्या म्यानातून सपकन् तलवार बाहेर पडली. क्षणात त्या झगमगत्या उजेडात दीड–दोनशे तलवारी लखाकल्या आणि त्या मशाली अन् मशालींच्या बरोबर ती सारी टोळी नारंदीच्या पात्राकडे धावत सुटली. ताड ताड उड्या पडत होत्या. सावल्या धावत होत्या. नारंदीच्या पात्रात पाणी अगदीच हातभर होतं. धावत्या प्रवाहात मशालींची ललाळती प्रतिबिंबं नाचू लागली. जणू नारंदीला आग लागली. उधळलेली जनावरं सुटावीत तशी ती टोळी पाण्यातून ताड् ताड् धावत सुटली. पाण्याचे फवारे उडू लागले. नदीपलीकडल्या येसगावात एकदम कुत्री भुंकू लागली. टोळी येसगावात घुसली. गोठ्यांतली जनावरं भेदरून दावी तोडून पळू लागली. घराची दारं–कवाडं थडा थडा वाजू लागली. आरोळ्या, किंकाळ्यांनी येसगाव कोंदलं. कौलाच्या घरांवर, कडब्याच्या गंजींवर आणि गोवऱ्यांच्या राशींवर मशाली भिरकावल्या जाऊ लागल्या. तलवारींच्या फटकाऱ्याखाली माणसं

मरू लागली. जीव वाचवण्यासाठी सैरावैरा धावत सुटलेली बायकापोरंही घावाखाली गवसू लागली. क्षणापूर्वी गाढ झोपलेल्या येसगावाची होळी पेटली......

......आणि समशेरगडावरील खलबतखान्याच्या चोरझरोक्यात हुक्क्यातील निखारे झकास फुलले. खलबतखान्यात साधे शमादानही तेवत नव्हते. पूर्ण अंधार होता. मेहरबदार झरोक्यातून गडाबाहेरच्या मुलखावर नजर जात होती. त्या अवसेच्या रात्री काळोखात मावळातलं ते जांभूळखोरं बुडून गेलं होतं. वर निळं अस्मान, क्षितिजावरती काळी डोंगरकिनार आणि खाली मावळातलं ते अंधारात काजळलेलं जांभूळखोरं. खलबतखान्याच्या झरोक्याशी हुक्क्याची नळी घेतलेला एक हात हालचाल करीत होता. त्या हाताच्या बोटातील हिऱ्याची अंगठी हुक्क्याच्या अंगारामुळे चमकत होती. दुसरा हात झरोक्याच्या कठड्यावर अधीरतेने बोटं नाचवीत होता. दोन करडे डोळे झरोक्यातून जांभूळखोऱ्यावर उत्सुकतेने फिरत होते. लोडाशी ती विप्पाड पाठ टेकली होती. समशेरगडावरच्या खलबतखान्यात ती एकच व्यक्ती झरोक्याशी हुक्का ओढीत जांभूळखोऱ्यावर नजर लावून बसली होती. नाही नाही! ह्या व्यक्तीच्या माठीमागे आणखीही एक व्यक्ती उभी होती. लोडाशी बसलेल्या व्यक्तीने हुक्क्याचा झुरका घेताना निखारा फुलला, की ती मागे उभी असलेली व्यक्तीही अंधुकशी दिसे. तासामागून तास चालले होते. त्या दोन्ही व्यक्ती खलबतखान्याच्या झरोक्यातून जांभूळखोऱ्यावर नजर लावून बसल्या होत्या. त्यांची अधीरता शिगेला पोहोचली होती. मध्यरात्रीचा ऐन अम्मल सुरू झाला. एक एक क्षण त्यांना प्रहरासारखा वाटू लागल्यासारखा दिसत होता अन् तेवढ्यात मागे उभ्या असलेल्या व्यक्तीने एकदम झरोक्यातून नायकिणीच्या माळाकडे बोट रोखीत अगदी हळू आवाजात म्हटलं,

"सरकार, वह देखिए!"

नजर विस्फारीत ती बसलेली व्यक्ती झरोक्यावर झुकली. नायकिणीच्या माळावर मशालीचा एकच ठिपका काजव्यासारखा लकलकताना दिसला अन् लगेच एकापाठोपाठ अनेक मशाली पेटलेल्या दिसल्या. झरोक्यातले डोळे अधिक उत्सुकतेने रोखले गेले. माळावर पेटलेल्या मशाली धावताना दिसू लागल्या अन् थोड्याच वेळात होळीसारख्या ज्वाळा भडकलेल्या दिसू लागल्या.

खलबतखान्यात एकदम हास्याची मग्रूर लकेर उठली. लगत लगत लाचार लकेर उठली. हुक्क्याचा झुरका मारताच निखारा झकास फुलला आणि ते दोन्ही खूष झालेले चेहरे एकमेकांना दिसले.

लोडाशी हुक्का ओढीत बसलेला चेहरा होता तकतकीत काळा. दाढी असलेला. निबरट ओठांचा. पन्नाशीच्या वयाचा. मागे उभा असलेला चेहरा



अविचाराची ही रात्र होती...

होता गव्हाळ. कल्लेदार मिशांचा. कानांत चौकडे आणि कपाळावर गंधाचा टिळा असलेला. लाचार हसू हसणारा...... ! ते लाचार हसू पुन्हा फुटलं अन् लाचार अदबीचे शब्द उमटले,

"सरकार, मी म्हटलं नव्हतं ? तस्संच झालं ! हैबतराव देशमुखाची माणसं बघा आता झुंजारराव सरदेशमुखाच्या मुलखाचा सत्यानाश करतील. त्यांच्यातलं हाडवैर कसं धुमसत ठेवायचं अन् केव्हा ते भडकवायचं, हे कसब ह्या सुलतानराव पाटलाला...... "

"अच्छे तरहसे मालूम है ! बसस्, सुलतानराव पटेल, हम निहायत खूश है ! "

बैठकीवरून हसत हसत उठत त्या व्यक्तीने सुलतानराव पाटलाची पाठ थोपटली. पाटील लगेच मुजऱ्यासाठी झुकला. त्या व्यक्तीने पाटलाचा झुकलेला हात तसाच घट्ट धरला आणि आपल्या बोटातील हिऱ्याची टप्पोरी अंगठी काढून पाटलाच्या बोटात चढविली. उगीचच हसत पाटील पुटपुटला,

"कशाला, कशाला सरकार एवढं ! "

"मेरी याद रहनी चाहिये ! "

" असं कसं सरकार ? मी विसरेन होय हे पाय कधी ? "

" फिरभी ! यह अंगठीपर नगीनेके नीचे मेरा नाम लिखा है -- ' सीद्दी सलाबत रेहान ' ! "

झरोक्यातून सिद्दी सलाबत रेहान आणि सुलतानराव येसगावच्या होळीकडे बघत होते. जरा थोडा वेळ गेला आणि येसगावाकडून उगवतीच्या दिशेला त्या मशाली धावताना दिसू लागल्या. जणू काजव्याचा थवा धावत होता. बरेच अंतर मशाली धावताना दिसल्या. धावता धावता थबकलेल्या दिसल्या आणि अशाच आगी क्षणार्धात तिथंही भडकलेल्या दिसल्या ! दुसरंही गाव पेटलं ! खलबतखान्यात पुन्हा हास्याच्या लकेरी उठल्या. सुलतानराव सिद्दी सलाबतला म्हणाला,

" सरकार, झुंजारराव सरदेशमुखाच्या मुलखाचं आता तळपटच बघा ! हैबतराव ऐकत नाही ! "

सलाबत फक्त हसला.

हैबतराव देशमुखांच्या टोळधाडीखाली झुंजाराव सरदेशमुखांचा मुलूख खरोखरच हुरडयासारखा भाजून निघू लागला. गावंच्या गावं पेटली. उभ्या पिकांची नासाडी उडू लागली. दारांना बाहेरून कडया घालून घरं पेटवून देण्यात आली होती. माणसं आणि गुरंढोरंसुद्धा होरपळून मरत होती. घरा-वरून उडया टाकून कितीतरी माणसांनी जीव वाचवला होता, पण गुरंवासरं मात्र बांधल्या दाव्यानिशी होरपळून मेली होती. मरत होती.

सिद्दी सलाबत झरोक्यातून आगीचं तांडव बघत होता. पानविडयाचं तबक त्याच्यापुढं करीत सुलतानराव म्हणत होता,

" आता झुंजारराव खंडोबाच्या जत्रेहून परत येईल, तेव्हा दिसंल त्याला खंडोबा प्रसन्न झालेला ! "

सलाबतने हसत हसत तबकातला विडा उचलला. तोंडात घातला. वर तंबाखूची चिमूट त्याने तोंडात टाकली. पिचकारी थुंकण्यासाठी तो झरोक्याशी झुकला. तेवढयात सुलतानरावाने चटकन् पिकदाणी पुढं केली.

* * *

जेजुरीचा डोंगर हळदीने पिवळाधमक झाला होता. हातात दिवट्या आणि बुधल्या घेऊन माणसं डोंगर चढता चढता मोठ्याने गर्जत होती,

" जय येळकोट मल्हाऽऽर ! "

" मल्हारी मार्तंडाचा ऽऽ... "

" ये ऽऽऽ ळ को ऽऽ ट ! "

देवाचा गड चढणाऱ्या बायकांच्या पायांतली जोडवी टचा टचा वाजत होती. पोरं धावत होती. वाघ्यामुरळ्यांचे फड ठायी ठायी रंगले होते. डफ-तुणतुण्यांच्या तालावर आपल्या हातातील घाट वाजवीत मुरळ्या गात होत्या. नाचत होत्या. अंगावर चार डागडागिने घालून आणि हाती फुलांच्या माळा घेऊन काही मुरळ्या गडाच्या वाटेवर उभ्या होत्या. नाजूक हसत होत्या. साजूक बोलत होत्या. तरण्या गड्यांना भुरळ घालीत होत्या. हातातल्या फुलांच्या माळेने गडीमाणसांचे हात त्या वेढीत होत्या. खंडोबाच्या नावाने पैसा मागत होत्या. टकारुका हाती पडला, की गड्यांच्या गालाकानशिलावरून हात फिरवून त्या आलाबला घेत होत्या. फडात नाचणाऱ्या मुरळ्यांच्या भवती गर्दी होती. टिपेत आवाज चढवून त्या गात होत्या. चाबकासारख्या लवत होत्या. भिंगरीसारख्या नाचत होत्या. वाद्ये साथ देत होते. भंडारा उधळला जात होता. गडावरती देवाचा चौघडा झडत होता. खंडोबाची जेजुरी धुंद झाली होती. नऊ लाख पायरी रंगली होती.

गडावरती देवाचा गाभारा बेलभंडाऱ्याने झाकून गेला होता. घंटा वाजत होत्या.

बायकापोरांची गजबज देवळात कोंदली होती.

त्यातच झुंजारराव सरदेशमुखांची बायकामुलं होती. चंद्राक्का म्हाळसाईला मळवट भरीत होती. गोजाऊआत्या खंडोबाला नवस बोलत होती. गोजाऊ ही झुंजाररावांची बहीण. लहानपणीच विधवा झालेली. तेव्हापासून तिचा सारा जीव भावाच्या संसारात गुंतलेला होता. भावाच्या पोराबाळांवर ह्या आत्याचा भारी जीव. गोजाऊआत्याने आणि चंद्राक्काने आपल्या पोराबाळां-सकट खंडोबाच्या गाभाऱ्याचा जणू तावा घेतला होता. एकेका पोराला खंडो-बाच्या पायावर घालीत आत्याने छोट्या दीपेला पुढ्यात घेतलं. दीपा होती अवघी सहा वर्षांची. ही पोर सर्वांत आत्याची लाडकी. चंद्राक्काने दीपाला जन्म दिला होता, पण तिचं सारं आईपण गोजाऊआत्यानेच केलं होतं. परकऱ्या दीपेला खंडोबापुढं डोकं टेकायला लावीत आत्या चंद्राक्काला म्हणाली,

" अग वैने ! "

" जी वैन्सं ! "

" अग नवस बोलत्ये मी. ऐक ! "

"नवस ? कंचा व वैन्सं ? "

"ऐक ! "

चंद्राक्काचा मळवटाचा हात थांबला. आत्या दीपेला देवाच्या पायावर घालीत नवस बोलू लागली,

"ऐका देवा खंडेराया, माझ्या दीपाऊला तालेवार नवरा मिळू दे. तुला सोन्याचं बेलपान वाहीन अन् भंडार उधळीत नवरा-नवरीला तुझ्या दर्शनाला आणीन ! "

हा नवस ऐकताच दीपा जी एकदम लाजली, ती उठून पळूनच जाऊ लागली. सगळे हसत होते. गुरव नवसाचा भंडारा तिच्या माळी लावण्यासाठी ओल्या हळदीत हात बुडवीत होता. आत्याने तेवढ्यात तिच्या परकराला धरून ओढीत म्हटलं,

"अग थांब पोरी ! नवसाचा भंडारा–"

"जा बाई ! मला लगीनच नाही करायचं ! "

"लगीन न्हाई करायचं ? "

"नाही ! "

"मग हो मुरळी अन् न्हाय हतंच ! "

हसण्याने गाभारा गदगदला. तेवढ्यात देवाच्या दारातून झुंजाररावांचा आवाज आला,

"अग एऽऽ बायांनू ! आता आवरा की ! का हतंच मुक्काम करताय ? आं ? ए गोजाक्का—"

अन् मग जरा लगबग सुरू झाली. झुंजाररावांनी देवाला निरोपाचं दंडवत घातलं. गेले पाच दिवस त्यांचा मुक्काम जेजुरीला पडला होता. आज आता घराकडे परतायचं होतं. त्यांनी देवाला निरोप मागितला–

"देवा, निरोप द्या ! अशीच सदोसदी भेट घडू द्या. पोरंबाळं, गाईवासरं सुखी ठेवा. येतो आता. जय येळकोट मल्हार ! "

झुंझाररावांनी उंबरठ्यावर मस्तक ठेवलं. तेवढ्यात त्यांच्या कानावर गलबला आणि हाक पडली,

"धनी, धनी ! "

गर्दीतून पुढे घुसत, घाबऱ्या आवाजात मानाजी ओरडत होता,

"धनी धनी, दगा झाला ! "

झुंजारराव हा कालवा ऐकून लगबगा उठले. मानाजी आणि आणखी चार गडी धावत-दौडत आले होते. मानाजी घामाने भिजला होता. झुंजाररावांनी अधीरतेने त्याला विचारलं,

"काय झालं रे माना ? "

" दगा झाला धनी ! हैबतराव हिम्मतबहाद्दरांनी मारा केला. चार गावं जाळली. आपलं स्वार सावंगीतून जाई जाईपावतर त्येंनी चार गावं जाळली."

" आं ? आरं काय सांगतूस काय ! "

" जी धनी. दोन विसा माणसं जखमी झाल्याती. बारा कापली गेली. येसगाव, धुंदी, पालखी आन् कवठं जळाली. आपल्या स्वारांनी धावणी केली, तवा त्ये पळाले. नारंदी वलांडून गेले, पर नायकिणीच्या माळावर गाठलंच. झटापट झाली. आपली दोघं पडली. त्येंची आठ पडली. मंग पळून गेली समदी कळशाला. हिम्मतबहाद्दरानं माती केली–"

झुंजाररावांचे डोळे विस्फारले गेले होते. हैबतरावांनी झुंजारराव सावंगीत नाहीत, असं पाहून हा दावा साधला होता. पाच पिढ्यांचं वैर हे असं संधी साधून उफाळून येत होतं. वैर कशासाठी ? मानापानासाठी ! घराण्याच्या मोठेपणासाठी ! झुंजाररावांच्या घराण्याला चाळीस गावांची देशमुखी होती. बादशाहीकडून त्यांच्या घराण्याला ' रुस्तुमराव ' असा किताबही मिळालेला होता. शिवाय सरदेशमुखीचाही हुद्दा मिळालेला होता. हैबतराव होते साधे देशमुख. त्यांना फक्त अठ्ठावीस गावांची देशमुखी होती. म्हणजे झुंजाररावांपेक्षा बारा गावं कमीच ! बादशाहाच्या दरबारात झुंजाररावांचा मान हैबतरावांपेक्षा मोठा होता. नुकत्याच झालेल्या एका लढाईत झुंजाररावांनी गाजवलेल्या बहादुरीवर खूष होऊन बादशाह इब्राहीम आदिलशहाने त्यांना डंकानिशाण दिले होते. केवढा हा मान ! बारा मावळांत झुंजाररावांचं वजन वाढलं होतं. हैबतरावांना हे सहन होत नव्हतं. बघवत नव्हतं. हैबतरावांच्या आजोबांकडे असलेली बारा गावं काढून घेऊन बादशाहाने झुंजाररावांच्या आजोबांना दिली होती. तेव्हापासूनच झुंजाररावांच्या घराण्याचं पारडं


शुभ चिंतन

नववर्षासह येवो भाग्य नवे, वैभव, धन ।
सकलांना हे आमुचे दीपावलि शुभचिंतन ।।

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि.,

चेंबूर – मुंबई ७१

हैबतरावांच्या घराण्यापेक्षा मानापानानं जड होऊन बसलं होतं. एकाच मावळात राहणाऱ्या ह्या अस्सल मराठ्यांत पिढ्यान्पिढ्या वैर चालत आलेलं होतं. त्यांत ह्या मानापानाच्या चढउतारानं भरच पडत होती. वैर इतकं की मागच्या पिढीत एकानं दुसऱ्याचं लग्नाचं वऱ्हाड चरोलखिंडीत गाठून कापून काढलं होतं ! ह्याचा सूड म्हणून दुसऱ्यानं पहिल्याच्या घरावर धाड घालून गवसली तेवढी माणसं बायकापोरांसकट छाटून टाकली होती ! हे असं गेली दीडशे वर्षं चाललं होतं. उभा दावा ! पण विजापूरच्या आदिलशाह बादशाहांशी मात्र ही दोन्ही घराणी निष्ठावंत होती. बादशाहांनी हाक मारायच्या आत दोन्ही घरचे मर्द रुमालाने हात बांधून तख्तापुढं हाजीर होत होते. आपल्याच माणसांशी वैर आणि परक्या सुलतानांशी निष्ठा अशी वहिवाट पडली होती मावळ मुलखात. बादशाहांना तेच हवं होतं. सह्याद्रीच्या अकटविकट दऱ्याकपाऱ्यांत राहणाऱ्या ह्या वाघाच्या जातीचं सुलतानांना भय वाटत होतं. ही वाघाची जात जर एका दिलाची झाली आणि मावळच्या पहाडपट्टीत बंड करून उठली, तर बादशाही अम्मल उखडला जाईल, याची जाणीव धूर्त बादशहांना होती. याच मराठ्यांच्या जिवावर आपल्याला मराठी मुलखावर राज्य चालवायचं आहे, हे ते ओळखून होते. यासाठी एकच उपाय होता. मराठ्यांना या ना त्या कारणावरून आपसात झगडत ठेवायचं अन् दोघांनाही जरबेत ठेवून आपल्या नांगराला जुंपायचं ! मग प्रसंगी मानमरातब देऊन दोघांनाही चढवायचं अन् वेळ आली तर कोणाची धिंड काढून तोफेच्या तोंडी द्यायचं. कोणाचं पारडं हलकं करायचं अन् कोणाचं जड करायचं, याचा अचूक सल्ला देणारी सुलतानराव पाटलासारखी माणसं बादशहाच्या पदरी होतीच अन् हे सारं बिनचूक घडवून आणणारे सिद्दी सलाबत रेहानसारखे कुशल पाताळयंत्री अम्मलदारही बादशाहाला लाभलेले होते. मावळ्यातले वाघ एकमेकांवर तुटून पडत होते. समशेरगडावरून गडाचा किल्लेदार सुलतानराव आणि समशेरगडसुभ्याचा सुभेदार सिद्दी सलाबत मजा बघत होते.

हिम्मतबहाद्दराने रुस्तुमरावावर असा घाव घातला होता. एक हिम्मतबहाद्दर होता. दुसरा रुस्तुमराव होता. हे दोन्ही किताब बादशाहाने दिलेले होते. हैबतराव हिम्मतबहाद्दरांनी अशी कुऱ्हाड घातलेली समजताच झुंजाररावांचं मस्तक संतापाने तडकून गेले. त्यांचे डोळे लालावले. शिरा तरारल्या. त्यांनी मानाजीला एकच सवाल केला,

"त्यो हैबतराव सवता जातीनं व्हता ह्या धाडीत ?"

"जी धनी ! हिम्मतबहाद्दर जातीनं व्हतं !"

हे ऐकलं आणि झुंजाररावांचे ओठ थरथरू लागले. त्यांचे डोळे विलक्षणच विस्फारले गेले होते. त्यांनी एकदम समोर खंडोबाकडे पाहिलं. क्षणभर सुन्न



ही अवलाद सरदेशमुखाची हाये...

शांतता दाटली अन् झुंजारराव एकदम सुरुंग उडावा तसे गरजले,

"खंडेराया, ह्या वैऱ्याचं मुंडकं एक वर्साच्या आत जर तुझ्या उंबरठ्यावर आणून वाहिलं नाही तर म्या माझं सवताचं मुंडकं हतं वाहीन! ही अवलाद सरदेशमुखाची हाये –"

"आबाऽऽऽ!"

गोजाऊनं ही त्याची प्रतिज्ञा ऐकून एकदम टाहो फोडला. चंद्राक्का तर भोवळ येऊन भुईवर कोसळली. पोरं गोंधळून रडू लागली. गोजाऊ झुंजाररावांकडे धावली, पण त्यांनी तिला एकदम बाजूला लोटली. झुंजारराव आरडले,

"मानाऽ बायकापोरास्नी सावंगीला जपून घेऊन ये! जय मल्हार! जय येळकोट मल्हाऽऽर!"

झुंजाररावांनी देवळातल्या घंटेला इतक्या जोरात दणका दिला, की ती घंटा हिन्काळत घणघणत राहिली. झुंजारराव देवळातून ताड् ताड् पावलं टाकीत निघाले. गोंधळलेली दीपा आईला बिलगून रडू लागली. तिला ह्या प्रकाराचा काहीच अर्थ समजत नव्हता. काही तरी भयंकर वाईट घडलंय्, एवढंच तिला समजत होतं.

झुंजारराव जेजुरीचा डोंगर चित्त्यासारखा उतरून आले. पायथ्याशी त्यांच्या स्वारांची छावणी पडलेली होती. कबिल्याच्या बैलगाड्या सोडलेल्या होत्या. घोडी टापा आपटीत कडवा तोडीत होती. हैबतरावांनी घातलेल्या धिंगाण्याची खबर इथं छावणीत समजली होती. सारे मावळी स्वार धन्याची वाट बघत उभेच होते. झुंजाररावांचा तंबू उभा होता. ते झपाझपा आले. त्यांचं अंग देवाच्या भंडाऱ्याने पिवळं झालं होतं—त्यांनी लांबूनच हुकूम सोडला,

" घोडी तयार करा ! तंबू पाडा ! आवरा ! गाड्या जुपा ! जिवा, पिरा, हरबा – "

" जी ! जी ! जी ! "

" तुमी पन्नास गडी घेऊन मागं ऱ्हावा. मानाजी बायकोपोरास्नी घेऊन निघंल. त्येच्या संगती तुमी या. बाकीची समदी चला माझ्यासंगती ! "

घटकेत शे-पाऊणशे स्वारांची तुकडी जेजुरीच्या वेशीतून भरधाव दौडत सुटली. आघाडीला दौडत होते झुंजारराव.

★ ★ ★

समशेरगडावरचा अत्तरमहाल हंड्याझुंबरांनी झगमगत होता. महालातून कवालीचे मादक सूर येत होते. पायांतली घुंगरं रिमझिमत होती. सारंगीच्या सुरांची साथ उमटत होती. नाजूक गळ्यातून शब्द सांडत होते,

' दिल की दौलत हाय सहेली, लूट गयी ना ! "

महालाच्या कमानीवरचे जाळीदार पडदे झुळझुळत होते. महालाच्या मध्यभागी एक भरगच्च लाल गालिच्यावर गोरीपान पावलं नाचत होती. धूपदाणीतील सुगंधी धूर दरवळत होता. नक्षीदार हुक्क्यातील निखारा चमकत होता. हुक्क्याचा नेचा कलाबतूने विणलेला होता. मसनदीपुढे पानविड्यांचं तबक होतं. दुसऱ्या एका तबकात अत्तरदाणी, गुलाबदाणी व सुगंधी गजरे होते. मसनदीच्या उजव्या हाताला एका तबकात मीन्याच्या डौलदार दोन सुरया होत्या. पेला नव्हता ! पेला होता मसनदीवर बसलेल्या सिद्दी सलाबतच्या हातात. हुक्क्याची नळी त्याच्या डाव्या हातात होती. त्याची धुंद नजर समोर लागलेली होती. कवालीवर. डोळ्यांवर. त्या हसण्यावर. सुरई रिकामी होत चालली होती. महालात फक्त एकच रसिक बसला होता. सिद्दी सलाबत ! त्या नाचणाऱ्या पोरीच्या वादक—साथीदारांशिवाय तेथे कुणीही नव्हतं.

महालाच्या बाहेर खांद्यावर नागव्या तलवारी घेतलेल्या अरबांचा पहारा होता. कानांवर जेवढं पडेल तेवढ्यावर ते जवान तहान भागवीत होते.

रात्र चढत होती. गडाचे दरवाजे बंद होते. तटांवुरुजांवर हशम हातात भाले घेऊन पहारा करीत होते. ठिकठिकाणच्या चौक्यांवरचे हशम जागे राहण्याची कोशीस करीत होते. गप्पागोष्टी करीत होते. चिलमीचे झुरके मारीत होते. कुणाला पेंग आली, तर त्याला ढुशी देऊन जागे करीत होते. आज–काल असं सख्त हुश्शार राहणं त्यांना जरूर होतं. कारण गेले चार दिवस सुभेदार सिद्दी सलावत रेहानचा मुक्काम गडावर होता. अत्यंत कमी बोलणारा, पण केवळ आपल्या भयंकर क्रूर डोळ्यांच्या नजरेने अम्मल चालविणारा हा मोठा तिखट सुभेदार होता. एक नेकजात शूर आणि कर्तबगार करडा अम्मलदार म्हणून त्याचा बादशाहीत मोठा लौकिक होता. पूर्वी एकदा आपल्या सुभेदारीतील तोरणगडावर हा अगदी अचानक गेला. भर दुपारची वेळ होती. हा असा गुपचूप आलेला पाहून किल्लेदाराची तारांबळच उडाली. एकही अक्षर न बोलता हा झप झप झप गडाच्या झुंजार-माचीवर गेला. तिथला एक पहारेकरी हशम सुस्तावून तटाला टेकून सावली पाहून झोपला होता. याने त्याला झोपलेला पाहिलं ! याच्या डोळ्यांत आग उसळली. याने एकही अक्षर न बोलता बरोबरच्या हशमांना खूण केली, की ह्या झोपलेल्या पहारेकऱ्याला अस्साच उचला अन् द्या तटावरून कड्याखाली लोटून ! सलावतने खूण करताच चार–पाच हशमांनी झोपेत असलेल्या त्या गड्याला उचलले. तो खडबडून जागा झाला. ओरडू लागला. हशमांनी त्याला तटावरून लोटावयास सुरवात केली, पण तो लोटणारांनाच घट्ट पकडू लागला. पण त्याचे बळ अपुरे पडले. तो तटाखाली लोटला गेला ! पण पडता पडता त्याने एका हशमाच्या गळ्याला अशी घट्ट मिठी मारली, की तोही त्याच्याबरोबर खाली ओढला गेला ! गेला, गेला, गेला ! दोघंही खोल खोल दरीत कोसळले ! ठिकऱ्या झाल्या !

सिद्दी सलावतच्या चेहऱ्यावर दयेची छटासुद्धा उमटली नाही. एक निरपराध जीव कोसळला याची किंचितही खंत त्याला वाटली नाही.

तेव्हापासून त्याचा दरारा साऱ्या सुभ्याला बसला होता. जांभूळखोऱ्यावर नजर ठेवण्यासाठी समशेरगड बांधलेला होता. गड मोठा बाका. मावळातली भांडणं अगदी विझूही द्यायची नाहीत आणि अगदी भडकूही द्यायची नाहीत, अशी जबाबदारी समशेरगडच्या किल्लेदारांवर बादशाहाने टाकलेली असायची. सुलतानराव पाटील अगदी अचूक माणूस सिद्दी सलावतला गवसला होता. खवासखान वजिराच्या खाशा फौजेत साधा शिपाई होता तो आधी, पण तो गुणांनी चढत गेला ! गुण सगळे सुलतानी अमलाला हवेत, तसे होते. एक दिवस तो सुलतानगडचा किल्लेदार झाला. सहा वर्षं झाली होती. आता त्याची नजर होती नायब सुभेदारीवर. सिद्दी सलावतच्या हाताखाली दुय्यम

सुभेदार होण्यासाठी तो धडपडत होता. तेवढे कौशल्य त्याच्या अंगी होते.

समशेरगडावर सिद्दी सलाबतचा मुक्काम असल्यामुळे गडाला एवढा वचक बसला होता, की त्याच्या धाकामुळेच प्रत्येकाचं पळीपळी रक्त आटत होतं. गड अगदी सावध होता.

सिद्दी सलाबत अत्तर-महालात रंगला होता. सुलतानराव पाटील मात्र खलबतखान्यात बसला होता. फक्त एक शमादान तेवत होतं. खलबत-खान्याची बांधणी एवढी चिरेबंदी होती, की एक शब्दही बाहेर ऐकू जाणं शक्य नव्हतं. पश्चिमेच्या भिंतीत एक छोटा डौलदार झरोका होता, पण त्या झरोक्याखाली खोल खोल तुटलेला कडा होता.

सुलतानराव कोणाची तरी वाट बघत होता. तो खलबतखान्यात येरझारा घालीत होता. क्षणाक्षणांनी रात्र चढत होती. सुलतानराव एकटाच होता. मधूनमधून तो झरोक्यातून बाहेर नजर टाकीत होता. त्याने तिकडे अत्तर-महालात सिद्दी सलाबतची सारी व्यवस्था चोख लावून दिली होती.

तासामागून तास उलटत होते. मध्यरात्रीचा प्रहर झाला. सुलतानरावाच्या येरझारा फारच गतीने सुरू झाल्या. तो कशासाठी तरी अधीर झाला होता अन् तेवढ्यात खलबतखान्याच्या दरवाजाच्या बाजूने ठक् ठक् असा आवाज आला. खलबतखान्याच्या खोलीचा दरवाजा पन्नास पावलं दूर होता. दरवाजा भला भक्कम होता आणि दरवाजातून आत आलं, की एका वेळी एकच माणूस चालत जाऊ शकेल, अशी चिरेबंदी बांधणीची सायसंगीन वाट खल-बतखान्यापर्यंत होती. ही वाट सुमारे पन्नास पावलांची होती. येथून चाल-ताना एखाद्या भुयारातून चालल्यासारखे वाटे. दरवाजा आतून बंद करण्या-साठी कड्या व अडसर होता.

दरवाजावरचा आवाज ऐकू येताच सुलतानराव झपझप निघाला. दर-वाजावर तलवारीची मूठ आपटल्याचा आवाज येत होता. सुलतानजी दर-वाजाशी आला. त्याने अडसर व कडी काढण्यापूर्वी आतूनच विचारलं,

" कोण आहे ? "

" मी, दौलू ! "

बाहेरून जबाब आला आणि लगेच सुलतानरावाने कडी, अडसर काढला. कर्रर्र वाजत दरवाजा उघडला गेला. दौलू आत आला. दरवाजा पूर्ववत बंद झाला. दोघेही खलबतखान्याची वाट चालू लागले. दोघांचीही पायताणं वाजत होती. खलबतखान्यात येताच सुलतानरावाने विचारलं,

" काय खबर ? "

" धनी, झुंजारराव लईच खवळल्याती ! हैबतरावांनी गावं जाळल्याची खबर त्यानला जेजुरीच्या खंडोबाम्होरंच समजली. त्ये तथंच भडकले.

म्हणाले, वर्साच्या आत हैबतराव हिमतबहाद्दराचं मुंडकं हतं उंबरठ्यावर आणून वाहीन ! आन् जर न्हाई सावलं तर सवताचं मुंडकं वाहीन !"

"अस्सं ? अन् पुढं–?"

"झुंजारराव तस्संच तडख जेजुरीहून दौडलं ते मघा दिवस मावळायला सावंगीत पोहचलं."

"ठीक, असाच पाळतीवर राहा !"

नंतर दौलू आणि सुलतानराव खलवतखान्यातून बाहेर पडले. दौलू आपल्या देवडीवर गेला. सुलतानरावाची पावलं पडू लागली अत्तर-महालाकडे.

गाणे चालू असतानाच सुलतानराव महालात प्रवेशला. सलाबतला त्याने कुर्निसात केला. त्यानं भिवई उंचावीत विचारलं,

"क्या खबर ?"

"जी ! सोन्यासारखी खबर !"

"अच्छा ? बोलो !"

आणि मग त्याने दौलूकडून मिळालेली जेजुरीची बातमी सलाबतच्या कानांत हलक्या आवाजात सांगितली, पण त्याच्या चेहऱ्यावर आनंद काहीच उमटला नाही. तो गंभीरच राहिला. ते पाहून सुलतानरावाचा जरा अपेक्षा-भंगच झाला. त्याने सांगितली होती सोन्यासारखी खबर. क्षणभर थांबून सलाबत म्हणाला,

"वे आपसमे झगडना चाहिए ! लेकीन मरना नही ! इसमे हजरत बादशाहा परवरदिगारका नुकसान है !"

आणि हे ऐकताच सुलतानराव उसळला. तो 'सोन्यासारखी खबर' म्हणून सांगायला आला. अंदाज चुकला ! आपली दूरदृष्टी कमी पडली, हे त्याच्या लक्षात आलं. चित्ते झुंजत ठेवायचे आहेत, ते एक होऊन बादशाहीवर उलटू नये म्हणून. ते आपसात इतपतच झगडावेत. मरू नयेत. हे शूर चित्ते बादशाहाशी निष्ठावंत आहेत आणि राहिले पाहिजेत, बादशाहीवर संकट आलं तर हीच माणसं प्राणावर उदार होऊन झुंजतात व झुंजतील, हाच सलाबतच्या बोलण्याचा इत्यर्थ होता. सुभेदाराला खबर देण्यात आपला जरा उतावळे-पणाच झाला, असे सुलतानरावाला वाटले, पण मग स्वतःलाच सावरण्यासाठी कुर्निसात करीत हळूवार हसत तो म्हणाला,

"जी जी ! बरोबर आहे ! बरोबर आहे !"

कुर्निसात करीत मागे मागे पावलं टाकीत सुलतानराव महालातून बाहेर पडला. सुभेदारापुढं आज आपल्या अक्कलहुशारीचा रंग जरा फिका पडलेला पाहून तो खजील झाला.

★ ★ ★

सकाळीच समशेरगडावर शे-सवाशे स्वार सज्ज झाले होते. ते निघण्याच्या तयारीत होते. थोड्याच वेळात महालातून सुभेदार सिद्दी सलाबत बाहेर पडला. महालाच्या पायऱ्यांशी कमानीत येताच तो क्षणभर थांबला. त्याने सभोवार नजर फिरविली. गडावरच्या हशमांनी आपल्या जागेवरूनच त्याला मुजरे केले. वास्तविक हे हशम त्याच्यापासून दूर दूर आपआपल्या पहाऱ्यांवर उभे होते, पण सर्वांना सुभेदाराचा वचक इतका होता की, तो दुरून जरी दिसला तरी प्रत्येकाच्या छातीत धस्स व्हायचं आणि मान मुजऱ्यासाठी झुकायची.

सलाबतच्या मागोमाग सुलतानराव होता. एक हशमाने सलाबतचा घोडा पुढं आणला. सलाबतनं रिकिबीत पाय घातला आणि घोड्यावर टांग टाकली. सुलतानरावाने मुजरा केला. सलाबतने घोड्याला जरा टाच दिली; तेवढ्यात गडाच्या दरवाजातून कोणी एक स्वार दौडत येत आहेसे दिसले. सलाबतची तिकडे नजर गेली. त्याने घोडा थांबवला. दौडत येणारा स्वार पठाणी वेषात होता. दरवाजातून अंबारखान्याला वळसा घालून तो येत होता. कुतूहलाने सर्वजण त्याच्याकडे बघत होते. सलाबत जिथं उभा होता, तो महाल समशेरगडच्या बालेकिल्ल्यात होता. तेथून सारा गड दिसत होता. झाडाझुडपांतून असलेल्या वाटेने दौडत येणारा पठाण-स्वार क्षणभर दिसे, क्षणात झाडीत गुप्त होई. पुन्हा दिसे. पुन्हा दिसेनासा होई. आता त्याच्या टापांचा आवाज जवळजवळ येऊ लागला.

पठाण-स्वार अगदी नजीक आला. सलाबतपासून थोडेसे अंतर राहिल्यावर त्याने घोड्यावरून उडी टाकली आणि तो पायी चालत निघाला. अगदी जवळ येताच त्याने सलाबतला कुर्निसात केला आणि कमरेच्या दुपट्ट्यात खोवलेली पत्राची थैली काढली. ती त्याने सलाबतच्या हाती दिली. घोड्यावरच्या घोड्यावरच ती सलाबतने उघडली. आपल्या पत्राची वळकटी त्याने उलगडली. पत्राच्या माथ्यावर शिक्का होता विजापूर दरबारच्या मुख्य वजिराचा. पत्र अर्थात त्याचेच होते. सलाबतने भराभर तो सारा फार्सी मजकूर वाचला. सारे स्वार आणि विशेषतः सुलतानराव किल्लेदार अतिशय कुतूहलानं सलाबतच्या चेहऱ्याकडे बघत होते, पण त्या काळ्याकुळकुळीत चेहऱ्यावर अंधुकशीही छटा उमटत नव्हती. सलाबतने पत्राची वळकटी करून पुन्हा थैलीत ठेवली. ती थैली स्वतःच्या कमरेला खोवली अन् त्या पठाण जासुदाकडे पाहत त्याने फक्त अशा पद्धतीने मान हलवली, की त्या मानेचा अर्थ पठाणाच्याही ध्यानात आला. सलाबतच्या मानेचा अर्थ होता, 'ठीक है ! हुक्मकी तामिली जल्द-अज् जल्द हो जायेगी !'

सलाबतने सुलतानरावाकडे पाहिले. सुलतानराव झटकन् पुढे आला.

त्याच्याकडे बघत सलाबतने पठाणाकडे फक्त बोट केले. अर्थ स्पष्ट होता.

" ह्या जासुदाच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करा !"

आणि तावडतोब सलाबतने घोड्याला टाच मारली. पठाण व सुलतानराव कुर्निसात करीत असतानाच सलाबतचा घोडा दौडत निघाला. त्याच्या मागोमाग त्याच्या स्वारांनीही लगाम ताणले. वळणे घेत घेत झाडाझुडपांतून गेलेल्या वाटेने सलाबतची फौज गड उतरू लागली. टापांचा आवाज उठत राहिला. बालेकिल्ल्याच्या भव्य दरवाजातून सलाबत बाहेर पडला आणि तोपर्यंत तिकडे नजर लावून उभ्या असलेल्या सुलतानरावाने सुस्कारा टाकला. लगेच त्याने त्या पठाण जासुदाकडे बघितलं आणि हसून म्हटलं,

" चला खानसाहेब !"

आपल्याला किल्लेदाराने खानसाहेब म्हटलं, यातच पठाण खूष झाला. सुलतानरावाने मोठ्याने जान्या हुजऱ्याला हळूच डोळा मिचकावीत म्हटलं,

" जान्याऽ, मुदपाकखान्याला वर्दी दे. दरबारचे पाहुणे आहेत म्हणावं. मुर्गी हवी म्हणावं !"

पठाण जासूद जास्तच खुलला. सुलतानरावाने त्याला महालातल्या एका दालनात नेलं. गालिचावर बसवलं आणि पानविड्याचं तबक पुढं सरकवीत हसून पुसलं,

" कुठली थैली होती खानसाहेब ?"

पानाच्या शिरा उलगवीत पठाण म्हणाला,

" विजापूरकी !"

" अस्सं ? वा ! उत्तम ! कुठलं काही शादीचं बोलावणंबिलावणं आहे की काय ?"

" नही नही ! वजीरे आजम खवासखान साहबकी थैली थी !"

" का बरं ? काही विशेष ?"

" हाँ हाँ—"

आणि मग पठाणाने त्याला माहीत होती, तेवढी सगळी हकीकत सांगितली. हकीकत अशी होती– काहीतरी तोलामोलाची खलबतं करण्याकरिता वजीरसाहेबांनी ठिकठिकाणच्या सुभेदारांना विजापुरात बोलावलं आहे. तसंच दरबारात अशीही एक बातमी आहे, की दिल्लीचा मोंगल बादशाह शाहजहान जातीने दख्खनवर प्रचंड फौजेनिशी चालून येणार आहे. त्यामुळे खुद्द विजापूर शहराचा कडेकोट बंदोबस्त करण्यात बादशाह हजरत मुहम्मद आदिलशाह जातीने गुंतले आहेत. दिल्लीहून येणाऱ्या प्रचंड आक्रमणाला तोंड कसं द्यायचं याचा विचार करण्यासाठीच सर्व ठिकाणच्या सुभेदारांना वजीरसाहेबांनी तातडीने बोलावलं असेल. दिल्लीची फौज अजून निघालेली नाही,

पण निघेल.

अशी सारी हकीकत पठाणाने सांगितली. ह्यापेक्षा अधिक काही राजकारणी ज्ञान मिळवायची आणि ते सुसूत्र सांगण्याची पठाणसाहेबांची ऐपतच नव्हती. बाजारगप्पा मात्र बऱ्याच ऐकवल्या त्यांनी. तेवढ्यात जान्या हुजऱ्या दोन्ही हातांनी मुजरे घालीत आला.

"धनी!"

"काय रे जान्या? असं रडकं थोबाड घेऊन कशाला आलास?"

"धनी, मुर्गी मिळत न्हाई!"

"मुर्गी मिळत नाही? काय सांगतोस गाढवा! सगळ्या मुर्ग्या काय काशीयात्रेला गेल्या होय रे?"

"काशीयात्रेला कशाला जात्याल? समद्या एकदम सर्गाला गेल्या!"

"म्हणजे रे?"

"रोग पडला न् पटाटा मेल्या वगा धनी! येक बी न्हाई जीत! समद्या मेल्या!"

"तूही मर! जा, हो चालता!"

पठाणाचा चेहरा मात्र उतरला.

साध्या डाळभातावरच पठाणाची बोळवण झाली!

सूर्य मावळला. गडाचे दरवाजे बंद व्हायची वेळ झाली. सुलतानराव घोड्यावरून गडावरच्या सर्व चौकी-पहाऱ्यांवर नजर टाकीत होता. तो सदरेपाशी आला आणि समोरून दौलू येताना दिसला. दौलू सुलतानरावासाठी बातम्या आणीत असे. तो अशा बेमालूम ढंगाने वागत असे, की हा बातम्या काढणारा हेर आहे, असा संशयही कोणाला येऊ नये. त्याला घोड्यांच्या आणि इतर जनावरांच्या रोगराईची आणि त्यावरील औषधपाण्याची उत्तम माहिती होती. त्याच्या काखेला औषधांचा भला मोठा बटवा सदोदित असायचाच. तो गावोगाव हिंडायचा. गडावरच्या पागेतही त्याला नोकरी होती, पण त्याच्यावर बंधनं फारशी नव्हतीच. इतकंच नव्हे तर गडाचे दरवाजे बंद झाल्यावरही खास दौलूसाठी दरवाजे उघडले जात असत. हा औषधोपचारांसाठी वाटेल तेव्हा जातो व येतो, असा समज सर्व लोकांचा झाला होता; पण त्याचे अंतरंग व कसब फक्त सुलतानरावाला माहीत होतं.

दौलू येताना दिसताच सुलतानराव घोड्यावरून उतरून सदरेच्या हवेलीत शिरला. दौलूही सदरेवर गेला. सदरेवर कोणीही नव्हतं. दौलू आला आणि औषधांचा बटवा सताड उघडून दौलू सुलतानरावाशी हळूहळू कुजबुजू लागला. हेतू हा की कुणी पाहिलंच तर औषधासंबंधी बोलतोय असं वाटावं. दौलू सांगत होता—

" धनी, हैबतरावावर घावडाव करायच्या तयारीला झुंजारराव लागल्याती ! चार–सा महिनं कसून तयारी करून हैबतरावाचं तळपट करायचा मनसुबा दिसतोया झुंजाररावाचा ! जेजुरीला गेलेली त्येंची बायकापोरं परत आली. आन् बरं का धनी––"

" काय रे ?"

" पुरंदरगडावर गेल्तो म्या. अशीच पागेची घोडीपाडी बघायला गेल्तो. तथं बोलण्याबोलण्यात ऐकलं, की दिल्लीचा बाच्छाव आपल्या बाच्छावावर स्वारी करनार हाये म्हनून ! आन् बरं का धनी, आपलं बाच्छाव लई चिंतंत पडल्याती म्हनं !"

. दौलू बोलत होता. सुलतानराव ऐकत होता. तो ह्या बातम्यांचे आणि पठाणाने सांगितलेल्या बातम्यांचे धागेदोरे एकमेकांशी जुळवीत होता.

* * *

सुभेदार सिद्दी सलाबतखान समशेरगडावरून विजापूरची थैली घेऊन निघाला. तो तडक शिरवळला आला. शिरवळच्या भुईकोट किल्ल्यात त्याचं मुख्य ठाणं होतं. शिरवळच्या कोटाभवती खंदक होता. खंदकात पाणी होतं. दरवाजावरती उंच माल्यावर आदिलशाही झेंडा फडकत होता. दरवाजा भव्य होता. खंदक ओलांडून दरवाजात जाण्यासाठी दणकट लाकडी फळ्यांचा पूल होता. तो वर ओढून घेता येत असे. जरूर तेव्हा तो खंदकावर सोडून वाट करता येत असे.

सुभेदाराची फौज दौडत दौडत येत होती. धूळ उसळत होती. शिरवळच्या तटावरच्या हशमांनी नजर दिली. त्यांनी ओळखलं की सरकारस्वारी आली ! किल्ल्याच्या तटाबुरुजांवर एकदम हुशार राहण्याचे इशारे सुरू झाले. दरवाजावरची नौबत झडू लागली. दरवाजा उघडला गेला. बुरुजावरच्या रहाटांना गुंडाळलेले साखळदंड उलगडू लागले. खंदकावरचा पूल वरून हळूहळू खाली खाली येऊ लागला. खंदकावर तो आडवा पडला. किल्ल्यात जाण्याची वाट खुली झाली. पहारेकरी हशम भाले-तलवारी सावरून गंभीरपणे उभे राहिले. सिद्दी सलाबतच्या मागोमाग सारे स्वार किल्ल्याकडे दौडत होते. ते पुलाजवळ आले. घोड्यांच्या टापांचा त्या लाकडी पुलावर धडधड धडधड आवाज होऊ लागला. सलाबतला कुर्निसात झडू लागले.

घोडे सुभेदाराच्या हवेलीपाशी येताच मोतद्दार पुढे धावत आला. खोगीर न उतरवण्याची सूचना सलाबतनं मोतद्दाराला दिली. सलाबत हवेलीत गेला

आणि अवघ्या अर्ध्या तासात बाहेर आला. समशेरगडाहून आलेले सर्व स्वारही पुन्हा तयार होऊन आले. फक्त चार उंट ह्या स्वारीत दाखल होणार होते. त्या उंटांवर जरूरीचं सामान लादलेलं होतं. सलावत घोड्यावर स्वार झाला.

स्वारी किल्ल्यातून बाहेर पडली. कुणीकडे जायचंय याची कुणालाही कल्पना नव्हती. स्वारी विजापूरच्या रस्त्याला लागली. शिरवळपासून विजापूर होतं सव्वाशे कोस दूर. वजिराचा खलिता इतक्या निकडीचा होता, की जास्तीत जास्त दौड मारीत लौकरात लौकर विजापुरात पोहोचणं जरूर होतं. सिद्दी सलाबतला विजापुरातील खलबताचा आधीच अंदाज आला होता. जर मोंगलांची ही संभाव्य स्वारी आलीच, तर मावळसुम्याचा बंदोबस्त कसा कसा करायचा, याचा विचार तो आतापासूनच करीत होता.

दिल्लीची स्वारी येणार येणार अशा बातम्या दख्खनच्या मुलखावर झपाट्याने पसरत होत्या. कोणाचीही स्वारी आली तरी सारा मुलूख भरडून निघायचा, हे ठरलेलंच असे. शेतीमाती, घरंदारं, धान्यवैरण, धनदौलत, गुरंढोरं, प्राण आणि अब्रू फौजांच्या पायदळी जायची, हे निश्चित असे. स्वारीची बातमी आली, की लोकांच्या छातीत भीतीने गोळा उभा राहत असे.

विजापुरात आतापासून तयारी सुरू झाली होती. रोज नव्या बातम्या उठत होत्या. शाहजहान सत्तर हजार फौज घेऊन निघणार अशी एक बातमी होती, पण दुसऱ्याच दिवशी हा आकडा लोकांच्या तोंडी ऐंशी हजारांवर गेला ! तोफा, हत्ती, घोडदळ यांचे आकडेही फुगत होते; पण लाखाच्यावर मात्र कुणालाही आकडा ऐकू येत नव्हता.प्रत्यक्ष बादशाहाची व दरबारची अशीच कल्पना होती, की दिल्लीची फौज जास्तीत जास्त एकंदर एक लाखापर्यंत येईल. हाही आकडा भयंकर होता. एक लाखाच्या स्वारीला तोंड कसं द्यायचं, हा दरबारपुढं चिंतेचा सवाल होता. बादशाहाची झोप उडाली होती. वजीर खवासखान मोठा धैर्याचा होता. येणाऱ्या स्वारीला तोंड कसं द्यायचं, याचा काहीएक आराखडा त्याने मनाशी ठरवला होता.

सिद्दी सलावत मोठमोठ्या मजला मारीत विजापुरात येऊन दाखल झाला. नजराणा घेऊन तो तडक बादशाहाच्या भेटीला गेला. योगायोग असा, की याच वेळी बादशाह मुहम्मद आदिलशाह व वजीर खवासखान सदरेवर बोलत होते. एका उंच मसनदीवर बादशाह बसला होता. वजीर जवळच आदबीने उभा होता. तेथेच खासबारदाराने वर्दी दिली, की मावळ परगण्याचे सुभेदार सिद्दी सलावत रेहान आले आहेत. बादशाहाने सिद्दीला येण्याची इजाजत फर्मावली. तो नजराणा घेऊन आला. आदबीने मान झुकवून सलावत पुढे गेला. त्याला उद्देशून वजीर म्हणाला,

" आईये सुभेदारसाहब, आईये ! "

सलाबतने नजराण्याचे ताट पेश केले आणि लवून कुर्निसात केला. पण कुर्निसात करीत असतानाच खासबारदाराने एक अत्यंत तातडीची थैली आणून वजिराच्या हाती दिली. बादशाहाचं लक्ष थैलीवर खिळलं. ते एक महत्त्वाचं बातमीपत्र होतं. वजीर ते वाचू लागला, पण वाचता वाचता एकदम जरा गंभीर झाला. बादशाहाने काळजीच्या सुरात विचारलं,

" क्या खबर है ? "

पत्रात खबर भयंकर होती. दिल्लीहून दोन महिन्यांत शाहजहान बादशाह दीड लाख फौज घेऊन निघत आहे, अशी खबर होती ! त्यात ऐंशी हजार घोडदळ, एक हजार लहानमोठ्या तोफा आणि सातशे चिलखती हत्ती आहेत, अशीही माहिती होती ! वजिराने ती वाचून दाखविली. अपेक्षेपेक्षाही स्वारीचे हे स्वरूप भयंकर होते. बादशाह दिङ्मूढच झाला. सलाबतही विलक्षण गंभीर झाला. वजीर क्षणभर निःशब्द झाला, पण ईर्ष्येने तो म्हणाला,

" हम भी कुछ कम नही ! "

वजिरानं तिथंच बोलून दाखवलं, की जरी आपली फौज कमी असली तरी बहाद्दूर आहे. मराठी फौजा जर झाडून आपण उभ्या केल्या, तर मराठी फौजेची हिम्मत आणि करामत अशी असते, की त्या एकट्याच ह्या प्रचंड स्वारीचा मोड करतील. सिद्दी सलाबतनेही वजिराच्या म्हणण्याला दुजोरा दिला. कोकण, मावळ आणि देश ह्या मराठी मुलखातील सारी मराठी शक्ती हजरत आदिलशाह बादशाहांच्या पायाशी रुजू करण्याची फक्त जरूर आहे, असे वजीर बोलला. मराठा सैन्याच्याच जोरावर आपण आजपर्यंत राज्य चालवीत आहोत, हेही सर्वांना उघड दिसत होतं. वजिराने मोठ्या खात्रीच्या सुरात म्हटलं, की हे जंग आपण जिंकू, पण ते मराठ्यांच्याच जिवावर. झाडून साऱ्या मराठ्यांना एकवटून आपण मैदानात आणलं पाहिजे. मराठ्यांच्या कर्तबगारीबद्दल त्याला विलक्षण खात्री होती. त्याला मराठ्यांचे गुणही माहीत होते आणि दोषही माहीत होते. कारण तो एके काळी मराठाच होता ! पुढे बाटून मुसलमान झाला होता. आदिलशाही सत्ता मराठ्यांच्याच एकजुटीवर टिकवावयाची, असा त्याचा पक्का निर्धार झाला होता. म्हणूनच त्याने सर्व सुभ्यांचे सुभेदार विजापुरास बोलाविले होते. प्रथम येऊन पोहोचला होता सिद्दी सलाबत.

मराठ्यांची आपसात भांडणं लावून, त्यांच्यात बेकी ठेवून मराठ्यांवरच राज्य करणाऱ्या दरबारला आता स्वतःच्याच रक्षणासाठी मराठ्यांना एकदिलाने एकत्र आणण्याची जरूर वाटत होती ! वजिराने सलाबतला विचारले,

" आपके सुबेकी कैसी हालत है ?"

काय विचारावी हालत ! याच दरबारने पद्धतशीर प्रयत्न करून मावळात पेरून ठेवलेली भांडणं सध्या शिगेला पोहोचली होती. मराठे एकदिल झाले, तर सह्याद्रीच्या आश्रयाने डोईजड होतील, बंड करतील, ह्या भीतीपोटीच ही वैरं बादशाहांनी रुजवली व पोसली होती. वजिराच्या सवालावर सिद्दी सलाबत म्हणाला,

" वजीरे आजमकू तो मालूम ही हैं सूबा मावल की हालत ! "

अन् मग जांभूळखोऱ्यातील हाडवैरं आणि त्यापायी होत असलेला नाश आणि रक्तपात सलाबतने सांगत सांगत जेजुरीच्या देवळात झुंजारराव सरदेशमुखांनी हैबतरावांच्या वधाची केलेली प्रतिज्ञाही त्याने हुजूरना ऐकवली. ती ऐकून बादशाह आणि वजीर दोघंही म्हणाले, की हे प्रकार ताबडतोब बंद झाले पाहिजेत. नाही तर ऐन धामधुमीत ही भांडणे फितुरीला कारण ठरतील. यातील कोणीही मोंगलांना सामील होईल !

पण पिढ्यान् पिढ्या रक्ताचे घोट घेत चालत आलेली ही भांडणं थांबणार कशी, हे मात्र कोणालाच समजेना. झुंजारराव आणि हैबतराव ह्या दोन्ही असामी बादशाहाला चांगल्याच माहीत होत्या. त्यांचे बळ आणि त्यांचे भयंकर हट्टी स्वभावही त्याला माहीत होते. एक अशक्यप्राय कल्पना बादशाहाच्या मनात चमकली. हे अशक्य आहे, हे त्यालाही समजत होते. तरीही ती कल्पना हिरीरीने मनात धरून बादशाह म्हणाला,

" सलाबत रेहान– "

" जी आलमपनाह ! "

" एक बात होनीही चाहिए ! "

" हुक्म आलमपनाह ! "

" झुंजारराव सरदेशमुखकी एक लडकी है ! "

" जी आला हजरत ! "

" और हैबतराव देशमुखका यह लडकीसे बडा एक लडका है ! "

" जी हाँ आलिजाह ! "

" अच्छा ! झुंजाररावके लडकीकी शादी हैबतरावके लडकेके साथ होनी चाहिए ! "

काय भयंकर कल्पना ! झुंजाररावांची लेक हैबतरावांची सून होणार ? अशक्य ! हे कालत्रयी शक्य नाही ! ही कल्पना ऐकून सलाबत तर सर्दच झाला. वजीरही गप्प झाला. बादशाहालाही खरं म्हणजे ही गोष्ट अशक्यप्राय आहे, हे पटत होते. तरीही त्याने चढत्या स्वरात ही कल्पना सत्यात आलीच पाहिजे, असं म्हटलं. भांडण मनापासून मिटण्याचा त्यातल्या त्यात खात्रीचा हा एकच मार्ग होता. लग्न ! नातेसंबंध !

यावर सलाबत काही बोलणार, असं दिसताच बादशाह एकदम ओरडला,

" मावदौलत कुच नही सुनना चाहते ! यह शादी होनीही चाहिए ! यह रिश्ता जुलनाही चाहिए ! कुच भी करो !"

आता बोलणंच थांबलं. वास्तविक प्रचंड आक्रमक स्वारीला तोंड देण्यासाठी शस्त्रास्त्रं, दारूगोळा, पैसा, धान्यवैरण इत्यादी युद्धसाहित्य सिद्ध करणं अत्यंत महत्त्वाचं व अवघड होतं. केवळ मावळातील दोन घराण्यांतील वैर मिटवीत बसणं एवढीच काही एकमेव महत्त्वाची कामगिरी नव्हती. युद्धासाठी कराव्या लागणाऱ्या अनेक कामांपैकी हे एक काम होतं; पण बरंच महत्त्वाचं होतं, यातही शंका नव्हती. कारण मावळपट्टीत अशी भांडणे अनेक होती. अगदी हाडवैरं. जर एक हाडवैर असं मिटलं तर त्याचा परिणाम सर्वत्र होईल, ही खात्री बादशाहाला वाटत होती.

आता हे जांभूळखोऱ्यातील वैर मिटवण्याची जबाबदारी सलाबत रेहानवर येऊन पडली. इतरही असंख्य कामं शिरावर आलीच, पण सलाबतला हेच काम सर्वांत अवघड वाटत होतं. प्रांताचा व किल्ल्यांचा बंदोबस्त, धान्याची व दारूगोळ्याची साठवण, पैशाची तरतूद, एक का दोन ! हजार कामांच्या चिंता त्यांच्याभवती गांधीलमाशांसारख्या घोंगावू लागल्या. मराठी फौजेची जमवाजमव आणि त्यासाठी त्यांच्यात एकजूट हा प्रश्न भयंकर कठीण !— पण महत्त्वाचा !

पूर्वीचा अनुभव असा होता, की मावळातील हे देशमुख, बादशाहाचा हुकूम आला, की छावण्यांत हजर होत; पण सर्व बळानिशी नव्हे ! आपल्या घरादारांच्या व देशमुखी गावांच्या रक्षणासाठी हजार हजार शिपाईप्यादे ते मागे ठेवीत ! प्रत्येकाला भय वाटे, की साऱ्या सैन्यानिशी आपण स्वारीवर गेलो, तर आपला दावेदार आपल्यामागे आपल्या सर्वस्वाचा नाश करून टाकील. म्हणून बादशाहाच्या पायाशी निष्ठा असूनही हे लोक कुचराई करीत. ही कुचराई व फितुरीची भीती निदान जांभूळखोऱ्यात टाळायची असेल, तर हे हाडवैर मिटून त्यांच्यात स्नेह, जिव्हाळा, विश्वास, एकी निर्माण होणं जरूर होतं. त्यासाठी बादशाहाने खात्रीचा पण अवघड उपाय सुचविला होता— लग्न !

सिद्दी सलाबत रेहान विजापुराहून जड डोक्याने परतला, पण एकदम त्याला आठवण झाली समशेरगडच्या किल्लेदार सुलतानरावाची ! आणि मग एकदम विश्वासाने त्याच्या चेहऱ्यावर एकच निमिष स्मित उजळून गेलं. त्याने ठरवलं, की बाकीची सर्व कामं आपण स्वतःच्या शिरावर घ्यावीत आणि झुंजारराव–हैबतराव यांचे भांडण काहीही करून मिटवून खात्रीचं ऐक्य घडवण्याची जबाबदारी टाकावी सुलतानरावावर ! बस्स्, ठरलं ?

साऱ्या प्रवासात तो विचार करीत करीत चालला होता. रात्रंदिवस.

शिरवळचा किल्ला केव्हा आला, ते त्याला समजलेही नाही. साखळदंड उलगडले गेले आणि खंदकावर लाकडाचा पूल अंथरला गेला. त्या पुलावरून टापा आपटीत त्याचा घोडा किल्ल्यात प्रवेशला.

* * *

शाहजहानच्या स्वारीच्या बातम्या ऐकून प्रत्येक गडकोटाचं धाबं दणाणलं. कशोशीने गडकोटांची बंदोबस्ती सुरू झाली होती.

सलाबत रेहान समशेरगडावर आला. सुलतानराव गडाच्या दरवाजापर्यंत सामोरा आला. विजापुराहून परतलेला सलाबत नक्कीच काही तरी आता महत्त्वाचं राजकारण सांगणार, ही सुलतानरावाला खात्री होती.

विश्रांतीही न घेता सलाबतने सुलतानरावाला एकांतात चलण्यास खूण केली. दोघेही खलबलखान्यात आले. झरोक्यातून दिसणाऱ्या जांभूळ खोऱ्याकडे बोट दाखवीत सुलतानराव म्हणाला,

" सरकार, हा मुलूख म्हणजे दारूचं कोठार आहे. शांत आहे. शांत आहे तोवर तुळशीतल्या मातीसारखा दिसतो, पण ठिणगी पडली की— "

" हाँ सच है ! लेकीन सुनो सुलतानराव, हजरत आलम पनाहका हुक्म हुवा है—"

आणि सलाबतने विजापुरास घडलेली हकीकत आणि अंगावर पडलेली जबाबदारी सुलतानरावाला सांगितली. चित्रासारखा तो ती ऐकत राहिला. झुंजारराव आणि हैबतराव यांच्यातील भांडण मिटवण्याची जबाबदारी बादशाहाने तुझ्यावरच खास सोपविलेली आहे, असं सलाबतने सुलतानरावाला सांगितलं ! बादशाह तुला फार नावाजतात आणि मानतात, असेही त्याने सुलतानरावाला सांगितलं ! सुलतानरावाला तो गौरव ऐकून अस्मान ठेंगणं वाटू लागलं, पण दोघा वैऱ्यांतील ऐक्य लग्नसंबंधातूनच घडलं पाहिजे व ही कामगिरी सुलतानरावच पार पाडील, असं बादशाहाने म्हटल्याचं जेव्हा सलाबतने सांगितलं, तेव्हा मात्र त्याचं डोकं गरगरू लागलं. खंडोबाला वैऱ्याचं मुंडकं वाहण्याची प्रतिज्ञा करणारा झुंझारराव त्याच्याच घरी पोरगी देईल हे कल्पनेतही अशक्य ! हे भलतंच अवघड झेंगट बादशाहाने आपल्या गळचात अडकवलेलं पाहून सुलतानरावाच्या मनाची तारांबळ उडाली. यात यश न मिळालं तर बादशाहापाशी आपलं 'वजन' उरणार नाही ही भीती ! सलाबत मात्र बादशाहाचं नाव सांगून सांगून ही कामगिरी सुलतानरावाच्या

गळी उतरवीत होता. सुलतानराव डोळे विस्फारून शून्य नजरेनं कुठंतरी बघत होता. वास्तविक विजापुरातील सबंध मुक्कामात कोणाच्याही तोंडून सुलतान-रावाच्या नावाचा उल्लेखसुद्धा झाला नव्हता, पण हे काम सुलतानरावाच्या गळ्यात अडकवण्यासाठी सलाबत वारंवार बादशाहाच्या नावाने सुलतान-रावाची स्तुती करीत होता. सलाबतला मावळपट्टीतील असल्या भांडणात अन् भांडणारांत लक्ष घालण्याची यत्किंचितही इच्छा वा हौस नव्हती. युद्धाच्या इतर लष्करी तयारीसाठी तो अहोरात्र झटत होता, पण ही मांडणं मिटलीच पाहिजेत, नाही तर आपली आघाडी लंगडी राहील, हेही त्याला जाणवत होतं.

सुलतानराव अजूनही शून्यात नजर लावून बसला होता. सलाबतने त्याला म्हटलं,

" सुलतानराव, यह मनसुबा फते होना चाहिए ! "

सुलतानराव भानावर येत अदबीने हसत म्हणाला,

" होईल होईल ! काही फिकीर नका करू सरकार ! "

वास्तविक त्याची जीभ कोरडी पडली होती !

सुलतानराव झरोक्यातून जांभूळखोऱ्यावर नजर लावून बसला होता. त्याच्या डोक्यात काहूर उठलं होतं. त्याला दौलूचे शब्द आठवत होते. दौलू म्हणाला होता, 'धनी, हैबतरावावर घावडाव करायच्या तयारीला झुंजारराव लागल्याती...'

कितीतरी वेळ तो तसाच बसून होता. त्याने बाजूला मान वळवली. सिद्दी सलाबत केव्हा उठून गेला, हे सुलतानरावाला कळलंही नाही. बाद-शाहाने खास आपल्यावर सोपविलेली कामगिरी कशी पार पाडायची, हेच त्याला समजेना. तो विचार करीत होता. तास-दीड तास असाच गेला. त्याने मनाशी काहीतरी बेत योजला. तो लगेच खलबतखान्यातून बाहेर पडला. सुभेदार अत्तर–महालाकडे गेल्याचं त्याला समजलं. लगेच तो अत्तर-महालाकडे निघाला.

सलाबत विचार करीत महालात संथ येरझरा घालीत होता. सुलतान-रावाने महालात प्रवेश करीत करीत त्याला कुर्निसात केला आणि हळू स्वरात उद्गारला,

" सरकार–"

सलाबत थांबला. त्याने सुलतानरावाकडे वळून पाहिलं. सुलतानराव म्हणाला,

" सरकार, मी झुंजाररावाला आणि हैबतरावाला गडावर बोलावून घेतो. त्यांच्याशी सारी काही मी बोलणी करतो, पण आपण तियं हजर असावं. आपल्या समक्ष, आपल्या मसनदीपुढंच मी बोलणी करतो. "

" मतलब ? "

"सरकार जातीने असतील तर त्या दोघांवरही दाब राहील. नाही तर ते पिसाळलेले चित्ते—"

" अच्छा ! मंजूर ! "

सुलतानरावाने लगेच 'सुभेदार सिद्दी सलावत रेहान सुभे मावळ' ह्या नावाने दोन पत्रे तयार करविली आणि थैल्यांत घालून एक झुंजारराव सरदेशमुख यांच्याकडे सावंगीला आणि दुसरं हैबतराव हिम्मतबहाद्दर यांच्याकडे कळशाला त्याने स्वारांबरोबर रवाना केली. पत्रात मजकूर होता, की आज संध्याकाळी समशेरगडावर दाखल होणे. काही महत्त्वाचे मनसुबे बोलावयाचे आहेत.

पत्रं रवाना झाली. समशेरगडापासून सावंगी होती पाच कोसांवर दक्षिणेला आणि कळसं होतं सहा कोसांवर पश्चिमेला. सावंगी आणि कळसा गडापासून फारसं दूर नव्हतं.

पत्रं रवाना झाल्यावर सुलतानराव सतत विचार करीत होता. झुंजारराव आणि हैबतराव आल्यानंतर त्यांच्याशी कसं बोलायचं, कसं वागायचं आणि बादशाहांनी आपल्यावर सोपविलेली कामगिरी तडीस कशी न्यायची याचा. यशाबद्दल मात्र तो खरोखर पूर्ण निराश होता. सिद्दी सलाबत तर हा सारा विषय सुलतानरावावर सोपवून समशेरगडाची बारकाईने पाहणी करण्यात गुंतला होता. तोफा कुठं चढवणं जरूर आहे, बांधकाम किंवा दुरुस्ती कुठं कुठं करणं जरूर आहे, याचाच बारकाईने विचार करण्यात तो गुंतला होता.

सूर्य मावळू लागला. खलबतखान्याच्या झरोक्यात सुलतानराव उभा होता. त्याचं लक्ष जांभूळखोऱ्यावर फिरत होतं. तो क्षणभर सावंगीच्या रोखाने अन् क्षणभर कळशाच्या रोखाने बघत होता. झुंजारराव आणि हैबतराव हे दोघेही पत्रं पावताच गडावर येतील, याबद्दल सुलतानरावाला आणि सलाबतला शंका नव्हती. झुंजारराव व हैबतराव एकमेकांचे भयंकर वैरी होते, तरी बादशाहांच्या पायाशी मात्र दोघेही कमालीचे निष्ठावंत होते. दोन्ही घराण्यांतील कितीतरी माणसं बादशाहांच्या सेवेसाठी ठार झालेली होती. कावेबाज राजकारणं खेळणाऱ्या बादशाहांनी ह्या दोन्ही घराण्यांवर कित्येकदा अन्याय केला होता; तरीही ह्या दोन्ही घराण्यांची निष्ठा कमी झालेली नव्हती.

थोडा वेळ गेला आणि कळशाच्या बाजूने धूळ उधळत येताना दिसली. स्वार दौडत येत होते. सुमारे साठ–सत्तर स्वार असावेत. थोड्या वेळानंतर दक्षिणेच्या बाजूने सावंगीकडूनही धूळ उसळत येताना दिसू लागली. तीही स्वारांची संख्या मोठी होती. हैबतराव आणि झुंजारराव कधीही एकटेदुकटे बाहेर पडत नसत. बरोबर नेहमी पन्नास तरी स्वार घेतच. आपल्याला दगा-

फटका होईल, ही भीती दोघांनाही वाटे !

लगेच सुलतानरावाने खलबतखान्यातच मसनद, लोड, गालिचे आणवले. बैठक सजवली.

गडाच्या डोंगरावर स्वार चढू लागले. झुंजारराव आघाडीला होते. थोड्याच वेळात ते दरवाजाशी येऊन पोहोचले. सूर्यास्त झालेला होता. गडाचे दरवाजे बंद झाले होते, पण आता येणाऱ्या झुंजारराव व हैवतरावांच्याकरता दरवाजे खास उघडण्यात येणार होते. दरवाजे उघडण्यात आले आणि झुंजाररावांनी गडात प्रवेश केला. बालेकिल्ल्याच्या दरवाजाशी स्वत: सुलतानराव उभा होता. त्याने झुंजाररावांना हसत हसत म्हटलं,

" यावं यावं झुंजारराव ! "

झुंजाररावांनी घोड्यावरून उतरून किल्लेदाराला रामराम घातला आणि पुसलं,

" सुलतानराव, निकडीचा स्वार धाडला. काय बेतावर बोलावणं केलं आम्हाला ? "

" तसंच काही आहे. सुभेदारसाहेब त्यासाठी जातीने आले आहेत. आपली वाट बघताहेत. "

सुलतानरावाबरोबर झुंजारराव चालत होते. पावलं पडत होती खलबतखान्याकडे. आपण खलबतखान्याकडे चाललो आहोत, हे झुंजाररावांच्या लक्षात आलं. बोलणं खलबतखान्यात होणार आहे, हे लक्षात येताच त्यांनी ओळखलं, की काही तरी फारच महत्त्वाचं दिसतंय् ! थोडासा अंदाज त्यांना आधीच आला होता. कारण दिल्लीच्या येणाऱ्या स्वारीच्या बातम्या त्यांना समजलेल्या होत्या.

खलबतखान्याच्या दाराशी चार अरब पहारेकरी पहारा करीत होते. दार बंद होतं, ते उघडलं गेलं. सुलतानरावाच्या मागोमाग झुंजारराव आत गेले. धूपाचा आणि चंदनाचा किंचित सुगंध दरवळत होता. ती अंधारी वाट चालत दोघेही चालले होते. खलबतखान्याच्या दालनात ते प्रवेशले आणि झटकन् झुंजाररावांनी कुर्निसात केला. सिद्दी सलाबत गंभीरपणे म्हणाला,

" आईये झुंजारराव ! "

सलाबतने त्यांना बसण्याकरता हात केला. ते बसले. खलबतखान्यात एका उंचशा मसनदीवर लोडाशी सलाबत बसला होता. तो हुक्का पीत होता. मसनदीलगत मोठा गालिचा अंथरला होता. झरोक्यातून वारा येत होता. खलबतखान्यात गारवा फारच होता. एका कोपऱ्यात एक बिलोरी शमादान तेवत होते. त्याचा मंद प्रकाश खलबतखान्यात फक्त चेहरे ओळखण्यापुरताच पसरलेला होता. सिद्दी सलाबतच्या काळ्याभोर चेहऱ्यावर त्याचे ते दोन

करडे डोळे उठून दिसत होते. त्याच्या काळचामोर दाढीमिशात मधूनच त्याचे दात चमकत होते.

सिद्दी सलाबत हा एक अत्यंत तापट, क्रूर आणि अतिशय कमी बोलणारा सुभेदार म्हणून झुंजाररावांना माहीत होता. ह्या सुभेदाराला विजापूरचा वजीर आणि सरनौबतही वचकून वागतात, हेही त्यांना माहीत होतं. सलाबतचं वागणं आणि बोलणं होतंच तसं. झुंजारराव मसनदीच्यापुढं गालिचावर बसले. सलाबत एकही अक्षर बोलत नव्हता. सुलतानरावानेच काही तरी बोलायलाच हवं म्हणून म्हटलं,

" सारं ठीक आहे ना ? पीक–पाणी ?"

" लई ब्येस ! औंदा दहा खंडी कोळसं झालं की ! गडावरून दिसलंच आसंल की सुलतानराव तुम्हाला !"

हंबीररावांनी त्यांची गावं जाळली, त्याला उद्देशून झुंजारराव हे बोलले आणि सुलतानरावाला असं झालं, की आपण कुणीकडून हा पीकपाण्याचा प्रश्न यांना विचारला ! झुंजाररावांच्या डोळ्यांत भलतीच तिरीप उमटून गेली. सुलतानरावाची आशा आणखीच खाली घसरली. पहिल्याच क्षणाला झुंजाररावांचा हैबतरावांविषयीचा संताप असा उफाळून आलेला पाहिल्यावर पुढं काय होणार हे स्पष्ट दिसायला लागलं. सुलतानरावांनी पटकन् विषयच बदलला !

तेवढ्यात बोलण्याची आणि पावलांची चाहूल येऊ लागली. सुलतानराव उठून चार पावलं सामोरा गेला. अंधारातून खलबतखान्यातून येताना दिसले हैबतराव. कानाकडे उलटी फिरलेली काळी-पांढरी दाढी, टप्पोरे डोळे, भव्य कपाळ, त्यावर दोन बोटांचं गंध आणि डोक्याला मराठी पीळदार पागोटं आणि एकूण इमारत भलतीच धिप्पाड. येत होते ते हसत हसत. सुलतानरावांनी त्यांचं आगतस्वागत करीत म्हटलं,

" यावं यावं हैबतराव ! "

" रामराम, रामराम किल्लंदार ! "

आणि हसत येणाऱ्या हैबतरावांच्या चेहऱ्यावरचं हसं एकदम ढासळलं. ते गंभीर झाले. झुंझाररावांचं दर्शन त्यांना घडलं ! पण त्याच क्षणी त्यांना मसनदीवर बसलेला सुभेदार दिसला आणि ते झटकन कुर्निसाताकरिता झुकले. हैबतरावांचं तोंड दिसताच झुंजाररावांनी एकदम मान फिरवली. त्यांच्या मुद्रेवर असंतोषच नव्हे, तर संताप तरळू लागला. सलाबत हुक्क्याची नळी डाव्या हाती घेत उजव्या हाताने गालिच्याकडे हात करीत म्हणाला,

" आईये हिम्मतबहाद्दर, तश्रीफ लाईये ! "

सलाबतने हाताने बसावयास खुणावलेली जागा झुंजाररावांच्या समोरचीच

होती. हैबतरावांच्या आणि झुंजाररावांच्याही चेहऱ्यावर सख्त नाखुषी दिसत होती. दोघेही अस्वस्थ झाले होते, पण बोलता तर येईना. सुभेदाराबद्दल त्यांच्या मनात दरारा भयंकर होता. सुभेदाराचा स्वभाव आणि कोप दोघांनाही माहीत होता. हैबतराव घुटमळले. झुंजाररावांच्या समोर अवघ्या पाच वितीवर बसायचं त्यांच्या जिवावर आलं होतं, पण तेवढ्यात किंचित चढत्या आवाजात सुभेदाराचे शब्द उठले,

" हैबतराव, तश्रीफ – ! "

हैबतराव अस्वस्थ मनानेच ' जी ' म्हणत बसले. सुलतानराव हसण्याचा आणि गोडवा आणण्याचा प्रयत्न करीत म्हणाला,

" मावळातील शाही दौलतीचे कदीम अर्कान ! सारी मदार तुम्हा दोघांवर आहे हजरत बादशाहांची. बादशाहांना अभिमान वाटतो तुमच्या तलवारींचा, खानदानाचा ! "

पण यावर दोघेही अबोलच राहिले. त्यांनी कोणतीच ' दाद ' दिली नाही. चार क्षण अगदी सुन्न गेले. काय बोलावं हे सुलतानरावास समजेना. तेवढ्यात सलाबत गंभीरपणे म्हणाला,

" हैबतराव – "

" जी. "

" झुंजारराव – "

" जी. "

" आप वाकीफ होंगे की आदिलशाही सल्तनत खतरेमे है ! – "

– आणि लगेच सुलतानरावाने बोलायला सुरवात केली,

" खतरा लहानसान नाही हैबतराव, झुंजारराव ! दीड लाख फौज, अफाट तोफखाना, हत्ती, पागा घेऊन दिल्लीचा मोंगल जातीने निघालाय. सारी दौलत बुडवून आदिलशाही तख्त नीस्तोनाबूद करण्याचा इरादा आहे त्याचा. हुजूर आलमपनाह बादशाह सख्त चिंतेत आहेत. त्यांनी सुभेदारसाहेब बहादूरना जातीनं विजापुरास बोलावून घेतलं होतं. कालच सरकार विजापुराहून परत आले – "

सलाबतने झुरका घेत फक्त होकारार्थी मान हलविली. सुलतानराव पुढे म्हणाला,

" हजरतींनी येणाऱ्या भयंकर स्वारीची फारच फिकीर धरली आहे. ही दौलत ह्या काळाच्या जबड्यातून कोण वाचवील, ह्या चिंतेत खावंद आहेत. आजवरच्या संकटात मावळच्या देशमुखांनी जिवाचं रान केलं, दौलत तारली, पण आता – आता – "

गप्प ऐकत असलेल्या दोघांच्याही नजरा एकदम सुलतानरावाकडे रोखल्या

गेल्या. झुंजारराव एकदम बोलले,

"आता काय ? सरदेशमुख नामर्द झाले ? की निमकहराम झाले ? कुठं कमी पडली माझी तलवार, म्हणून खावंदांनी चिंता करावी ?"

हैबतरावही एका हाताची पाच आणि दुसऱ्या हाताची तीन बोटं सुलतान-रावापुढं करीत म्हणाले,

"इकती मुंडली हैत आमच्या घरातली तख्तासाठी. बेइमानी न्हाई ह्ये हत्यार !"

हैबतरावांनी मांडीशी ठेवलेली तलवार उचलीत म्हटलं; तेव्हा सुलतान-रावाने म्हटलं,

"खरंच आहे हे हैबतराव, झुंजारराव ! बादशाहांना अभिमान वाटतो तुमच्याबद्दल. हजारदा बोलून दाखवतात ते. भरदरबारात तुमची नावाजणी करतात, पण तरीही यावेळी त्यांनी अविश्वास —"

'अविश्वास' हा शब्द सुलतानरावाच्या तोंडून निघताच ते दोघेही इमानी देशमुख एकदम उफाळून ओरडले,

"अविश्वास ? अविश्वास ?"

"त्यो काय म्हनून ? हा झुंजारराव सवताच्या हातानं बाच्छावांच्या पायावर सवताचं ह्ये मुंडकं कापून वाह्यला अर्ध्या राती तैयार हाये ! दुसऱ्या कुनाचं मला न्हाई ठाव; पर ह्यो झुंजारराव असलं लागीर बोलनं न्हाई ऐकायचा !"

"माझ्या एकुलत्या येक पोरानिशी बाच्छावांच्या पायावर परान ठिवतो. ह्यो हिम्मतबहाद्दर खाल्ल्या अन्नाशी हरामखोरी करनारा न्हाई. काहीच्या बाही ऐकून घ्यायाचा न्हाई म्या ! घाररावाच्या औलादीचा हाये–"

"होय होय हैबतराव, झुंजारराव, खरं आहे तुमचं म्हणणं. खावंद नाका-रीत नाहीत, पण–"

"तरीही खातर न्हाई ?"

"अ– अ– नाही ! खातरजमा नाही ! थांबा थांबा, ऐकून घ्या. बाद-शाहा काय म्हणाले ते तरी ऐकून घ्या !"

"काय ? दिल्लीचा मोंगल रावनबळानं आला म्हनून म्या घाबरून माघारा पळंन ? का दगाबाजी करंन ? का कुचराई करंन ?"

"हां हां ! बादशाहा हेच म्हणताहेत, की जांभूळखोऱ्यातले देशमुख इमानी आहेत. शेर आहेत. त्यांच्या बहादुरीला तोड नाही, पण ते कुचराई करतात !"

हा आरोप सुलतानरावाने सांगताच सुरुंग उडावेत, तसे दोघेही एकदम उफाळून ओरडले–



– वे आपसमे झगडना चाहिए ! लेकिन मरना नही ! –

" कुचराई ? ती कशी ? "

" सांगतो. हजरत खावंद म्हणतात, की ही देशमुख–घराणी थोर आहेत. नेकजात आहेत, पण आपापसात फार भांडतात. वैर करतात. स्वारीवर बोलावलं तर साऱ्या बळानिशी येत नाहीत. घरादारांसाठी मागे फौजा राखून ठेवतात. रणात लढतात तरी ह्यांचं चित्त घराच्या काळजीने गावाकडे गुंतलेलं असतं आणि मग मनात नसलं, रक्तात नसलं, तरी हे असं न कळता सरकार–चाकरीत बळ कमी पडतं. कुचराई होते. मुद्दाम बेइमानीनं होत नाही, पण कुचराई घडतेच. कारण तुमची आपसातली वैरं ! सांगा, सांगा यात खावंदांचं म्हणणं कुठं चूक आहे ? ही कुचराई नाही का ? "

आता मात्र ते दोघेही गप्प झाले. आरोप अगदी अचूक होता. दोघांनाही पटत होता. दोघेही जमिनीकडे बघत राहिले. सुलतानराव म्हणाला,

" काय झुंजाराव ? हैबतराव ? "

चार क्षण अबोल गेले अन् झुंजारराव म्हणाले,

" या वेळी कुचराई व्हायची न्हाई. "

" नाही झुंजारराव, याच वेळी तुमच्या हातून कुचराई होईल ! "

" सुलतानराव ! "

" संतापू नका झुंजारराव, पण याचवेळी तुमच्या हातून तुमची इच्छा नसली तरी कुचराई होईल ! इतकंच नव्हे तर बादशाही हिताला धोका

पोहोचेल– ! ”

“ त्ये कसं ? ”

“ झुंजारराव, तुम्हीच जेजुरीच्या खंडोबाच्या देवळात देवापुढं उंबरठ्यात काय आणून वाहायची आण घेतलीय ? ”

“ आमची तीन गावं जाळली. माणसं मारली– ! ”

झुंजाररावांनी हे बोलताच हैबतरावांनी झुंजाररावांकडे बघत डोळ्याला डोळा देत म्हटलं,

“ गावं जळ्ळी, मानसं मेली ! मागल्या बारीला माझ्या पुतन्याला–साबाजीला येकला गाठून नांदूरखिंडीत कुनी कापला ? ”

“ थांबा, थांबा ! हैबतराव, झुंजारराव, ही राहू द्या भांडणं. इथं आपण आलो ते भांडायला नाही–एका दिलानं मोंगलाशी झुंजायचा डाव मांडायला. ह्या तुमच्या भांडणापायीच तुम्ही कुचराई करता, असं बादशाहा म्हणतात हा मुद्दा अन् तो खराच आहे. एकमेकांविरुद्ध बादशाहाकडे आतापर्यंत तुम्ही किती पत्रं लिहिलीत. आठवा बरं. गाडीभर पत्रं लिहिलीत. अजून लिहिता. मग सांगा, बादशाहांनी तुमच्या मदतीचा, चाकरीचा पुरेपूर विश्वास कसा धरावा ? अविश्वास ! अविश्वासच ! ”

“ सुलतानराव, ह्यो शबूद जिव्हारी झोंबतोय ! खावंदाच्या पायावर हात ठिऊन आन वहातो म्या, की ह्यो झुंजारराव साऱ्या बळानिशी खावंदाच्या हुकमाखाली झुंजंल. बेहत्तर हाये माझं घरदार कापलं ग्येलं तरी ! घरदारं पेटली तरी ! पर खाल्ल्या अन्नाला जागंन. मोंगलाच्या घशात ही दौलत न्हाई जाऊ द्येनार ! विजापुरास जाऊन खावंदांना वचन आन देतो म्या. मग तर झालं ? ”

“ ह्यो हैबतराव बी आन वहायला तयार हाये, की जसा माजा पुतन्या दगाबाजीनं कापला ग्येला, तसा माजा येकुलता येक सर्जा कापला गेला आन् सारं घरदार गाढवाच्या नांगराखाली ग्येलं तरी बी म्या साहीन ! पर कुचराई न्हाई करनार. झाडून साऱ्या बळानिशी खावंदांच्या वैऱ्याशी झुंजंन ! ”

“ हे बोलता बोलतासुद्धा तुम्ही दोघं एकमेकांवर अविश्वास दाखवता आहात ! वैर धरून वागता आहात ! सरदारांनो, बादशाहांच्या सुखासाठी, अन्नदात्याच्या कल्याणासाठी, तख्तासाठी, तुमच्या पिढीजात इमानासाठी ही आपसातील वैरं विसरून जा ! त्याशिवाय बादशाहांना जांभूळखोऱ्याबद्दल खात्री वाटणार नाही. विश्वास पटणार नाही. बादशाहांसाठी तुम्ही काय काय करायला तयार आहात ? ”

“ सवताची आन् पोराबाळांची मुंडकी तख्तापुढं वहायला तयार हाये म्या ! ”

" ह्यो हैबतराव शिबीराजासारखं सवताचं आन् पोराचंबी तुकडं करून तख्ताची पूजा बांधायला तयार हाये !"

" बादशाहांना ही सर्व खात्रीच आहे, पण तुमच्यासारख्या लाखामोलाच्या माणसांची मुंडकी का हवीत त्यांना कापून? त्यांना हवाय तुमच्या सर्व इमानी बळाचा बेकसूर आधार ! विश्वास !"

" बेलभंडार देतो ! "

" बादशाहांना तुमच्या बेलभंडारापेक्षा प्रत्यक्ष पुरावा हवाय !"

" देतो ! देतो !'

" देणार ?"

" खंडूबाची आन ! भवानीची आन !"

" मग बादशाहांना निर्वास्त बनविण्यासाठी एक गोष्ट करावी, अशी बादशाहांचीच तुम्हा दोघांना पदर पसरून अर्जवणी आहे–"

" छ्या छ्या ! खावंदांनी चाकरापुढं पदर कसा पसरावा ? हुकूम करावा ह्या झुंजाररावाला !"

" न्हाई हुकूम पाळला तर हात तोडा माझं !"

दोघांनीही आपआपल्याकडून भरवसा दिला, तेव्हा सुलतानराव म्हणाला,

" बादशाहांची अशी इच्छा आहे, अशी अर्जवणी आहे, विनवणी आहे, अशी फर्मावणी आहे, की झुंजाररावांनी आपली मुलगी हैबतरावांच्या मुलाला द्यावी !"

हे ऐकताच दोघंही दचकले. ते सुलतानरावाकडे बघत राहिले. दोघांच्या काळजात पिढ्यान् पिढ्यांचा एकमेकांवरील संताप उफाळून आला. झुंजाररावाच्या अंगावर घाम उमटला. हैबतरावाला ही कल्पनाही सहन होईना. वैऱ्याची पोर सून म्हणून आपल्या घरात घ्यायची ? मग त्यापेक्षा पोरासकट आगीत उडी घेऊन जीव दिलेला बरा ! झुंजाररावाला तर ही कल्पना ऐकवेनाही. आपली लाडकी दीपा ह्या राक्षसाच्या पोराला द्यायची ? त्यापेक्षा विहिरीत लोटून देऊ की ! आणि घामेजलेले झुंजारराव गरजले,

" न्हाई न्हाई ! ह्ये न्हाई व्हायाचं ! माझ्या हातानं पोरीचं मुंडकं उडिवतो. मायेचा पाश तोडतो. ज्यांच्यापायी म्या कुचराई करंन असं हुजूरना म्या वाटतं, त्यं मूळच कुऱ्हाडीनं तोडतो. म्या माझी लाडकी दीपा न्हाई द्येनार वैऱ्याघरी !"

" आन् हत्तं कुनाला उचकी लागलीय् सापाची पोर घरात घेयाला ?"

एकदम सुलतानराव ओरडला,

" थांबा ! तोंडं आवरा !"

क्षणभर सुलतानराव गप्प राहिला आणि कमालीच्या गंभीरपणानं

म्हणाला,

" समजलं सारं ! बादशाहांच्या, तुमच्या अन्नदात्यांच्या शब्दासाठी, पदर पसरून केलेल्या विनवणीसाठी तुम्ही काय काय करू शकता याचा हिशेब समजला ! बादशाहांसाठीं शिरं वाहू म्हणे ! शिबीराजासारखा देह कापून देऊ म्हणं ! तोंडची बडबड ! कसा विश्वास वाटावा ? बादशाहांनी साधी विनवणी, केली की एकमेकांचे व्याही व्हा ! रक्ताचे नातलग व्हा ! ते तुम्हाला जमेना. साहवेना ! पोटच्या लेकालेकींना ठार करण्याच्या गोष्टी तुम्हाला सुचतात, पण सुखाने भरल्या घरात नांदण्याची स्वप्नं काही तुम्हाला सुचेनात ! तुमचं इमान, तुमच्या आणाभाका, तुमचं हाडवैर आणि तुमची जिद्द सरकारांनी आत्ता ऐकलीय, पाह्यलीय. सरकार ती विजापूरला खावंदांच्या कानावर घालतीलच. "

गप्प बसून हुक्का फुकणाऱ्या सलाबतने फक्त मान हलवली; तेव्हा दोघेही जरा अस्वस्थ झाले. कारण बादशाहांच्या कानावर शेवटी काय जाईल अन् कसं जाईल, याचा भरवसा नव्हता. बादशाहाची मर्जी फिरली तर ? झुंजाररावांनी म्हटलं,

" लगीनगाठी बांधनं एवढा योकच इलाज हाये का ? दुसरा काय बी इलाज न्हाई ?"

" आहे ! एक इलाज आहे !"

" कंचा ? सांगा !"

" तुम्हा दोघांपैकी कोणाही एकाने घरादारासकट, बायकापोरांसकट जांभूळखोरं सोडून जावं !"

" म्हंजी ? वनवास पत्करावा म्हना की !"

" भांडण मिटल्याविना साऱ्या बळाची एकजूट बादशाही कामाला लागणार नाही. ती मिटायची असतील, तर हे एवढेच उपाय आहेत. जांभूळखोरं सोडा नाही तर एकमेकांशी नाती जोडा. त्याशिवाय हजरत बादशाहांना तुमचा भरवसा वाटणार नाही. येणारं संकट रावणाकुंभकर्णापेक्षाही भयंकर आहे. दीड लाखाशी झुंजून आपलं तख्त राखायचंय. बादशाहांची जांभूळखोऱ्यावर फार मोठी भिस्त आहे, पण भरवसा वाटत नाही—"

आणि मग किती तरी वेळ सुन्न शांततेत गेला. एकही शब्द उठला नाही अन् मग सिद्दी सलाबत पुटपुटला,

" मालूम हुवा..."

" काय ?"

" तुम्हारा इमान ! तुम्हारी जिद्द ! बादशाहके आर्जूकी आप लोक क्या कद्र करते है यह जाहीर होता है !"

हे ऐकताच दोघाही देशमुखांना ते शब्द झोंबले. त्यांचं इमान असं सलाबतने तोललं. त्यांतच झील धरली सुलतानरावाने. तो म्हणाला,

" तुम्हाला तुमची वैरं बादशाहांच्या इच्छेपेक्षा मोलाची वाटतात ! ठीक आहे, मर्जी तुमची ! सरकार हा सारा करीना बादशाहांना कळवतील !"

झुंजारराव अन् हैबतराव भणाणलेल्या डोक्याने बेचैन झाले होते. स्वत:च्याच मनाशी ते भयंकर झुंजत होते. काही क्षण असेच गेले आणि झुंजारराव आवंढा गिळीत मोठ्या कष्टाने म्हणाले,

" मायबाप खावंदांच्या बोलाकरता म्या माझी पोर दावेदाराच्या घरात द्यायाला तयार हाये ! "

" शाब्बाश झुंजाराव ! हम तुम्हारे इमानदारीकी कद्र करते है, शाब्बाश ? "

आता सारी परीक्षा हैबतरावांवर आली. झुंजारराव होय म्हणाले. आता ? –

हैबतरावांची मान वर उचलली गेली. त्यांच्या कपाळाला आठ्या पडलेल्या होत्या. ओठ थरथरत होते. अखेर अपरंपार कष्टाने त्यांच्या तोंडातून शब्द निघाले,

" म्या तयार हाये ? माझ्या सर्जाला म्या लगीनभवल्यावर उभा करंन ! "

सलाबत एकदम मोठ्याने हसला. त्याची टाळी वाजली. मावळपट्टीतील एक कामगिरी फत्ते झाली. पुढं युद्धात काय व्हायचं ते होवो, पण आज तरी बादशाहांच्या इच्छेप्रमाणं, आज्ञेप्रमाणे घडलं, याचा त्याला फार मोठा आनंद झाला. सुलतानरावाला तर बिलक्षण आनंद झाला. भांडण मिटणार आणि दोन मराठी घराणी नात्याने जोडली जाणार म्हणून नव्हे, तर आपल्या अंगावर आलेली कामगिरी एकदाची तडीला जाणार म्हणून ! सुलतानराव म्हणाला,

" हैबतराव, झुंजारराव, फार फार मोठी मनं केलीत तुम्ही. आता लौकर घ्या उरकून. स्वारी तोंडावर येतीय. "

" हम खुद शादीमे हाजीर रहेंगे ! "

सुलतानरावाने पानदान पुढं सरकवलं. सुलतानरावाचा भाव वाढला होता !

* * *

रात्र खूप झालेली होती. गडाचे दरवाजे उघडले. हैबतराव आणि झुंजारराव हे दोघेही आपआपल्या स्वारांसह गडाबाहेर पडले. एकमेकांशी ते अक्षरही बोलत नव्हते. दोघेही मनापासून असंतुष्ट होते. झुंजाररावांच्या डोक्यात जेजुरीच्या देवळातली घंटा घणघणत होती !

गडाच्या पायथ्यापर्यंत घोड्यांच्या टापाशिवाय दुसरा शब्द उमटला नाही.

पायथा येताच हैबतरावांनी थेट कळशाच्या रोखाने घोड्याला टाच मारली. जाताना त्यांनी झुंजाररावांकडे वळून बघितलंसुद्धा नाही. झुंजाररावांनीही डावीकडे लगाम खेचला आणि सावंगीकडे ते दौडत सुटले.

झुंजारराव सावंगीत आले. गोजाक्का आणि चंद्राक्का जाग्या होत्या. पोरं झोपलेली होती. दीपाला गाढ झोप लागलेली होती. झुंजारराव न बोलता दीपाकडे क्षणभर बघत राहिले. त्यांना भडभडून आलं. कमनशिबी पोर ! वैऱ्याच्या घरात पडणार ! ते झटकन् निघून गेले. आपल्या अंथरुणावर त्यांनी अंग टाकलं. चंद्राक्काची जोडवी वाजली. ती म्हणाली,

"हये व काय ? निजलायसा ? भाकर न्हाई खायाची ? उपाशीच झोपतासा ? "

" मला भूक न्हाई ? "

झुंजाररावाने तोंडावर पांघरूण ओढलं.

– हैबतरावांच्या डोक्यातलं वादळ बेपर्वा उसळत होतं. पण ह्या लग्नाचं दु:ख होण्यापेक्षा राग येत होता. 'झुंजाररावांचे व्याही' हा नात्याचा शिक्का अपमानकारक वाटत होता. लगीन होऊन वैऱ्याची पोर घरी येणं वाईटच, पण बळंआळं जुलमानं हे लगीन करावं लागतंय्. उपाय नाही. सापाची पोर घरी येतीय. येऊ द्या ! वाड्यात दहा–वीस गुरंढोरं, कुत्री मांजरी आहेत तशी हीही राहील ! औक्षाची दोरी असेल तवर जगेल ! नाही तर मरेल ! काय त्याचं सुख दु:ख ? पण अपमान वाटतोय् त्या वैऱ्याचा व्याही होण्यात.

हैबतराव घरी आले. त्याना एक गोष्ट आधी समजलीच होती, ती गडावरच्या बोलण्यात सुलतानरावाच्या तोंडून बाहेर पडली. झुंजाररावांनी जेजुरीच्या खंडोबापुढं आण वाहिली आहे, की हैबतरावाचं मुंडकं............ अन् आता अशी आण वाहणाऱ्या वैऱ्याशी सोयरीक जोडायची वेळ आली होती.

हैबतरावांच्या दहा वर्षांचा पोरगा सर्जा झोपला होता. हैबतरावांच्या वाड्यात खाशी माणसं फक्त ही दोनच. ते आणि सर्जेराव. सर्जेरावांची सख्खी आई नुकतीच मरण पावली होती. सावत्र आया दोन होत्या. त्याही मागेच मरण पावल्या होत्या. हैबतरावांना एक सख्खा पुतण्या होता. साबाजी त्याचं नाव. पण झुंजाररावांच्या शिपायांनी अगदी अचानक त्याला एका खिंडीत गाठून उडवला. त्याची बायको सती गेली. आता घरात माणसं होती फक्त नोकरचाकर, कुळंबिणी आणि स्वारशिपाई. घर गजबजलेलं असायचं. गाईवासरं, घोडीपाडी खूप होती. पण हैबतरावांना फार दु:ख व्हायचं, की कुंकू लावायला घरात सवाशीण नाही.

––सबंध रात्रभर झुंजाररावांना झोप लागली नाही. पहाटे उठून रोजच्या-

प्रमाणे आंघोळ करून ते देवघरात जाऊन बसले. त्यांना काही सुचत नव्हतं. दीपाबाईच्या काळजीने ते खिन्न झाले होते. एक तास गेला. चंद्राक्का दुधाचा तांब्या घेऊन आली. जेजुरीच्या देवळात नवऱ्याने घेतलेली भयंकर आण ऐकूनच ती धास्तावली होती. दूध ठेवीत म्हणाली,

" दूध ठिवलंय् ! घ्यावा ! "

" मला नगं दूध. ! "

" अवो असं काय करता. "

" तू हतून जा वगू. ! "

चंद्राक्का गेली. तिने गोजाक्काला सांगितलं,

" वैन्सं, ह्ये वगा कसं करत्याती. काय हाय डोक्शात त्ये बी उमगंना. "

चंद्राक्काला हुंदका आला. गोजाऊने आपल्या भावजयीची समजूत घातली. ती स्वत: देवघरात आली. भावापुढं बसत म्हणाली,

" आबा, कशाची रं खंत धरलीस ? काय झालं गडावर काल राती ? सांग तरी ? दूध न्हाई घ्यायाचं. ! हं घ्ये ! "

गोजाऊनं सरळ तांब्या उचलून त्याच्या तोंडाला लावला. अगदी मुकाट झुंजाररावाने दूध घेतलं.

" सांग मला तुझं दुक ! का म्हनून चिंतावलास यवढा ? आ ! "

" गोजाक्का, काय सांगू ? पोरीचं वाटुळं करनं आलं आपल्याच हातानं ! माझी गुनाची दीपा ! "

" आ ? म्हंजी ? काय झालं तरी काय आबा ? माझ्या दीपीचं काय–"

" गोजाक्का, काल म्या गडावर गेलो हुतो– "

आणि सारा प्रकार त्यांनी गोजाक्काला सांगितला. गोजाक्का एकदमच गंभीर झाली. दारामागून हुंदका फुटला. चंद्राक्का ऐकत होती सारं.

" वैऱ्याच्या घरी पोर द्यायाची पाळी आली. त्यो हैवतराव राक्षस हाये ! हैवान हाये ! माझ्यावरला राग त्यो पोरीवर काढील. छळून छळून मारील तिला ! "

दिवस वर चढत होता. दीपाला समजेना, की आत्या अन् आई आपल्याला पोटाशी धरून का रडताहेत. सारं वातावरण गंभीर झालं होतं.

सुभेदाराकडून माणसं येत-जात होती. त्यातच दिल्लीकडल्या बातम्याही भयंकर येत होत्या. मोंगल बादशाह शंभर कोस पुढं आल्याच्या ताज्या खबरा होत्या. जो तो आपल्या घरादारांच्या, मुलामाणसांच्या विवंचनेत होता. त्यातच झुंजाररावांच्या घरात लगीन निघालं होतं. झुंजारराव आणि हैबतराव यांच्या घरच्या भटजींनीच एकमेकांकडे हेलपाटे चालविले होते. दोन्ही घरची खाशी माणसं अजीबात जात-येत नव्हती. हैबतरावाचं तर ह्या लगीन-

सोहाळ्यात लक्षही नव्हतं. सारा उत्साह होता सुलतानरावाचा ! झुंजारराव समजत होते, आपली पोर मेली !

दीपाऊला कळलं, आपलं लगीन आहे म्हणून. उगीचच लाजत होती. पोरी तिला चिडवीत होत्या. गोजाऊआत्या मात्र काळजीनं करपली होती. लगीन सावंगीला झुंजाररावांच्या घरी लागायचं ठरलं होतं. तीथ ठरली, वार ठरला.

मांडव पडला. हळदी लागल्या. भोवलं सजलं.

लग्नाचा दिवस उगवला. कसंही झालं तरी मोठ्या घरचं लगीन. सारा गाव गजबजला. ताशे-वाजंत्र्या तडाडू लागल्या. सुभेदार जातीनं येणार होता लग्नाला. दुपार उलटली. नवरदेव कळशाहून वाजत-गाजत यायचा होता. हैबतराव तर स्वत: येणारच नव्हते ! पण सुभेदाराने डोळे मोठे केलेले दिसताच त्यांनी बेत बदलला. लग्नाला जायचं ठरवलं

उन्हं पार कलंडली. सावंगीतली पोरं उंच उंच झाडांवर चढून नवरदेवाची स्वारी येताना दिसतीय का ते पाहू लागली. घटका गेली आणि झुंजाररावांना सांगावा आला, की नवरदेव अर्ध्या कोसावर आला. हैबतराव, सुलतानराव आणि हैबतरावांचं सारं गोत बरोबर आहे. करवल्या, मैतरणी, सगेसोयरे तयार झाले. झुंजारराव साऱ्या घेऊन सामोरे निघाले.

नवरा वेशीपाशी आला. व्याह्याच्या सामोरे झुंजारराव गेले, पण हैबत-रावांनी निरोप धाडला, की व्याह्या-व्याह्याच्या भेटी व्हायच्या नाहीत ! काय विधी करायचे ते आम्हाला वगळून करा ! झुंजाररावांच्या हातातला मानाचा नारळ तसाच राहिला.

नवरदेवाचे मानपान झाले. लिंबलोण उतरलं. वाजतगाजत नवरा मांडवात आला. मामाच्या कडेवर बसून दीपा आली. अंतरपाटाच्या अल्याड-पल्याड नवरानवरी माळा घेऊन उभी राहली. मंगलाष्टकं गरजली. अक्षता पडल्या. अंतरपाट दूर झाला. टाळी कडकडली. वाजंत्र्या दणाणल्या. फैरी झडल्या. दीपाने सर्जेरावाला माळ घातली. वैऱ्याचा पोर झुंजाररावांचा जावई झाला. वैऱ्याची पोरगी हैबतरावांची सून झाली. नवरानवरीच्या पदरांना गाठ बसली. गोजाऊ दुरूनच निरखू निरखू बघत होती, आपला जावई कसा ते ! काही दिसेना !

जेवणंखाणं झाली. हैबतरावांनी मला जेवायचं नाही, असं साफ कळवलं ! पाणीही ते प्यायले नाहीत ! हे वागणं पाहून झुंजाररावांना दीपाचं पुढचं सारं नशीब चक्क दिसत होतं.

लग्नात बडेजाव होता सुलतानरावाचा. सुभेदार तर येईन म्हणून कळवूनही आलाच नाही.

वरातीची तयारी झाली. हलग्या, ताशे, ढोल, झांजा, तास, कडी वाजू

लागली. वरातीचं घोडं सजून उभं होतं.

घरात आई अन् आत्या रडत होत्या. झुंजारराव गंभीरपणे हालत–डुलत होते. कामं उरकीत होते. नवरानवरी देवाच्या पाया पडायला आली. आत्या पुढं झाली. तिला भरून आलं. चंद्राक्कानं भरल्या डोळ्यांनी पोरांची दीठ काढली. झुंजाररावांना मन आवरवेना. त्यांनी दोन्ही पोरांना एकदम मिठी मारली. हुंदका फुटला. ते कसंबसं म्हणाले,

" माझ्या बाळांनू, सुखी नांदा ! कुळाचं नाव मोठं करा ! "

त्यांनी उपरण्याने डोळे टिपले आणि दीपाला म्हणाले,

" मुली, आता आजपासून तू सासूरवाशीन झालीस. आता ध्यानात ठीव– इथून पुढं तू आधी सून हायेस हिम्मतबहाद्दरांची आन् मग लेक हायेस झुंजाररावाची ! आधी सवताचं घर सांभाळायचं. तू तुझ्या घरची लक्षिमी झाली हायेस. इसरू नगंस–"

झुंजाररावांनी जावयाला आणि लेकीला बोटांशी धरलं. ते त्यांना घेऊन बाहेर मांडवात बसलेल्या हैबतरावांकडे चालले. हैबतराव रोखलेल्या डोळ्यांनी बघत होते. झुंजाररावांचे ओठ गहिवराने थरथरत होते. सारा


दीपावली शुभेच्छा

४%

बचत खात्यावरील नवीन आकर्षक व्याज.
मुदतठेवींवर-जास्तीतजास्त ७½%
मुदतीप्रमाणें

MB

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

657



वधूपिता

मांडव थबकला होता. वाद्यं थांबली होती. झुंजारराव पोरांना घेऊन हैबत-रावांच्या पुढं आले. ते पोरांना म्हणाले,

"बाळांनू, पाया पडा वडलाच्या !"

पोरं हैबतरावांच्या पाया पडली अन् लगेच झुंजाररावांनी उपरण्याचा पदर हैबतरावांच्या पायावर पसरीत म्हटलं,

"व्याही, आजवर दावेदार म्हनून भांडत होतो. आज एका लेकीचा बाप म्हनून तुमच्याम्होरं पदर पसरतोय. काय सजा करायची ती मला करा. ही पोर पदरात घालतोय्. तुमच्या घरातली ती लक्षिमी झाली हाये. चुडे–मळवट लेवून तुमच्या घरात येतीया ती. व्याही, पदरी घ्या. सून म्हनून तुमच्या पदरात घालतोय, पण लेक म्हनून सांभाळा. व्याही, आजवर वैर केलं–दया करा ! दया करा ! चुकलं आमचं !"





हैबतरावांनी एकदम झुंजाररावांना मिठी मारली. ते मोठ्याने गरजले,

" संपलं वैर ! झुंजारराव, तुम्ही आमचे व्याही झालात ! माझी लक्षिमी– माझी सूनबाई ! "

हैबतरावांनी दीपाला आणि सर्जेरावाला एकदम उचलून कडेवर घेतलं. ते मोठ्याने हसत होते. त्यांच्या डोळ्यांतून पाणी पाझरत होतं. मांडवात एकदम आनंदाचं उधाण आलं. झुंजारराव डोळे टिपीत हसत होते. तिकडं दूर दारात उभ्या असलेल्या गोजाऊ–चंद्राऊ आनंदाचे हुंदके देत होत्या. वाद्यं वाजवणारांनी एकदम सारं गाव डोक्यावर घेतलं होतं. पोरं नाचत होती. हैबतरावांच्या दोन्ही कडेवर सर्जा आणि दीपा होती.

फक्त एकाच माणसाचा चेहरा जरा उतरला होता– सुलतानरावाचा !

झुंजारराव हैबतरावांना आर्जवाने म्हणाले,

" हैबतराव, पंगतीला चार घास खाऊन घ्या ! जेवलेलं न्हाईत तुम्ही ! "

" माझं पोट भरलं ! आता जेवनाखानासाठी माझ्या लेकरांची वरात न्हाई थांबायची ! चला रं ! "

हैबतराव ऐकेनात. खरोखर ते निघाले.

हैबतरावांच्या एका माणसाने वरातीसाठी सजवलेलं घोडं पुढं आणीत म्हटलं,

" धनी, नवरानवरी बसवा घोड्यावर ! "

" न्हाई न्हाई ! येडा हायेस तू ! माझ्या पोरांची वरात माझ्या अंगाखांद्यांवरूनच जायची ! वाजतगाजत ! "

अन् खरोखरच हैबतरावांनी कडेवर घेतलेली ती मुलं खाली न उतरवता तशीच घेऊन चालायला सुरवात केली. सारं वऱ्हाड वरातीबरोबर चालू लागलं. मशालीच्या उजेडात आणि वाद्यांच्या तालात वरात चालू लागली. वरातीत आनंद नारंदीसारखा खळाळत होता. झुंजारराव आनंदाने भारावले होते. वरात वाढत्या कल्लोळात कळशाकडे चालली होती.

* * *

वरात कळशाच्या वेशीत आली. वेशीलगत मारुतीचं देऊळ होतं. देवळाच्या पायरीवर गुरव उभा होता. त्याने शिंग फुंकलं. नवरानवरींनी मारुतीचं, भैरोबाचं आणि भवानीचं दर्शन घेतलं. ही देवळं लागून लागूनच होती.

वरात पुढं वाड्याकडे चालू लागली अन् हैबतरावांना एकदम आठवलं, की आपण आपल्या वाड्याची रागापायी काहीसुद्धा लगीनशोभा केलेली नाही. दिवा नाही, पणती नाही, तोरण नाही – अंब्याची डहाळीसुद्धा नाही टांगली. वाडा उदासवाणाच ठेवला. का, तर हे लगीन म्हणजे जुलमाचा रामराम आहे. सर्जाचं खरं लगीन पुढं व्हायचंय् म्हणून ! अन् आता मात्र हैबतरावांना वाईट वाटलं. माझी ही लक्ष्मीसारखी सून सोन्याच्या पावलांनी घरी येणार अन् घर ह्ये असलं उदासवाणं ! छ्या छ्या ! आपण काय बरं नाय केलं !

पण आता काय उपयोग ? आयत्यावेळी काय करता येणार ? हैबतराव मुकाट चालत राहिले. वाडा जवळ आला. कोपऱ्यावर चौकात उजवीकडं वळलं, की समोरच वाड्याचा भव्य दरवाजा.

वाद्यं दणाणत होती गुलाल उधळत होता. मशाली फुरफुरत होत्या. शिंगं ललकारत होती. बंदुकांच्या फैरी कडाडत होत्या. अवघा कळसा धुंद झाला होता.

चौकात कोपऱ्यावर वरात वळली. समोरच वाड्याचा दरवाजा होता. लेकासुनेला कडेवर घेतलेल्या हैबतरावांचं लक्ष समोर दरवाजाकडे गेलं. ते चकितच झाले. त्यांचे डोळे विस्फारले गेले. त्यांच्या मुद्रेवर आनंद उमटला. त्यांचं मन उचंबळून आलं. वाड्याच्या दरवाजावर असंख्य पणत्या झगमगत होत्या. केळीचे खुंट लटकलेले होते. बेगडाचं तोरण आणि नारळाचं तोरण खुलत होतं. हाती पंचारत्या घेऊन, नाकी नथा घालून पाच सवाष्णी पदर सावरीत

उभ्या होत्या. एकजणीच्या हाती लिंबलोण होतं. एकीच्या शिरावर घागर होती. दरवाजावरच्या सज्जात नगारा झडत होता. अंब्याच्या डहाळ्या लटकत होत्या.

हैबतराव दरवाजाशी आले. सडे–रांगोळ्या घातलेल्या होत्या. नवरा-नवरीला बायकांनी ओवाळलं. लिंबलोण उतरून टाकलं. त्यांच्या पावलांवर घागर ओतली. डोळ्यांना पाणी लावलं. दीपाऊनं नवऱ्याबरोबर सासरच्या दरवाजात पाऊल टाकलं. मागोमाग हैबतराव चालत होते.

आतल्या प्रशस्त अंगणात गावकऱ्यांची दाटी झालेली होती. सर्वत्र पणत्या लखलखत होत्या. बसायला जाजमं अन् झोरे अंथरले होते. खाशा सदरेवर गाद्या, लोड, तकिये घालून सदर सजवलेली होती. पानदाने ठेवलेली होती. मुलांना घेऊन हैबतराव देवघरात गेले. देवघरही फुलांनी, रांगोळ्यांनी, समयांनी आणि कलशांनी सजवलेलं होतं. वाडा इतका न सांगता कुणी सजवला असेल, याची कल्पना त्यांना ताबडतोबच आली. त्यांची नजर शोधतच होती आणि हैबतरावांना ते पलीकडच्या दालनात काहीशा अंधारात उभे असलेले अंधुकसे दिसले. मुलांनी देवापुढं खणनारळ ठेवले. डोकी टेकवली अन् गदगदलेल्या आवाजात हैबतरावांनी त्या दालनाकडे बघत हाक मारली,

" अप्पा ! रावजीअप्पा ! "

आणि साठी ओलांडलेली एक शिडशिडीत व्यक्ती अंधारातून देवघराकडे येऊ लागली. रावजीअप्पा देशपांडे ! हैबतरावांचे कारभारी. पिढीजात कारभारी. त्यांची सारी हयात ह्या वाड्याची सेवा करण्यात गेली होती. धोतर, चुणीदार अंगरखा, करवतीकाठी उपरणं, डोक्यावर गरगरीत तांबडं पागोटं, पांढऱ्याशुभ्र भरदार मिशा, आडवं गंध, कानांत चौकडे, भीकबाळी आणि बोटात नवग्रहांची अंगठी. म्हातारा अंधारातून उजेडात आला. हैबत-रावांनी ओळखलं होतं, की वाडा सजवला अप्पांनीच. हैबतरावांनी हसून अप्पांकडे पाहिलं. ते मुलांना म्हणाले, " सर्जा, दीपा, आपल्या अप्पांच्या पायावर डोई ठिवा. "

मुलांनी नमस्कार केला. अप्पांनी मुलांना पोटाशी धरीत म्हटलं,

" मार्कंडेयाच्या औक्षाचे व्हा ! रामराज्य करा ! "

" अप्पा, आज माझ्या सर्जाची आई असती तर ...... "

हैबतरावांचे शब्द अपुरे राहिले. ते वळले. ते अप्पांना म्हणाले,

" अप्पा, बिगी बिगी समदं डागडागिनं आना. " मशाल घेऊन उभ्या असलेल्या माणसाला घेऊन चटकन् अप्पा आत गेले. दीपाऊच्या अंगावर मंगळसूत्राच्या पोतीशिवाय आणि हिरव्या चुड्याशिवाय काहीही नव्हतं. हैबतरावांनी काहीही तिच्या अंगावर घालायचं नाही असं ठरवलं होतं ना !

अगदीच थोडया वेळात अप्पा आले. त्यांच्या हातात भलं मोठं ताट होतं. मशालीच्या उजेडात त्यातील डागडागिने लखलखत होते. हैबतरावांनी एक एक त्यातील डागिना घेऊन दीपाच्या अंगावर घालण्यास सुरवात केली. सरी, पुतळचाची माळ, टीका, ठुशी–पण ते सारे डागिने मोठया वयाच्या बाईचे, सर्जाच्या आईचे होते. ते दीपेच्या अंगावर मोठे होत होते. हातांतले गोट, तोडे, येळा, पायांतले तोडे, कमरपट्टा हे डागिने तर बसणं शक्य नव्हतं. नथ तर दीपेच्या नाकापेक्षाही मोठी होती ! गळचातले डागिने फक्त दीपाच्या गळचात, तेही हाराप्रमाणे बसले. दीपा आता मात्र थेट गणपतीच्या गौरी-सारखी दिसू लागली.

झुंजारराव शेजारीच उभे होते. वैर करणारे हैबतराव सून आल्याबरोबर एकदम पालटले होते. आधी लेकीच्या आयुष्याची आणि सुखाची चिंता करणारे झुंजारराव हा पालटलेला रंग पाहून अक्षरश: भांबावून गेले होते. जी घराणी एकमेकांना आगीत बघत होती, ती घराणी आज एकमेकांना सुखाने भिजवीत होती. सर्जेराव अन् दीपाऊ यांचं लगीन लागलं आणि पिढयान् पिढयांचं वैर नारंदीत वाहून गेलं. झुंजाररावांना, रावजीअप्पांना आणि सर्वांना वाटत होतं, की आपण पाहत आहोत, ते एक स्वप्न तर नाही ना ?

झुंजाररावांच्या मागेच सुलतानराव उभा होता. झुंजारराव त्याच्याकडे वळून म्हणाले,

" सुलतानराव, माझ्या पोरीचं भाग्य लई लई मोठं ! "

यावर सुलतानराव कसंसंच हसला अन् त्यांच्या कानाशी पुटपुटला,

" –पण झुंजारराव, तुम्ही खंडोबाच्या देवळात घेतलेल्या शपथेचं काय ?"

झुंजारराव लगेच म्हणाले,

" आन मोडली ! तुटली ! तुमच्या रूपानं खंडोबानं ती आन मोडायला लावली ! "

चार दिवस लगीनसोहाळा गाजला. दिवस कसे गेले, ते समजलंही नाही. असा देखणा जावई मिळालेला पाहून गोजाक्का हरखून गेली होती. ती खंडोबाला नवस बोलली होती. तिचा आत्तापासून झुंजाररावांच्या मागे तगादा लागला होता, जेजुरीला चला म्हणून. जावई मनासारखा मिळाला होता ना ! तिचा नवस होता, की तालेवार जावई मिळू दे......

हैबतरावाच्या वाडचाला एकदम निराळं रूप आलं होतं. दीपाच्या हसण्या–खेळण्याने वाडा निनादत होता. सर्जेराव आणि दीपा यांचा जोडा मनात भरत होता. हैबतरावांना तर असं झालं होतं, की पोरांना कुठं ठेवू ! त्यांना दीपाचा लळा लागला. आपलं लग्न झालं म्हणजे नेमकं काय झालं, हे

दीपाला कळतही नव्हतं. चार नव्या मैतरणी मिळाल्या होत्या. सर्जा नावाचा नवरा मिळाला होता ! नवरा म्हणजे सध्या तिच्या हिशेबी सौंगडी एवढाच अर्थ होता, पण हा सौंगडी तिला मनापासून आवडलेला दिसत होता. पोरीचा स्वभावच खेळकर होता. कुठंही रमायची. हैबतरावांना ती सर्जा-प्रमाणेच ‘ दाजी ’ म्हणत होती. गोजाक्का तिला म्हणाली,

“ अग, तुझे ते सासरे हैती ! ‘ मामंजी ’ म्हन त्यास्नी ! ”

पण काही जमेना ! रोज रात्री आत्याच्या मांडीवर डोकं ठेवून झोपी जायची सवय होती तिला. आत्याला काळजी पडली होती, पण दीपाला काळजी पडलीच नाही. ती सरळ हैबतरावांच्या मांडीवर डोकं ठेवून झोपू लागली. हैबतरावांची ओसरी सागरगोटचांनी गजबजली. त्यांनी मधल्या



दालनात तिला झोपाळा बांधून दिला. सोनाराला बोलावून त्यांनी दीपाऊसाठी पाटल्या, गोट, येळा, नथ, तोडे, पुतळ्या करायला टाकल्या.

आठ–दहा दिवस गेले. लढाईचे ढग जमत होते. मोंगलांच्या स्वारीच्या बातम्या येत होत्या. हैबतराव एका बाजूला लढाईची तयारी करीत होते. एका बाजूला दीपाचा संसार सजवीत होते. ते रमले होते. स्वत:ला विसरले होते. एका तासात शंभरदा त्यांच्या तोंडून नाव उमटत होतं दीपाचं. 'दीपा ऽ! दीपाबाई ऽ! दीपाऊ ऽ! मुली ऽ! सूनबाई ऽ! पोरी ऽ!' गेली पंचवीस वर्षं झुंजाररावांना जिकता न आलेला हा हिम्मतबहाद्दर दीपाने आठ दिवसांत गोड गोड हसून आणि गोड गोड बोलून काबीज करून टाकला होता.

आठ दिवस लग्नाला उलटले. कुळाचे देवधर्म, रीतरिवाज झाले. एके दिवशी सकाळी गोजाक्का आणि झुंजारराव हैबतरावांच्या घरी आले. आगतस्वागत झालं. गप्पागोष्टी रंगल्या. पानविडे रंगले अन् झुंजारराव म्हणाले,

"हैबतराव—"

"बोला व्याही!"

"दीपाऊला न्यायला आलो हुतो! रिवाजापरमानं—" होय, रिवाज असा होता, की लग्नानंतर नवरीमुलगी माहेरी यायची. मुली लहान असत. लगीन होऊनही मुलींनी माहेरीच राहायचं आणि मग मधूनअधून एखाददुसरा दिवस कारणाकारणाने सासरी यायचं. मग पुढं पदर आला, वय जाणतं झालं, की नांदायला सासरी यायचं. रिवाजाप्रमाणे दीपाला माहेरी न्यायला झुंजारराव व गोजाऊआत्या हैबतरावांकडे आले. ही दोघं कशाला आली आहेत, हे हैबतरावानं ओळखलं होतंच. झुंजाररावांनी विषय काढला,

"दीपाऊला न्यायला आलो हुतो—"

"साफ सांगतो झुंजारराव, पोरीला पाठीवनार न्हाई! माझी दीपा आता माझ्या घरातच ऱ्हायाची. ती आता तुमची न्हाई, आमची हाये! ती माझी सून बी हाये आन् लेक बी हाय! रीतरिवाज ह्याबाबतीत आम्ही न्हाई वळखीत!"

आता काय बोलायचं? झुंजारराव हसायला लागले. हैबतरावही हसायला लागले. हसता हसता दोघांच्याही डोळ्यांना पाणी आलं.

आणि नवल पाहा! ती पोरटीही चुकून म्हणाली नाही की, आत्या, मी तुझ्यासंगं येते म्हणून! कारटी माहेरची माया विसरली! पोरींची जातच ही असली! ● ●

[पूर्वार्ध समाप्त. उत्तरार्ध, १ डिसेंबर, १९६५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या पुढील अंकी.]


किर्लोस्कर
दीपावली शुभेच्छा
ही दिवाळी व नूतन वर्ष आमच्या
ग्राहकांस व हितचिंतकांस
सुखसमृद्धीची व आनंदाची जावो.
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.
एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

# जेव्हा इंग्लंड युद्धसज्ज होते . . .

लेखक : मा. र. साबडे

सर्व क्षेत्रांत, सर्व आघाड्यांवर 'स्वावलंबन' व 'स्वयंपूर्णता' ही आपली उद्दिष्टे म्हणून घोषित झालेली आहेत.

पण प्रत्यक्ष अनुभव काय आहे ? सांगली भागातील एक प्रख्यात कार्यकर्ते श्री. वसंतराव दादा पाटील यांचेच उदाहरण पुरेसे बोलके आहे. कदाचित ते प्रातिनिधिकही असेल.

सांगली जिल्हा परिषदेच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन समारंभ-प्रसंगी (दि. ६ सप्टेंबर १९६५) भाषण करताना आ. वसंतराव म्हणाले,

"धान्यआघाडीवर आम्ही काही मोठ्या प्रमाणात कार्य करू इच्छितो. आम्हाला लागणाऱ्या साहित्याबद्दल सरकारातून हुकूम सुटतात, पण साहित्य येथे येतच नाही. खतासंबंधी हुकूम आला आहे, पण खत येत नाही. इंजिनसंबंधी हुकूम आला आहे, इंजिन्स येत नाहीत आणि हा काय प्रकार चालला आहे, हे आम्हाला कळत नाही. युद्ध-काळात नियम जर प्रगतीच्या आड येत असतील तर, नियमांचा अनुकूल अर्थ लावायला आपण सिद्ध पाहिजे......नियमांचे अडथळे असेच येत राहतील तर श्रेष्ठ नेत्यांच्या घोषणा व्यर्थ आहेत."......

राष्ट्रीय नेत्यांचे संकल्प आणि कार्यकर्त्यांचे अनुभव यांत आजही एवढी तफावत आढळून येत आहे. या संदर्भात युद्धकाळात ब्रिटनने गाजविलेल्या विधायक कर्तृत्वाचा हा आलेख वाचकांना खासच उद्‌बोधक वाटेल.

★

१९४० मध्ये फ्रान्सचा पाडाव झाल्यानंतर इंग्लंडची अनतिक परिस्थिती झाली होती. इंग्लंडच्या युद्धसामुग्रीचा फार मोठा साठा बेल्जियममध्ये होता. त्यातील बराचसा शत्रूच्या हाती लागला व काही उद्‌ध्वस्त झाला. युरोपमधील पोलंड, हॉलंड, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्स ही राष्ट्रे हिटलरच्या भक्ष्यस्थानी पडली होती. तेथील कच्च्या मालाचे साठे, दारूगोळ्याचे कारखाने जर्मनीच्या ताब्यात गेले होते. जर्मनीची तयारी दिवसेंदिवस वाढत होती व इंग्लंड, युरोपमधील सर्व मित्रराष्ट्रे गमावून एकाकी पडले होते. इंग्लंडचे सागरी दळणवळण धोक्यात आले होते व



युद्धाची वास्तवता

अन्न, कच्चा माल यांच्या आयातीवर अवलंबून असणाऱ्या इंग्लंडपुढे यामुळे मोठे संकट उभे होते. अमेरिका युद्धात पडण्यास अजून तयार नव्हती. देशातील अर्थ-व्यवस्थाही युद्धासाठी सज्ज नव्हती. अशा परिस्थितीत जवळ शस्त्रास्त्रांचा पुरेसा साठा नाही, दळणवळणाची साधने तुटलेली, बाहेरून मदत मिळण्याची साशंकता, या अशा कठीण अवस्थेत इंग्लंडने जर्मनीशी जी यशस्वी टक्कर दिली, त्याला इतिहासात तोड नाही. ब्रिटिश जनतेच्या राष्ट्रप्रेमाची, त्यागाची, चिकाटीची व त्याचप्रमाणे ब्रिटिश उद्योगधंद्यांनी या आणीबाणीच्या काळी देशासाठी जी कामगिरी केली व युद्धासाठी

लागणारी शस्त्रास्त्रे, इतर आवश्यक साधनसामग्री आणि देशात नागरिकांसाठी आवश्यक मालाचा पुरवठा करण्याची जबाबदारी घेऊन ती यशस्वीपणे पार पाडली, तीही अभूतपूर्व म्हणावी लागेल. अर्थव्यवस्था युद्धप्रवण झाल्यानंतर किती पटींनी उत्पादन वाढेल, ह्याचे जे अंदाज खुद्द ब्रिटिश सरकारने केले होते, त्याच्या कितीतरी पटींनी अधिक उत्पादन करून व आघाडीवरील सैनिकांना शस्त्रास्त्रे व इतर सामग्रीचा भरपूर पुरवठा चालू ठेवून ब्रिटिश कारखानदार व कामगार यांनी आपल्या राष्ट्रप्रेमाची उज्ज्वल साक्ष दिली. ही उत्पादनवाढ त्यांनी कोणत्या बिकट अवस्थेत केली, हेही पाहण्यासारखे आहे. माणसे आपल्या नजीकच्या नातेवाइकांपासून ताटातूट झालेली, बॉंबहल्ला सारखा होत असलेला, ब्लॅकआउट, आगी, बॉंबहल्ल्याने उद्ध्वस्त झालेली घरे व कारखाने पाहून मनावर दडपण आलेले, अन्नवस्त्राच्या तुटवड्याने किमान खासगी सुखसोईही नाहीशा झालेल्या, अशा अवस्थेत ब्रिटिश जनतेने... "बेचिराख होऊ, पण पारतंत्र्य स्वीकारणार नाही..." या एकाच ईर्षेने स्वतःच्या सुखसोईंची व कष्टांची पर्वा न करता अविरत काम करून राष्ट्राच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंचे उत्पादन वाढत्या प्रमाणात चालू ठेवले.




### गरजा कमी करून संरक्षणशक्ती वाढविली

आपल्या नेहमीच्या गरजा कमी करून राष्ट्राची सर्व उत्पादनशक्ती संरक्षणकार्यार्थ इंग्लंडने राबविली व दुसऱ्या महायुद्धातील सर्व राष्ट्रांमध्ये अगदी थोड्याच काळात राष्ट्राची उत्पादनक्षमता संरक्षणकार्यार्थ राबविण्यात व त्याचप्रमाणे ब्रिटिश जनतेने आपल्या नेहमीच्या आवश्यक वस्तूंचा वापर जास्तीत जास्त कमी करून

जगात जवळजवळ उच्चांक गाठला. राष्ट्राची उत्पादनशक्ती संरक्षणकार्यार्थ वाढत्या प्रमाणात कशी वापरली गेली, हे त्यांच्या पुढील आकडयांवरून दिसून येईल. १९३८ साली राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त शेकडा ६ टक्के खर्च संरक्षणावर होत होता. १९३९ साली हे प्रमाण १४ टक्यांवर गेले. १९४० साली हे वाढूनही फक्त २० टक्क्यांवरच होते. पण त्यानंतर मात्र उत्पादनशक्तीचा फार मोठ्या प्रमाणावर संरक्षणकार्यासाठी विनियोग झाला व चार वर्षांनंतर १९४४ साली राष्ट्रीय उत्पन्नाच्या शेकडा ५५ टक्के भाग युद्धाकार्यासाठी खर्चण्यात येत होता. देशातील उत्पादनही कसे वाढले, याचे खालील आकडे उद्‌बोधक आहेत :–

| संरक्षणाची शस्त्रे | वार्षिक उत्पादन | |
|---|---|---|
| | १९३९ ची शेवटची तिमाही | युद्धकाळी उच्चांक |
| मशिनगन्स | २९,२०० | १०४,८०० |
| सबमशिनगन्स | नाही | १,५७२,००० |
| रणगाडे | १,२०० | ८,६०० |
| वाहतुकीच्या किंवा चिलखती गाडया | २,५०० | २४,४०० |
| छोटी शस्त्रे (आकडे दशलक्षांचे) | ४५ | ३,०४६ |
| तोफगोळे (आकडे दशलक्षांचे) | ७·००८ | ५९·००४ |
| विनाशिका व जहाजे (आकडे टनांत) | ८९,००० | ३४६,००० |
| बाँब (आकडे हजार टनांत) | १८ | ४५८ |
| विमानांची इंजिने | १८,१०० | ६३,३०० |
| विमान-दुरुस्ती | जवळजवळ नाही | ४५,४०० |
| विमाने (आकडे दशलक्ष टनांत) | ४५ | २२३ |

वर दिलेले उत्पादनाचे उच्चांक एकाच वेळी प्रस्थापित केलेले नसून, १९४० ते ४४ या काळातील एखाद्या वर्षीचे हे आकडे आहेत. युद्धाचे स्वरूप जसजसे पालटत होते, त्याप्रमाणे संरक्षणासाठी लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन कमीजास्त केले जात होते व उत्पादनामधील अग्रक्रमातही त्याचप्रमाणे फेरबदल केले जात होते.

उत्पादनवाढीचे हे आकडे थक्क करणारे आहेत, त्यात मुळीच शंका नाही आणि ही सर्व वाढ अनेक संकटांना व अडचणींना तोंड देत देत झाली असल्याने इंग्लंडमधील कारखानदार, सरकार व कामगार यांच्याबद्दल प्रशंसेशिवाय दुसरा उद्‌गार निघत नाही!

पण हे सर्व कसे झाले? इंग्लंडमधील कारखानदारांनी शांततेच्या काळातील आपले उत्पादन सोडून इतक्या थोडया काळात संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर शस्त्रे निर्माण करण्याची तयारी कशी केली? कामगारांनी अनेक हालअपेष्टांना


"रणी झुंजले झुंज झुंजार योद्धे
ऋणी देश गर्जे नमस्ते नमस्ते"
आपल्या देशाला नवें वर्ष
पराक्रमाचें आणि यशाचें जावो
किर्लोस्कर
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी, जि. सांगली.
STUSA

तोंड देत राष्ट्रासाठी अविरत श्रम कसे केले? कच्च्या मालाचा अपुरेपणा, माणसांची अपुरी संख्या, बाँबहल्ल्यामुळे कारखाने, यंत्रे यांचा सतत चाललेला विध्वंस, या सर्वांना तोंड देऊन ब्रिटिश सरकारने ही उत्पादनवाढ कशी घडवून आणली? हा साराच रोमांचकारी इतिहास वाचताना ब्रिटिश नागरिकांची छाती अभिमानाने भरून येईल, यात नवल नाही; पण तिन्हाईत माणूसदेखील या इतिहासाचे बारकाईने अवलोकन करताना ब्रिटिश जनतेच्या निष्ठेपुढे, त्यांच्या चिकाटीपुढे, त्यांच्या देशप्रेमापुढे व त्याचप्रमाणे ब्रिटिश सरकारच्या खंबीर, दूरदर्शी व मुत्सद्दी नेतृत्वापुढे नतमस्तक झाल्याशिवाय राहणार नाहीं!

दुर्दैवाने आज भारतावरही अशीच पाळी आली असून, भारतीय जनतेच्या देशप्रेमाची व भारतीय सरकारच्या नेतृत्वाची एक मोठी कसोटी लागलेली आहे. अशा प्रसंगी इंग्लंडने अडचणींना तोंड कसे दिले व त्यातून मार्ग कसा काढला, त्यांनी कोणती धोरणे अवलंबिली, याचे अवलोकन करणे खास उचित ठरेल.

## मनुष्यबलाची कमतरता

नेहमीच्या व्यवसायातून मोकळे करून राष्ट्रातल्या नागरिकांना युद्धप्रयत्नासाठी राबते करणे, ही एक अवघड गोष्ट आहे. त्यातही सैन्यासाठी लागणाऱ्या तरुण सैनिकांचा सतत मोठ्या प्रमाणावर पुरवठा करणे, देशातील कारखान्यांतून उत्पादन चालू ठेवण्यासाठी लागणारे तंत्रज्ञ व कामगार हे कमी पडत नाहीत, हे पाहणे व तावडतोब नवे शिक्षण देऊन नवे सैनिक, कामगार व तंत्रज्ञ तयार करणे या साऱ्या गोष्टी एकदम व द्रुतगतीने कराव्या लागतात. भूदल, नाविकदल व हवाईदल यांतील सैनिकांच्या प्रश्नाप्रमाणेच कारखान्यांतील कामगारांचा प्रश्नही इंग्लंडपुढे तेवढचाच महत्त्वाचा होता. शिवाय, सारखा बाँबहल्ला होत असल्यामुळे उत्पादनाचे केंद्रीकरण करणे अशक्य व धोक्याचे होते व त्यामुळे देशात ठिकठिकाणी उत्पादन विखुरलेले होते. त्यामुळे तर माणसांची संख्या आणखी जास्त लागत होती. यासाठी काम करण्याची वयोमर्यादा वाढविण्यात आली. स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर कामावर बोलविण्यात आले. कामाच्या वेळा आठवड्यातील ४० तासांवरून ५२ तासांपर्यंत वाढविण्यात आल्या. देशातील युद्धसामग्रीच्या उत्पादनासाठी इतर उत्पादनकार्यांत गुंतलेल्या किंवा इतर धंद्यांत वा व्यावसायांत गुंतलेल्या कामगारांना कामावर घेण्यात आले. इतर प्रकारचे उत्पादन पुष्कळ प्रमाणात कमी झाले व काहींचे अजीबात बंदही झाले. यासाठी सरकारने वेळोवेळी कायदे करून व त्यात प्रसंगानुसार दुरुस्त्या सुचवून कोणत्या वयातील कामगारांना कामावर घ्यावयाचे, त्याने काम कोठे करावयाचे, इत्यादीसंबंधी सर्व अधिकार आपल्याकडे घेतले. ज्या कारखान्यांतून युद्धोत्पादन केले जात होते, त्यांतील कित्येकांना त्या पद्धतीचे उत्पादन करण्याचा सराव नव्हता. त्यामुळे सुरवातीला उत्पादन फार सावकाश होत असे व त्यातही बऱ्याच अडचणी येत. तेव्हा ज्यांना अशा कामाचा सराव होता, त्यांच्या-

संपूर्णतया हिंदुस्थानात बनविलेले

# डायमंड टॅक्सी व ऑटो रिक्षा मीटर्स

श्रीनगर, जम्मू, दिल्ली, पाटणा, धनबाद,
जमशेटपूर, हजारीबाग, कलकत्ता, हैदराबाद,
अहमदाबाद, पुणे, मुंबई, मंगलोर, बंगलोर,
मद्रास, मदुराई, त्रिची, कोइंबतूर, कालिकत,
अर्नाकुलम्, त्रिवेंद्रम इत्यादी शहरी वापरत आहेत.

ऑटो रिक्षांना मीटर्स बसविण्यास पुणे व कोल्हापूर येथे सुरवात झाली.

# डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,

रजि. ऑफीस : ११८० बुधवार पेठ, पुणे २.

सोल सेलिंग एजंटस् : मे. आनंद ट्रेडर्स, पुणे.

**धंद्याच्या वाढीकरिता**
**किमान रु. १०० किंवा त्याच्या पटीत**
**मुदतीच्या ठेवी स्वीकारतो.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुदत | १ वर्षे | : | व्याज | ७ टक्के |
| | २ वर्षे | : | ,, | ८ टक्के |
| | ३ वर्षे | : | ,, | ९ टक्के |

माहितीपत्रक व अर्जाचा फॉर्म मागविल्यास पाठवितो

कडून तांत्रिक सल्ला मिळण्याची सोय करण्यात आली "प्रॉडक्शन एक्स्चेंजेस" म्हणून ही सुरवात झाली व पुढे याचेच मिनिस्ट्री ऑफ प्रॉडक्शनमध्ये रूपांतर झाले. त्याचप्रमाणे इंजिनीअरिंगच्या प्रत्येक विभागात वाढत्या प्रमाणात तांत्रिक माणसे लागत होती व त्यांचा तुटवडा पडू लागला. यासाठी प्रथम अशा तंत्रज्ञांसाठी एकमेकांत स्पर्धा लागू नये, अशी तरतूद सरकारने केली. त्यांचा पुरेपूर उपयोग होईल व ते नुसते "राखीव" स्वरूपाचे राहणार नाहीत, याची काळजी घेतली. भराभर शिक्षण देऊन नवे तंत्रज्ञ निर्माण केले व त्यांना वाढते पगार देऊन तंत्रज्ञांच्या जागांसाठी नव्यांना आकर्षित केले.

युद्धाचे स्वरूप जसे वाढत चालले, तसे संरक्षण–कायद्यात योग्य ती दुरुस्ती करून मजूरखात्याकडे इंग्लंडमधील कोणत्याही नागरिकास कोणतेही काम सांगण्याचा अधिकार देण्यात आला. यांत लहानमोठे, स्त्रिया व पुरुष असा कोणताही भेदभाव केलेला नव्हता. ५१ वयापर्यंत पुरुषांना लष्करी नोकरी सक्तीची केली व २० ते ३१ वयातील स्त्रियांना केव्हाही कामासाठी बोलविण्याचा अधिकार सरकारने घेतला. अशा स्त्रियांना नागरी संरक्षण, ऑक्झिलियरी फोर्स किंवा काही ठराविक उद्योगधंदे यांतून काम करण्याचा पर्याय देण्यात येई.

## महिलांची युद्धातील कामगिरी

परंतु कायद्यापेक्षा इंग्लंडमधील तरुणांनी, वृद्धांनी, स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे राष्ट्रासाठी जी कामगिरी केली, ती पाहण्यासारखी आहे. पेन्शन घेतल्यानंतरही पुनः युद्धासाठी कारखान्यांतून व कचेऱ्यांतून काम करणाऱ्या वृद्धांची संख्या जवळजवळ दहा लाख होती. कारखान्यांतून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या १३ लाखांवरून ४१ लाखांपर्यंत गेली. इंग्लंडमधील एकंदर अविवाहित महिलांपैकी जवळजवळ ९० टक्के महिला व अपत्यविरहित अशा एकंदर विवाहित महिलांपैकी ८० टक्के महिला देशासाठी कारखान्यांतून कम करीत होत्या व त्याखेरीज ज्या स्त्रियांना घरची जबाबदारी होती, अशा सुमारे ९ लाख स्त्रिया घरची कामे सांभाळून अर्धवेळ कारखान्यांतून काम करीत असत. सुमारे साडेतीन लाख स्त्रियांनी नागरी संरक्षणाची आघाडी सांभाळली. आतापर्यंत इंजिनीअरिंग उद्योगधंदा पुरुषांचाच होता, पण हे क्षेत्रही स्त्रियांनी काबीज केले. मोठी अवजड कामे पुरुषांकडे देण्यात आली व स्त्रियांसाठी साधी कामे दिली गेली. अशा साध्या (रिपिटिटिव्ह जॉब्स) कामासाठी आवश्यक त्या प्रकारची यंत्रेही बनविण्यात आली. थोड्याच काळात इंजिनीअरिंग, दारूगोळा, रणगाडे, विमाने, रसायने या सर्व क्षेत्रांत स्त्रियांनी वाढत्या प्रमाणात शिरकाव करून घेतला. दारूगोळा व शस्त्रास्त्रे निर्मितीच्या कारखान्यांत तर कामगारांच्या एकंदर ३६ टक्के स्त्रियाच कामावर होत्या !

युद्धकालात जशी गरज भासेल, त्याप्रमाणे कामगारांना देशाच्या एका भागापासून दुसऱ्या भागाकडे हलविण्यात येत होते. महिलांच्या बाबतीत हा फार मोठा प्रश्न

होता. यासाठी ठिकठिकाणी नॅशनल होस्टेले बांधण्यात आली व त्यांची व्यवस्था पाहण्यासाठी नॅशनल हॉस्टेल सर्व्हिस कॉर्पोरेशन स्थापण्यात आले. देशात युद्धकालात अशी एकंदर ५९ औद्योगिक होस्टेल्स बांधून तेथे स्त्रियांची राहण्याची सोय करण्यात आली. याशिवाय खाणींत काम करण्यासाठी भरती केलेल्या बेव्हिन बॉइजसाठी आणखी ६० वसतिगृहे बांधण्यात आली होती. या वसतिगृहांतून सुमारे ७०,००० लोकांची राहण्याची सोय करण्यात आली होती.

## कच्च्या मालाचा तुटवडा

माणसांच्या प्रश्नाबरोबरच युद्धोपयोगी वस्तूंच्या उत्पादनाला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरेसा पुरवठा करणे, ही एक कठीण गोष्ट होती. १९३९ पूर्वी पहिल्या महायुद्धाचा अनुभव लक्षात घेऊन तांबे, पितळ, जस्त इत्यादी अलोह धातू व लोकर, कापूस इत्यादी वस्तूंचा पुरेसा पुरवठा करण्याची सोय ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अमेरिका इत्यादी देशांशी करार करून करण्यात आली होती. या देशांतून माल आणण्यात काही अडचणी येतील व मालवाहू जहाजांचा तुटवडा पडेल, अशी फारशी कल्पना काही केली गेली नव्हती. पण १९४० साली फ्रान्सचा पाडाव झाल्यानंतर सारेच चित्र बदलले. युरोपमधील लाकूड, कच्चे लोखंड, फॉस्फेट, प्लॅक्स, कागदासाठी लागणारा कच्चा माल या वतूंची इंग्लंडमध्ये फार मोठ्या प्रमाणावर (सुमारे ७५ ते ९० टक्के) आयात केली जात असे; पण युरोप-मधील देश एकामागून एक जर्मनांच्या हाती पडल्यावर याच वस्तू फार दूरच्या देशांतून आयात करणे इंग्लंडला भाग पडले. कॅनडाहून प्लॅक्स, इजिप्त, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडहून लाकूड व फॉस्फेटस्, उत्तर अमेरिकेहून कागद व आफ्रिकेहून कच्चे लोखंड आयात करण्याची ताबडतोब व्यवस्था करावी लागली. डिसेंबर, १९४१ मध्ये पर्ल हार्बर प्रकरणानंतर कच्च्या मालाच्या पुरवठ्याची पूर्वेतील बरीचशी केंद्रे जपान्यांच्या हाती गेली व इंग्लंडची आणखी पंचाईत झाली. जगातील रबराच्या एकंदर उत्पादनापैकी ९० टक्के मॅनिला, हेम्पचे १०० टक्के, टिनचे ६० टक्के व रेशमाचे ८० टक्के उत्पादन जपानी लोकांच्या हाती पडले.

त्यामुळे कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, पूर्व ऑफ्रिका व भारत यांच्याकडून कच्चा माल व इतर आवश्यक वस्तू वाढत्या प्रमाणावर खरेदी करण्याशिवाय इंग्लंडला गत्यंतर उरले नाही. अमेरिकेकडून या काळात सुमारे ३२ कोटी पौंड किमतीचा कच्चा माल इंग्लंडला पुरविण्यात आला. यासाठी अमेरिका, इंग्लंड व इतर राष्ट्रे यांचे एक 'कंबाइन्ड रॉ मटिरिअल्स बोर्ड' निर्माण करण्यात आले व या बोर्डातर्फे कोणास कोणत्या कच्च्या मालाची जरूरी आहे, त्यांपैकी जास्तीत जास्त उत्पादन कोणते राष्ट्र करू शकेल, याचा निर्णय घेऊन तो कच्चा माल तेथे पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली. प्रत्येक राष्ट्राने कोणता माल पुरवावा व कोणत्या प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन करावे, हेही साधारणपणे ठरविण्यात आले.

## अजोड कल्पकता

याचबरोबर हा माल देशात आणण्यासाठी व त्याचे योग्य वाटप करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता निर्माण झाली. हे काम उत्पादन-मंत्रालयाकडेच देण्यात आले व उत्पादनाबरोबरच ह्या खात्याकडे प्रचंड प्रमाणावर व्यापारही आला. १९४५ पर्यंत ह्या खात्याने सुमारे २१० कोटी पौंड मालाचा पुरवठा केला. हे एक-प्रकारे उत्पादन-साधनांचे राष्ट्रीयीकरणच होते व परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारला उत्पादनाची सर्व साधने आपल्या हाती ठेवणे व त्याचे योग्य प्रकारे नियोजन करणे अत्यावश्यक होते. परंतु राष्ट्राच्या ताब्यात ही साधने जाऊनही प्रसंगी खासगी कारखानदारालाही लाजवील, अशी चतुरता सरकारी अधिकाऱ्यांनी दाखवून पुढे आलेल्या अडचणी कल्पकतेने सोडविल्या. या संबंधात एक–दोन गोष्टींचा येथे उल्लेख करणे जरूर वाटते. १९३९ पर्यंत फ्रान्स व बेल्जियममधून इंग्लंड डायमंड डाइजची सुमारे ९० टक्के आयात करीत असे. विमाने, टँक, रेडिओ यांना लागणाऱ्या व्हॉल्व्हसाठी व दिव्यासाठी लागणाऱ्या बारीक तारा तयार करण्यासाठी या डाइजची अतिशय आवश्यकता असे. यांपैकी काही डाइजमधील छिद्रे एका इंचाच्या ४/१००००० किंवा मानवी केसाच्या १/६ इतकी बारीक असत. फ्रान्स व बेल्जियम येथील उत्पादकांनी हे डाइज-उत्पादन करण्याचे तंत्र अतिशय गुप्त ठेवले होते. फ्रान्सच्या पाडावानंतर हे डाइज मिळणे कठीण झाले. त्यातून अनेक धोके पत्करून जर्मनांच्या कडक पहाऱ्यातून फ्रान्समधून चोरट्या मार्गाने काही डाइज आणले गेले. पण हा मार्ग काही कायमचा नव्हता. तेव्हा इंग्लंडमधील दोघा डाइजच्या उत्पादकांना आपले उत्पादन पाचपटींनी वाढविण्यास सांगण्यात आले. वायर ड्रॉइंगच्या कारखान्यांना लागणारे डाइज स्वतः तयार करण्यास उत्तेजन देण्यात आले. त्यासाठी खास शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली व संशोधनासही उत्तेजन देण्यात आले. एका इलेक्ट्रिकल कंपनीला या संशोधनात यशही आले व तिने हे डाइज तयार करण्यासाठी व जुने डाइज पॉलिश करण्यासाठी एक छोटेसे मशीनही तयार केले. अशा प्रकारे १९४४ पर्यंत इंग्लंडने देशातील डाइजची मागणी


**सुप्रसिद्ध पाय रेडिओ**

रोखीने व सुलभ हप्त्याने

अधिकृत विक्रेते

**कल्याण केंद्र**

वाजीराव रोड, पुणे २ फोन ५७७६२

तर पुरविलीच, पण त्यांची निर्यात करून अमेरिका, कानडा व इंग्लंडच्या वसाहतींची मागणीही पुरविली.

डी. डी. टी. चे संशोधन हे या बाबतीतील दुसरे उदाहरण म्हणून देता येईल. पूर्वेकडे युद्धाची आघाडी सुरू झाल्यानंतर कीटकनाशक द्रव्ये ही दारूगोळयाइतकीच महत्त्वाची आहेत, हे इंग्लंडला कळून आले. तेव्हा कृत्रिम कीटकनाशक द्रव्य शोधून काढण्यासाठी व विशेषत: वापरत असताना माणसाला काही अपाय होणार नाही, असे द्रव्य शोधण्यासाठी इंग्लंडने फार मोठ्या प्रमाणावर संशोधनकार्य हाती घेतले. विद्यापीठे, दवाखाने, संशोधनशाळा, सरकारी संबंधित खाती, खासगी कंपन्या या सर्वांनी हे संशोधन हाती घेतले व इकडे संशोधनात थोडीशी प्रगती होत आहे, असे दिसताच ताबडतोब १९४३ साली डी. डी. टी. चे वार्षिक १०० टन उत्पादन होईल, असा कारखाना उभारण्याचाही निर्णय घेतला व त्याची कामेही द्रुतगतीने सुरू झाली. सुदैवाने हे संशोधन यशस्वी झाले व ताबडतोब मोठ्या प्रमाणात डी. डी. टी. उत्पादनास सुरवात झाली. १९४५ साली इंग्लंडचे डी. डी. टी. चे वार्षिक ५००० टन उत्पादन होते. कीटकनाशक म्हणून डी. डी. टी. चा आता जगभर मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो.

### देशातील मालाची उत्पादनवाढ

परदेशांतून मोठ्या प्रमाणावर कच्चा माल आयात करण्याबरोबरच देशातल्या देशात होत असलेल्या कच्च्या मालाचे वाढत्या प्रमाणावर उत्पादन हाती घेतले. कच्च्या लोखंडाचे उत्पादन १ कोटी १० लाखांवरून १ कोटी ९५ लाख टनांपर्यंत वाढले. त्याचप्रमाणे लाकूड, फ्लॅक्स या वस्तूंचे उत्पादन वाढविण्यात आले, पण इंग्लंडमध्ये या प्रकारच्या उत्पादनवाढीस भौगोलिक मर्यादाच पडलेल्या असल्याने फार काही करणे शक्य नव्हते.

### कच्च्या मालाचा काळजीपूर्वक वापर

पण या अशा मालाचा जास्तीत जास्त काळजीपूर्वक योग्य उपयोग करून, नासाडी न करता इंग्लंडने युद्धाला लागणाऱ्या कच्च्या मालाची बचत केली. युद्धोपयोगी

दीपावली शुभचिंतन !

**स्वस्तिक प्लॅस्टिक प्रॉडक्टस्**

५१३ शनिवार पेठ, मेहुणपुरा, पुणे २

फोन– ५६७८२ : तार– "प्लॅस्टिकस्," पुणे शहर

मॅन्युफॅक्चरर्स ऑफ्

इंडस्ट्रिअल आयटेम्स् अॅण्ड प्लॅस्टिक पार्टस् फॉर

मेडिकल, इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंट

वस्तूंखेरीज इतर उत्पादनांत अशा वस्तू वापरण्यास बंदी केली. जिथे शक्य असेल तेथे दुसरा पर्यायी माल वापरला किंवा कमी प्रतीचा माल वापरला आणि अशा मालांत बचत केली. वाया जाणाऱ्या मालाचा नीट उपयोग व्हावा म्हणून सरकारने "इंडस्ट्रियल साल्व्हेज ग्रुप स्कीम" काढली. या योजनेप्रमाणे सुमारे १०,००० कारखान्यांनी ३०० गट बनविले होते. या योजनेखाली एका विभागातील कारखानदारांचा एक गट बनविण्यात येत असे. तेथे कारखानदार एकमेकांच्या प्रश्नांची व अडचणींची चर्चा करीत व एकमेकांपुढील अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करीत. त्यांना सोडविता न आलेले प्रश्न ते सरकारी संशोधनालयाकडे सोपवीत व त्यांच्यामार्फत हे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात. या अशा गटांवर सरकारची काही बंधने नव्हती.

या योजनेमुळे कारखान्यांचा फार मोठा फायदा झाला. पूर्वी ते आपल्या कारखान्यांतील जो माल कचरा म्हणून टाकून देत, त्याचा दुसरे कारखाने आपला कच्चा माल म्हणून उपयोग करू लागले व पर्यायाने देशातील कच्च्या मालाचा तुटवडा कमी करण्यास त्यांचा हातभार लागू लागला. यासंबंधीची अनेक उदाहरणे देता येतील. त्याचप्रमाणे या योजनेमुळे एकमेकांशी तांत्रिक विषयावर देवाणघेवाण होऊ लागली व तांत्रिक प्रश्न सोडविण्यासही या गटांची बरीच मदत झाली.

औद्योगिक कच्च्या मालाचा पुरेपूर उपयोग व्हावा म्हणून सरकारने अनेक निर्बंध घातले. उदाहरणार्थ, वुड पलपच्या आयातीऐवजी देशातील रद्दी कागदाचा पुरेपूर उपयोग करून घेण्याचे सरकारने ठरविले व बसचे तिकीट टाकून देणे, हादेखील कायद्याने गुन्हा ठरविला. अशा तऱ्हेने युद्धकाळात सुमारे ४२ लाख टन रद्दी कागद गोळा केला गेला. त्याचप्रमाणे जुन्या टायरपासून रबर काढण्यात येऊ लागले. टिनचे वाया गेलेले डबे पुन: घेऊन त्याचे टिन वापरण्यास सुरवात केली. फार काय, लोखंड व पोलाद यांचा तुटवडा पडू लागल्यामुळे सार्वजनिक उद्याने व खासगी बंगले यांच्यापुढे शोभेसाठी लावलेले गर्डर्स, लोखंडी दारे इत्यादी वस्तू काढून नेण्यात आल्या व त्या वितळवून पुन: उपयोगात आणल्या. अशा प्रकारे सुमारे ६ लाख टन वाया गेलेले लोखंड मिळविण्यात आले.


दीपावली अभीष्ट चिंतन !

**मे. सारडा लिथो प्रेस**

५१३ शनवार पेठ, मेहुणपुरा, पुणे २.

फोन :– ५६७८२

## कंट्रोल व रेशनिंग

युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनावर सर्व लक्ष केंद्रित करण्यासाठी नागरी वस्तूंच्या उत्पादनावर सर्व प्रकारची बंधने आली व ह्या उत्पादनशक्तीचा युद्धोपयोगी वस्तूंच्या उत्पादनाकडे उपयोग करण्यात आला. नागरी वस्तूंचे उत्पादन कमी झाल्यामुळे व बाहेरून नागरी वस्तूंची आयातही बंद झाल्यामुळे सर्व नागरिकांना अन्न, वस्त्र व इतर गरजेच्या वस्तू समान प्रमाणात मिळण्यासाठी रेशनिंग करण्यात आले.

प्रथम व्यापारावर नियंत्रण आणून किरकोळ व्यापाऱ्यांना त्यांच्या युद्धापूर्वीच्या व्यापाराच्या फक्त ७५ टक्के माल देण्यात आला. पुढे हे प्रमाण आणखी बरेच कमी करण्यात आले. अशा तऱ्हेने वाचलेला माल निर्यात करून युद्धाच्या आयातीच्या खर्चाची तरतूद करण्याचा बेत होता. त्याचप्रमाणे व्यापारातून लोकांनी बाहेर पडावे व उत्पादन व युद्धकार्य यात त्यांचा उपयोग व्हावा, असाही हेतू त्यामागे होता. याच पद्धतीने निरनिराळ्या १६ प्रकारच्या यंत्रांची एक यादी सरकारने प्रसिद्ध केली व परवान्याशिवाय ही यंत्रे विकणे किंवा विकत घेणे, हे बेकायदा ठरविले. यामुळे इंजिनीअरिंगच्या कारखान्यांना बाहेरची मागणी कमी झाली व अशा कारखान्यांची उत्पादनशक्ती सरकारला युद्धकार्याला वापरता आली. त्याचप्रमाणे सरकारी कायद्यान्वये नागरी वस्तूंचे व विशेषतः चैनीच्या वस्तूंचे उत्पादन २५ टक्के ते ५० टक्के कमी करून अशा कारखान्यांतील उत्पादनशक्ती युद्धोत्पादनासाठी वापरण्यात आली. ही उत्पादनशक्ती अशा तऱ्हेनेच वापरली जावी, म्हणून बोर्ड ऑफ ट्रेड, मिनिस्ट्री ऑफ लेबर व सप्लाय डिपार्टमेंट यांची खास यंत्रणा उभी केली. त्यायोगे ज्या कारखान्यांत अशी जादा उत्पादनशक्ती असेल, तेथेच संरक्षणखात्याच्या ऑर्डरी जाऊ लागल्या. पुढे पुढे काही वस्तूंचे उत्पादन संपूर्णपणे बंद केले गेले व या वस्तूंच्या काही ठराविक प्रकारांचेच उत्पादन करण्याची सक्ती करण्यात येऊन इतर उत्पादनावर बंदी घालण्यात आली.

## चैनीच्या व सुखसोईंच्या वस्तूंत कपात

सारी उत्पादनशक्ती युद्धोपयोगी वस्तूंच्या उत्पादनाकडे एकवटली असल्याने

दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे जावो !
जयको ब्रॅण्ड – कलप्लास्ट (बॅग्ज्)
पॉलिथिन बॅग्ज् – ट्युबिग्ज् व शीटिंग्ज्
सर्व साईजमध्ये माफक दरांत मिळतील ★ भेटा अगर लिहा.
कल्पना प्लॅस्टिक इंडस्ट्रीज
२०१३ इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे १३ — फोन ८७१२९
हेड् ऑफिस–१३६० भवानी पेठ, पुणे २ — फोन २४००८

नागरिकांना नेहमीच्या वस्तू मिळणे अर्थातच अशक्य होते. ब्रिटिश नागरिकांना अनेक वस्तूंचा त्याग करावा लागला. सर्व चैनीच्या व सुखसोईंच्या वस्तू नाहीशा झाल्या. मोटारी, मोटारसायकल्स, रबर–बूट, रेडिओ, रेफ्रिजरेटर, पियानो, टेनिस-बॉल, घड्याळे, खुर्च्या व गालिचे, अशा कितीतरी वस्तूंचे उत्पादनच थांबविण्यात आल्यामुळे या वस्तू नागरिकांना मिळणे शक्यच नव्हते. नागरी वस्तूंचा वापर युद्धकाळात किती प्रमाणात कमी झाला होता व नागरिकांना त्यामुळे किती गैरसोई सोसाव्या लागल्या असतील, याची थोडीशी कल्पना खालील आकड्यांवरून येईल.

### देशातील एकंदर उत्पादन

| | १९३५ | १९४३ |
|---|---|---|
| | (आकडे दशलक्षांचे) | |
| बूट-जोड्या | १६१ | ९० |
| पायमोजे | ३९० | २४० |
| खुर्च्या | २·७ | ०·१ |
| लोकरीचे ब्लँकेटस् | ६·५ | २·२ |
| गालिचे व रग्ज | ३४ | १·५ |
| फाउंटन पेन्स | ९ | २ |
| | (आकडे हजारांत) | |
| मोटारी | २८० | नाही |
| सायकली | १६०० | २४० |
| रेडिओ | १९०० | ५० |

या झाल्या चैनीच्या किंवा सुखसोईंच्या वस्तू; पण अन्न व खाण्याच्या आवश्यक वस्तूंचा पुरवठाही पुष्कळ कमी केलेला होता. चॉकलेट किंवा गोड पदार्थ यांवर


**माणूस** यापुढचा अंक : १ डिसेंबर १९६५
किंमत तीस पैसे

**या अंकात --**

- दिवाळी अंकासाठी योजलेली, परंतु काही कारणास्तव या अंकात जाऊ न शकलेली **लता मंगेशकर यांची सत्यजित रे यांच्यासंबंधीची खास मुलाखत**
- **शिलंगणाचे सोने :** ब. मो. पुरंदरे यांच्या कथेचा उत्तरार्ध
- **नाझी भस्मासुर :** पुढील हप्ता

कडक रेशनिंग होते. आइस्क्रीम तर अजीवात बंद झाले होते. फळफळावळ तर क्वचितच मिळे. एका लेखकाने सुमारे सहा वर्षांनंतर मला केळी पाहायला मिळाली, असे लिहिले आहे ! इंग्लंडमधील प्रत्येक माणसाच्या दर आठवड्याच्या सरासरी आहाराचे खालील आकडे पाहिल्यानंतर अन्न–वस्तूंतही किती कपात झाली होती, याची कल्पना येते.

**ब्रिटिश नागरिकाचा दर आठवड्याचा सरासरी आहार**

| | १९३४–३८ | १९४३ |
|---|---|---|
| लोणी (औंस) | ७·६३ | २·३४ |
| ताजी अंडी | ३·२६ | १·४५ |
| ताजे मास (औंस) | ३०·०४ | २२·१८ |
| मासा (औंस) | ६·५२ | ४·५६ |
| साखर (औंस) | ३०.५८ | २०·०० |
| फळफळावळ (औंस) | २७·१७ | १२·०६ |

अशा तऱ्हेने ब्रिटिश नागरिकांनी स्वत: वस्त्रे, अन्न व आवश्यक वस्तू यांचा वापर कमी करून राष्ट्राच्या आणीबाणीच्या प्रसंगी आवश्यक वस्तूंच्या तुडवड्याचा प्रश्न सोडविण्यास मदत केली.

### उत्पादनाचे केंद्रीकरण

सरकारने नागरी वस्तूंच्या उत्पादनावर नियंत्रण घालून किंवा त्यांना कच्चा मालच मुळात कमी देऊन त्यांचे उत्पादन कमी केले, पण याबरोबर दुसरा प्रश्न निर्माण झाला. युद्धापूर्वी अशा नागरी वस्तू उत्पादन करणारे अनेक कारखाने होते. आता या वस्तू फार थोड्या प्रमाणात उत्पादन करण्याचे ठरल्यावर हे सर्व कारखाने चालू ठेवावयाचे का यांतील फक्त काहीच चालू ठेवावयाचे, हा एक प्रश्न होता. पूर्वीच्या उत्पादनाच्या कितीतरी पटीने उत्पादन कमी करावे लागल्यामुळे कमी प्रमाणात उत्पादन चालू ठेवणेही या कारखान्यांना आर्थिकदृष्ट्या तोटयाचे होते. तेव्हा सरकारने उत्पादनाचे केंद्रीकरण करण्याचे धोरण स्वीकारले व अशा नागरी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या एकंदर कारखान्यांपैकी आवश्यक असेल, त्याप्रमाण एक किंवा दोन कारखान्यांनी आपली संपूर्ण उत्पादनशक्ती उपयोगात आणून पूर्ण उत्पादन करावे व त्या वस्तूंच्या इतर कारखानदारांनी आपले कारखाने बंद करावेत, असा निर्णय घेतला. बंद केलेल्या कारखान्यांना युद्ध संपताच पुन: कारखाना सुरू करता येईल, अशी हमी देण्यात आली. कारखाना बंद केल्याच्या काळात नुकसानभरपाई देण्यात आली व अशा कारखान्यांची यंत्रे चांगल्या अवस्थेत राहतील व त्यांची निगा राखली जाईल, याचीही व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे

ज्या कारखान्यात उत्पादन केंद्रित करावयाचे, अशांना कच्चा माल भरपूर मिळेल, अशी तरतूद करण्यात आली. त्यांच्या कामगारांना संरक्षण देण्यात आले व असे कारखाने सरकार ताब्यात घेणार नाही, याची हमी देण्यात आली. या योजनेचा दोन प्रकारे फायदा करून घेण्यात आला. एक बंद झालेल्या कारखान्यांतील व उत्पादन चालू ठेवणाऱ्या कारखान्यांतील तरुण कामगारांना सैन्यात किंवा संरक्षणाला लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनात गुंतविण्यात आले व चालू कारखान्यांना फक्त वयस्कर कामगारांना कामावर घेण्याची सक्ती करण्यात आली. याचबरोबरीने बंद झालेल्या कारखान्याची जागा दारूगोळा, शस्त्रास्त्रे ठेवण्यासाठी किंवा संरक्षणोपयोगी उत्पादनासाठी उपयोगात आणली गेली.

हा जरी सरकारी निर्णय असला, तरी शक्यतो सरकारने अशा कारखान्यांच्या संगनमताने कोणते कारखाने चालू ठेवावयाचे व कोणते बंद करावयाचे, याचा निर्णय घेतला. अनेकवेळा अशा कारखान्यांनाच हा निर्णय घेऊन सरकारला कळविण्यास सांगण्यात आले. नुकसानभरपाईचा प्रश्नही अशाच पद्धतीने सोडविण्यात आला. काही चालू कारखान्यांनी आपल्या उत्पादनापैकी काही उत्पादन आपल्या बंद कारखानदार बंधूंसाठी केले व हे उत्पादन त्यांच्या एजंटांमार्फत विकण्यासाठी त्यांच्या हवाली करण्यात आले. काही ठिकाणी उत्पादन चालू असलेल्या कारखानदारांनी स्वतःच्या नफ्यातील काही वाटा देऊन एक फंड तयार केला व त्यांतून बंद असलेल्या कारखानदारांना त्यांच्या यंत्रांची निगा राखण्यासाठी रक्कम देण्यात आली. कोणते कामगार संरक्षण–वस्तूंच्या उत्पादनासाठी द्यावयाचे व कोणते कामगार दुसऱ्या कारखान्यांत पाठवावयाचे, यासंबंधीचे निर्णयही कामगार व कारखानदार यांच्या समित्या नेमून त्यांच्यामार्फत घेण्यात आले. सरकारने ही योजना कशी अमलात आणावी, यासंबंधी संपूर्ण नियमावली तयार केली नव्हती. फक्त याची तत्त्वे मात्र प्रसिद्ध केली होती. त्यामुळे ठिकठिकाणी ही योजना निरनिराळ्या स्वरूपात अमलात आणली गेली व या योजनेला कारखानदारांनी स्वयंस्फूर्त पद्धतीने फार चांगले सहकार्य दिले. ही योजना कापड, होजिअरी, पॉटरी, बूट, पेन्सिली, फर्निचर, सौंदर्यप्रसाधने इत्यादी वस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांना लागू करण्यात आली व या योजनेखाली युद्धकाळात सुमारे ३५०० कारखाने बंद करण्यात आले.

## लहान उद्योगधंद्यांची कामगिरी

ब्रिटनमधील लहान वर्कशॉप व लहान कारखाने यांनी युद्धोत्पादनाच्या बाबतीत केलेल्या कामगिरीचाही उल्लेख करणे जरूर आहे. युद्धकाळी इंग्लंडमध्ये सुमारे २,३०,००० लहानमोठे कारखाने होते. त्यांतील सुमारे ८० टक्के कारखाने लहान प्रमाणावर होते व देशभर विखुरलेले होते. युद्धोत्पादनाची देशाची हाक ऐकताच या कारखानदारांनी तावडतोब युद्धकार्याला लागणाऱ्या लहानमोठ्या वस्तूंचे

व सुटया भागांचे उत्पादन हाती घेतले. या लहान कारखान्यांना मोठ्या कारखा-न्यांपेक्षा ही गोष्ट झटपट करता आली. त्यांच्याकडे फारशी अवजड गुंतागुंतीची व विशेष कामाची अशी मशिनरी नसल्यामुळे, आहे त्या यंत्रांच्या सहाय्याने, शक्य असेल त्या वस्तूंचे उत्पादन तावडतोब सुरू करणे त्यांना शक्य झाले. संरक्षण-खात्यानेही अशा कारखानदारांच्या पूर्वीच्या उत्पादनाशी मिळतेजुळते असलेले कामच शक्यतो त्यांना दिले. त्यामुळे त्यांच्या उत्पादनव्यवस्थेत फारसा बदल करणे त्यांना आवश्यक पडले नाही. या लहान कारखानदारांनी उत्पादन वाढविण्यासाठी एकमे-कांशी फार चांगले सहकार्य केले. त्यांनीही लहान–मोठे गट करून एकमेकांना यंत्रे दिली. आवश्यक कच्चा माल उसना दिला व प्रसंगी आपल्याकडील तंत्रज्ञही दिले. काही ठिकाणी यंत्रे, कच्चा माल व तंत्रज्ञ यांचा वापर एकत्र पद्धतीनेही ( जॉईंट पूल ) करण्यात आला. सर्वांपुढे ध्येय एकच होते–संरक्षणासाठी जास्तीत जास्त शस्त्रास्त्रांचे व आवश्यक वस्तूंचे उत्पादन वाढविणे !

कारखान्यांसाठी पुरेशी जागा नसताना जागा कशी उपयोगात आणली, हेही पाहणे आवश्यक ठरेल. तुरुंगाच्या कोठडया रिकाम्या करून तेथे विमानांना लाग-णाऱ्या भागाचे उत्पादन सुरू करण्यात आले. पार्लमेंटच्या इमारतीच्या एका भागात व देशातील लहानमोठ्या गॅरेजमधून लहानमोठे कारखाने चालविण्यात आले. एका माणसाने आपल्या घरातील जिन्याखाली यंत्र वसवून त्यावर $\frac{१}{१०००}$ इंच इतके बारकाईचे काम केले ! दुसऱ्या एका माणसाने सिनेमा थिएटरातील प्रॉजेक्शन खोलीला लागून असलेल्या व्हरांडयात एक लहान यंत्र बसवून दोन शोमधील वेळात काम करून यंत्रांना लागणारे सुटे भाग बनविले. ज्या महिलांना घराबाहेर पडून काम करणे शक्य नव्हते, अशा महिलांनी आपआपल्या भागांतील महिलांचे गट करून घरोघरी छोटी यंत्रे बसवून व त्यांवर लहानमोठे सुटे भाग तयार करून देशाच्या उत्पादनवाढीला हातभार लावला.

हे लहान उद्योगधंदे देशातील सर्व भागांत विखुरले असल्याने जर्मनांच्या बॉंब-हल्ल्याला तोंड देऊनही उत्पादनवाढीत खंड पडला नाही. एकाच ठिकाणी केंद्रित झालेले कारखाने एकदम बॉंबहल्ल्याच्या भक्ष्यस्थानी पडले व उत्पादनात फार मोठा खंड पडला, असे फारसे झाले नाही.

## कारखान्यांवरील बॉंबहल्ला

शत्रूंच्या विमानांचा सारखा बॉंबहल्ला चालू असल्यामुळे बॉंबहल्ला, स्फोट, आग यांमुळे उद्ध्वस्त झालेला कारखाना ताबडतोब दुरुस्त करणे व उत्पादनात खंड पडू न देणे हे आवश्यक होते. युद्धोपयोगी वस्तू तयार करणाऱ्या कारखान्यावर बॉंबहल्ला होऊन नुकसान झाल्याची सुमारे १२००० केसेसची नोंद युद्धकाळात झाली आहे. याचबरोबर एखाद्या शहरावर बॉंबहल्ला झाल्यामुळे तेथील पाणीपुरवठा, वीजपुरवठा इत्यादी आवश्यक गोष्टींमध्ये व्यत्यय येई व त्यामुळे कारखान्याच्या

उत्पादनात खंड पडे. या सर्वांना तोंड देण्यासाठी व बाँबहल्लयानंतर कारखान्याचा पडलेला भाग बाजूला करून तात्पुरती दुरुस्ती करणे, वीज, गॅस पाणी, टेलिफोन, यांचा पुरवठा पूर्ववत चालू करणे इत्यादी गोष्टींसाठी 'इमर्जन्सी सर्व्हिस ऑर्गनायझेशन' नावाची स्वतंत्र संस्था अस्तित्वात आणण्यात आली. यासाठी देशाच्या निरनिराळ्या विभागांत कारखानदारांच्या सहकार्याने पुनर्रचना समित्या नेमण्यात आल्या व या समित्यांवर इंजिनीअर, कारखानदार, बांधकामतज्ज्ञ, सरकारी अधिकारी घेण्यात आले. या अशा समित्यांवर सुमारे ३००० तज्ज्ञ विनावेतन काम करीत होते व पुनर्रचनेला लागणारा आवश्यक तो सल्ला त्यांच्याकडून मिळत होता. इमर्जन्सी सर्व्हिस ऑर्गनायझेशनकडे ताबडतोब बांधकाम करण्याचे सर्व अधिकार देण्यात आले व बांधकामाला उपयोगी पडावे म्हणून देशात ठिकठिकाणी बांधकामाला लागणाऱ्या साहित्याचा भरपूर साठाही ठेवण्यात आला. या संघटनेतर्फे हा साठा ताबडतोब उपलब्ध करून देण्यात येई. तज्ज्ञांच्या समितीचा यासंबंधी सल्ला घेण्यात येई व त्या कारखान्यातील कामगारांच्या सहाय्याने ताबडतोब आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येई.

या यंत्रणेबरोबरच बाँबहल्ला किंवा स्फोट कुठे झाला आहे, हे या संघटनेला कळण्यासाठी, देशभर अशा गोष्टी ताबडतोब या संघटनेला कळविण्यासाठी माणसांची नियुक्ती करण्यात आली होती. बाँबहल्लयाने कोणत्या कारखान्याला धक्का पोचला आहे, हे ताबडतोब ही माणसे सदर संघटनेला कळवीत व ताबडतोब ह्या संघटनेची माणसे, उत्पादनखात्याची माणसे, त्या खात्याचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी तिकडे धावून जात. ह्या बातम्या ताबडतोब सर्वसंबंधितांना कळविता याव्यात, म्हणून देशात निरनिराळ्या ठिकाणी कचेऱ्या उघडण्यात आल्या होत्या व तेथे रात्रंदिवस टेलिफोन, बिनतारी संदेश या सहाय्याने कामे चालत असत.

## कारखान्यांना भांडवलपुरवठा

नेहमीचे उत्पादन सोडून युद्धोपयोगी वस्तूंचे उत्पादन हाती घेताना अर्थातच या बदलासाठी नवे भांडवल मोठ्या प्रमाणावर कारखान्यांना लागत होते. त्याचबरोबरीने खेळते भांडवल व उत्पादन चालू ठेवताना येणाऱ्या काही आकस्मिक आर्थिक अडचणी यांसाठीही कारखान्यांच्या आर्थिक गरजा भागविणे आवश्यक होते.

शस्त्रास्त्रे व युद्धोपयोगी वस्तू यांच्या उत्पादनासाठी कारखान्याची जी वाढ करावी लागली, त्यासाठी जेथे शक्य असेल तेथे कारखान्यांनी आपण होऊन भांडवली खर्च केला; पण हा खर्च फार मोठ्या प्रमाणावर आवश्यक असल्याने सरकारनेही याचा बराचसा भाग उचलला. अनेक ठिकाणी संपूर्ण कारखान्याने किंवा कारखान्यांना नव्या शेड्स, नव्या इमारती सरकारने बांधून दिल्या व त्यांतील यंत्रे, उपकरणे सर्व गोष्टी सरकारने कारखानदारांना उपलब्ध करून दिल्या. अर्थातच अशा इमा-

रती व यंत्रे यांची मालकी सरकारचीच होती, पण जेथे कारखानदारांनी या इमारती व यंत्रे विकत घेण्याची इच्छा दर्शविली, तेथे ती त्यांना विकण्यात आली. ही रक्कम युद्ध संपल्यानंतर किंवा शक्य असेल तर युद्धकालातच सवडीने घेण्यात आली.

कारखान्यांतून जास्तीत जास्त पाळ्या चालवून काम चालविणे आवश्यक असल्याने पूर्वीपेक्षा कितीतरी पटींनी कामगार कामावर घ्यावे लागले. त्यांचा खर्च वाढला. त्याचबरोबरीने कारखानदार व कामगार शस्त्रास्त्रांच्या उत्पादनात सरावलेले नव्हते व उत्पादनाची काही निश्चिती नव्हती. अनेकवेळा मूळ डिझाईन बदलले जात असे व युद्धाच्या गरजेप्रमाणे उत्पादनातही तावडतोब फरक पडत असे. त्यामुळे भरपूर आर्थिक तरतुदीची व त्याचप्रमाणे ही मदत देताना लवचिक नियमांचीही जरूर होती. यासाठी सरकारतर्फे दोन उपाय योजण्यात आले. कच्च्या मालाची, लहानमोठ्या सुट्या भागांची सरकारतर्फे मोठ्या प्रमाणावर खरेदी करून, ते काहीही पैसे न घेता कारखानदारांना देण्यात आले व अशा तऱ्हेने आर्थिक देवघेव कमी करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष उत्पादनात जशी प्रगती होत असे, त्याप्रमाणे प्रत्यक्ष उत्पादनासाठी झालेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कम तावडतोब सरकारतर्फे देण्याची सोय करण्यात आली. उत्पादनावर देखरेख ठेवण्यासाठी व मालाच्या योग्यायोग्यतेची परीक्षा करण्यासाठी सरकारी अधिकारी निरनिराळ्या कारखान्यांतून असल्यामुळे उत्पादनावर कारखानदाराने किती खर्च केला आहे, हे कळणे सोपे होते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांनी शिफारस केल्यानंतर तावडतोब ही रक्कम देण्यात येई.

जेथे ही रक्कम अपुरी पडे, तेथे ही रक्कम ठरलेल्या किमतीपेक्षाही वाढत्या दराने किंवा उत्पादन पुरे होण्याच्या आधीही देण्यात येई. याशिवाय बँकांच्या नेहमीच्या व्यवहारात हस्तक्षेप केला जाणार नाही, याचीही दक्षता घेण्यात आली. बँकांचा उद्योगधंद्यांशी असलेला संबंध पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आला.

पण जेथे कारखान्याचे व्यवस्थापन नीट चालले नाही, किंवा जेथे सारख्या आर्थिक अडचणींमुळे उत्पादनवाढीत अडथळा आला, तेथे सरकारी डायरेक्टर नेमण्यात आले किंवा नुकसानभरपाई देऊन संपूर्ण कारखानेही सरकारने ताब्यात घेतले.

## युद्धकाळातील बँकांचे व्यवहार

बाँबहल्ल्यांमुळे बँकांच्या निरनिराळ्या शाखांतील महत्त्वाची कागदपत्रे, लोकांच्या खात्यांतील हिशेब, आवश्यक ती माहिती नाहीशी होऊन देशात गोंधळ माजण्याची फार मोठी भीती होती. यासाठी ब्रिटिश बँकांनी 'शॅडो ब्रँचेस' सुरू केल्या. या योजनेप्रमाणे बँकांच्या प्रत्येक शाखेची देशात दुसरीकडे एक 'शॅडो ब्रँच' असे. या शाखेत मूळ कचेऱ्यांतील सर्व कागदपत्रांच्या नकला, लोकांच्या हिशेबाच्या वह्यांच्या नकला ठेवलेल्या असत. त्याचप्रमाणे रोज त्या त्या खात्यांतून जे व्यवहार होत, त्याचीही तावडतोब तिकडे नोंद केली जाई. त्यामुळे या शॅडो ब्रँचमध्ये मूळ

जनरीत ओळखा

अफगाण स्नो
वापरून
नवलाईच्या
सुंदर विश्वात
प्रवेश करा




# अफगाण स्नो

सौन्दर्य प्रसाधने

ई. एस्. पाटनवाला, मुंबई ७७.

शाखेतील सर्व रेकॉर्ड, हिशेब, महत्त्वाची माहिती रोजच्या रोज जमा झालेली असे. बाँबहल्ल्याने यांपैकी एकाही शाखेला धोका झाला, ती शाखा उद्ध्वस्त झाली, तरी दुसऱ्या शाखेतून तावडतोब व्यवहार सुरू केले जात. सर्व देवघेवींची तेथे संपूर्ण नोंद असल्यामुळे जुने रेकॉर्ड पुन: तयार करून तावडतोब व्यवहार सुरू करणे कठीण जात नसे. ह्या अशा शाखा मूळ शाखेपासून फार दूर न ठेवता आसपासच्या लोकांना जाता यावे, इतपत अंतरावर ठेवल्या जात. पण दोन्ही शाखा एकदमच नाहीशा होऊ नयेत, इतपत एकमेकांत अंतरही ठेवलेले असे. लंडन व इतर शहरांवरील बाँबहल्ल्यांमुळे शेकडो बँकांच्या शाखा संपूर्णपणे उद्ध्वस्त तरी झाल्या, किंवा तेथे काम करणे अशक्य झाले. लिव्हरपूलवरील बाँबहल्ल्याला एका रात्री एका बँकेच्या पाचीही शाखा बळी पडल्या. शेफील्डमध्येही एका बँकेच्या पाच व दुसऱ्या बँकेच्या दोन शाखा बाँबहल्ल्यामुळे आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या, पण शॅडो ब्रँचच्या योजनेमुळे फारशी गैरसोय न होता तावडतोब पूर्ववत व्यवहार सुरू केले गेले. त्यामुळे बँकांवरील लोकांचा विश्वास युद्धकालातही उडाला नाही. बँकांच्या अधिकाऱ्यांनी फार तत्परतेने व कुशलपणे या आपत्तीला तोंड दिले.

## क्लिअरिंग हाउस

लंडनवर सारखे बाँबहल्ले होत असल्यामुळे क्लिअरिंग हाउसही हलविणे भाग होते. ते हलवून लंडनबाहेर नेण्यात आले व तेथे निरनिराळ्या बँकांचे चेकचे व्यवहार करण्यात आले. लंडनबाहेरील या क्लिअरिंग हाउसमध्ये रोज सुमारे दहा लाख चेक क्लिअर केले जात. त्याचप्रमाणे अनेक बँकांच्या मुख्य कचेऱ्या लंडनपासून दूर नेण्यात आल्या व महत्त्वाचे रेकॉर्ड तिकडे हलविण्यात आले.

सैन्याच्या हालचालीसाठी रोख पैशाचीही फार मोठ्या प्रमाणावर या वेळी आवश्यकता भासली. नोटा, चलनी नाणी यांचा तुटवडा पडू नये म्हणून असा साठा लंडनमध्ये एकत्र न ठेवता देशाच्या निरनिराळ्या भागांत तो साठा पुरेसा ठेवण्याची सोय करण्यात आली. तरी पण अनेकवेळा काही चलनी नाण्यांचा तुटवडा देशाच्या काही भागांत जाणवलाच.

युद्धाच्या सुरवातीस शस्त्रास्त्रे व युद्धसाहित्य यांचे उत्पादन जसजसे खासगी कारखानदारांकडे वाढत्या प्रमाणावर सोपविण्यात आले, त्या वेळी बँकांवर अॅडव्हान्सेससाठी थोडासा ताण पडला. पण पुढे सरकारतर्फे मोठ्या प्रमाणावर कच्चा माल, आवश्यक यंत्रे, यंत्रांना व शस्त्रास्त्रांना लागणारे सुटे भाग यांची खरेदी करून कारखानदारांना पुरविणे सुरू केल्यानंतर बँकांकडून अॅडव्हान्सेस फार मोठ्या प्रमाणावर घेण्याची जरूरी पडली नाही व बँकांवर फार मोठा ताण पडला नाही.

बँकांना इतर क्षेत्रांतल्याप्रमाणेच माणसांच्या तुटवड्याला मात्र तोंड द्यावे लागले. तरुण नोकरवर्गाला सैन्यात जावे लागले, त्यामुळे त्यांच्या जागी स्त्रिया व वयस्कर माणसे यांची भरती करावी लागली. या नव्या माणसांना कामाची पद्धती शिकवून

त्यांना तयार करावे लागले. जबाबदारीच्या माणसांना नोकरीची मुदत संपली तरी त्यांची मुदत वाढवून देऊन त्यांना काम करावयास लावावे लागले. कामाचे तासही वाढविण्यात आले. तरी तांत्रिक स्वरूपाच्या व बँकांच्या व्यवहाराची माहिती असलेल्या माणसांचा फार मोठा तुटवडा जाणवला. महिलांनी मात्र मोठ्या प्रमाणावर बँकांत नोकऱ्या पत्करल्या. बँकांतील एकंदर नोकरांपैकी सुमारे ५० टक्के नोकरवर्गात महिलांचाच भरणा होता.

## कामगार व कारखानदार संबंध

युद्धकालात कारखान्यांतून सुरळीतपणे उत्पादन चालू राहण्यासाठी कामगार व कारखानदार यांचे परस्परसंबंध चांगले असणे व विशेषतः कामगार संतुष्ट असणे जरूरीचे आहे, हे जाणून ब्रिटिश सरकारने त्यासंबंधी योग्य ती पावले उचलली. प्रत्येक कारखान्यात त्यासाठी एक खास अधिकारी नेमण्यात आला व त्याच्याकडे हे काम सोपविण्यात आले. प्रथम प्रथम कामावर गैरहजर राहणाऱ्या कामगारांची संख्या बरीच होती. त्यांची चौकशी करण्यात आली व या कामगारांना कारखान्यात चाललेल्या उत्पादनात काहीही रस नाही, असे दिसून आले. मग उत्पादन वाढविणे हे का आवश्यक आहे, यासंबंधी कामगारांना माहिती देण्याची मोहीम हाती घेण्यात आली. शस्त्रास्त्रांचे काही भाग तयार करणाऱ्या कारखान्यांत हे भाग कशाचे आहेत, याची माहिती देण्यात आली व त्या शस्त्रास्त्रांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. युद्धावर जाऊन आलेल्या सैनिकांची व सेनाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष आघाडीसंबंधी माहिती देणारी व्याख्याने कामगारांसाठी ठेवण्यात आली. युद्धविषयक फिरती प्रदर्शने भरविण्यात आली. भित्तीपत्रके लावण्यात आली व युद्धावरील चित्रपट दाखविण्यात आले. ही सर्व कामे कामागारसंबंध अधिकाऱ्यांकडे देण्यात आली व युद्धासाठी उत्पादनवाढ करणे आवश्यक आहे, हे कामगारांच्या मनावर बिंबविण्यात आले. या सर्वांचा परिणाम होऊन कारखान्यांतील उपस्थिती सुधारली.

याचबरोबरीने कामगार–कल्याणाच्या योजनाही हाती घेऊन त्या अमलात आणल्या गेल्या. जेथे घरे नाहीत, अशा ठिकाणी कामगारांची बदली केल्यास तेथे त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यांसाठी वसतिगृहे बांधण्यात आली. अशा वसतिगृहांतून खेळण्याची, वाचनाची व करमणुकीची सोयही करण्यात आली. कामगारांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून त्यांच्यासाठी दवाखाने, डॉक्टर यांची संख्या वाढविण्यात आली. आई-वडील दुसरीकडे कामाला गेल्यानंतर लहान मुलांच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये, म्हणून त्यांच्यासाठी जादा शाळा काढण्यात आल्या. स्त्रिया नोकरीवर गेल्यानंतर त्यांच्या लहान मुलांना सांभाळण्याची व्यवस्था केली गेली.

## उपसंहार

ब्रिटिश सरकारने निर्माण झालेल्या नवनव्या परिस्थितीस तोंड देण्यासाठी घेतलेले झटपट निर्णय व केवळ नियमांवर बोट ठेवून न चालता, अंतिम उद्देश साध्य

करण्यासाठी या निर्णयांची ब्रिटिश सरकारी अधिकाऱ्यांनी लवचिकपणे केलेली अंमलबजावणी, या दोन गोष्टींशिवाय इतक्या झटपट संपूर्ण अर्थव्यवस्था युद्धप्रवण करून हरएक बाबनीत प्रयत्नांचा उच्चांक करणे, ही गोष्ट केवळ अशक्य आहे. सध्या भारतात जनतेने युद्धप्रयत्नासाठी कोणतीही गोष्ट करण्याची तयारी दर्शवली आहे. कामगार व कारखानदार यांनी युद्धोत्पादनासाठी आपले सर्व श्रम व सर्व यंत्रणा राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. देशातील अंतर्गत वादविवाद विसरून जाऊन सव जनता खंबीरपणे सरकारच्या मागे उभी आहे. देशाची प्रकृती निकोप आहे, हे पुनः एकवार जनतेने सिद्ध केले आहे. सुदैवाने सरकारी धोरणात निश्चय व ठामपणाही दिसतो आहे. इतर देशांच्या मदतीवर अवलंबून न राहता, किंवा दुसऱ्यांच्या सहाय्याची अपेक्षा न करता स्वावलंबनाने नव्या संकटाला तोंड देण्याची जिद्द उत्पन्न झाली आहे. गेल्या अठरा वर्षांत देशात अनेक तऱ्हेचे कारखाने निघाले आहेत. अनेक वस्तूंचे उत्पादन आपल्या देशात आज होत आहे. ही सारी उत्पादनशक्ती संरक्षणकार्यासाठी व आवश्यक मालाच्या उत्पादनासाठी कार्यरत केली, तर आपल्याही देशाला इंग्लंडसारखा चमत्कार सहज करून दाखविता येईल ! ● ● ●

## सुमारे एक महिन्याच्या दौऱ्यासाठी



'नायक्रोम मेटल वर्क्स'चे श्री. विनायक रामचंद्र परांजपे दि. २६ ऑक्टोबरला रात्री मुंबईहून विमानाने प्रयाण करीत आहेत.

ऑस्ट्रियातील (जर्मनी) साल्झबर्ग येथील एका कंपनीच्या सहकार्याने संरक्षण-साहित्य-उत्पादनातील काही महत्त्वाची यंत्रसामग्री त्यांनी पुणे येथील आपल्या कारखान्यात तयार केली असून या संबंधात अधिक पाहाणी करणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.

संरक्षण सामग्रीबाबत देश अधिकाधिक स्वयंपूर्ण व्हावा या प्रयत्नातील आपला वाटा श्री. परांजपे उचलीत आहेत, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

त्यांचा प्रवास सुखकर व फलदायी ठरो.

—संपादक

[ दोन पत्रे : पृष्ठ ५ वरून चालू ]

unit चे २ अधिकारी व ८ जवान जखमी झाले. दोघंही अधिकारी लगेच मेले. जवान Hospital मध्ये आहेत. संध्याकाळी साधारण साडेसात वाजता आम्ही आमच्या बांधावरची जागा सोडली व जवळजवळ दोन मैल मागं जाऊन एका जागी एकत्रित झालो. तिथं गरम जेवण व drinks घेतली. म्हणजे जवळजवळ तब्बल अडतीस तासांनी पोटात अन्न गेलं. commanding Officer नं सांगितलं, की 'A' Platoon ज्या ठिकाणाहून परत आलो, तिथं आपण attack ला जाणार आहोत. तिथे पूल व पुलाजवळ एक टेकडी आहे. माझी Company पुलावर कब्जा करणार होती व दुसरी Company टेकडीवर कब्जा करणार होती. मी माझ्या rifle Company चा Platoon Commander होतो. आता attack ला जाणार म्हणजे...........

थोडी रम घेतली व मार्च केला...... Tank रस्त्याच्या मध्यभागी खडा होता. आम्ही रस्त्याच्या खाली उतरलो व परत वर येऊन attack केला. त्यामुळे त्या लोकांना सावरायला वेळच मिळाला नाही व आमचा 'राजा रामचंद्र की जय' च्या आरोळ्यांनी त्यांचं धाबंच दणाणलं व ते मिळेल त्या रस्त्यानं धावत सुटले. परिणाम म्हणजे आम्ही ६० जणांनी जवळजवळ २०० जणांना पळवून लावले. त्यांच्या Tanks वर चाल करून ते 'बरबाद' करून टाकले व त्यांच्या आतील बाजूस हॅन्डग्रेनेडस् टाकले. शत्रू जेव्हा पळून गेला, तेव्हा त्यांनी पूल तोडून टाकला व नदीच्या पलीकडून Tanks व artillery नं fire करायला सुरवात केली. आम्ही पहाटे पाचला पूल काबीज केला; ते सायंकाळी पाचपर्यंत सतत fire होत राहिलं, आमची पण हानी झाली. संध्याकाळी सातला आमची बदली झाली. आम्ही मागं येऊन एका बांधावर राहिलो. आमच्या unit ला फक्त एवढा पूलच काबीज करण्याची order होती, त्याप्रमाणे आम्ही काम केलं. मग शत्रू पळून गेला.

आता पुलाच्या पलीकडे अडीच–तीन मैल लांब शत्रूच्या चारपाच guns आहेत. बाकी infantry कुठंच दिसत नाही.

आम्हाला Air Force नं फार मदत केली. त्यांचे दोन–तीन Tanks व Petrol drums जाळले. आता लढाई जिंकल्यावर आमच्या unit च्या दोन Platoons बाहेर पाठविल्या व आमच्या Platoon नं एवढी सर्व जागा अडवून धरलीय. आता कधी कधी Shelling होतं. म्हणजे तासाभरात पंधरा मिनिटं, बाकी पंचेचाळीस मिनिटं शांतच !

आम्ही चार Officers एकाच Company मध्ये आहोत. आता दोन्हीवेळा

मेसकडून जेवण येतं. नळ जवळच आहे, त्यामुळं दिवसातून दोनदा आंघोळ करतो. मस्तपैकी गप्पा होतात. पूर्वीच पत्ते आणले होते. कधी कधी पत्ते खेळत बसतो; पण हे सर्व खंदकाशेजारीच. जरा bomb चा आवाज झाला, की कानोसा घेतो, की Shell कुठं पडणार. जर जवळपास पडेल, असं वाटलं तर लगेच खंदकात dive नाहीतर खेळ चालूच. आता जवानांना इतकं चांगलं train केलंय, की ते न घाबरता वर बसून बघतात, की bomb कुठं पडतोय. अशी ही हकीकत आहे.

News तर आम्हाला radio वरच कळतात. मला युद्धावर जाण्याची खूप इच्छा होती; ती आयूबखानांनी पूर्ण केली. परवाच आयूबमहाराज म्हणे कुठं तरी बोलले की 'आम्ही युद्ध थांबवणार नाही. एक तर जिंकू किंवा मरू?' पण आपली ज्या पद्धतीने प्रगती चाललीय ती पाहून मला दुसरीच गोष्ट खरी होईलसं दिसतंय्.

मला 'महाराष्ट्र टाइम्स' चा एक अंक मिळाला होता, पण नंतर पत्ता नाही, काय झालं त्याचं. कुठंतरी गेला असेल, मिळेल.

मी दिवाळीला सुट्टी घेऊन यायचा विचार करतोय.


तुमचा


**श्रीकांत**

बावीस तारखेला एक तार आली, की Lt. S. N. REGE is seriously wounded. He is admitted to Amritsar hospital.

*

आणि पंचवीस तारखेला दुसरी तार आली – We regret to inform you–Lt. S. N. Rege passed away due to serious wounds at Amritsar hospital.





साखर कारखान्याची यंत्र-सामग्री, बॉयलर्सची जोडणी, उभारणी व विद्युतीकरणाची कामे स्वीकारतो, उत्तम प्रकारे पार पाडतो. लोखंडी खिडक्या, दारे, सरकती दारे व 'विश्वास' रोल अप् शटर्स व रोल अप् ग्रिलस यांचे उत्पादक.

# नायक्रोम मेटल वर्क्स

४६ वेलस्ली रोड, संगम, पुणे १.

फोन : २४२८७ ]

[ तार : नायक्रोम, पुणे

MANOOS (Fortnightly) : 15 Oct. 1965 : 125 Paise : Regd. No. B 9304


# दीपावली
# शुभचिंतन

आमचे हितचिंतकांस, ठेवीदारांस, भागधारकास, कामगारबंधूस व व्यापारी मित्रांस ही दिपावली व नूतन वर्ष सुखाचे व भरभराटीचे जावो.

**स्वस्तिक** रबर प्रॉडक्टस् लि.
पुणे ३

PARKERSON/SRP/27-65.

**: स्वस्तिकची काही प्रमुख उत्पादने :**

इंजेक्शन बॉटल कॅप्स्, गम बूटस्, चप्पल्स, होज पाईप्स, इंडस्ट्रियल अ‍ॅण्ड ऑटो रबर पार्टस्, ऑईल सील्स, रबर व पी. व्ही. सी. केबल्स, सर्जिकल व इंडस्ट्रियल ग्लोव्हज्, खोडरबरे, रबर अ‍ॅडेसिव्हज्, संरक्षणविषयक साहित्य इ.

**: संकल्पित नवी उत्पादने :**

कॅनव्हास शूज व इतर पादत्राणे.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**